(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)

पृ.शी. : "प्रो कब्बडी लीग" बाबत श्री.एकल यांची झालेली फसवणूक

मु.शी. : "प्रो कब्बडी लीग" बाबत श्री.एकल यांची झालेली फसवणूक यासंबंधी श्री.विनायक मेटे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भारतामध्ये क्रिकेट हा खेळ लोकप्रिय असणे, यामुळे भारतीय परंपरेचे खेळ लोप पावत जाणे, आय.पी.एल.क्रिकेटच्या धर्तीवर "प्रो कब्बडी लीगची" संकल्पना श्री.अभिषेक दिनकर एकल व श्री.संतोष काशिद यांनी तयार करणे, ही संकल्पना अंमलात आणण्याकरिता "श्री स्वामी समर्थ क्रीडा मंडळ" ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत करणे, या प्रकल्पाची माहिती संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांना व सभासदांना असणे, ही संकल्पना मुंबई शहर असोशिएशन, वडाळा यांना योग्य त्या प्रस्तावासहीत सादर करणे, त्यांना हा प्रस्ताव आवडणे व त्याप्रमाणे त्यांनी जयपूरला पाठवणे, तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी श्री.किशोर पाटील, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य व कब्बडी असोशिएशनचे सहकार्याध्यक्ष विश्वास मोरे यांना लक्ष घालायला सांगणे, सदरील संकल्पनेची पूर्ण माहिती श्री.मोरे यांना श्री. अभिषेक एकल व काशिद यांच्याकडून ईमेल द्वारे घेणे व मेल मिळाल्याचे कन्फर्मेशन त्यांना कळवणे, परंतू त्यानंतर दिनांक 13 मार्च, 2014 रोजी नामवंत कॉर्पोरेटनी हा प्रोजेक्ट सरदार वल्लभभाई पटेल स्टेडीयम, वरळी येथे "प्रो कब्बडी लीग" या नावाने लाँच करणे, यामध्ये श्री.एकल यांची झालेली फसवणूक लक्षात येणे, त्यांनी सदरील सर्व कॉर्पोरेटशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करणे, परंतू त्यांना जाणून बुजून टाळण्यात येणे, याबाबत श्री.एकल यांनी भोईवाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करणे, परंतू अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, यामुळे त्यांची झालेली फसवणूक, पोलीसांनी कोणतीही न केलेली कारवाई व चौकशी, याबाबत शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

SRR/ 09:30

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातील उत्तर चुकीचे आणि अपूर्ण आहे. मला मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, त्यांना उत्तरात काही दुरुस्ती करावयाची आहे का, नसेल तर काय चुकले आहे, हे मी सांगतो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, निवेदन वितरित केल्याप्रमाणेच आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, शासनाच्या वतीने, पोलीस विभागाच्या वतीने एवढे धडधडीत खोटे उत्तर दिले जाते, याचे मला आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, निवेदनाच्या दुसऱ्या परिच्छेदात असे नमूद केले आहे की, "या गुन्ह्याबाबत फिर्यादीने महानगर दंडाधिकारी, 29 वे न्यायालय, दादर, मुंबई यांचेकडे फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 156 (3) प्रमाणे तक्रार दाखल केली होती....." पण उच्च न्यायालयात 15 फेब्रुवारी पासून आजतागायत केस सुरु आहे, हे गृह विभागाला दिसलेले नाही. हे काय आहे ? दिनांक 5 फेब्रुवारी पासून उच्च न्यायालयामध्ये हे प्रकरण आहे. त्याचा उल्लेख शासनाने निवेदनात का केला नाही, याचा खुलासा अगोदर मंत्री महोदयांनी करावा. त्यानंतर मी उप प्रश्न विचारतो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, निवेदनात अपूर्ण माहिती दिली असल्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी केला आहे. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असू शकते. परंतु, ती चुकीचे आहे, असे आपल्याला म्हणता येणार नाही. माहिती अपूर्ण असेल आणि सन्माननीय सदस्यांनी ती निदर्शनास आणून दिली तर.....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माहिती मुद्दाम लपवून ठेवण्याचा हा प्रकार आहे. सुरुवातीपासून ही माहिती दडवून ठेवण्याचा विभागाचा प्रयत्न आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी हे मान्य करतो की, सन्माननीय सदस्यांना असे वाटत असेल आणि त्यांनी सभागृहात केलेले कथन सत्य आहे, असे समजून, माहिती अपूर्ण आहे, असे गृहित धरून, पूर्ण माहिती दिली नसेल तर त्याबाबत चौकशी करू तसेच इंटेनशनली कोणी माहिती अपुरी ठेवण्याचा प्रयत्न केला असेल तर प्रचलित पध्दतीनुसार त्यांच्यावर कारवाई करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना मी धन्यवाद देतो. सदर विषयाची पार्श्वभूमी सांगण्यासाठी कृपया आपण मला दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. ज्याप्रमाणे क्रिकेटची आयपीएल संपूर्ण जगभरात गाजली, तसाच हा प्रकार आहे. कबड्डी हा खेळ सन 1938 पासून सुरु असून देशाला आणि जगाला महाराष्ट्राने दिलेली ही खेळाची देणगी आहे. सध्या कबड्डीला मोठे स्वरुप आले आहे. या खेळाला चांगल्या पध्दतीने पुढे घेऊन जावे, यासाठी आपल्या महाराष्ट्रातील काही मुलांनी एक नवीन संकल्पना राबविण्याचे ठरविले. या संकल्पनेला 'प्रो-कबड्डी', असे म्हटले जाते. ही संकल्पना घेऊन ते तत्कालीन उप मुख्यमंत्री यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी नंतर श्री.किशोर पाटील आणि श्री.विश्वास मोरे यांना सांगितले. त्यांनी या मुलांबरोबर 4-5 महिने काम केले. ती संकल्पना समजून घेतली, मॅचेस कशा घ्यायच्या, या बाबतचा तपशील ठरविला आणि ती संकल्पना ज्या मुलांनी शोधून काढली त्यांना सोडून ही संकल्पना दुसऱ्यांनाच विकून टाकण्याचे काम केले. या संकल्पनेबाबत त्यांना काहीही माहिती नव्हती. परंतु, संकल्पना तयार करणाऱ्यांना पूर्णपणे वाऱ्यावर सोडले. त्यानंतर या मराठी मुलांनी प्रचंड पाठपुरावा केल्यानंतर सुध्दा त्यांनी दाद दिली नाही. उलट श्री.विश्वास मोरे या माणसाने त्या ठिकाणी जाऊन दुसऱ्याला ही संकल्पना विकली आणि त्यामध्ये स्वत: चिफ को-ऑर्डिनेटर झाले. जे लोक यामध्ये सहभागी झाले आहेत, ते मोठमोठे लोक आहेत. यामध्ये एकूण 8 संघ आहेत. अनेक लोक सहभागी झाले आहेत. श्री.विश्वास मोरे सह कार्यवाह, मुंबई, श्री.पियुष पांडे, सल्लागार, श्री.देवराज चतुर्वेदी, श्री.विनय चोरमल, श्री.चारु शर्मा, श्री.राजु लुथ्रा, श्री.महिंद्रा आणि रोमा बलवाणी या सर्वांच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल झाले आहेत. त्यानंतर दिनांक 20 एप्रिल, 2014 रोजी तक्रार दाखल केली. गुन्हे मात्र दिनांक 25 सप्टेंबर, 2014 रोजी दाखल करण्यात आले. दरम्यानच्या काळात पोलिसांनी डीसीपी, वरचे अधिकारी, विधी खात्याचे अधिकारी यांचे अभिप्राय घेतले. कारण, त्यांना हे प्रकरण लांबवायचे होते, सर्व बाजूला ठेवायचे होते. परंतु, या मुलांनी पाठपुरावा केल्याने ते शक्य झाले नाही. त्यामुळे सायबर क्राईम, चोरी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे गुन्हे दाखल झाले. परंतु, 25 सप्टेंबरपासून आजतागायत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

आय.ओ., अे.सी.पी., डी.सी.पी. यांनी याबाबत कोणतीही चौकशी केली नाही. उलट हे अधिकारी याबाबतची माहितीच देत नव्हते. याचे महत्वाचे कारण असे आहे की, मी आपल्याला आयपीएलचे उदाहरण दिले. गेल्या वर्षी प्रो-कबड्डीमध्ये 300 ते 350 कोटी रुपयांचा टर्न ओव्हर झाला आणि या वर्षी तो 1000 कोटी रुपयांचा झाला आहे. यामध्ये 8 संघ आहेत. कबड्डी हा खेळ मुळात महाराष्ट्राचा असताना त्यामध्ये महाराष्ट्राची जास्त मुले नाहीत. बाकीचे सर्व लोक फायदे घेत आहेत. दुर्दैवाचा भाग असा आहे की, मराठी लोकांना बाजूला ठेऊन पोलीस त्या लोकांना सहकार्य करीत आहेत. हा गुन्हा समरी करावा म्हणून त्यांच्यावर दबाव आणीत आहेत, प्रकरण बाजूला ठेवीत आहेत. हे प्रकरण आता उच्च न्यायालयात गेले आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, पोलिसांनी या मुलांना बाजूला ठेवले आहे, पोलिसांनी हलगर्जीपणा केलेला आहे, या मुलांवर अन्याय झाला आहे, त्यांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे पोलीस तपास कधीपर्यंत पूर्ण करणार आहेत ?

सभापती महोदय, भ्रष्टाचार करुन, पैसे घेऊन हा गुन्हा समरी करण्याबाबतचा दबाव पोलीस या मुलांवर आणीत आहेत, असा माझा स्पष्ट आरोप आहे. मी स्वत: पोलीस अधिकाऱ्यांशी बोललो आहे. त्यामुळे पोलीस पैसे घेऊन गुन्हा समरी करण्याबाबत या मुलांवर दबाव आणीत आहेत, हे खरे आहे का ?

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया प्रश्न विचारावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, न्यायालयाने गुन्हेगारांना अटक करु नका, याबाबत स्थगिती दिली आहे. मी प्रश्नच विचारतो आहे. पोलीस पैसे खाऊन समरी करणार नाहीत, असे आदेश आपण त्यांना द्याल का ? मी जाहीपणे सांगतो की, पैसे घेऊन ते असे करीत आहेत. तपास कधी पूर्ण करणार आहात ? हायकोर्टाने त्यांना अटक करु नये, एवढेच सांगितले आहे. ती स्थगिती उठविण्यासाठी आपण काय करणार आहात ? ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्या मुलांना यामध्ये सहभागी करुन घेण्यास सांगणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आयपीएल लिगच्या धर्तीवर प्रो-कबड्डीची संकल्पना तयार झाली आहे. यामध्ये श्री.अभिषेक एकल आणि श्री.संतोष काशिद यांनी होमवर्क केले, असे सन्माननीय सदस्यांचे मत आहे. त्यांनी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनला प्रस्ताव सादर केला आणि त्यांच्याकडून महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष श्री.किशोर पाटील, सह कार्याध्यक्ष श्री.विश्वास मोरे यांना त्यामध्ये लक्ष घालण्यास तत्कालीन उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

त्यांनी श्री.अभिषेक एकल आणि श्री.संतोष काशिद यांच्याकडून ई-मेलद्वारे माहिती घेतली आणि त्याची पोहोच देखील आहे. त्यांच्या तशा मिटिंग झालेल्या आहेत, ते 4-5 महिने एकत्र काम करीत होते, असे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांनी सांगितले. दिनांक 13 मार्च, 2014 रोजी कॉर्पोरेटने सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम वरळी येथे प्रो कबड्डी लीग लॉन्च केले. यामध्ये श्री.एकल यांची फसवणूक झालेली आहे, असे त्यांना वाटते. कॉर्पोरेटने आपल्याला टाळले, कोणतेही पद दिले नाही, कोणतेही स्थान दिले नाही, आमची संकल्पना वापरली. परंतु, याबाबत कलम 156 (3), 420 आणि 34 अन्वये फिर्यादीवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी आणि आरोपी यांच्या विरोधात कोणताही ठोस पुरावा नसल्यामुळे ही प्रकरणे सी-फायनल पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आलेली आहेत. आपण असेही सांगितले की, तक्रार दाखल करण्यास विलंब झाला आणि तक्रार दाखल केल्यानंतर चौकशी करण्यास देखील विलंब झाला. मी सांगू इच्छितो की, याबाबत त्यांचे जे म्हणणे आहे त्याची दखल घेतली जाईल. आमची संकल्पना चोरीला गेरी असे कोणाला वाटत असेल तर प्रचलित कायद्यानुसार पुरावे सादर करावेत. त्यानंतर पोलीस स्टेशनला जो पुढील तपास करावा लागतो, त्याबाबत आम्ही विचार करू.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जुळलेल्या एका खेळाला आज आंतरराष्ट्रीय दर्जा मिळालेला आहे. ज्या व्यक्तीने ही तक्रार केली, ती व्यक्ती मलाही भेटली होती. कारण, मी मागील 15 वर्षापासून मुंबई कबड्डी असोसिएशनचा अध्यक्ष आहे. मी महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचा उपाध्यक्ष असताना ते माझ्याकडे आले होते. त्यांनी श्री.विश्वास मोरे यांच्या संदर्भात जे सांगितले ती माहिती चुकीची आहे. ते महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनवर कधीही नव्हते. ते मुंबई कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह आहेत. त्यामुळे या व्यक्तीने स्वत:ची संकल्पना असल्याचा जो दावा केलेला आहे, त्यांनी ज्या कोणाबरोबर चर्चा केली होती, त्यावेळी त्यांनी मलाही वेळ मागितला होता. परंतु, ही संकल्पना त्या अगोदरच आम्ही स्वत: महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन, मुंबई कबड्डी असोसिएशन, देश पातळीवरील कबड्डी असोसिएशन आणि ऑलम्पिकशी जे संबंधित आहेत त्या सर्वांनी, आता दादा त्याचे अध्यक्ष आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

म्हणून आपल्या सर्वांना अभिमान वाटावयास पाहिजे की, महाराष्ट्राच्या मातीतील गल्ली बोळात हा खेळ खेळला जातो. गरीब विद्यार्थी हा खेळ खेळत असतात. मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून थोडी अधिक माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण, यामध्ये मुंबई कबड्डी असोसिएशनचे नाव आलेले आहे आणि मी त्याचा अध्यक्ष आहे. यामध्ये श्री.विश्वास मोरे यांचे नाव आलेले आहे आणि ते माझे सहकारी आहेत. मी या काळात कबड्डी असोसिएशनचा उपाध्यक्ष होतो. मी सांगू इच्छितो की, त्यांची चौकशी पूर्णतः योग्य रितीने झालेली आहे आणि आपल्या सर्वांना अभिमान वाटावा अशा या खेळाचा दर्जा मोठ्या प्रमाणावर सुधारलेला आहे. जगामध्ये जेवढा वेळ फुटबॉलचे सामने बघितले जातात त्याच्या खालोखाल आज प्रो कबड्डी सामने बघितले जातात, ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. एखाद्या व्यक्तीच्या मनात संकल्पना आली म्हणजे त्यालाच सर्वच सूचले, असे समजून त्याने जे काही केले आहे त्यावर पूर्णतः प्रक्रिया झालेली आहे. कारण, मी स्वतः अध्यक्ष या नात्याने याबाबतची माहिती घेतली होती. या खेळाला प्रोत्साहीत करण्यासाठी प्रो कबड्डीच्या माध्यमातून जी पावले उचलली गेली तशी पावले आणखी उचलली जावीत. उलट प्रो कबड्डीच्या पार्श्वभूमिवर महाकबड्डी देखील सुरु झाली. महाराष्ट्रातील सर्व खेळ तेथे खेळले गेले आणि त्या खेळांना देखील मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली. आज आपल्या सर्व गरीब खेळाडुंना ज्या पद्धतीने सन्मान मिळत आहे, पैसा मिळत आहे, त्याचे आपण स्वागतच करावयास पाहिजे. प्रो कबड्डीमध्ये सर्वात जास्त खेळाडू महाराष्ट्रातील आहेत, हे सांगताना मला अभिमान वाटतो. कारण, हा खेळ खूप जुना आहे आणि आपल्याला त्याचे स्वागतच करणे आवश्यक आहे. मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून ही माहिती दिलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. मी रायगड कबड्डी असोसिएशनचा अध्यक्ष आहे. खरे म्हणजे, ही चर्चा होणे चुकीचे आहे. मी राज्य कबड्डी असोसिएशनचा सदस्य आहे. प्रो कबड्डी लिगचे सामने झाले पाहिजेत. प्रो कबड्डी लिगमध्ये रायगडचे 3 खेळाडू आहेत. आम्ही कोकणात 3 ठिकाणी महाकबड्डी सामने आयोजित केले होते. आम्ही खेड, अलिबाग येथे सामने आयोजित केले होते. ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

चर्चा वेगळ्या मार्गाने नेऊन हा विषय विनाकारण पोलिसांकडे देऊ नये. कबड्डी असोसिएशन निर्णय घेईल, हे मंत्री महोदयांनी सांगावे. कारण, राज्य कबड्डी असोसिएशनला ते अधिकार आहेत. महाराष्ट्र राज्याने देशात आणि जगात कबड्डी नेली. बुवा साळवी यांनी देशात आणि जगात कबड्डी खेळ पोहोचविला. या लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून वेगळी चर्चा होत आहे, वेगळी भूमिका मांडली जात आहे. म्हणून हे प्रकरण येथेच थांबवून ते राज्य कबड्डी असोसिएशनकडे पाठवावे, अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक 2 चर्चेला घेऊ.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. कोणी काय बोलावे, हा त्यांचा विषय आहे.

तालिका सभापती : मंत्री महोदयांनी चौकशी करतो असे सांगितले आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

तालिका सभापती : मी आपल्याला एकच प्रश्न विचारण्याची संधी देतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, असे हेत्वारोप होत आहेत की, जणू काही मी कबड्डीचा दुश्मन आहे. परंतु, असे नाही. आम्ही सुद्धा कबड्डी खेळतो. आम्हाला कबड्डी बाबत चांगली माहिती आहे. मुद्दा असा आहे की, जो आरोप आहे त्याची समरी करण्यापूर्वी ज्यांनी आरोप केला त्यांना अजिबाबत विचारणा करण्यात आली नाही. म्हणून त्यांना विचारणा करुन तुम्ही त्यांची चौकशी करावी. त्यानंतर समरी करावयाचे किंवा कसे, याबाबत निर्णय घ्यावा. परंतु, चौकशी केली पाहिजे आणि शासन ती करणार आहे काय ? चौकशी केल्यानंतर खरे काय आणि खोटे काय, हे कळेल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सदर प्रकरणाबद्दल माहिती घेतली जाईल. फिर्यादी यांनी आरोपी यांच्याबरोबर कोणताही अधिकृत करार झालेला नव्हता, त्याबद्दल कोणताही ठोस पुरावा नाही. मी अगोदरच सांगतले की, सी फायनल केलेले आहे. तरीही सन्माननीय सदस्यांची जी मागणी आहे त्याबद्दल चौकशी केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: परभणी जिल्ह्यातील सोनपेठ पोलीसांनी विठ्ठल हाके या तरुण व्यापाऱ्याकडून लाचेची रक्कम न मिळाल्याने त्याचा मानसिक व शारीरिक छळ करणे

मु.शी.: परभणी जिल्ह्यातील सोनपेठ पोलीसांनी विठ्ठल हाके या तरुण व्यापाऱ्याकडून लाचेची रक्कम न मिळाल्याने त्याचा मानसिक व शारीरिक छळ करणे यासंबंधी सर्वश्री अब्दुल्ला खान दुर्राणी, धनंजय मुंडे, रामराव वडकुते, जयवंतराव जाधव, सतीश चव्हाण, अमरसिंह पंडित यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"परभणी जिल्ह्यातील सोनपेठ पोलीसांनी विठ्ठल हाके या तरुण व्यापाऱ्याकडून लाचेची रक्कम न मिळाल्याने त्याचा मानसिक व शारीरिक छळ करणे, यास अपमानीत होऊन सदर तरुण व्यापाऱ्याने दिनांक 9 जुलै, 2015 रोजी गळफास लावून आत्महत्या करणे,लाचेची पूर्ण रक्कम मिळेपर्यंत पोलीसांनी चक्क मयत विठ्ठल हाके याच्या वडीलांना ओलीस म्हणून डांबून ठेवणे, तरुण व्यापाऱ्याने आत्महत्या करणे, महिन्यापूर्वीच पाथरी, जि.परभणीच्या पोलीसांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून वाघाळा येथील सुवर्णकार व्यापारी रवी टेहरे यांनीही गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडणे, दोन्ही प्रकरणी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द निलंबन व मनुष्यवधास कारणीभूत असल्याप्रकरणी कलम 306 प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची मागणी मयताच्या कुटुंबियांनी करुनही दोषींविरुध्द गुन्हे दाखल न करता पोलीस अधिक्षक, परभणी यांनी दोषी पोलीस अधिकारी कर्मचारी यांना पाठीशी घालणे, न्याय मागण्यासाठी गेलेल्या कुटुंबियांना व जनतेस न्याय न देता सोनपेठ पोलीसांनी डांबून टाकण्याच्या धमक्या दिल्याने संतप्त जनतेच्या भावनांचा उद्रेक होवून तोडफोडीच्या घटना घडणे, पोलीस अधिक्षकांनी परिस्थिती योग्यप्रमाणे न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी.....

हाताळल्याने व दोषींना पाठीशी घातल्यानेच कायदा व सुव्यवस्था बिघडणे, दोषींवर कारवाई करण्याऐवजी निरपराध निर्दोष 400-500 नागरिकांवर खोटे गुन्हे नोंदवून पोलीस दडपशाहीचा प्रकार करणे, अकार्यक्षम असणाऱ्या पोलीस अधिक्षकांच्या कामगिरीमुळे जिल्ह्यात अशा अप्रिय घटनांत वाढ होणे, अकार्यक्षम पोलीस अधिक्षक व दोषी पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचे निलंबन करुन त्यांचेवर कलम 306 प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची मागणी सोनपेठकरांनी तहसिलदार सोनपेठ यांच्याकडे करणे, या प्रकरणी कोणतीही सक्षम कारवाई न झाल्याने बेमुदत सोनपेठ बाजार पेठ बंद व ग्रामपंचायत निवडणूकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात येणे, या गंभीर प्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी : सभापती महोदय, परभणी जिल्ह्यातील पोलिसांच्या छळाला कंटाळून 2 व्यापाऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. दिनांक 9 जुलै, 2015 रोजी विठ्ठल हाके या व्यक्तीने पोलिसांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात या प्रकरणाचा घटनाक्रम दिलेला आहे. श्री.मुरलीधर हाके हे मयत व्यक्तीचे वडील आहेत. पोलिसांनी दिनांक 8 जुलै, 2015 रोजी श्री.मुरलीधर हाके यांच्या घरावर छापा टाकला आणि 11,000 ते 11,500 रुपयांचा गुटखा जप्त केला. त्यांना पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले. त्यांना पोलीस स्टेशनमध्ये डांबून ठेवण्यात आले आणि त्यांच्याकडे 50 हजार रुपयांची मागणी करण्यात आली. त्यांचे वय 70 वर्षे आहे. त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुलाखान दुर्रानी...

त्याने 35 हजार रुपये आणून दिले व त्याला नंतर सोडून दिले, दुसऱ्या दिवशी पोलीस त्याच्या घरी गेले व राहिलेले 15 हजार रुपये दे म्हणून सांगितले. पोलिसांनी विठ्ठल हाके यांना त्यांच्या घरातून मोटारसायकलवर बसविले व त्याच्या गळ्यात गुटख्याची माळ घालून त्याची रस्त्याने धिंड काढून पोलीस स्टेशनला नेले. उर्वरित 15 हजार रुपये तुझ्या वडिलांनी का दिले नाही, असा प्रश्न त्या मुलाला विचारला, त्यानंतर काही लोक पोलीस स्टेशनला गेल्यावर विठ्ठल हाके यांना सोडून देण्यात आले. विठ्ठल हाके घरी आल्यानंतर माझा व माझ्या वडिलांचा अपमान केला म्हणून विठ्ठल हाके यांनी आत्महत्या केली. त्यांना दोन लहान मुले आहेत, अशा प्रकारचा कारभार परभणी जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेचा सुरु आहे. या घटनेमुळे लोकांमध्ये मोठा उद्रेक निर्माण झाला व लोकांनी पोलीस स्टेशनसमोर जमाव केला होता, तेथे केशव लटपटे, जमादार, सुरेश भंडारे पोलीस व श्री.तिडके, एपीआय या तिघांचा हा सर्व कारभार आहे. सर्व शहर या तीन पोलिसांमुळे त्रस्त झाले आहे. भंगारवाले व हातगाड्यावाल्यांकडून हे तिघे पैसे वसूल करतात, असा कारभार करण्यात येत असतो. तेथील लोकांमध्ये असंतोष असल्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशनसमोर मोठा जमाव केला व तेथील एक मोटर सायकल जाळली ज्या पोलिसांनी विठ्ठल हाके यांच्या गळ्यात गुटख्याची माळ टाकली होती त्या पोलिसांची मोटार सायकल जमावाने जाळली आहे. इतर कोणत्याही गाड्यांना दगड देखील मारण्यात आलेला नाही. अशी मोठी गंभीर घटना तेथे घडलेली आहे. विठ्ठल हाके यांच्या पत्नीने एपीआय दिलीप तिडके, बीट जमादार, केशव लटपटे व सुरेश भंडारे, पोलीस या तिघांविरुध्द तक्रार नोंदविली असून त्यांच्यावर कलम 306 चा गुन्हा नोंदवा अशी मागणी केली आहे. या तिघांवर गुन्हा दाखल करुन त्यांना निलंबित करण्यात येईल का असा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, एक महिन्यापूर्वी एका गरीब सोनाराने चार ग्रॅम सोने विकत घेतले होते, त्याच्या मोबदल्यात पोलीस कॉन्स्टेबल सखाराम टेकुडे यांनी 90 ग्रॅम सोने वसूल केले व त्या सोनाराचा सातत्याने छळ सुरु केला. या सोनाराने एक चिठ्ठी लिहून आत्महत्या केली आहे, 22 वर्षाचा हा लहान व्यापारी होता. अशा प्रकारे या जिल्ह्यात पोलीस छळ करीत आहेत, सखारात टेकुडे यांच्याविरोधात कलम 306 चा गुन्हा नोंदवून त्याला सस्पेंड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुलाखान दुर्राणी...

करण्यात आले आहे. तेथी श्री. प्रभाकर चिंचाणे हे पी.आय. आहेत, यांच्या विरोधात कलम 306 गुन्हा नोंदविण्यात आला नाही व त्यांना निलंबित देखील करण्यात आले नाही. श्री. प्रकाकर चिंचाणे यांच्यावर कलम 306 चा गुन्हा नोंदवून त्यांना निलंबित करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अब्दुलाखान दुर्राणी यांनी दोन प्रकरणाची माहिती दिलेली आहे. पहिले प्रकरण सोनपेठ पोलीस स्टेशन येथील एपीआय तिडके हे एक महिन्याच्या अगोदर हजर झाले आहेत. सन्माननीय सदस्य जे बोलले ते सत्य मानून मी कथन करीत आहे. एपीआय श्री.तिडके यांनी गुटखा व इतर बाबतीत प्रभावीपणे मोर्चेबांधणी सुरु केली होती. दिनांक 08-07-2015 रोजी मुरली हाके वडील व त्यांच्या मुलगा विठ्ठल हाके जेथे राहतात तेथे त्यांनी छापा टाकल्यावर 11 हजार रुपये किंमतीचा गुटखा रंगेहात पकडला होता. विठ्ठल हाके यांना पोलीस स्टेशनमध्ये नेले तेव्हा यांच्यासोबत नगरसेवक श्री.रंजवे देखील आले होते, तेव्हा त्यांनी असे स्टेटमेंट दिले होते की, हा व्यवसाय मी करीत नसून माझे वडील हा व्यवसाय करतात असे सांगितल्यामुळे विठ्ठल हाके यांना रात्री पोलिसांनी सोडून दिले. दुसऱ्या दिवशी दिनांक 09-07-2015 रोजी मुरली हाके यांना अटक करण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुरली हाके हे 70 वर्षाचे म्हातारे आहेत, त्यांना लाथाबुक्क्या मारल्या व त्यांच्याकडे 50 हजार रुपयांची मागणी करण्यात आली असा आरोप आपण केला आहे. त्यातील 35 हजार रुपये दिले व 15 हजार रुपये द्यावयाचे बाकी होते असे आपण सांगितले आहे. दिनांक 09-07-2015 रोजी रात्री 23 वाजून 10 मिनिटांनी हे सर्व झालेले आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी विठ्ठल हाके यांनी आत्महत्या केली. त्यानंतर जी घटना घडली त्यात पोलीस स्टेशनला जमावाने घेराव घातला होता. तेव्हा नगराध्यक्ष पोलीस स्टेशनमध्ये बसले होते व बाहेर जमाव होता त्या जमावाने पोलीस स्टेशन व पोलीस स्टशेनच्या निवासस्थानांची, तेथील कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची मोडतोड केली व पेटवून दिले. तेथील घरगुती गॅस सिलेंडर बाहेर काढून गाडीत टाकून त्यांचा स्फोट केला. आपण असे सांगितले की, ज्या पोलीस कॉन्स्टेबलने विठ्ठल हाके यांच्या गळ्यात गुटख्याची माळ टाकली होती, त्याच पोलीस कॉन्स्टेबलची मोटर सायकल जाळली. परंतु रेकॉर्डवर असे आहे की, एपीआय यांच्या निवासस्थानातील घरगुती गॅस सिलेंडर बाहेर काढून तो गाडीत टाकला व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

त्याचा स्फोट घडवून आणला. मदतीसाठी जे पोलीस आले होते त्यांच्यावर देखील दगडफेक करण्यात आली. त्यामुळे तेथे 53 लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील 13 लोकांना आतापर्यंत अटक करण्यात आलेली आहे. त्या गुन्ह्यातील कलमे 307, 143 , 147, 148, 149, 427, 332, 336, 454, 436, 504 व 506 अशी आहेत. क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट 3 आणि 4 यामध्ये शासकीय मालमत्तेचे हानी केल्यामुळे अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आपण असे म्हणाला की, विठ्ठल हाके यांच्या गळ्यात गुटख्याची माळ घातल्यामुळे त्याचा अपमान झाला व त्यांनी आत्महत्या केली. विठ्ठल हाके निष्पाप असेल व त्याला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे एखादे कृत्य पोलिसांकडून झाले असेल तर त्याबाबत निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. यामध्ये केशव लटपटे, सुरेश भंडारे व एपीआय तिडके यांनी मोठ्या प्रमाणात भंगार व हातगाडीवाल्यांकडून वसुली केली आहे असे आपण सांगितले. या प्रकरणात 35 हजार रुपये पोहचविले व 15 हजार रुपये दिले नसल्यामुळे त्यांना त्रास देण्यात आला. विठ्ठल हाके या प्रकरणात निष्पाप असेल तर या प्रकरणाची शहानिशा केली जाईल व त्याची सखोल चौकशी केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा विषय असा उपस्थित केला होता की, एका गरीब सोनाराने चार ग्रॅम सोने विकत घेऊन त्याच्याकडून पोलिसांनी 90 ग्रॅम सोने वसूल केले. तेथे टेकुडे पोलीस कॉन्स्टेबल आहेत, त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यावर 306 चा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आपण एपीआय श्री. प्रभाकर चिंचाणे यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे, यांची देखील सखोल चौकशी केली जाईल. या व्यक्तीचे कोठे पाळेमुळे असतील तरी कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही. यामध्ये एपीआयची चौकशी करीत असताना एसपीचा कोठे संबंध येत असेल तर एसपी यांची देखील चौकशी केली जाईल.

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर अपूर्ण आहे. कारण त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अब्दुलाखान दुर्राणी, विधानसभा सदस्य श्री. भांबळे, मी स्वत: व विरोधी पक्ष नेत्यांनी त्या ठिकाणी भेट दिली होती. ज्या मुलाने आत्महत्या केली त्या मुलाला पोलिसांकडून असे सांगण्यात आले होते की, 25 दिवसात अवैध धंदा बंद केला नाही तर 25 दिवसानंतर तुझ्याकडून जसे पैसे वसूल करता येतील तसे करण्यात येतील. म्हणून त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) C-4

VVK/ प्रथम श्री.बोरले... 09:50

श्री.रामराव वडकुते...

मुलाने आत्महत्या केलेली आहे. त्या ठिकाणी विठ्ठल हाके यांची पत्नी होती, तिने असे सांगितले की, आमचे सासरे व आम्ही वेगळे राहतो, या प्रकरणात विठ्ठल हाकेचा काहीही संबंध नाही. तिच्या पत्नीला देखील पोलिसांनी धक्काबुक्की केली आहे. त्या महिलेने सांगितले की, तुमच्याकडे महिला कॉन्स्टेबल नाही तुम्ही मला का धक्काबुक्की करीत आहात, त्या मुलाला ताब्यात घेऊन तेथील घर उघडण्यात आले व तेथील गुटखा काढला व त्याच्या गळ्यात गुटख्याच्या माळीचा हार घातला त्याला मोटारसायकलवर बसवून पाच मिनिटाच्या अंतरावर पोलीस स्टेशन असताना जवळच्या रस्त्याने न नेता त्याची गावामध्ये धिंड काढण्यात आली व त्याचा परिणाम त्याच्या मनावर झाला. विठ्ठल हाके त्या धंद्यात नाही, हे पोलिसांना स्पष्टपणे कळले होते, पैसे काढण्यासाठी त्याला नेण्यात आले, पुन्हा वडिलांना पोलीस स्टेशनला नेण्यात आले म्हणून विठ्ठल हाके यांनी आत्महत्या केली आहे. माझा प्रश्न असा आहे की, लटपटे, तिडके आणि भंडारे यांच्या विरोधात कलम 302 चा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार काय ? कारण या प्रकरणात विठ्ठल हाके यांचा कोणताही संबंध नव्हता.

या नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते.....

कारण स्पष्टपणे त्याच्या वडिलांचा दोष होता. त्यांना हे माहीत होते. परंतु पैसे उकळायचे होते म्हणून त्यांनी हे केलेले आहे. 5000 लोकांनी पोलीस ठाणे जाळण्याचा प्रयत्न केला ही माहिती चुकीची आहे. शासनाचे जर असे म्हणणे असेल तर जनतेमध्ये या घटनेवरुन किती प्रक्षोभ निर्माण झाला होता हे स्पष्ट होते. हे 5000 लोक कोणत्या एका जाती धर्माचे नव्हते. यात सर्व जाती धर्माचे लोक होते. 600 लोकांवर कलम 307 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. 302 कलमाखालील आरोपी फरार असले तरी एका व्यक्तीने आपले प्राण गमावले आहेत. या पोलिसांनी मयत व्यक्तीची बॉडी उचलून लोकांना अटक करण्याचे कृत्य केले आहे. संबंधित तीन पोलीस कर्मचाऱ्यांवर त्वरित कारवाई करुन त्यांना सस्पेंड करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : मी यापूर्वी हेच सांगितले की, विठ्ठल हाके हा इनोसन्ट असेल तर त्याची सखोल चौकशी करु

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या पूर्वी एका प्रकरणात परभणीच्या पोलीस अधीक्षकांची सीआयडी मार्फत चौकशी करण्याचे गृह राज्यमंत्री प्रा.राम शिंदे यांनी सभागृहात जाहीर केले आहे. परभणी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक वारंवार गैरमार्गाने लोकांवर दबाव आणून पैसे उकळण्याचे काम करीत आहेत. त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात येणार आहे काय?

श्री.अमरसिंह पंडित : त्याच पोलीस स्टेशनमध्ये वारंवार असे प्रकार घडत आहेत.

(गोंधळ)

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मला माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संरक्षण मिळावे.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : सर्व माननीय सदस्यांनी अगोदर प्रश्न विचारावेत, त्यानंतर त्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी एकत्रितपणे उत्तर द्यावे. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, परभणी जिल्हयातील या सर्व घटना सभागृहासमोर येत आहेत. आता असे वाटू लागले आहे की, पोलीस विभाग हिंदी सिनेमा निर्मात्यांना या निमित्ताने नवीन संहिता देणार आहे का? ज्या पध्दतीने पोलीस कर्मचारी वागतात, सर्वसामान्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माणसाची धिंड काढून त्यांना अवमानित करतात, त्यामुळे आत्महत्या करावी लागते, या प्रकरणाला जबाबदार कोण आहे? असे प्रकार खालच्या दर्जाचे पोलीस कर्मचारी करु शकत नाहीत. याला

श्री.हेमंत टकले.....

वरिष्ठ अधिकारी जबाबदार असतात. त्यांच्या प्रमुखत्वाखाली या सगळया गोष्टी घडतात. पोलिसांना त्यांचे संरक्षण असेल तर अशा प्रकारे बेलगामपणे कायदा हातात घेण्याचे प्रकार घडतात. 4 ग्रॅम ऐवजी 90 ग्रॅम सोने वसूल केले. महाराष्ट्रभर असे घडत आहे. सर्वच सराफ व्यावसायिक सांगतील की, कशा पध्दतीने पोलिसांचा अत्याचार त्यांना सहन करावा लागतो. अशा पध्दतीने नागरिकांच्या आत्महत्या होणार असतील तर याचा बंदोबस्त करण्यासाठी या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे. पोलीस प्रमुखांनी त्यांना प्रोत्साहन दिले असेल तर त्यांना त्या पदावरुन तातडीने दुसरीकडे पाठवून या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल करुन निलंबनाची कारवाई करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत एवढेच सांगू इच्छितो की, असे जे गुन्हे घडतात ती एक परंपरा म्हणून किंवा प्रिसिडन्ट म्हणून कोणी करीत असेल तर वरिष्ठाला सुध्दा जबाबदार पकडले पाहिजे, त्याच्या आशीर्वादाने असे प्रकार घडतात असे माननीय सदस्यांच्या बोलण्यातून ध्वनित होते. हे खेर आहे की, या प्रकरणामध्ये 11 हजार रुपये किंमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. त्या संदर्भातील कलमे लावणे क्रमप्राप्त होते. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एका वेगळया प्रकरणात पोलीस अधीक्षकांची सीआयडी चौकशी करण्याचे मान्य केले आहे. हे गुटखा जप्तीचे प्रकरण आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, विठ्ठल हाके हा चौकशीमध्ये इनोसन्ट दिसून आला तर माननीय सदस्य म्हणतात ते कलम सुध्दा लावावयास तयार आहोत. या सर्व प्रकरणात गुटखा सापडला असल्यामुळे कुठेही कोणालाही पाठीशी घालण्याचा संबंध नाही. पोलीस कर्मचारी सर्वश्री लटपटे, भंडारे आणि तिडके किंवा पोलीस अधीक्षक यांची सुध्दा चौकशी केली जाईल.

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी : सभापती महोदय, एका निरपराध व्यक्तीला पोलिसांच्या जाचाला कंटाळून आपले प्राण गमवावे लागले इतका गंभीर गुन्हा घडला आहे. गुटखा जप्त करण्यात आला असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु पोलिसांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली गेली. त्यामुळे संबंधित पोलीस कर्मचा-यांविरुध्द कलम 306 अन्वये गुन्हा नोंदविण्याचे आदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे. पी.आय.श्री.तिडके यांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल 302 कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात येऊन त्यांना निलंबित करावे. त्यांची फक्त बदली केली आहे.

...3..

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) D.3

SGB/ 10:00

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी यांनी अतिशय पोटतिडकीने विषय मांडला आहे. माननीय सदस्यांनी मांडलेली भूमिका सत्य समजून या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन 7 दिवसाच्या आत संबंधित अधिकाऱ्यांसह माननीय सदस्यांना बोलावून त्यांच्या सुध्दा भावना समजून घेतल्या जातील, जे रेकॉर्ड येईल त्याची पूर्ण चौकशी करुन माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांविरुध्द दाखल केलेले गुन्हे मागे घेणे

मु.शी. : प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांविरुध्द दाखल केलेले गुन्हे मागे घेणे यासंबंधी सर्वश्री भाई जगताप, संजय दत्त ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सार्वजनिक हिताच्या निरनिराळ्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राजकीय पक्ष व सामाजिक संघटना यांच्यामार्फत बंद पुकारणे, घेराव घालणे, मोर्चा काढणे, निदर्शने करणे, इ.प्रकारचे आंदोलनाचे मार्ग अनुसरले जात असणे, त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल गुन्हे दाखल करण्यात येत असणे व न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करुन खटले भरण्यात येत असणे, सदर खटले वर्षानुवर्षे चालू राहत असल्याने ते खटले मागे घेण्याबाबत शासनास विनंती अर्ज सतत प्राप्त होत असणे, अशा प्रकारच्या राजकीय/सामाजिक आंदोलनामध्ये दिनांक १ मे, २००५ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले आणि ज्यामध्ये जीवितहानी झालेली नाही व अशा घटनेमध्ये खासगी व सार्वजनिक मालमत्तेची रु.५ लक्षपेक्षा अधिक वित्त हानी झालेली नसणे असे खटले मागे घेण्याचा निर्णय दिनांक १३ जानेवारी, २०१५ मध्ये घेण्यात आलेला असणे, परंतू अद्यापही अनेक प्रलंबित खटले मागे घेण्याबाबत शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी जनमानसांत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, त्यामुळे उपरोक्त नमूद दिनांकापूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेल्या राजकिय व सामाजिक आंदोलनातील खटल्यांचा कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्याचा आढावा घेणे व शासन निर्णयात नमूद केलेल्या निकषाप्रमाणे प्रकरण तपासून खटले मागे घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या विषयाची व्याप्ती आपल्याला माहीत आहे. आपण सार्वजनिक जीवनात वावरत असताना आपल्याला अनेकदा आंदोलने करावी लागतात, मोर्चे काढावे लागतात. त्या अनुषंगाने राजकीय नेते व कार्यकर्त्यांविरुध्द गुन्हे दाखल केले जातात. 2010 साली हा निर्णय झाला होता, आता 2015 साल सुरु असून पाच वर्षाचा कालावधी लोटला आहे. या संदर्भात अनेकदा आदेश काढण्यात आले. शेवटचा आदेश दिनांक 13 जानेवारी, 2015 रोजी काढण्यात आला. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा सांगितले होते. पोलिसांचा रोल त्यांनी केलेला आहे. पोलिसांची आणि जिल्हाधिकाऱ्यांची या गोष्टीची छाननी करण्यासाठी समिती तयार करण्यात आली होती. त्या समितीने 1670 खटले मागे घेण्याची शिफारस केली होती. त्यापैकी फक्त 142 प्रकरणातील खटले मागे घेण्यात आले. ही प्रोसेस अगदी पारदर्शक आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आणि पोलिसांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे याची खातरजमा केली आणि 1670 खटले मागे घ्यावेत अशी शिफारस केली होती. मग हे खटले मागे घेण्यामध्ये कोण झारीतील शुक्राचार्य आडवे येत आहेत?

सभापती महोदय, विरोधी पक्ष किंवा सत्ताधारी पक्षातील कोण आहेत हे महत्वाचे नाही. मी गेली 30 वर्षे कामगार क्षेत्रात काम करीत आहे. आम्हाला अनेकदा आंदोलने करावी लागली आहेत. 5 लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या मालमत्तेचे नुकसान व्हावयास नको याची जिल्हाधिकाऱ्यांनी आणि पोलिसांनी तपासणी करुनच 1670 खटले मागे घेण्याची शिफारस केली आहे. असे असताना फक्त 142 खटले मागे घेण्यात आले. महत्वाची गोष्ट अशी की, पोलीस प्रॉसीक्युटर यांच्याकडे या केसेस जातात. पोलिसांकडे पूर्णत: पारदर्शक प्रस्ताव आल्यानंतर तो दाखल करुन खटले मागे घ्यायला काहीही हरकत नाही.

नंतर इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

1670 खटल्यांसंबंधी शिफारस करण्यात आली आहे. राजकीय आंदोलने करण्यात येतात त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल करण्यात येतात. यासाठी आपण क्रायटेरिया ठरविलेला आहे. कामगार क्षेत्रात देखील आम्ही बरीच आंदोलने केली आहेत. अलीकडे शिक्षक देखील रस्त्यावर आंदोलन करण्यासाठी येत आहेत. सामाजिक प्रश्नावर आंदोलन केल्यानंतर संबंधितांवर केसेस दाखल केल्या जातात. तेव्हा कामगार क्षेत्रात ज्यांनी आंदोलन केले आहे व ज्यांच्यावर केसेस दाखल करण्यात आल्या आहेत अशांचा देखील यात अंतर्भाव करण्यात येईल काय ? कारण त्याही गोष्टी देखील महत्त्वाच्या आहेत. गेली 25 ते 28 वर्षे कामगारांचा मोर्चा काढला म्हणून आमच्यावर केसेस सुरूआहेत. त्या सर्व केसेस ॲफिडेव्हीटमध्ये येतात. मग वृत्तपत्रामध्ये लिहून येते की, अमूक एका लोकप्रतिनिधींवर इतक्या केसेस आहेत. त्यामुळे हा देखील प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यामुळे ट्रेड युनियनमधील नेत्यांवरील केसेस असतील किंवा आंदोलने करणारे इतर संघटनांचे प्रतिनिधी असतील त्यांच्यावरील खटले शासन मागे घेणार आहे काय ?

श्री.रणजित पाटील : सभापती महोदय, दिनांक 13.1.2015 च्या निर्णयानुसार दिनांक 1.11.2014 पूर्वी ज्यांच्यावर राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले होते ते मागे घेण्यासंबंधातील कार्यपद्धती विहित केलेली आहे. त्याअनुसार आढावा घेण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पोलीस आयुक्तालय स्तरावर वेगळी व जिल्हा स्तरावर वेगळी समिती नेमण्यात आली. वेळोवेळी आढावा घेण्यात आला आहे. जानेवारी महिन्यामध्ये जी.आर.निर्गमित झाला आहे. तो जी.आर. पोहोचण्यास तीन-चार महिने लागले आहेत. यासंबंधात किती बैठका झाल्या याबाबतची तपशीलवार माहिती माझ्याकडे आहे. 4335 खटले असून 27886 लोक गुंतलेले आहेत. यापैकी 1/4 म्हणजे 1070 खटले मागे घेण्यात आले आहेत. आपण 142 आकडा कुठून आणला ते मला माहीत नाही. हा चार महिन्यांचा आकडा आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, लेखी निवेदनातील शेवटच्या दोन ओळी माननीय मंत्र्यांनी वाचल्या तर बरे होईल. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, "सदर शासन निर्णयानुसार राज्यातील पोलीस आयुक्तालये व जिल्ह्यामध्ये राजकीय व सामाजिक आंदोलनातील न्यायालयात दाखल असलेल्या खटल्यांपैकी एकूण 1070 खटले माननीय न्यायालयातून मागे घेण्यात आले आहेत," असे लेखी उत्तरामध्ये नमूद आहे. माझ्याकडे जे लेखी उत्तर आहे ते मी आता वाचून दाखविले आहे. सन्माननीय सदस्यांकडे कदाचित असुधारित उत्तर असेल. मी जी माहिती सांगत आहे ती अधिकृत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आमच्याकडे वेगळे उत्तर आणि आपल्याकडे वेगळे उत्तर असे कसे काय होऊ शकते ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, शैक्षणिक संस्था, ट्रेड युनियन यासुद्धा व्यक्तिगत कामासाठी रस्त्यावर येत नाही. त्यांचे राजकीय स्वरूप समजून यामध्ये त्यांना अंतर्भूत करता येते किंवा कसे पाहिले जाईल. याला सुद्धा 5 लाखाचे नुकसान हे जे निकष आहेत ते लावता येईल किंवा कसे हे देखील तपासून पाहिले जाईल. मी तर पुढे जाऊन असे सांगतो की, आपण हा जी.आर.वाचला तर ती मर्यादा पाच लाखा पर्यंत ठेवलेली नाही. त्या रकमेची भरणा सर्वांनी मिळून केली तर ते खटले देखील मागे घेण्याची तरतूद या जी.आर.मध्ये आहे. ट्रेड युनियन आणि शिक्षकांच्यासंबंधी सकारात्मक विचार करून यात काही मार्ग निघू शकतो काय याबद्दल आगामी काळामध्ये एक बैठक बोलाविण्यात येईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मदरशांमधून शिक्षण घेणाऱ्या मुलांना शाळाबाह्य विद्यार्थी समजण्यात येत असणे

मु. शी. : मदरशांमधून शिक्षण घेणाऱ्या मुलांना शाळाबाह्य विद्यार्थी समजण्यात येत असणे यासंबंधी सर्वश्री.संजय दत्त,भाई जगताप, प्रकाश गजभिये, हेमंत टकले,सुनिल तटकरे,नरेंद्र पाटील, धनंजय मुंडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे,श्री.आनंदराव पाटील, श्रीमती दीप्ती चवधरी, ॲड.रामहरी रूपनवर,प्रा.जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अल्पसंख्याक मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"इंग्रजी, गणित व विज्ञानासारखे प्राथमिक विषय देखील शिकविले जात नसल्याने मदरसा ही शाळा मानली जाणार नाही व तेथील मुलांना शाळाबाह्य समजले जाईल अशी भूमिका सरकारने घेतल्याचे माहे जून - 2015 च्यासुमारास उजेडात येणे, अन्य धर्माच्या मुलांना मदरशांमध्ये प्रवेश नाकारला जात असणे, मदरशांमध्ये अन्य विषय शिकविले जात नसल्याने मदरसा धार्मिक संस्था ठरत असणे, मदरशांमध्ये प्राथमिक विषय शिकविले जातात किंवा नाही याबाबत 4 जुलै, 2015 रोजी सर्वेक्षण केले जाणार असणे, असे शिक्षण जर मुलांना मिळत नसेल तर त्या मुलांना शाळाबाह्य मुले मानले जाईल व त्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील असे शासनाने स्पष्ट केले असणे, 1890 मदरसे महाराष्ट्रात नोंदविलेले असणे, त्यापैकी 550 मदरशांनी गणित, इंग्रजी, विज्ञान आणि सामाजिकशास्त्र विषय शिकविण्याची तयारी दाखविली असणे, या मदरशांना त्यासाठी निधी देण्याची आणि प्रसंगी या विषयांचे शिक्षक पुरविण्याचीही तयारी शासनाने दाखविणे, राज्यशासनाच्या या भूमिकेवर मुस्लीम संघटना नाराज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

असणे, त्यामुळे अल्पसंख्याक समाजामध्ये शासनाबाबत असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्य शासनाने मदरशांतील मुले शाळाबाह्य दाखविण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत आपली भुमिका स्पष्ट करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप कांबळे (अल्पसंख्याक राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. "सबका साथ सबका विकास" या घोषणेने सत्येत आलेले एका विशिष्ट समाजाला गेल्या काही महिन्यांपासून टार्गेट करीत आहे, लक्ष्य करीत आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे काय चालले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा या लक्षवेधी सूचनेचा भाग आहे. मी पार्श्वभूमी सांगत आहे. मी सिद्ध करून दाखविन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, टार्गेट करण्यात येत आहे हे कामकाजातून काढून टाकावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी पार्श्वभूमी सांगत आहे. ही माझ्या अधिकारावर गदा आहे. मी पार्श्वभूमी सांगत आहे. मी हे सिद्ध करेन.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : तपासून योग्य ते काढले जाईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मदरशासंबंधी सरकारने निर्णय घेतला आहे. त्याची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. जेथे सरकार पोहचू शकत नाही अशा ठिकाणी दारिद्र्य रेषे खालील विद्यार्थ्यांना मदरशामधून शिक्षण देण्याचे काम करण्यात येत आहे. मदरशा मधून शिकणाऱ्या मुलांना डी-रेकग्नाईझड् करण्याचा निर्णय शासन घेत आहे. पण ते कधीच रेकग्नाइझ्ड नव्हते. त्यामुळे ते डी-रेकग्नाइझ्ड् कसे झाले ? एका बाजूला आपण असे म्हणतो की, या समाजाला मूळ प्रवाहामध्ये आणले पाहिजे. त्यांना शिक्षण प्रोव्हाईड केले पाहिजे. त्यांच्या कोट्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. पण त्यासंबंधी काहीच कार्यवाही केली जात नाही. या समाजाच्या शाळांसाठी पायाभूत सुविधा पुरविल्या जात नाहीत. ... (अडथळा).... आधीच्या लक्षवेधी सूचनेवर 10-10 मिनिटे चर्चा झालेली आहे. आपण मला अडथळा आणून आपला वेगळा हेतु साध्य करून घेऊ नका. आपली लक्षवेधी सूचना येईल त्यावेळी आम्ही गडबड करू हे आपण लक्षात ठेवावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य धमकी देत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ही धमकी नाही. टीट फॉर टॅट आहे. सभापती महोदय, आपण हे समजून घेतले पाहिजे की, मदरशांमध्ये जे विद्यार्थी शिकलेले आहेत त्यातील बरेचश्े विद्यार्थी हे सिव्हील सर्व्हीसेसची परीक्षा पास झालेले आहेत. इंजिनिअर झालेले आहेत. मुस्लिम समाजामध्ये ड्रॉप आऊट रेट हा सर्वात जास्त आहे. दलित आणि मुस्लिम समाजामध्ये ड्रॉप आऊट रेटचे प्रमाण सर्वात जास्त आहे. या मदरशांमध्ये दारिद्र्य रेषे खालील असणारी मुलेच शिकत असतात. 98 टक्के मुले अजूनही शिक्षणाच्या बाहेर आहेत. तरी देखील शासनाने हा निर्णय घेतला आहे. शासन जेव्हा धोरणात्मक निर्णय घेते तेव्हा यामध्ये काम करणारे जे स्थानिक प्रतिनिधी असतात त्यांना विश्वासात घेतले जाते. त्यांच्याशी चर्चा केली जाते. त्यांच्या काय अडचणी आहेत, त्यांच्या काही तक्रारी आल्या आहेत काय हे सर्व पाहिले जाते. तशी प्रोसिजर सरकारने केली आहे काय ? असा निर्णय घेण्याचे कारण काय होते, असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरे असे की, या शासनाची नियत साफ नाही. शासनाने दिनांक 4 जुलै रोजी सर्व्हे घेण्याची भूमिका घेतली. रमझान ते ईद या कालावधीत मदरसा बंद असतात. त्यामुळे सर्व मदरशांचा सर्व्हे कसा झाला हा एक प्रश्न उपस्थित होतो ? येथे अनुदाना विषयी देखील उल्लेख करण्यात आला आहे. डॉ.झाकिर हुसेन योजने अंतर्गत शिक्षकांना मानधन दिले जाते. माझा प्रश्न असा आहे की, शिक्षकांना वार्षिक मानधन दिले पाहिजे. आपण दोन ते तीन वर्षापुरता मानधन देता. त्या मदरशांमध्ये कायम स्वरूपी शिक्षक असतात. त्यामुळे त्या शिक्षकांना कायमस्वरूपी मानधन देण्यात येणार आहे काय ? मला शासनाकडून एक माहिती पाहिजे आहे. शासनाने उत्तरामध्ये असे दिले आहे की, आरटीई ॲक्टमुळे हा निर्णय घ्यावा लागला आहे. मी आपल्या परवानगी थोडेसे वाचून दाखवितो. "Madarsas are exempted from Right to Education Act as they are recognized as institutes giving geological education. According to Central Government guidelines issued in 2010 pertaining to Section 35 of RTE Act, 2009, institutions including Madarsas and Vedic Pathshalas especially serving religious and linguistic minorities are protected under Article 29 and 30 of the Constitution. The Act does not come in the way of continuation of such institutions or the rights of Children."

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त.....

म्हणून माझा चवथा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आरटीई ॲक्टमध्ये हे कसे काय आले ? केंद्रशासनाचे संविधानाचे गाईडलाईन्स वेगळे असल्यामुळे यासंदर्भातील माहिती मंत्री महोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रश्न शिक्षण खात्याचा आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या चारही प्रश्नामध्ये एखादा विषय पॉलिटिकल कसा करावयाचा हे काही जण ओवेसी कडून शिकलेले आहेत. (अडथळा) येथे ओवेसीची बाजू घेऊन बोलणाऱ्यांचे म्हणणे योग्य आहे असे समजून मी माझे म्हणणे मागे घेतो. आता या ठिकाणी ओवेसीचे वकील यावयास लागले आहेत. (अडथळा) मी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या प्रश्नाला उत्तर देत आहे.

तालिका सभापती : मंत्री महोदयांनी फक्त उत्तर द्यावे, उत्तराव्यतिरिक्त माहिती देऊ नये.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, ओवेसीचे वकील या ठिकाणी नको एवढेच माझे म्हणणे होते. ओवेसीचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. कपिल साहेबांनी मांडला (अडथळा) हे ऑन रेकॉर्ड आहे. (अडथळा) ज्यावेळी शिक्षक आमदार पगार सोडून शैक्षणिक गुणवत्तेवर बोलतील त्याच वेळेस मी शैक्षणिक गुणवत्तेवर बोलेन. (अडथळा)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्यावर हेत्वारोप करण्यात आले आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हेत्वारोप नसून क्लिअर आरोप आहे. विधिमंडळाचे अधिवेशन तीन आठवडे चालले तर या आठवडयातील प्रश्न,या आठवडयातील लक्षवेधी, या आठवडयातील 93 हे सगळे कशावर होते ? याची माहिती घेतली तर आपल्याला सर्व काही समजून येईल. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. (अडथळा) मी महत्वाच्या प्रश्नाला महत्वाचे उत्तर देत आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदयांनी काय उत्तर द्यावयाचे हा त्यांचा अधिकार असल्यामुळे त्याबद्दल मी बोलत नाही. परंतु या सभागृहातील कोणत्याही सदस्यावर हेत्वारोप करण्याचा अधिकार मंत्रिमहोदयांना नाही. मंत्रिमहोदय सरकारमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

आहेत म्हणून त्यांना हा अधिकार मिळालेला नाही. आपण मंत्री झालो म्हणून सगळी सत्ता आपल्या ताब्यात आली या भ्रमात मंत्रिमहोदय असतील तर या सभागृहाने त्यासंदर्भात त्यांना जाणीव करुन दिली पाहिजे. या मंत्रिमहोदयांनी सभागृहातील एका शिक्षक आमदारावर हेत्वारोप केला बसून या सभागृहातील सर्व शिक्षक आमदारावर आरोप केले आहेत. शिक्षक आमदारांनी शिक्षकांच्या प्रश्नावर, राज्याच्या प्रश्नावर आणि जनतेच्या प्रश्नांवर जे कॉंट्रीब्यूशन दिलेले आहे ते कॉंट्रीब्यूशन मंत्रिमहोदयांनी दिले आहे की, नाही याबद्दल मी आरोप करीत नाही. परंतु स्वत:कडे सर्व अक्कल आहे असे मानणे बरोबर नाही. आम्ही जरी ज्ञानेश्वर विद्यापीठात शिकलो नसलो तरी आम्हीही विद्यापीठातच शिकलो आहोत. म्हणून माझे म्हणणे आहे की, मंत्रिमहोदयांनी (अडथळा) मी आरोप करीत नाही.

तालिका सभापती : मंत्रिमहोदय उत्तर देणार असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझे याच अधिवेशनात नाही तर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील या सभागृहात आल्यापासून त्यांनी किती प्रश्न पगाराचे, किती प्रश्न शैक्षणिक गुणवत्तेचे विचारले हे एकदा समोरासमोर येऊ द्या. मी तयार आहे. ऊगाच अशी भाषणे करण्याची गरज नाही. माझा आरोप आहे की, सन्माननीय सदस्य हे शिक्षकांच्या पगारावरच बोलले आहेत. शिक्षकांच्या प्रतिनिधीने समाजाचे सर्व विषय मांडावयाचे असतात. सरकारी कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी.... (अडथळा) असे चालणार नाही. सन्माननीय सदस्यांनी काहीही बाललेले चालणार नाही. असे चालणार नाही. (अडथळा)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपापसात बोलू नये. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेब मी आपल्याला बोलण्याची संधी दिली होती. त्यामुळे आता आपण खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे. खाली बसून कोणीही बोलू नये.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयावर सभागृहात एकदा नियम 97 खाली चर्चा लावू. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देत असताना मी शिक्षकांच्या संदर्भात काहीच बोललो नाही. (अडथळा) मी मदरशाच्या शिक्षणाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

संदर्भात बोलतो आहे. मघाशी "टिट फॉर टॅट" असे कोणीतरी बोलले होते ते मला माहिती नाही. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी चार प्रश्न विचारले आहेत. (अडथळा) त्यामुळे.... (अडथळा) यांच्याकडून अल्पसंख्याक समाजावर अन्याय चालला आहे. (अडथळा)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खाली बसून बोलणे योग्य नाही. गेल्या 15 वर्षात सरकार म्हणजे मालक नाही हे आम्ही पाहिले आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी मांडलेला जो विषय आहे तो नीट समजून घेतला पाहिजे. शालेय शिक्षण विभागाने शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले आहे. सर्वेक्षण करताना ज्या विद्यार्थ्यांना नॅशनल स्कूल करिक्युलम म्हणजे गणित, समाजशास्त्र आणि विज्ञान याचे शिक्षण मिळत नाहीत, ते विद्यार्थी नाहीत असे समजून या विद्यार्थ्यांचे काही कमी करावयाचे नाही तर त्यांना अधिकचे द्यावयाचे आहे. मदरशामध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांच्या धार्मिक शिक्षणाला कोठेही अथडळा, हस्तक्षेप, अडकाव कमी न करता त्या ठिकाणी गणित, समाजशास्त्र आणि विज्ञान हे शिक्षण दिले जात नसेल तर ते आयडेंटीफाय करावे आणि त्या ठिकाणी हे शिक्षण देण्याचे काम सरकारने करावे असा शुध्द आणि चांगला हेतू यामध्ये आहे. म्हणून शालेय शिक्षण विभागाने या विषयातील सर्वेक्षण केवळ रमझानमध्येच नाही तर वर्षभर चालणार आहे. वर्षभर चालणाऱ्या सर्वेक्षणामध्ये ज्या विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित आणि सोशल सायन्स हे शिकवले जात नाही असे विद्यार्थी आढळले तर त्या विद्यार्थ्यांना ते शिकवण्यासाठी जास्त पैसे देऊन, जास्त योजना लावून, जास्त शिक्षक लावून काम केले जाणार आहे. ऊर्दू शिक्षक टिचर इलिजिबिलीटी टेस्ट पास होत नाही म्हणून त्यांना विशेष प्रोत्साहन देऊन आम्ही सर्व काही पॉझिटिव्हली करणार आहोत. त्यामुळे सदस्यांनी इकडच्या तिकडच्या ऐकण्यावर जाऊ नये.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी माझ्या प्रश्नाला मोघम उत्तर दिले आहे. मी विचारलेल्या स्पेसिफिक प्रश्नांना मंत्रिमहोदयांकडून स्पेसिफिक उत्तर अपेक्षित आहे. माझा प्रश्न मंत्रिमहोदयांना समजला नसेल तर मला पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

तालिका सभापती :सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आता प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या स्पेसिफिक प्रश्नाला मंत्रिमहोदयांनी दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे असा माझा आक्षेप आहे. आरटीई नुसार कोणते विद्यार्थी शाळाबाह्य ठरतात याची व्याख्या मंत्रिमहोदयांनी या सभागृहाला सांगावी. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात असे म्हटले आहे की, मदरशांना खालील तीन बाबींसाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाते, त्या बाबी मी या ठिकाणी वाचत नाही. परंतु किती मदरशांना झाकीर हुसेन योजनेतून अशा पध्दतीचे अनुदान देण्यात आले, किती शिक्षकांची नेमणूक करण्यात आली, शिक्षकांकडून आलेल्या रिझल्टची तपासणी शासन कशा पध्दतीने करणार आहे ? या प्रश्नांचे मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

यानंतर श्री. अजित .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ज्या ठिकाणी विज्ञान, गणित आणि समाजशास्त्र हे विषय शिकवल जात नाहीत, जेथे नॅशनल करीक्युलचा विषय शिकवले जात नाहीत ते विद्यार्थी शाळाबाह्य मानावेत. सन्माननीय सदस्य कलमबाबत विचारत आहेत. ती माहिती मी पटलावर ठेवतो.(अडथळा)..या प्रश्नाचे चांगले उत्तर यावे म्हणून मी हे सांगितले. मला वेतनश्रेणी आणि कलम या गोष्टी पाठ नसतात. नॅशनल करिक्युलमचा विषय ज्याला कळत नाही त्यांना कलम सांगून काय उपयोग आहे ? झोपेचे सोंग घेतले असेल त्याला कसे जागे करणार ?

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळंखे): मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रत्येक सन्माननीय सदस्याला आपण दिलेली लक्षवेधी सूचना चर्चेला यावी असे वाटत असते. तेव्हा ज्या सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यांनी प्रश्न विचारावेत. मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी या ठिकाणी संविधानातील प्रावधान सांगितलेले आहे. आरटीई ॲक्ट मधील सेक्शन 35 मध्ये स्पष्ट तरतूद आहे की, मदरसा आणि वैद्यकीय इन्स्टीटयुशन आरटीई ॲक्टमध्ये येत नाही. म्हणून हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. तेव्हा याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आरटीई ॲक्टमध्ये शाळेच्यासंबंधी जे निकष आहेत म्हणजे शाळेला कुंपण पाहिजे आणि इतर गोष्टी पाहिजेत या सर्व गोष्टी मदरशांना सूट आहेत. आम्ही चांगले पॉझीटिव्ह देण्याचा प्रयत्न करीत आहोत तर आपण न कळत रोखण्याचा का प्रयत्न करीत आहात ? युपीए सरकारच्या कालावधीत आरटीई लागू झाला. आम्ही त्याची अंमलबजावणी करुन अल्पसंख्याक समाजाला काहीतरी चांगले देण्याचा प्रयत्न करीत आहोत. मदरशामध्ये विज्ञान, गणित आणि सायन्स हे विषय शिकवणे बंद केले पाहिजे असे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या पक्षाचे मत आहे काय, त्यांनी तसे सांगावे, आम्ही ते करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. त्यांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. श्री.संजय दत्त यांच्या पक्षाचे मत काय आहे अशाप्रकारची उत्तरे मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहेत काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी विचारलेला प्रश्न अतिशय योग्य आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न विचारताना "सबका साथ सबका विकास" असे सांगितले. त्यांनी तसे सांगितले नसते तर मी देखील तो विषय मांडला नसता.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या ठिकाणी एका चांगल्या विषयावर लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली आहे. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या भांडणात आम्ही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. भारतीय संविधानाने फन्डामेन्टल राईटस दिलेले आहेत. राज्यातील प्रत्येक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये अशी मंत्री महोदयांची भूमिका आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे स्वागत करतो. परंतु आजच्या सकाळ वर्तमानपत्रात बातमी आहे की, "शाळाबाह्य सर्वेक्षणाचा पुन्हा बोजवारा" मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांकडे त्या बातमीचे कात्रण पाठवितो. त्या बातमीचे शाळाबाह्य सर्वेक्षणाचा पुन्हा बोजवारा, महापालिका शिक्षणाधिकारी अनभिज्ञ असे हेडींग आहे. म्हणजे अजून शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण झालेले नाही. दिनांक 21 ते 31 जुलै या कालावधीत सर्वेक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु आजपर्यंत शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण झालेले नाही. हे सर्वेक्षण करण्याकरिता मुदतवाढ देणार आहात काय, जर ही मुदतवाढ देणार असाल तर ते सर्वेक्षण किती कालावधीत पूर्ण करणार आहात ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, हे सर्वेक्षण वर्षभर चालणार आहे. जे सव्वादोन कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांची काहींना चिंता कमी आहे आणि जे शाळाबाह्य विद्यार्थी आहेत त्यांची संख्या साधारणतः 5 लाख 10 लाख, त्यांची चिंता जास्त दिसते. आम्ही शाळाबाह्य मुले शोधण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. पण आम्ही हे सर्वेक्षण सुरु करीत नाहीत तोपर्यंत बातम्या देऊन मोकळे झाले आहेत. मी वारंवार सांगितले की, हे सर्वेक्षण वर्षभर चालणार आहे. या विषयामध्ये श्री.हेरंब कुलकर्णी आणि एनजीओ काम करीत आहेत त्यांच्याशी माझा पत्र व्यवहार झालेला आहे, बैठक झाली आहे. पण जे सव्वादोन कोटी विद्यार्थी शिकत आहेत त्यांच्याबद्दल काही न बोलता जे शाळाबाह्य 10-15 लाख मुले आहेत, त्यांना शोधून शिकवायचे आहे. त्यावर इतके चर्चा चालू आहे की, सव्वादोन कोटी विद्यार्थ्यांना जे शिक्षण देणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

चालू आहे ते बंद करून या 10-15 लाख मुलांच्या पाठीमागे लागावे काय ? वीट भट्टीवर जाण्याचे दिवस ठरलेले आहेत, ऊस तोडणीसाठी जाण्याचे दिवस ठरलेले आहेत. त्यावेळी सर्वेक्षण करावे लागते म्हणून वर्षभर सर्वेक्षण करणार आहोत. आम्ही हा विचारपूर्वक निर्णय घेतलेला आहे.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, मुलांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न सुरु आहेत. परंतु मुलांच्या शिक्षणाचा जो डेटा तयार झालेला आहे, त्यावरून असा धक्कादायक निष्कर्ष आला आहे की, अल्पसंख्याक समाजातील जवळपास 50 टक्के विद्यार्थी चौथीपासून शिक्षण सोडत आहेत. ही मुले गरिबीमुळे शिक्षण अर्धवट सोडून देतात. गरिबीमुळे त्यांना शिक्षण घेता येत नाही अशा मुलांसाठी जिल्हावार रेसिडेन्शीअल स्कूल सुरु करणार काय ? माझा अल्पसंख्याक मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, केंद्र शासनाने अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती सुरु केली होती. यासाठी केंद्र सरकारकडून 75 कोटी रुपये आणि राज्य शासनाकडून 25 कोटी रुपये असे एकूण 100 कोटी रुपये दिले जात होते. परंतु आता ही सर्व रक्कम केंद्र सरकार देत आहे. प्री-मॅट्रीक शिष्यवृत्तीसाठी 7 लाख अर्ज आले त्यापैकी 2 लाख 90 हजार विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती देण्यात आली. या योजनेतील जे 25 कोटी रुपये शिल्लक राहतात ते कुठे वर्ग करण्यात आले ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मूळ लक्षवेधी सूचनेच्या विषयाला सोडून प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे. त्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर त्यांना कळविण्यात येईल.

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, मागील महिन्यात अल्पसंख्याक समितीच्या कार्यालयात मुल्लामौलवी यांची एक बैठक झाली होती. त्यावेळी त्यांनी अशी शंका उपस्थित केली होती की, मदरशामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना आम्ही आमच्या पद्धतीने धार्मिक शिक्षण देतो.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग....

त्यांनी अशी शंका उपस्थित केली होती की, ज्या विद्यार्थ्यांना, लोकांना, मदरशांना आवश्यकता आहे त्यांना आणि ज्यांना आवश्यकता नाही त्या सर्वांसाठी ही योजना बाध्य राहील काय ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आज सभागृहाची विशेष बैठक सकाळी 9.30 वाजता सुरु झाली. आता 10.45 वाजले आहेत. म्हणजे एक तासानंतर आपण केवळ चौथ्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा करीत आहोत. आजच्या कामकाजपत्रिकेत 17 लक्षवेधी सूचना दर्शविलेल्या आहेत. बाल कामगार, शालेय शिक्षण, औद्योगिक शिक्षण, सहकार इत्यादी अनेक विषयांवरील लक्षवेधी सूचना आजच्या कामकाजपत्रिकेत आहेत. आपण अशाप्रकारे लक्षवेधी सूचनेवर चर्चा करीत राहिलो तर या विभागांचे प्रश्न कधी सुटणार ? सध्या सुरु असलेल्या लक्षवेधी सूचनेवर 20 मिनिटांपासून चर्चा सुरु आहे. त्यामुळे यापुढे दोन दोन प्रश्न विचारुन लक्षवेधी सूचना संपवाव्यात, असे मला वाटते.

तालिका सभापती : लक्षवेधी सूचनांना न्याय मिळण्यासाठी सर्वच सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा लक्षात घेऊन प्रश्न विचारावेत.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी विचारल्यानुसार सांगतो की, 2014-15 मध्ये 536 मदरशांना अनुदान देण्यात आले होते. जे मदरशे या योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी अर्ज करतील त्या सर्वांना अनुदान देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : चंद्रपूर जिल्ह्याच्या धर्तीवर बुलढाणा जिल्ह्यात दारूबंदी करण्याची होत असलेली मागणी

मु.शी. : चंद्रपूर जिल्ह्याच्या धर्तीवर बुलढाणा जिल्ह्यात दारूबंदी करण्याची होत असलेली मागणी, या संबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

***"संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात वैध आणि अवैध दारु कायमस्वरुपी बंद करण्यात यावी या मागणीकरिता अस्तित्व महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी पुकारण्यात आलेला एल्गार, महिला संघटनेतर्फे लाखो नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांची मोहिम राबविण्यात येणे, जिल्ह्यामध्ये देशी दारुची, वाईन बार, बियरशॉपी याशिवाय अवैधरित्या दारु विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असणे, दारुमुळे तरुणपिढीसह अनेक जणांचे संसार भरकटत चालले असून ह्या दारुमुळे अनेकांना जीव गमवावा लागल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात शासनाने दारुबंदी केली त्याचप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यात दारुबंदी व्हावी अशी मागणी असंख्य संतप्त महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रस्त्यावर ठाण मांडून करणे, तसेच यासंदर्भात संतापलेल्या महिलांनी महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांना दिलेले निवेदन, अनेकवेळा मोर्चे, आंदोलन, निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकरणी तात्काळ लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."""*

श्री.दिलीप कांबळे (राज्य उत्पादक शुल्क राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, इतर लक्षवेधी सूचनांवर जास्त चर्चा झाल्यामुळे या लक्षवेधी सूचनेला कमी वेळ देणे क्रमप्राप्त झाले आहे. अस्तित्व महिला संस्थेने गेल्या आठ वर्षांपासून बुलढाणा जिल्ह्यातील वेगवेगळ्या 250 गावांमध्ये दारूबंदी बाबतचे ठराव केलेले आहेत. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात, या प्रकरणी उत्पादन शुल्क विभागाने कशा धाडी टाकल्या आहेत हे नमूद केले आहे. परंतु शेवटी असे नमूद केले आहे की, महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात किंवा गावात दारूबंदी करावयाची असेल तर त्या संदर्भातील कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया शांत बसावे. या लक्षवेधी सूचनेवर शेवटी प्रश्न विचारण्याला संधी मिळेल की नाही अशी मला शंका आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारते की, बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळगाव देवी, ता.मोताळा या गावात दिनांक 25 जुलै, 2014 रोजी गट विकास अधिकारी यांनी ग्राम सभा बोलावून दारूबंदीचा ठराव केला होता. त्या गावातील लोकांनी बहुमताने दारूबंदी करण्याचे सांगून, त्यावर सह्या केल्या. परंतु नंतर उप जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, सदरहू ग्राम सभेचे व्हिडीओ चित्रीकरण केले नव्हते म्हणून, पुन्हा ग्राम सभा घ्यावी. महोदय, आजची तारीख 31 जुलै, 2015 आहे. यावरून आपल्या लक्षात येईल की, त्या गावामध्ये एक वर्षापूर्वी दारूबंदीबाबतचा ठराव करून सुध्दा दारूबंदी करण्यात आलेली नाही. जिल्ह्याच्या उर्वरित 250 गावांत सुध्दा हीच परिस्थिती आहे. सभापती महोदय, या सरकारला स्वतःच्या कृतीतून राजकीय इच्छाशक्ती दाखवावयाची असेल तर त्यांनी त्या ठिकाणी दारूबंदी करावी. जिल्हाधिकारी आणि उप जिल्हाधिकारी त्या भागात दारूबंदी करण्यात टाळाटाळ करीत आहेत. मी स्पेसिफिक विचारते की, बुलढाणा जिल्ह्यातील 250 गावांनी दारूबंदी करण्याची मागणी करून सुध्दा ते ठराव प्रलंबित का ठेवण्यात आले ? तसेच दुसरी गंभीर बाब अशी की, चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी केल्यानंतर त्या जिल्ह्यातील दारु विक्रीचे परवाने मात्र इतर जिल्ह्यांत हस्तांतरित करण्यात येणार आहेत. आमची मागणी आहे की, चंद्रपूर जिल्ह्यातील दारु विक्रीचे परवाने रद्द करणे आवश्यक आहे. ते परवाने इतर जिल्ह्यांत हस्तांतरित केले तर त्या ठिकाणी धूमाकूळ होईल. सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील महिलांनी जिल्हानिहाय दारूबंदीची मागणी केली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे गजानान महाराजांचे देवस्थान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे, सिंदखेड राजा येथे जिजामाता यांचे जन्मस्थळ आहे. मातृतीर्थ असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात दारूबंदी करावी अशी त्या महिलांची मागणी आहे. शासनाने चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी केली आहे. माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी राजकीय इच्छाशक्ती दाखवून चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी केली. डॉ.अभय बंग यांनी मध्यंतरी म्हटले होते की, महाराष्ट्र हे मद्यराष्ट्र झाले आहे काय ? परंतु हे 10 वर्षे कोणी ऐकले नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, एखाद्या जिल्ह्यातील किती गावात महिलांनी ठराव केल्यानंतर त्या जिल्ह्यामध्ये दारु बंदी करण्याबाबत सरकार काही निश्चित धोरण आखणार आहे काय ? तसेच ज्या महिलांनी दारूबंदीच्या आंदोलनात भाग घेऊन लढा दिला व ज्यांच्यावर केसेस दाखल झालेल्या आहेत त्या केसेस मागे घेण्यासाठी सरकार पाऊल उचलणार काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शेवटी जो प्रश्न विचारलेला आहे त्याला 'होय' असे उत्तर आहे. ज्या ज्या ठिकाणी महिलांनी दारूबंदीसाठी आंदोलन केले असेल आणि त्यांच्यावर केसेस दाखल झाल्या असतील त्या सर्व केसेस तपासून मागे घेण्यात येतील. तसेच दुसरी बाब अशी की, बुलढाणा जिल्ह्याच्या पिंपळगांव देवी, ता.मोताळा येथील एक दारूचे दुकान ग्रामसभेच्या ठरावानुसार बंद करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, जिल्ह्यातील किती गावांनी ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव केल्यानंतर जिल्ह्यात दारूबंदी करण्यात येईल ? मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्या ज्या ग्रामसभांकडून दारूबंदी बाबत ठराव येतील त्या ठरावांच्या बाबतीत शासन नक्की निर्णय घेईल. एकूण जिल्ह्याच्या संदर्भात दारूबंदी न करता, त्या त्या गावातील दारूच्या दुकानांच्या संदर्भात ठराव आल्यानंतर त्या ठिकाणी दारूबंदी करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनांवर चर्चा घेण्यासाठी आजची विशेष बैठक घेण्यात येत आहे. त्यामुळे आजच्या कामकाजपत्रिकेवरील संपूर्ण लक्षवेधी सूचना पूर्ण होण्याच्या दृष्टीने आपण माननीय सभापतींच्या अनुमतीने सभागृहाची विशेष बैठक 12.15 वाजेपर्यंत सुरु ठेवावी आणि दुपारी 12.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, वेळेची मर्यादा लक्षात घेता ज्यांनी लक्षवेधी सूचना दिली आहे त्यांनीच प्रश्न विचारावेत.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, जानेवारी-2015 ते जून-2015 या कालावधीत विभागाच्या तत्कालीन आयुक्तांनी काही प्रकरणांत अर्धन्यायिक चौकशी करुन बेकायदेशीर निर्णय घेतलेले आहेत. सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ते जिल्हाधिकाऱ्यांडे पाठविण्यात आलेले आहेत. अनेक जिल्हाधिकाऱ्यांनी ते निर्णय मान्य केलेले नाहीत. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, चुकीचे घेतलेले निर्णय शासन रद्द करणार काय ? तसेच चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी झाल्यानंतर गेल्या 10 महिन्यांच्या काळात तत्कालीन आयुक्तांनी भरमासाठ पैसे घेऊन त्या जिल्ह्यातील परवाने हस्तांतरित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील दारु विक्रीचे परवाने हस्तांतरित न करता ते रद्द करण्यात येतील काय ? नाही तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी व माननीय मंत्री आल्यानंतर या विषयीचा निर्णय घ्यावा.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना बुलढाणा जिल्ह्याशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या विभागाशी संबंधित असल्यामुळे मी सांगू इच्छितो की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. जर चौकशीमध्ये कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

तालिका सभापती : मी पुन्हा एकदा सांगतो की, वेळेच्या मर्यादेमुळे ज्यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यांच्याशिवाय इतरांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जाणार नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दारुबंदी बाबतची लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. सन्माननीय सदस्यांनी मूळ प्रश्न हा जिल्हा दारुबंदी बाबत विचारलेला आहे. त्यांनी विचारले की, किती गावातून दारुबंदी बाबतचे ठराव आल्यानंतर जिल्ह्यात दारुबंदी केली जाते. परंतु माननीय मंत्री सांगत आहेत की, एखाद्या गावाने ग्रामसभेत दारुबंदीचा ठराव केला तर दारुबंदी केली जाईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ....

ठराविक अमुक इतक्या गावांचा ठराव आला तर त्या जिल्ह्यात बंदी होणार की नाही हे सांगावे.

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, स्पेसिफिक गावांच्या संदर्भात त्या ठिकाणी असणाऱ्या एका दुकानाच्या संदर्भात त्या ग्रामसभेने ठराव केल्यानंतर ते दुकान बंद केले जाते. एकूण जिल्ह्यात किती गावांनी ठराव केला किंवा असे काही नाही. स्पेसिफिक ग्रामसभेने एखादा ठराव केल्यानंतर त्या ठिकाणचे दुकान बंद करण्यात येते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आमची अपेक्षा आहे. आताच्या आत असे नाही. सरकारचे धोरण स्पष्ट नसेल तर ठीक आहे. माननीय मंत्री श्री. सुधीर मुगनंटीवार हे देखील सभागृहात आहेत. सर्व माननीय मंत्र्यांना या विषयी माहीत आहे. किती गावांनी दारूबंदी केल्यावर, त्या जिल्ह्यामध्ये कधी दारूबंदी होईल याची काही प्रोसेस शासन ठरविणार आहे का ? मी असे म्हणत नाही की, आताच सर्व जिल्ह्यांत दारूबंदी झाली पाहिजे. अस्तित्व महिला संस्थाच्या श्रीमती प्रेमलता सोनावणे आहेत, त्या आणि असे काम करणाऱ्या संस्थांना बोलावून, बुलढाण्याचे अधिकारी बोलावून आपण पुढील महिन्यात बैठक घेणार का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, ज्या महिला संघटना दारूबंदीसाठी आंदोलने करीत आहेत त्या सर्व संघटनांच्या प्रमुख आणि .... शासन स्तरावर पुढील महिन्यात मुंबईत नक्की बैठक घेण्यात येईल.

तालिका सभापती : लक्षवेधी सूचना ज्या सन्माननीय सदस्यांनी दिली आहे, त्यांनीच प्रश्न विचारावेत अशी माझी विनंती आहे. जेणेकरून सर्व लक्षवेधी सूचना कव्हर करता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अकोला जिल्ह्यातील शेगाव शहर विकास कामासाठी शिखर समितीने मंजूर केलेली कामे प्रलंबित असणे.

मु.शी. : अकोला जिल्ह्यातील शेगाव शहर विकास कामासाठी शिखर समितीने मंजूर केलेली कामे प्रलंबित असणे यासंबंधी श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय नियोजन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला जिल्ह्यातील देशातील प्रमुख तिर्थक्षेत्रांपैकी एक असलेले शेगांव शहर विकास कामासाठी शिखर समितीने मंजूर केलेल्या रु.136 कोटींचा विकास काम प्रलंबित असणे, संत गजानन महाराज समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त शेगाव शहराचा सर्वांगिण विकास व्हावा याबाबत विनंती करणारी जनहित याचिका हायकोर्टात सादर होणे व मा.हायकोर्टाने 8 दिवसांत दिनांक 17 जून, 2015 ला शासनाला निधी देण्याबाबत निर्देश देणे, असे असूनसुध्दा काम प्रलंबित असणे, या विकास आराखड्यातील कामे त्वरीत सुरू करण्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करणे व शेगाव शहराचा विकास करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यातील शेगाव आपणा सर्वांना विदितच आहे. संत गजानन महाराजांच्या पावन स्पर्शाने ती पुनीत झालेली नगरी आहे. आता या समाधीला 100 वर्षे पूर्ण झाले आहेत. शेगाव तीर्थक्षेत्राचा संपूर्ण इंटिग्रेटेड विकास व्हावा याकरिता 360 कोटी रूपयांचा आराखडा तयार करण्यात आला आणि त्याला मंजुरीसुध्दा मिळाली. परंतु 360 कोटी रूपये शासनाकडून मिळत नव्हते, म्हणून लोकांना उच्च न्यायालयामध्ये जावे लागले. उच्च न्यायालयाने आदेश दिले की, शासनाने लवकरात लवकर निधी तेथील विभागीय आयुक्तांच्या बँक खात्यामध्ये जमा करावा. परंतु तो निधी जमा झालेला नाही. त्यानंतर मग उच्च न्यायालयाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा असे सांगितले. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 7 जुलै, 2015 ला मंत्रालयात बैठक घेतली. माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले की, लवकरात लवकर याचा निर्णय घ्यावा. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्याकडून सांगितले गेले की, आता सर्व गोष्टींचे भाव वाढले आहेत. त्यामुळे वाढीव दराबद्दल आता काय करायचे ? त्यामुळे तसा अहवाल मुख्य अभियंत्यांना देण्यास सांगितले. परंतु तो अहवाल अजूनपर्यंत आलेला नाही. तो अहवाल केव्हापर्यंत येणार आहे ? शासनाकडून या संपूर्ण तीथक्षेत्राचा विकास करण्याकरिता 33 कोटी रूपये जमा करण्यात येतील असे सांगितले. परंतु तेवढ्या पैशाने हे होणार नाही. भाववाढ झाली आहे. उच्च न्यायालयाने निदेश दिले आहेत की, सन 2016 पर्यंत तुम्ही हे काम पूर्ण करावे. त्यामुळे त्याकरिता त्यांच्याकडून केव्हा अहवाल येणार आहे ?

सभापती महोदय, तेथील रेल्वेचा ब्रीज बांधायचा आहे. परंतु त्याकरिता तेथील डीआरएमनी आडकाठी केली आहे. त्यांच्याकडून अजून उत्तर आलेले नाही. आपण त्याकरिता प्रयत्न करणार आहात का, उच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे, 136 कोटी रूपये किती दिवसांत विभागीय आयुक्तांच्या बँक खात्यात जमा करणार आहात ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सनमानीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांनी अतिशय महत्वाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या रूपाने उपस्थित केला आहे. सरकार पूर्ण शक्तीने हा आराखडा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. हे खरे आहे की, गेल्या 5 वर्षांत याची गती मंद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार ....

होती. जून, 2016 पर्यंत या आराखड्यानुसार सर्व कामे पूर्णत्वास जावीत या दृष्टीने लक्ष देण्याचा शासनाचा निर्धार आहे. विभागीय आयुक्तांनाही तशा सूचना करण्यात आल्या आहेत. शासनाने मागच्या आराखड्यामध्ये 250 कोटी रुपये मान्य केले होते. एकूण आराखडा 360.40 कोटी रुपयांचा झाला होता. 250 कोटी रुपयांपैकी 248.40 कोटी रुपयांचा निधी वितरितही करण्यात आला आहे. सभापती महोदय, मागच्या आराखड्यानुसार 250 कोटी रुपयांपैकी 248.40 कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. 244.98 कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यताही दिली आहे. विविध यंत्रणांना 215.19 कोटी रुपयांचा निधी वितरितही केला आहे. प्रश्न असा उपस्थित झाला आहे की, गेल्या 5 वर्षांत वेगाने कामे केली पाहिजे होती. परंतु त्यामध्ये भूसंपादनाच्या अडचणी आल्या, काही ठिकाणी अतिक्रमणे होती. विभागाच्या माध्यमातून या कामांच्या किंमतीमध्ये वाढ झाली असे सांगण्यात आले. 5 वर्षांतील वाढ 110 कोटी रुपये दर्शविण्यात आली. 25 कोटी रुपयांची नवीन कामे प्रस्तावित करण्यात आली. आता असा 136 कोटी रुपयांचा प्रश्न आला आहे. एखादा विभाग जेव्हा अशी वाढ प्रस्तावित करतो आणि सांगतो की आमच्या कामाची किंमत वाढली आहे तर ती तपासलीच पाहिजे. ती तपासण्याची कार्यवाही 30 दिवसांच्या आत करण्यात येईल. प्रश्न पैशांचा नाही. कारण सन 2015 च्या अर्थसंकल्पात सुध्दा या शिवाय 25 कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आलेलीच आहे. म्हणजे 250 कोटी रुपयांपेक्षा 25 कोटी रुपये अजूनही आहेत. आवश्यकता असेल तर ते पैसे त्यांना उपलब्ध करण्यात येतील.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी माननीय वित्त मंत्र्यांचे आभार मानेन. आपण एका महिन्यात तो निधी देणार आहात. खळवाडी वस्ती त्यामध्ये बाधित होत आहे. खळवाडी वस्तीचे पुरर्वसन करण्यासाठी शासन त्यांना जमीन केव्हा देणार आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माझ्याकडे या संदर्भातील माहिती उपलब्ध नसली तरी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची माहिती घेऊन व्यक्तिगत रितीने ती माहिती मी त्यांना निश्चितपणे देईन. आवश्यक असेल त्यांचे पुनर्वसन करणे, अतिक्रमण या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार ....

संदर्भात मी जेव्हा माहिती घेतली तेव्हा असे समजले की, 438 अतिक्रमणे हटविण्यात आली, अजून 176 अतिक्रमणे आहेत. त्यामुळे कामाचा वेग मंद आहे. हा कामाचा वेग वाढविणे आवश्यक आहे. मी त्यासाठी स्वत: जाऊन शेगावला या संदर्भातील आराखड्याच्या संदर्भात बैठक घेईन. त्यावेळी सन्माननीय सदस्यांना सोबत घेऊन जाईन.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक देवस्थाने आहेत, त्यातील एक उत्कृष्ट असे प्रामाणिकपणे काम करणारे गजानन संस्थान आहे. संस्थानाचे काम, आनंद सागर वगैरे सर्व उत्कृष्ट आहे. स्थानिक लोकांनासाठी शेगावची ड्रेनेज व्यवस्था, रस्ते, शौचालये या संदर्भात नियोजन करून विकास करणे आवश्यक आहे आणि ते नियोजन करीत असताना त्या संस्थानाच्या काही लोकांची मदत घेणे आवश्यक आहे. आपण तशी मदत घेतली तर आपली कामे अतिशय प्रामाणिकपणे व चांगली होतील. शासन त्यामध्ये त्यांना समाविष्ट करून घेणार का ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, त्यामध्ये त्यांना समाविष्ट केले आहे. एकूण जुना आराखडा 360 कोटी रूपयांचा होता, यामध्ये संस्थाचे 65.50 कोटी रूपये आहेत, सरकारचा वाटा 250 कोटी रूपयांचा आहे, केंद्र शासनाचा वाटा 31 कोटी रूपयांचा आहे, नगरपालिकेचा वाटा 13.90 कोटी रूपयांचा आहे. संस्थान स्वत: जातीने लक्ष देत आहे. फक्त तेथे् असणारे अतिक्रमण, भूसंपादन यांचे प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रेल्वेच्या काही अधिकाऱ्यांनी याबाबत निर्माण केलेले प्रश्न आहेत. वेग कमी होता. मात्र तो निश्चितपणे वाढविण्यात येईल.

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा येथील नागपंचमी सणास मान्यता देण्याबाबत

मु.शी. : सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा येथील नागपंचमी सणास मान्यता देण्याबाबत सर्वश्री अनंत गाडगीळ, जनार्दन चांदूरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.अनंत गाडगीळ (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा या गावाला गौरवशाली धार्मिक व सांस्कृतिक परंपरेकरिता ऐतिहासिक वारसा असून तेथे प्राचिन काळापासून नागपंचमी उत्सवा दरम्यान जिवंत नागाची पूजा करण्याची परंपरा असणे, नागपंचमीनंतर विधीवत पूजा करुन सर्व जिवंत नागांना वन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांचे नैसर्गिक अधिवासात सोडले जावून सदर उत्सवाची आत्मियता व श्रध्दा तेथील स्थानिक अनंत काळापासून पाळत असणे, सदर उत्सवा दरम्यान समाजातील सर्व जाती धर्मांचे नागरीक एकत्र येत असून यात्रेच्या माध्यमातून स्थानिकांच्या आर्थिक जीवनावर त्याचा महत्वाचा प्रभाव पडत असणे, प्रस्तुत उत्सवाच्या निमित्ताने आज पावेतो कोणत्याही नागरिकावर वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 नुसार दखलपात्र गुन्ह्यांची नोंद नसतानाही काही वन्यजीव संरक्षण संस्था आणि निसर्गप्रेमी मंडळींनी सन 2002 मध्ये दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने शासनाने सदर उत्सवावर आणलेली बंदी, उक्त बाबींची शासनाने गांभिर्याने दखल घेण्याची निर्माण झालेली आवश्यकता, परिणामी स्थानिक भाविकांमध्ये शासनाप्रती पसरलेला असंतोष व तीव्र नाराजी, परिणामी बत्तीस शिराळा येथील नागपंचमीस असलेला सांस्कृतिक व धार्मिक परंपरेचा पौराणिक वारसा पुढे चालू ठेवण्याकरिता यंदाच्या वर्षी माहे ऑगस्ट, 2015 मध्ये सदर नागपंचमी सणास मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार (वन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा येथे नागपंचमीच्या निमित्ताने नागाची पुजा करण्याची प्राचिन काळापासून परंपरा आहे आणि जवळपास अडीच ते तीन लाखांपेक्षाही जास्त लोक त्या ठिकाणी येत असतात. त्यामध्ये अनेक परदेशी पर्यटकांचा सुध्दा सहभाग असतो.

सभापती महोदय, मध्यंतरी काही प्राणीप्रेमी लोकांनी न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे या उत्सवावर काही बंधने आली आहेत. परंतु, यामुळे स्थानिक लोकांचे आर्थिक नुकसान होऊ लागले असून ही धार्मिक प्रथा बंद होऊ लागली आहे. ज्या बिळातून ते नागाला पकडतात, त्याच बिळामध्ये ते त्या नागाला सोडत असतात, दुसऱ्याच्या बिळामध्ये सोडत नाहीत किंवा आयत्या बिळावर नागोबा, अशीही परिस्थिती नसते.

सभापती महोदय, माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांनी सुध्दा पुण्यामध्ये संबंधित शिष्टमंडळाला सहानुभूती दाखविलेली आहे. न्यायालयाने दिलेल्या निदेशांच्या चौकटीत राहून यंदाच्या नागपंचमीसाठी स्थानिक सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींबरोबर आपण बैठक आयोजित करावी, अशी माझी सूचना आहे. ती आपण स्विकारणार आहात का ? तसेच यंदाच्या वर्षी नागपंचमीच्या दिवशी सर्व नियम तात्पुरते शिथिल करणार आहात का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार या संदर्भातील बैठक येत्या सोमवारी घेऊ. या संदर्भात या सभागृहाचे माजी सभापती सन्माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांनीही बैठक घेण्याविषयीची सूचना दूरध्वनीवरून केली आहे. ते या सभागृहाचे माजी सभापती असल्याने त्यांच्या सूचना आमच्यासाठी आदेशासारख्याच आहेत. तसेच, त्या भागातील सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव नाईक यांनीही सूचना केली आहे. निश्चितपणे येत्या सोमवारी ही बैठक आपण घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने केलेली जमीन खरेदी

मु.शी. : महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने केलेली जमीन खरेदी सर्वश्री जयंत प्र.पाटील, विजय सावंत, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्री. विश्वास भोसले, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे या संस्थेमध्ये एकाच पदावर सुमारे गेल्या साडेचार वर्षांपासून कार्यरत असणे, या कार्यकाळात श्री. भोसले यांनी अल्प किंमत असलेल्या जमिनी जास्त दराने खरेदी करणे, मौजे जळगाव ता.कोरेगाव, जि.सातारा, धनावडेवाडी (जि.रत्नागिरी) या जमिनीचे रुपये 21 लाख 20 हजार अदा करुन फक्त 1 एकर 25 गुंठे जमीनी ताब्यात घेणे, याशिवाय बोरखेडी (ता.जि.जालना), खडकी (ता.जि.अहमदनगर) व कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जमिनीची खरेदी करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करणे, याबाबत महालेखापाल यांनीही आक्षेप नोंदविणे, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या निधीतून कोणतीही निविदा प्रक्रिया न करता संगणक (एसएपी) प्रणालीची खरेदी व अंमलबजावणी करतांना फार मोठया प्रमाणात मनुष्यबळावर खर्च गैरवाजवी दराने करण्यात येणे, या प्रणाली चालविण्यासाठी तांत्रिक कर्मचारी नसतांना सुमारे 14 कोटी रुपये खर्च करण्यात आले असून या महागड्या यंत्रणेसाठी दरवर्षी कोट्यावधी रुपये वार्षिक देखभाल खर्च म्हणून या कंपनीस द्यावा लागणे, हा खर्च दरवर्षी सुमारे 3 ते 4 कोटी अपेक्षित असणे, श्री.भोसले यांचे काळात रु. 100 कोटीहून अधिक कर्ज घेवून अनेक गोदामे बांधण्यात आली असणे, तथापि अनेक बांधकामे निकृष्ट असून ठेकेदारांशी हितसंबंध असल्याने बरीच कामे वेळेत पूर्ण झालेली नसणे, जळगाव (जि.सातारा), धनावडेवाडी (जि.रत्नागिरी), पुसेगाव (जि.सातारा), वाई (जि.सातारा), मिरज (जि.सांगली), खडकी (जि.अहमदनगर), पनवेल (जि.रायगड) व ठाणे येथील कामे आजही अपूर्ण स्थितीत असणे, कामांचा दर्जा अत्यंत वाईट असून शासनाचे 10 टक्क्याहून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

जादा दराने निविदा मंजूर न करण्याचे आदेश असतांना अनेक कामे त्याहून अधिक दराने मंजूर करण्यात येणे, महामंडळाच्या कर्मचारी संघटनेने देखील श्री.विश्वास भोसले यांच्या विरुध्द भ्रष्टाचार व गैरकारभार केल्याच्या तक्रारी करणे, भविष्यात महामंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व केलेली उपाययोजना."

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...६.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हे राज्यातील सर्वात नफ्यात असलेले महामंडळ आहे. एमआयडीसी देखील नफ्यात आहे. परंतु, त्यापूर्वीपासून वखार महामंडळ नफ्यात होते. तथापि, या वखार महामंडळाचा नफा आणि स्वनिधी दिवसेंदिवस कमी होत चालला आहे.

सभापती महोदय, वखार महामंडळाने वेअर हाऊसिंगसाठी जमिनी खरेदी केल्या आहेत. या खरेदीसाठी राज्य शासनाने त्यांना परवानगी दिली होती का, सरकारी जमीन उपलब्ध नाही, असे राज्य शासनाने महामंडळाला कळविले होते का ?

सभापती महोदय, मौजे जळगांव, तालुका कोरेगांव, जिल्हा सातारा, पुसेगांव, जिल्हा सातारा, वाई, जिल्हा सातारा, मिरज, जिल्हा सांगली, खडकी, जिल्हा अहमदनगर आणि पनवेल, जिल्हा रायगड येथे सरकारी जमिनी उपलब्ध आहेत. सरकारी जमीन उपलब्ध असताना कोट्यावधी रुपये खर्च करुन महामंडळाने खाजगी जमिनी का खरेदी केल्या ?

सभापती महोदय, या संदर्भात महालेखापालांनी कोणते आक्षेप घेतले आहेत, त्या आक्षेपात काय सांगितले आहे ?

सभापती महोदय, या महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हे गेल्या साडेचार वर्षांपासून त्या महामंडळावर कार्यरत आहेत आणि या महामंडळाला नाबार्डकडून 100 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे, ही गोष्ट खरी आहे का ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपल्या राज्यातील धान्य साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला उद्दिष्ट ठरवून दिले होते. त्यानुसार 20 लाख मेट्रीक टन साठवणूक क्षमता निर्माण झाली पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला होता. केवळ आपल्याच राज्याला नाही तर देशभरातील सर्वच राज्यांना असा आग्रह धरण्यात आला आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत आपण 6 लाख मेट्रीक टन धान्य साठवणूक क्षमता निर्माण करु शकलो आहोत. ही क्षमता आणखी वाढविण्यासाठी मौजे जळगांव, तालुका कोरेगांव, जिल्हा सातारा आणि धनावडेवाडी, जिल्हा रत्नागिरी येथे शासकीय जमीन उपलब्ध नसल्यामुळे खाजगी जमिनी घेण्यासाठी वखार महामंडळाने ई-निविदा पध्दतीने प्रक्रिया पूर्ण करुन.....

...7.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. कोरेगांव, खटाव हा दुष्काळी भाग आहे. त्यामुळे तेथे किती तरी जमिनी उपलब्ध आहे. आज सुध्दा उपलब्ध आहेत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, शासकीय जमीन उपलब्ध नसल्यामुळे हा व्यवहार झाला आहे.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने शासकीय जमीन उपलब्ध नाही, असे वखार महामंडळाला कळविलेले नाही. हे सर्व मॅनेज झालेले आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी सभागृहात सांगितलेली माहिती खरी मानून याबाबतची चौकशी आम्ही करु.

सभापती महोदय, शासकीय जमीन उपलब्ध नाही, असे राज्य शासनाने वखार महामंडळाला कळविलेले नाही, असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. तथापि, कोणत्याही शासकीय कामासाठी जमिनीची आवश्यकता असेल तर त्याची मागणी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे केली जाते. जिल्हाधिकारी जमीन उपलब्ध करुन देऊ शकले नाही किंवा त्यांनी तसे कळविल्यास मग खाजगी जमीन घेतली जाते. प्रस्तुत प्रकरणी ई-निविदा पध्दतीने जमिनीचा व्यवहार झाला आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हे पूर्णपणे स्वायत्त महामंडळ आहे. त्या महामंडळावर अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी असतात.

सभापती महोदय, नाबार्डकडून या महामंडळाला 100 कोटी रुपयांचे अनुदान मिळाले नसून कर्ज मिळाले आहे. सदर कर्ज महामंडळाने टप्प्याटप्प्याने घेतले असून त्याची परतफेडही केली आहे. कोणतेही खाते एनपीअेमध्ये नाही.

सभापती महोदय, या सर्व विषयांमध्ये काही-ना-काही शंकास्पद झाले आहे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तेथील व्यवस्थापकीय संचालक त्या महामंडळावर गेल्या साडेचार वर्षांपासून कार्यरत आहेत, असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. तथापि, नुकतीच या व्यवस्थापकीय संचालकांची आयुक्त, पशुसंवर्धन या पदावर बदली केली आहे. नवीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

अधिकाऱ्यांची नेमणूक त्वरित करावी, अशा आशयाचे पत्र मुख्यमंत्री महोदयांनी पाठविलेले आहे. नवीन अधिकारी येईपर्यंत पूर्वीच्याच अधिकाऱ्यांकडे या महामंडळाचा अतिरिक्त कार्यभार राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी शासकीय जमीन उपलब्ध असून खाजगी जमीन खरेदी केली, नाबार्डची मदत या सर्व विषयाबाबत सक्षम अधिकाऱ्यांकडून चौकशी करू अधिकाऱ्यांची मागणी करण्यात आली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 10 टक्के बिलोने हे टेंडर देण्यात आले आहे. पॉईंट आणि वर काही असेल तर शासनाची परवानगी मागावी लागत नाही. परंतु, 10 टक्क्यांपेक्षा जास्त दराने हे टेंडर देण्यात आले आहे. तसेच, जी कामे सुरु आहेत, ती अपूर्ण आहेत आणि त्यांचा दर्जा देखील खालावलेला व निकृष्ट आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्च पातळीवरुन चौकशी होऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा आणि ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय शासन घेणार आहे का ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, जळगांव, जिल्हा सातारा, धनावडेवाडी, जिल्हा रत्नागिरी आणि खडकी, जिल्हा अहमदनगर येथील बांधकामे पूर्ण झालेली आहेत. अपूर्ण कामांबाबत नियमाप्रमाणे संबंधित कंत्राटदारांना नोटीसा देण्यात आल्या आहेत व दंडही केला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या शंका उपस्थित केल्यामुळे उच्चस्तरीय चौकशी नक्की करु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बीड जिल्ह्यात टँकरने पाणीपुरवठा करण्यात झालेला घोटाळा

मु.शी. : बीड जिल्ह्यात टँकरने पाणीपुरवठा करण्यात झालेला घोटाळा सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाड्यात सलग तीन वर्ष भीषण दुष्काळ पडणे, अल्पपर्जन्य आणि पाणी पातळीत झालेली लक्षणिय घट यामुळे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होणे, माहे मे अखेर मराठवाड्यात सुमारे 2000 पेक्षा अधिक टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणे, पिण्याच्या पाण्यासाठी अनेक गावात हाणामारीचे प्रमाण घडणे, शासनाचे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी कंत्राटदारांवर सुमारे 100 कोटी रुपये खर्च होणे, टँकरलॉबीकडून अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासनाची मोठी आर्थिक फसवणूक करण्यात येणे, मराठवाडा विशेषत: बीड जिल्ह्यात खाजगी टँकर कंत्राटदारांविरुध्द लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांकडून शेकडो तक्रारी देण्यात येणे, जि.पी.एस. प्रणाली न बसविणे, क्षमतेप्रमाणे पाणी पुरवठा न करणे, मंजुर खेपा टाकण्यात न येणे, टँकरवर नियमाप्रमाणे फलक न लावता राजकीय नेत्यांचे छायाचित्र लावणे अशा तक्रारी देवुनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात न येणे, मौजे भेंडटाकळी, ता. गेवराई येथे टँकरच्या जादा खेपांची नोंद करण्यासाठी मागासवर्गीय महिलेला जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण करण्याचा प्रकार घडणे, जिल्ह्यात टँकरलॉबीची मोठी दहशत निर्माण होणे, संबंधित अधिकाऱ्याच्या संगनमतामुळे टँकर कंत्राटदारांची कोट्यावधी रुपयांच्या बोगस देयके अदा करण्यात येणे, बीड जिल्ह्यातील कोट्यावधी रुपयांच्या टँकर घोटाळ्याच्या चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात येवुनही या गंभीर बाबींकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासन प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...11....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, टँकरच्या गैरव्यवहाराबाबत ही लक्षवेधी सूचना आहे. आजही 100 पेक्षा अधिक टँकर प्रत्येक तालुक्यात सुरु आहेत. या संदर्भात पुराव्यानिशी आरोप केलेले आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, असा कोणताही प्रकार घडलेला नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सदर प्रकरणाची चौकशी आपण जिल्ह्याबाहेरच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडून करणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, एकूणच पाणी पावसाचे दुर्भिक्ष पाहता आपण टँकरसाठी मुदतवाढ देणार आहात काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्यातील पाणी पुरवठ्याच्या टँकर संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. आष्टी तालुक्यातील 101 गावांमध्ये तपासणी करण्यात आली. त्यापैकी 13 गावांमध्ये टँकरच्या कमी खेपा केल्याचे दिसून आले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील 3 गावांमध्ये तपासणी केली असता एका गावात टँकरच्या कमी खेपा केल्याचे निदर्शनास आले आहे. बीडमधील 89 गावांमध्ये तपासणी केली असता 3 ठिकाणी लॉग बुक भरलेले नाही. धारूर, गेवराई, केज, माजलगांव, परळी, शिरूर, पाटोदा, वडवणी.....

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपण या संपूर्ण गैरप्रकरणाची चौकशी जिल्ह्याबाहेरच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडून करणार आहात काय आणि एकूणच पाणी पावसाची परिस्थिती पाहता टँकरसाठी मुदतवाढ देणार आहात काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे 11 ठिकाणी तपासणी करण्यात आली असून त्या ठिकाणी लॉग बुक भरलेले नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे जीपीएस प्रमाणाली बसविलेली नाही. म्हणून त्या टँकरचे एक रुपया सुद्धा बिल दिले जाणार नाही. ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या तक्रारी येतील त्या ठिकाणी टँकर लॉबिला मोडीत काढण्यात येईल. विभागीय पातळीवरील अधिकाऱ्याकडून या संपूर्ण प्रकरणाची तातडीने 15 दिवसाच्या आत चौकशी करण्यात येईल. राज्यात अनेक जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्यात पाण्याचे टँकर आणि त्यांना मुदतवाढ तातडीने देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो की, आपण धोरणात्मक निर्णय म्हणून संपूर्ण राज्यासाठी टँकरची मुदत वाढविणार आहात काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, राज्यात ज्या जिल्ह्यात कमी पाऊस झालेला आहे त्या सर्व जिल्ह्यांसाठी आजच्या आज आदेश देऊन टँकरसाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी टँकरसाठी मुदतवाढ दिली, याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु, ही मुदतवाढ देताना टँकरचे अधिकार तहसीलदारांना देणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे आपण हे अधिकार तहसीलदारांना देणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जीपीएस प्रणाली प्रमाणे बिले काढली जातात असे सांगण्यात आले. परंतु, बीड जिल्ह्यात तसे झालेले नाही. जीपीएस प्रमाणे नसताना सुद्धा 8 कोटी रुपये दिले गेले आहेत. आपण जी चौकशी करण्याचे मान्य केलेले आहे त्यामध्ये आपण याचा सुद्धा अंतर्भाव करणार आहात काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, बीडीओ आणि तहसीलदार यांना तातडीने या संदर्भातील अधिकार देण्यात येतील. दुसरे म्हणजे, ज्या ठिकाणी जीपीएस प्रमाणी बसविलेली नाही आणि त्या ठिकाणी पेमेंट झाले असेल तर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यात टँकर लॉबिची मोठ्या प्रमाणावर दहशत आणि गुंडगिरी सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. गेवराई तालुक्यातील मौजे भेंडटाकळी येथील मागासवर्गीय महिलांनी त्या गावात टँकरच्या जादा खेपा करण्याची मागणी केली असता त्यांना जातीवाचक शिविगाळ करुन मारहाण करण्याचा प्रकार घडलेला आहे. या संदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, टँकर लॉबिची दहशत आणि गुंडगिरी सुरु आहे. मागासवर्गीय महिलांना जातीवाचक शिविगाळ करुन त्यांना मारहाण करण्याचे प्रकार घडलेले आहेत. म्हणून आपण संबंधितांविरुद्ध कडक कारवाई करणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मौजे भेंडटाकळी, ता.गेवराई, जि.बीड या ठिकाणी महिलेला मारहाण झाली, ही गोष्ट खरी आहे. महिलेला मारहाण करणाऱ्या लोकांविरुद्ध दिनांक 30 जून, 2015 रोजी तलवडा पोलीस ठाणे येथे एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" हा शब्द वगळून या शाळांना टप्प्या-टप्प्याने अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेणे

मु.शी.: राज्यात कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" हा शब्द वगळून या शाळांना टप्प्या-टप्प्याने अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेणे यासंबंधी डॉ.अपूर्व हिरे, श्री.विक्रम काळे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" हा शब्द वगळून 2009 मध्ये या शाळांना टप्प्या-टप्प्याने अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेणे, गत 14 वर्षापासून राज्यात हजारो शाळा विनाअनुदान तत्वावर असणे, सन 2011 मध्ये शासन निकषानुसार प्रस्ताव पाठविण्यात येणे, यापैकी फक्त 58 शाळा अनुदानास पात्र ठरणे, त्यानंतर 2013 मध्ये मुल्यांकनाची दुसरी फेरी सुरु करत शासनाने 1343 शाळा अनुदानास पात्र करणे, त्यानंतर पुन:शाळांचे पुनर्मुल्यांकनाचा निर्णय घेणे व पुर्वीचा निर्णय रद्दबातल ठरविणे, तद्नंतर 1343 शाळा व फेरमुल्यांकन झालेल्या 162 शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या 925 पदांना मंजुरी देण्याचा शासनाने निर्णय घेणे, पण त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद नसणे, दरम्यान राज्यभरातील पात्र शाळांपैकी केवळ अमरावती विभागातील 117 शाळांना अनुदानासाठी पात्र म्हणून घोषित करण्यात येणे, पण उर्वरित महाराष्ट्रातल्या एकाही शाळेचा प्रस्ताव मंजुर न होणे, गेल्या 14 वर्षापासून अनुदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या शाळांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होणे, शासनाने महाराष्ट्रातील उर्वरित सर्वच पात्र विनाअनुदानित शाळांना अनुदान मंजुर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून राज्यातील ज्या शाळांना शासनाने अनुदानास पात्र घोषित केले आहे, ज्या पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे त्यांना अद्यापही शासनाकडून वेतन मिळालेली नाही. ही तांत्रिक बाब निर्माण झालेली आहे. यासाठी लागणारा निधी शासनाकडे उपलब्ध आहे. दुर्दैवाने डिसेंबर महिन्यात झालेल्या अधिवेशनात आणि याही अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये याचा समावेश होऊ शकला नाही. कदाचित, समावेश झाला असता तर हा निधी त्या शिक्षकांना आणि संबंधित शाळांना मिळाला असता. या संदर्भात मंत्री महोदय आणि वित्त मंत्री महोदयांबरोबर सखोल चर्चा झालेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, आता पुरवणी मागण्या मंजूर झालेल्या आहेत. त्यामुळे हा विषय सभागृहात येणार नाही. म्हणून या संदर्भात निधी उपलब्ध असताना तो शिक्षकांना मिळण्यासाठी, त्यांच्या वेतनाचा मार्ग मार्गी लागण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, वित्तमंत्री, शिक्षण मंत्री यांची 8 दिवसाच्या आत एकत्रित बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याबाबत मंत्री महोदय आश्वासन देतील काय आणि त्या प्रमाणे कार्यवाही करतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन देण्यासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण साहेब, आपल्या शासनाच्या काळात निर्णय काय झाला ? सन 2009 मध्ये सत्तेवर असलेल्या शासनाने कोणता निर्णय घेतला ? दिनांक 20 जुलै, 2009 च्या शासन निर्णयान्वये निधीच्या उपलब्धतेनुसार, असा निर्णय घेतला. आता आम्ही सत्तेवर आलो तर निधीच उपलब्ध नाही. आम्ही वर्ष दोन वर्षात काही तरी शासनाच्या तिजोरीत भर पडेल असा प्रयत्न करु. कारण, शेवटी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमुळे राज्यातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आम्ही त्याचे मूल्यांकन केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते, प्रा.अनिल सोले, सर्वश्री नागो गाणार, सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे हे वारंवार हा विषय सभागृहात उपस्थित करीत असतात आणि प्रामाणिकपणे हा प्रश्न लवकर सोडविला पाहिजे. कारण, कायम शब्द वगळण्याच्या आंदोलनात आम्ही देखील होतो आणि ते आवश्यक आहे. शेवटी शिक्षण देणे हे शासनाचे काम आहे. त्यामुळे यासाठी निधी उपलब्ध करत टप्प्याटप्प्याने पुढे जाणे गरजेचे आहे. मला 8 दिवसात बैठक होईल किंवा नाही हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सांगता येणार नाही. कारण, मला मुख्यमंत्री महोदयांच्या वेळेची उपलब्धता बघावी लागेल. परंतु, अशा प्रकारची एक संयुक्त बैठक घेऊन आपण या संदर्भात पुढील रोडमॅप ठरवू आणि संबंधित पदविधर आणि शिक्षक लोकप्रतिनिधींना त्या बैठकीसाठी बोलावू. फक्त अट अशी आहे की, सर्वांनी वेतनश्रेणी सोडून इतर प्रश्न विचारावेत.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, अमरावती विभागाचा प्रस्ताव जून, 2015 मध्ये प्राप्त झाला आणि 18 जून, 2015 रोजी तो मंजूर झाला. आपण फक्त अमरावती विभागाच्या बाबतीत एवढी तत्परता का दाखविली, इतर विभागाच्या बाबतीत आपले धोरण काय आहे आणि इतर विभागाचे प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत काय ?

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, इतर विभागांचे प्रस्ताव या अगोदर करुन झाले होते, अमरावतीचा प्रस्ताव त्या काळात राहिला होता, माननीय मंत्री डॉ.रणजित पाटील तसेच आणखी दोन सन्माननीय सदस्य तेथील आहेत, यांनी हा विषय मागील अधिवेशनात उपस्थित केला होता. त्यानंतर सभागृहात सांगितल्याप्रमाणे मी त्यांच्याबरोबर संयुक्त बैठक घेतली होती म्हणून तो प्रस्ताव घाईघाईने मागविण्यात आला होता. इतर विभागांचे प्रस्ताव पूर्ण होऊन तीन महिने पूर्ण झाले होते. फक्त अमरावती विभागावर अन्याय झाला होता, त्यावर देखील अमरावती विभागाला न्याय व इतर विभागावर अन्याय अशा प्रकारची पत्रके सन्माननीय आमदार महोदयांनी काढली होती. अमरावती विभागावर जो अन्याय झाला तो अन्याय दूर करण्यात आला आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, अमरावती विभागाबाबत शासनाने जी.आर. काढला आहे. त्यांची पात्रता घोषित करुन नंतर आधारकार्डची पूर्तता करण्यात सांगण्यात आले आहे. आता आपण सर्व विभागांचे फेरमुल्यांकन करीत नाही, ज्या शाळा अनुदानास पात्र आहेत त्यांची पात्रता यादी शासन तातडीने जाहीर करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जो नियम अमरावतीसाठी लावण्यात आलेला आहे तोच नियम आता संपूर्ण महाराष्ट्रात लावण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मूल्यांकनास पात्र झालेल्या राज्यातील शाळांच्या बाबतीत प्रादेशिक भेदभाव करता येणार नाही, त्यामुळे समान निकषावर राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळांना जेथे विद्यार्थी संख्या पुरेशी आहे व शिक्षक पात्र आहेत या दोन निकषानुसार शासन 1 एप्रिल, 2010 पासून कायद्याप्रमाणे शासनावर जी जबाबदारी आलेली आहे, त्यानुसार पूर्वलक्षी प्रभावाने 100 टक्के अनुदान देण्यात येईल काय ?

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयातील पायाभूत सुविधांनुसार 925 वाढीव पदांना 21 मे 2014 च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. शासनाचे असे म्हणणे आहे की, वेतनेतर अनुदान उपलब्ध करुन देण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन आहे. हा विषय किती वेळ विचाराधीन राहणार आहे, या लोकांना न्याय केंव्हा मिळणार आहे, असा माझा प्रश्न आहे, दिनांक 20 जुलै, 2009 च्या शासन निर्णयानुसार निधीच्या उपलब्धतेनुसार किती कालमर्यादेत ही बाब पूर्ण करण्यात येईल याची कालमर्यादा मंत्री महोदय सांगतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रातील सर्वच विभागांना समान न्याय दिला जाईल. सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी 925 पदांचा मुद्दा उपस्थित केला आहे, यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेसोबत चर्चा करुन 925 पदे म्हणजे कोण व्यक्ती आहेत व त्यातील जवळपास 331 आले आहेत, बाकीचे येत नाहीत, ते येत नसल्यामुळे शासनाला देता येत नाही. 331 ची माहिती घेण्यात आली आहे. त्या पदांना लवकर अनुदान देण्यात येईल. उर्वरित माहिती नावानिशी आल्यावर त्यासाठी मंजूरी देऊन त्यांना देखील अनुदान देण्यात येईल.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, आतापर्यंत शासनाने 1929 शाळा व 1927 वर्ग तुकड्या अनुदानास पात्र घोषित केल्या आहेत, याप्रमाणे अनुदान देण्याची शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे, शासन आपली घटनात्मक जबाबदारी किती कालावधीत पूर्ण करणार,याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, घटनात्मक दृष्ट्या बंधनकारक अशा सर्व जबाबदाऱ्या शासन पूर्ण करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई शहरात इमारतींना बीसीसी न घेता वाढीव एफएसआयचा फायदा घेऊन इमारतींवर अतिरिक्त मजले चढविल्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास

मु.शी.: मुंबई शहरात इमारतींना बीसीसी न घेता वाढीव एफएसआयचा फायदा घेऊन इमारतींवर अतिरिक्त मजले चढविल्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास या संबंधी सर्वश्री किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहरात पुनर्विकास नियमावलीच्या 33/7 व 33/9 अंतर्गत इमारतींच्या पुनर्बांधणीची कामे अनेक विकासकांकडून हाती घेतली जाणे, मात्र पुनर्विकासाचे काम एकदा घेतल्यानंतर विहित कालावधीत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे भासवून पार्शियल ओसी घेतली जाणे, प्रत्यक्षात विकासक सोसायटीला कन्व्हेयन्स किंवा डिम्ड कन्व्हेयन्स करीत नसणे, तसेच संबंधित अधिकाऱ्याकडून पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगून बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेत नसल्याचे अलीकडेच निदर्शनास येणे, बांधकाम पूर्ण झाल्याचा दाखला नसल्यामुळे कन्व्हेयन्स करता येत नसल्याचे कारण पुढे करुन सदर जमिनीचे सर्व अधिकार वर्षानुवर्षे आपल्याकडे ठेवून अतिरिक्त एफएसआय उपलब्ध झाल्यावर संबंधित सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना हाताशी धरुन व अमिषे दाखवून तसेच मुंबई मनपाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन इमारतीची क्षमता विचारात न घेता अतिरिक्त मजले उभारणे, यामुळे निष्पाप माणसे अपघातांमध्ये बळी पडणे, परिणामी बांधकाम व्यावसायिक, शासनाचे व मुंबई मनपाचे अधिकारी यांच्या अभद्र युतीच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, यास्तव मुंबई मनपाच्या कायद्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची नितांत आवश्यकता व शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 33/7 च्या संदर्भात सांगितले आहे, आम्ही प्रश्न विचारला एक व आपण उत्तर दुसरेच दिले आहे. आम्ही असा प्रश्न विचारला होता की, 'अ' वर्ग उपकरप्राप्त इमारतींसाठी 2.50 वरुन 3.00 इतके चटईक्षेत्र वाढविण्यात आले आहे. त्यानंतर अ,ब,क यांना नियम शिथिल करुन दिनांक 28/07/2011 आणि दिनांक 14/08/2013 रोजी एकच नियम करण्यात आला आहे. अ,ब,क साठी नियम एकच असेल तर 33/7 मध्ये पुनर्विकास झाल्यानंतर ज्यांचा पुनर्विकास झाला त्यांना देखील जागा दिली, यामधील सेल्फ कम्पोनेंट विकून झालेला आहे, त्या इमारतीला ओसी घेतली आहे, लोकांनी करोडो रुपये खर्च करुन तेथे सदनिका घेतल्या आहेत, अगोदरचा एफएसआय .5 शिल्लक राहिला व एखादा बिल्डर 25 ते 30 मजल्यानंतर त्यावर आणखी मजले बांधत असेल तर त्या इमारतीत जे लोक रहायला गेले, त्यांना ओसी देण्यात आली आहे. बिल्डरने स्वत:हून बीसीसी घेतली नाही, कायद्याच्या दृष्टीने व महानगरपालिकेने ही पळवाट ठेवलेली आहे. या पळवाटीचा फायदा घेऊन इमारतीवर मजले वाढविले जाणे, तेथे राहत असलेल्या लोकांना त्रास होणे, किती वर्षे असे मजले बांधून विकत रहावे व त्याचा त्रास इतर रहिवाशांनी सोसावा यासाठी या नियमात शासन बदल करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे. नियम 33/7 नुसार .5 एफएसआय राहिला असेल व अशा काही प्रकरणातील इमारतींना दोन तीन वर्षे पूर्ण झाली त्यांना बीसीसी घ्यावयास लावणार आहात काय ? जे रहिवासी पाच वर्षापासून राहत आहेत त्यांना बीसीसी घेण्याबाबत नियमात काही बदल करण्यात येतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, 33/7 आणि 33/9 अंतर्गत पुनर्विकासकाच्या आयओडीमध्ये जे ओरिजनल भाडेकरु असतात त्यांच्या ओसी प्राधान्याने दिल्या जातात. आपण त्यांना पार्शियल ओसी संबोधित असाल, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे की, सेलेबल कम्पोनेंट किती कालावधीत पूर्ण करावा याबाबत नियमात कोणतेही बंधन नाही, याचा फायदा घेऊन ते पार्शियल कम्पिलीट आहे असे भासवित कदाचित आपल्या म्हणण्यानुसार तेथे पार्शियल ओसी आहे असे भासवित बीसीसी देत नाही आणि सोसायटीला डीम्ड कन्व्हेयन्स करीत नाही. त्यामुळे काम प्रगतीपथावर आहे असे भासवून वर्षानुवर्षे नवीन येणाऱ्या पॉलिसीचा फायदा घेत जास्तीचे मजले बांधण्याचे काम काही विकासक करतात असे आपले म्हणणे आहे. 33/5 मध्ये .5 ने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

एफएसआय वाढवित असेल तर तेथील स्ट्रक्चर स्टेबिलिटीचे पूर्ण काम महानगरपालिका स्तरावर करण्यात येते. त्याचबरोबर जोथा बांधकामाबाबत देखील स्ट्रक्चरल ऑडिट केले जाते. त्यानंतर जास्तीचे मजले बांधण्याची परवानगी मिळते. यासाठी प्रचलित कायद्यातील तरतुदीचा अभ्यास करुन विद्यमान तरतुदी अधिक कठोर व बंधनकारक करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. ओसी घेतली आहे परंतु ज्यांचा .5 एफएसआय राहिला आहे. अशी काही प्रकरणे असतील व ज्यांनी बीसीसी घेतली नसेल अशा सर्व प्रकरणांमध्ये पाच वर्षाची कालमर्यादा घालण्यात येणार आहे काय ? असा प्रश्न विचारण्यात आला आहे. अशी काही प्रकरणे असतील तर त्याबाबत माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल. आताच्या कायद्यात कोणतेही बंधन नाही याबाबत जी भीती आपणाला वाटते, त्यासाठी माझ्या दालनात जी बैठक घेण्यात येईल त्यामध्ये चर्चा करुन काही धोरणात्मक निर्णय घेता येतो काय याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, हा 33/7 चा प्रश्न नाही, आज उप नगरात 1 एफएसआय आहे तो 1.33 करण्याची चर्चा मार्केटमध्ये आहे, त्यामुळे ज्या व्हर्जिन जमिनी आहे त्याबाबत हा प्रश्न निर्माण होणार आहे. एक एफएसआयवर बांधकाम करायचे व मग .33 एफएसआय घ्यावयाचा किंवा टीडीआर घ्यावयाचा तसा हा प्रश्न नाही. चटई निर्देशकांचा व डिम्ड कन्व्हेयन्सचा फायदा घेण्याची बाब आता उपस्थित होण्याची शक्यता दिसून येत नाही हे कोठे तरी दिशाभूल करणारे आहे असे मला स्वतःला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावस्कर यांनी सांगितले की, सीसी आणि बीसीसी वेळेत घेणे बंधनकारक असले पाहिजे. डीसी रुल्समध्ये असले पाहिजे, आयओडीमध्ये असता कामा नये. दुसरी अशी सुधारणा करण्यात येणार आहे की, सेल्फ कम्पोनेंट 33/7 शिवाय एक एफएसआयच्या नॉर्मल कन्स्ट्रक्शनमध्ये उरलेल्या 25 टक्के एरियाला सीसी न देता that CC should be taken along with BCC.

या नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

अशा स्वरूपाची सुधारणा करून जे बिल्डर वर्षानुवर्षे कन्व्हेयन्स करीत नाहीत आणि प्लॉटची मालकी स्वत:कडे ठेवतात या बिल्डरांना चाप लावून सामान्य नागरिक करोडो रूपये खर्च करून मुंबई शहरात फ्लॅट विकत घेतात त्यांना मदत केली जाईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, भविष्यकाळात काही धोरणात्मक बदल घडून ॲडिशनल एफएसआय मिळेल या अनुषंगाने विचार करतात, आज ओसी आपल्याकडे ठेवायची, बीसीसी मिळू नये यासाठी अधिकाऱ्यांबरोबर विकासक संगनमत करीत असतील तर त्यासाठी मी म्हटले की, आगामी काळात अशा कोणत्याही जून्या स्ट्रक्चरला एफएसआय मिळणार असेल तर तो ॲडिशनल फ्लोअर बांधण्यासाठी उपयोगात आणू नये आणि जे इमारतीमध्ये राहतात त्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये. अशा पध्दतीने आगामी काळात कोणताही ॲडिशन एफएसआय घेण्याच्या हेतूने प्रयत्न होत असेल तर त्यासाठी आपण एकत्रित बैठक माझ्या दालनात घेऊ. अनेक माननीय सदस्यांचे यामध्ये कॉन्ट्रिब्यूशन आहे, त्यानाही सोबत घेऊन बैठक घेऊ.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, अतिरिक्त एफएसआय वापरण्यासाठी जे काही प्लॅनिंग केले जाते, तो एफएसआय उपलब्ध झाला तर त्या सोसायटीला देण्यात येईल काय?

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये कलम 33(7) अंतर्गत प्रस्तावित असलेल्या अनेक इमारतींची कामे अडकली आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, बिल्डर इमारत पूर्ण होईपर्यंत भाडेकरूंना तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी घरे उपलब्ध करून देतो. कालांतराने भाडे देणे बंद करतो. अशा प्रकरणात सरकार काय बंधन आणणार आहे? पूर्ण न झालेल्या इमारतींमध्ये लोक रहायला जातात. अशा परिस्थितीत ओसी देण्याचे आश्वासन दिले जाते, परंतु ओसी मिळत नाही. या संदर्भात बिल्डरवर कालावधीचे बंधन आणले जाईल काय? जर ओसी जोपर्यंत दिली जात नाही तोपर्यंत बीसीसी करिता अर्ज कसे घेतले जातात? बीसीसी संदर्भात बंधन आणणार आहात काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य ॲड.अनिल परब व अनंत गाडगीळ यांनी वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले आहेत. माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी भविष्यकाळात ॲडिशनल एफएसआय उपलब्ध झाला तर तो सोसायटीला देण्यात येईल काय असा प्रश्न विचारला आहे. उपलब्ध कायद्यानुसार ज्यांच्याकडे कन्व्हेयन्स आहे त्यांना तो वापरता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M=2

SGB/ 11:30

डॉ.रणजित पाटील...

सभापती महोदय, मूळ भाडेकरु असतात त्यांच्या पुनर्वसनासाठी जी व्यवस्था केली जाते ती योग्य प्रकारची नसते हा विषय ऐरणीवर आलेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने मागील काळात एक अशासकीय विधेयक सभागृहात मांडण्यात आले होते. त्यावर उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, विशिष्ट कालमर्यादेत त्यांचे पुनर्वसन आणि बांधकाम व्हावयास पाहिजे, यासाठी डीम कालावधी दिलेला आहे. ते करताना टेनन्सी ॲक्टप्रमाणे जे संरक्षण भाडेकरुंना मिळत होते ते 354 ला सुध्दा लागू करु असे आदरणीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. कदाचित ऑर्डिनन्स काढून आपण ते करु.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई महापालिका क्षेत्रात कलम 33(7) व 33(9) अंतर्गत 100 वर्षापूर्वीच्या इमारतींचा पुनर्विकास सुरु आहे. महापालिकेचे अधिकारी विकासकाशी संगनमत करुन कोणत्याही नियमांचे पालन करीत नाहीत. पुनर्वसन किंवा रिहॅब इमारत पहिल्यांदा पूर्ण करावयाची असते, त्यानंतर सेलेबल इमारतीचे बांधकाम करावयाचे असते. परंतु या नियमाचे पालन होत नाही. पुनर्वसन प्रक्रियेमध्ये सभासदांना विश्वासात घेतले जात नाही. या प्रक्रियेमध्ये अनेक अडचणी आहेत, निविदा प्रक्रिया पारदर्शक असत नाही. कलम 33(7) आणि 33(9) चे जे नियम आहेत त्याचे पालन अधिकारी करीत नाहीत. एफएसआयचा फायदा बिल्डरना मिळतो. या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शासन काय करणार आहे?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, पुनर्वसन कम्पोनन्ट इमारतीसाठी पार्ट ओसी दिली जाते. जेणेकरुन त्या कामासाठी विलंब लागू नये, भाडेकरुंना लवकरात लवकर घर मिळावे. यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी काय करणार असे माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. त्या दृष्टीने कुठलीही प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने होणार नाही. मी आधीच सांगितले की, या प्रकरणामध्ये काही धोरणात्मक बदल करावयाचे असतील, in the larger interest of the people and for the security of those who are occupying the building with additional floor, additional FSI,त्याची बैठक घेतली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, झोपडपट्टीमध्ये आणि चाळीमध्ये राहणाऱ्या लोकांनी अनधिकृत बांधकाम केले तर महापालिकेकडून तातडीने कारवाई केली जाते. परंतु बिल्डर मात्र इमारत पूर्ण झाल्यानंतरही मजल्यावर मजले बांधतात, त्यांना ओसी मिळाली आहे परंतु नियमानुसार बीसीसी किती कालावधीत घेतली पाहिजे याबद्दल भाष्य केले जात नाही. गरीब लोकांवर तातडीने कारवाई केली जाते. परंतु श्रीमंत आणि बिल्डर लोकांना जाण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ज्या पळवाटा ठेवल्या आहेत त्या बंद करण्यासाठी आपण कोणती कारवाई करणार आहात? शहरात भरपूर मनोरे आहेत, 25-30 मजल्यांचा टॉवर पूर्ण झाला त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट काय होणार आहे? ओसी दिली आणि लोक इमारतीमध्ये रहायला गेले. त्या इमारतीवर मजले बांधायला दिले जाणार असतील तर त्याबाबत तातडीने पॉलिसी मॅटर म्हणून कोणता निर्णय घेतला जाणार आहे? डीसी रूल्समध्ये 2009, 2011 व 2013 मध्ये बदल झाले. भविष्यकाळात शासनाकडून असे बदल होतील. याचा अर्थ त्या इमारतीचे लाईन आणि इमारतीतील रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात?

डॉ.रणजित पाटील : मी यापूर्वी सांगितले आहे की, अशा प्रकारे ॲडिशनल 0.5 एफएसआय मिळवून अतिरिक्त मजले बांधले जातात, त्या इमारतीची स्ट्रक्चरल समिती पहायला जाते. बांधकामाचे जोते सुध्दा पाहिले जाते. त्याची सुध्दा तपासणी केली जाते. अशा प्रकारे कोणत्याही इमारतीवर ॲडिशनल फ्लोअर वाढविला जात नाही. सेलेबल कम्पोनन्ट पूर्ण करण्यामध्ये बंधन नाही. त्यासाठी सांगितले की, बीसीसी प्रमाणपत्र विशिष्ट कालावधीत त्यांना दिले गेले पाहिजे. याबाबत धोरण ठरविले गेले पाहिजे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, पाच वर्षाच्या आत बीसीसी इश्यू झाले पाहिजे याबाबत सरकार सकारात्मक विचार करेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधि विद्यापीठ स्थापन करणे

मु.शी. : औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधि विद्यापीठ स्थापन करणे यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, विक्रम काळे, अब्दुल्ला खान दुर्राणी ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी सन १९९७ मध्ये अखिल भारतीय विधी मंत्र्यांच्या परिषदेत निर्णय घेण्यात आलेला असणे,त्यानुसार २००७ मध्ये राज्य मंत्रीमंडळाने औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी पूर्व तयारी म्हणून औरंगाबाद येथे ६० एकर जमीन घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली असणे, माहे फेब्रुवारी, २०१३ ला मंत्री मंडळाचीही मान्यता मिळालेली असणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदाबाबतही कार्यवाही करण्यात आलेली असणे, परंतु अद्याप विधी विद्यापीठ औरंगाबाद येथे सुरु होत नसल्याने मराठवाड्यातील विधी तज्ञ, नागरीक, विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, शासनाने यावर त्वरीत कार्यवाही करुन औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ शैक्षणिक सत्र २०१५ पासुन सुरु करणे गरजेचे असल्याने यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M=5

SGB/ 11:30

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, 2012 साली औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूल मंजूर झाले. 2013 साली राजपत्र प्रसिध्द झाले. या नॅशनल लॉ स्कूलसाठी 7 एकर जागा घेतली गेली. शासनाने अधिकृतपणे घोषणा केली की, यावर्षी सुरु करु. नंतर घोषणा केली की पुढील वर्षी सुरु करु. आजपर्यंत औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूल सुरु झालेले नाही. आयआयएम सुध्दा मंजूर झाले. माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी आमदारांसमोर घोषणा केली की, मी यामध्ये लक्ष घालतो आणि ताबडतोब घोषणा करतो. दुपारी 3.00 वाजता त्यांनी सभागृहात घोषणा केली की, आयआयएम नागपूर येथे सुरु करीत आहोत. हा मराठवाड्यावर अन्याय आहे. सहा महिन्यापूर्वी केंद्र सरकारच्या एचआरडी मंत्रालयाने घोषणा केली की, आयआयटी स्थापन केली जाईल. काल विधानसभेत असे सांगण्यात आले की, पश्चिम महाराष्ट्राचा मागील 8 ते 10 वर्षात विकास झाला. आता विदर्भाचा विकास होत आहे. मराठवाड्याचा नंबर केव्हा लागणार आहे? हा विषय माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या अखत्यारीतील आहे. त्यांनी धडाडीने निर्णय घेतले आहेत. नॅशनल लॉ स्कूल औरंगाबाद येथे केव्हा सुरु होणार आहे. त्यामध्ये अडचण अशी आहे की, कायद्यानुसार सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांची आवश्यकता आहे. ते औरंगाबादला उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत हे स्कूल सुरु होणार नाही. आपण या संदर्भात काय कारवाई करणार आहात?

नंतर एन.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : आपणाला आजच्या सर्व लक्षवेधी सूचना घ्यावयाच्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी अगदी थोडक्यात प्रश्न विचारावेत.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, दिवंगत मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांची औरंगाबाद येथे युनिव्हर्सिटी सुरू व्हावी अशी इच्छा होती. माझी एकच विनंती आहे की, श्री.विलासराव देशमुख यांनी औरंगाबाद येथे युनिव्हर्सिटी सुरू करण्याचे काम सुरू केलेले असताना आता मुंबई, नागपूर येथे सर्व काही झाले. औरंगाबाद मात्र तसेच मागे पडून राहिले. मूळ प्रश्न जेथून सुरू झाला तोच आपण बाजूला ठेवला आहे. दिवंगत श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता तरी हे विद्यापीठ औरंगाबाद येथे लवकरात लवकर सुरू करणार आहात काय ? सुप्रीम कोर्टाचे जज्ज कसे नेमावयचे ते आपण नंतर बघावे. आपण त्यांची इच्छा पूर्ण करणार आहात की नाही ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख यांच्या इच्छा सोडा. पण त्यांचे श्री.सतिश चव्हाण व श्री.विनायकराव मेटे हे जे अनुयायी आहेत त्यांची इच्छा नक्की पूर्ण करणार आहे. महाराष्ट्रामध्ये विधि विद्यापीठाची स्थापना होणे हे खऱ्या अर्थाने योग्य असेच आहे. लॉ मध्ये येणाऱ्या मुलांना जीएलसीला किंवा पुण्यामधील आयएलएसला जायचे असते. त्यापेक्षा चांगली प्रॉयॉरिटी बंगळूरीची असते. अशा प्रकारचे विद्यापीठ महाराष्ट्रामध्ये सुरू व्हावे म्हणून तसा कायदा देखील पारित केला. तो कायदा पारित करताना आपण बंगळूरूच्या धर्तीवर या विद्यापीठाचे कुलपती सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असावे असे आपण म्हटलेले आहे. त्याप्रमाणे माननीय कुलपतींशी विचारविनिमय करून या सगळ्या गोष्टी कराव्या लागतात. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व्यस्त असतात. तरी देखील विभागाच्या माध्यमातून पाठपुरावा करून ...(अडथळा)... कायदा आपणच गोंधळात पारित केला आहे. त्यावेळी आपले बहुमत होते. कायदा मंजूर करताना एकमत नव्हते. त्यावेळी मी विरोधी पक्ष नेता असताना सुधारणा दिली होती. यामध्ये कुलपती हे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आहेत. त्यामुळे ॲकेडेमिक स्टँडर्ड देखील वाढते. यामध्ये प्रशासकीय विलंब होत आहे. तो कमी करून पुढच्या ॲकेडेमिक इयरपर्यंत औरंगाबाद येथे अशा प्रकारचे विद्यापीठ सुरू करता येईल काय, या दिशेने आम्ही हालचाली सुरू केल्या आहेत. मला असे वाटते की, त्या यशस्वी होतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पुणे येथील घोरपडे पेठ सर्व्हे क्र.335 येथील एसआरए योजनेची चौकशी करणे

मु.शी. : पुणे येथील घोरपडे पेठ सर्व्हे क्र.335 येथील एसआरए योजनेची चौकशी करणे यासंबंधी श्री.अनिल भोसले,,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुण्यातील घोरपडे पेठ येथील सर्वे नं. 335 मधील फायनल प्लॉट 157/अ येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस (एसआरए) मंजूरी देण्यात येणे, या योजनेमध्ये विकासकाकडून बोगस कागदपत्रांच्या आधारे मुळ 78 असलेल्या झोपड्यांची संख्या वाढवून ती 122 पर्यंत वाढविण्यात आलेली असणे, या ठिकाणी एसआरए अंतर्गत बांधलेल्या बहुमजली इमारतीत पाणी उपलब्ध नसणे, लिफ्ट बंद असणे, इमारतीची देखभाल न करणे, अशा अनेक तक्रारी येथील झोपडपट्टी धारकांकडून गेल्या दीड वर्षापासून एसआरए व महापालिकेकडे वारंवार करण्यात येणे, परंतु पालिका प्रशासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, येथील रहिवाश्यांच्या पाठपुराव्यानंतर एसआरएसकडून विकासकास पात्र व अपात्रतेच्या यादीची छाननीचे व काम बंद ठेवल्याचे आदेश देवूनही विकासकाकडून या आदेशाची पायमल्ली केली जाणे, परिणामी रहिवाश्यांमध्ये शासनाबाबत असंतोष व संतापाची भावना निर्माण होणे, घोरपडे पेठ सर्वे नं.335 येथील एसआरए योजनेची चौकशी करुन विकासकावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रवींद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात एसआरएच्या योजना सुरू आहेत. घोरपडे पेठ, सर्व्हे क्र.335 येथील अपात्र रहिवाशांची दिनांक 2.6.2015 रोजी तहसीलदार मार्फत चौकशी करण्यात आली होती. मागच्या सरकारच्या काळात या एसआरए योजनेसंबंधी पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीची दर महिन्याला बैठक होत होती. दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची ही समिती असते. त्यामध्ये एसआरए योजनेचे विषय येतात. तेव्हा आपण समिती कधी घटित करणार आहात व यासंबंधातील बैठक कधी होणार आहे ? घोरपडे पेठ येथे स्थगिती उठविण्यात आली आह. ती स्थगिती कोणत्या कारणामुळे उठविली आहे ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, पुण्यातील घोरपडे पेठ येथील सिटी सर्व्हे नं.335/अ/2 मधील अंतिम भूखंड क्र.157/अ येथील गलिच्छ वस्तीवर मे.चिंचवले डेव्हलपर्स,पुणे यांनी पुनर्वसन योजना दाखल केली.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 10 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, 122 झोपड्या होत्या. त्यापैकी जवळ जवळ 26 झोपडीधारक अपात्र होते, तर 96 झोपडीधारक पात्र होते. त्यानंतर पुन्हा याची छाननी करण्यात आली. त्यात 96 पैकी 9 झोपडीधारक पुन्हा अपात्र ठरले. 21 झोपड्या होत्या त्या बॉर्डरवर होत्या. त्यांचा अर्धा भाग दुसऱ्या प्लॉटमध्ये जात होता. त्यामुळे छाननी करण्यात आली. यासाठी स्थगिती उठविण्यात आली. आता तेथे 66 पात्र झोपडीधारक आहेत. परंतु, आता शासनाने नवीन जी.आर.निर्गमित केला आहे. त्यानुसार या झोपड्या देखील पात्र ठरतील. त्या अनुषंगानेच ही स्थगिती उठविण्यात आली आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बालमजुरांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

मु.शी. : बालमजुरांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यात मानव विकास केंद्राच्या माध्यमातून यशदाने नाशिक, जालना, औरंगाबाद,जळगांव, धूळे, सातारा, ठाणे, गोंदिया, अमरावती, नांदेड, सांगली ह्या जिल्ह्यात रँन्डम पध्दतीने ६ ते १४ वयोगटातील बाल कामगारांचा अभ्यास करणे, त्यात प्रामुख्याने कत्तलखाने, मटन शॉपी, घरकाम, कचरा वेचणारे, शेत मजूरी करणारे, वीट भट्टीवर काम करणारे, मूर्ती काम व मणी ओवण्याचे काम करणारे, बिडी उद्योग व गॅरेजमध्ये काम करणारे, भिक मागणे, खडी फोडणे, प्लॉस्टीक रिसायकलींग व्यवसायात काम करणारा बालमजूर मोठया प्रमाणात असणे हे सिध्द होणे, सर्वांसाठी शिक्षण हक्क कायदा, राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प १९८४ पासून सुरु असणे, तसेच बालकामगारांच्या पूनर्वसनासाठी सर्व समावेशक असा "बालमजूरी निर्मूलन" आराखडा तयार करुनही आज राज्यात वरील उद्योगांमध्ये रँन्डम सर्व्हे केल्यानंतर ११०७२ बालमजूर आढळणे, त्यांना कोणत्याही शैक्षणिक सूविधा न मिळणे, गीट्टी फोडणे, विटभट्टी, प्लॉस्टिक रिसायकलींग सारखे धोक्याचे काम करणाऱ्या व इतरही व्यवसायात काम करणाऱ्या बालमजूरांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, त्याकडे शासनाचे झालेले दूर्लक्ष, बाल कामगार कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, शासनाने यावर त्वरीत करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. ..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विधान परिषदेत आणि विधान सभेत बाल कामगारांचा प्रश्न चर्चेला जात नाही. प्रत्येक वेळी बाल कामगारांवर अन्याय होत असतो. बाल कामगार ही अनिष्ठ प्रथा नष्ट करण्यासाठी केंद्र शासनाने बाल कामगार कायदा (प्रतिबंध व नियमन) अधिनियम 1986 पारित केला असून राज्य शासनाने महाराष्ट्र बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) नियम 1997 सन 1997 मध्ये तयार केले. जवळपास अनुसूची "अ" मधील 18 व्यवसाय व अनुसूची "ब" मधील 65 व्यवसाय बाल कामगारांसाठी बंद करण्यात आले. यासंबंधी मानव विकास केंद्राने सर्व्हे केला आहे. प्लास्टीक रिसायक्क्लींग, भंगार गोळा करणे, खडीकाम, भीक मागणे, गॅरेजमध्ये काम करणे, मणी उद्योग, विडी उद्योग, मूर्ती काम, विट भट्टी, मटण शॉप, कत्तलखाने, कचरा वेचणारे उद्योग व व्यवसाय अनुसूचीमध्ये आहेत. अकरा जिल्ह्यांचा रँडम सर्व्हे केल्यानंतर असे लक्षात आले की, 8937 मुले ही अजूनही अशी कामे करीत आहेत. त्यापैकी 4971 मुले शाळेत जात होती. उर्वरित मुले शाळेत जात नव्हती. ही मुले सकाळी 6.00 ते 12.00 नव्हे तर सायंकाळी 4.00 ते 5.00 वाजे पर्यंत भट्टीमध्ये काम करीत असतात. या मुलांचा शाळेचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न विचारात घेता त्यांना तेथून मुक्त केल्यानंतर बालसुधारगृहामध्ये टाकल जाते. रिमांड होम ही मुलांना सुधारण्याची कंपनी आहे असे नाही. रिमांड होमध्ये गुन्हेगारी स्वरूपाची मुले जातात. त्यामुळे या बाल कामगारांना तेथे टाकून आपण मोठ्या प्रमाणावर गुन्हेगार निर्माण करणार आहात काय हा माझा प्रश्न आहे. तसेच या मुलांच्या शिक्षणासाठी शाळेची व्यवस्था करण्यात येणार आहे काय, या मुलांना ठेवण्यासाठी वसतिगृहाची व्यवस्था करण्यात येणार आहे काय, आर्थिक चणचणीमध्ये ही मुले काम करतात. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न शासन सोडविणार आहे काय ?

श्री विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस म्हणाल्याप्रमाणे बालकामगारांचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. या विषयावर सभागृहात क्वचितच चर्चा होत असते. त्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून एक महत्त्वाचा विषय सभागृहासमोर आणलेला आहे. त्यांनी दोन प्रश्न मांडलेले आहेत. शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर शाळा बाह्य असलेल्या बाल कामगारांना शाळेत आणून त्यांच्या वयानुसार त्या त्या इयत्तेत दाखल करणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

बंधनकारक झालेले आहे. त्यामुळे पुढच्या काळात प्रत्येक बालकामगाराला त्याच्या वयानुसार त्या त्या इयत्तेमध्ये प्रवेश दिला जाईल. स्पेशल ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून आपण 2033 मुलांना ठेवले होते. त्यापैकी 342 मुले स्थलांतरित झाली होती. सन्माननीय सदस्यांची सांगितलेला मुद्दा महत्त्वाचा आहे. आपण धाड घातल्यानंतर जी मुले येतात त्यांना शाळा व वसतिगृहांमध्ये प्रवेश दिला तर आपल्याला जी चिंता वाटते ती दूर होईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ज्या फॅक्टरीमध्ये किंवा व्यवसायामध्ये मुले सापडतात त्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याची कायद्यात तरतूद आहे. त्यामुळे हे बालकामगार जेथे काम करीत होते अशा फॅक्टरी मालकांवर आपण कारवाई केली आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासंबंधात जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून वेगळे अभियान राबविले जाते. त्यातून बालकामगार शोधले जातात. बालकामगार असणाऱ्यांवर आणि ठेवणाऱ्यांवर कायद्याने कारवाई केली जाईल.

.....

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ***चंद्रपूर जिल्ह्यातील मार्डा बॅरेज प्रकल्पाला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने मंजुरी देणे***

मु.शी. : ***चंद्रपूर जिल्ह्यातील मार्डा बॅरेज प्रकल्पाला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने मंजुरी देण***यासंबंधी श्री.संदिप बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संदिप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्ह्यातील मार्डा बॅरेज प्रकल्पाला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने मंजुरी देण्यात येणे, सदर मंजुरी देताना विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने आवश्यक असताना देखील खनिकर्म मंडळाची परवानगी न घेणे, सदर प्रकरणाची प्रशासनाला वारंवार तक्रार करुनही चौकशी देखील करण्यात न येणे, दिनांक १४ जुलै, २०१५ रोजीच्या सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या तारांकित प्रश्नांच्या यादीमध्ये देखील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे मोघम उत्तर देवून त्याबाबत सुस्पष्टता न केल्याने सदर प्रकरण दडपण्याचा होत असलेला प्रयत्न, मार्डा बॅरेज प्रकल्प बांधताना होत असलेली अनियमितता, त्यामुळे जनतेत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माझे स्पेसिफिकली 3-4 प्रश्न आहेत. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने हा प्रकल्प एमआयडीसीला कोणत्या कारणासाठी दिला होता ? मार्डा बॅरेजच्या परिसरात प्रचंड प्रमाणात कोळसा खाणी असताना सुध्दा या प्रकल्पाला परवानगी कशी काय देण्यात आली ? या प्रकल्पासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र कोणी व का दिले, प्रमाणपत्र देण्यासंदर्भात मंत्रिमहोदयांची परवानगी घेण्यात आली होती काय ? मंत्र्यांची परवानगी घेतल्यानंतर सदर काम एमआयडीसीला किती दिवसात हस्तांतरीत करुन हे काम सुरु करण्यात आले यासंदर्भातील सखोल चौकशी केली जाणार आहे काय ? पर्यावरणाचे प्रमाणपत्र मुंबईवरुन हवे असताना ते प्रमाणपत्र लोकल अधिकाऱ्याकडून घेण्यात आले ही वस्तुस्थिती आहे काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा औद्योगिक वसाहतीसाठी हा संपूर्ण प्रकल्प करण्यात आलेला आहे. या प्रकल्पासाठी पर्यावरणाच्या परवानग्या मिळालेल्या आहेत. या विषयाच्या संदर्भात माझ्याकडे कॉपिज असून त्या आपल्या माहितीसाठी पाठवून देतो. या परवानग्या आताच देण्यात आल्या आहेत असे नसून या परवानग्या सन 2009-2010-2011 मध्ये देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्प हा पिण्याच्या पाण्यासाठी असल्यामुळे या प्रकल्पाला कोणत्याही परवानगीची आणि एन्व्हायर्मेंट इम्पॅक्ट असेसमेंटची गरज नाही अशा प्रकारचे पत्र पर्यावरण विभागाने दिलेले आहे. या प्रकल्पाला मंत्रिमहोदयांनी परवानगी दिली आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यानी विचारला असून या प्रश्नाला "होय" असे उत्तर असून महामंडळ स्तरावरुन तत्कालीन मंत्री जलसंपदा यांनी दि. 22/10/2010 रोजी हा प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडूनच करावा असे आदेशित केले होते व या आदेशाचे पुन्हा पुनर्विलोकन सन 2011 मध्ये करण्यात आले. 2011 मध्ये तत्कालीन जलसंपदा मंत्र्यानी हा प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडूनच करावा असे आदेशित करण्यात आले होते. या प्रकल्पातील पाण्याचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी असून काही अटी आणि शर्थींना आधीन राहून परवानग्या देण्यात आल्या आहेत. यामध्ये चार महिन्याच्या पाण्याची साठवण क्षमता असावयास पाहिजे असते त्यामुळे मार्डा बॅरेजचा प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेला आहे. या प्रकल्पाला पर्यावरण विभागाच्या सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. खनिकर्मच्या संदर्भात परवानग्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे.....

एन्व्हायर्मेंट इम्पॅक्ट असेसमेंटचे पत्र असून या परवानग्याचा डायरेक्ट जलसंपदा विभागाशी संबंध येत नसून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संबंधित यंत्रणेकडून परवानग्या घेतलेल्या असून यामध्ये गैर असे काहीही झालेले नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, सभागृहाच्या पटलावर चुकीचे रेकॉर्ड राहू नये यासाठी मी सांगू इच्छितो की, हा प्रकल्प पिण्याच्या पाण्यासाठी आहे अशी माहिती मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी दिलेली आहे परंतु हा प्रकल्प पिण्याच्या पाण्यासाठी नसून या ठिकाणच्या दोन उद्योगाच्या पाण्यासाठी हा प्रकल्प घेण्यात आलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात थोडीशी दुरुस्ती करु इच्छितो. या प्रकल्पाचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी तसेच औद्योगिक वापरासाठी करण्यात आलेला आहे. पर्यावरण विभागाच्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की, "As your above project is only for water supply of MIDC area it does not attract provision of Environment Impact Assessment Notification,2006." या ठिकाणी एमआयडीसी असून या ठिकाणच्या लोकांना पिण्यासाठी पाणी लागत असतेच तसेच ऊद्योगासाठीही पाणी लागत असते.

तालिका सभापती : आता दोन लक्षवेधी सूचना राहिलेल्या आहेत. त्यामुळे सभागृहाची वेळ 10 मिनिटांसाठी वाढवून देण्यात येत आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोल्हापूर जिल्हयात ***मनरेगा अधिनियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार केल्याचे उघडकीस येणे***

मु.शी. : कोल्हापूर जिल्हयात ***मनरेगा अधिनियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार केल्याचे उघडकीस येणे*** यासंबंधी ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूर जिल्ह्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१२-१३ पासून चालु असलेल्या कामांची शासन निर्णय दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ अन्वये मापदंडाप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील उपअभियंता यांनी तपासणी केलेल्या कामामध्ये मनरेगा अधिनियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे जून, २०१५ मध्ये उघडकीस येणे, सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये केलेली बहुतांश कामे मजुरांद्वारे करावयाची असतांना सदर कामे जे.सी.बी., पोकलॅनसारख्या यंत्रसामुग्रीने करुन मजुरांचे खोटे हजेरीपट भरुन मोठ्या प्रमाणात शासकीय पैशांचा झालेला अपहार, त्याचप्रमाणे सिंचन विहिरीच्या ऐवजी जिल्हा परिषद सदस्यांसाठी दगडाची खाण काढणे, शासनाने मागेल त्याला काम ह्या उदात्त हेतूने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत तालुका पातळीवरील अभियंत्याला रु ५०,०००/- ची तांत्रिक मंजुरीचे अधिकार असतांना, रुपये २५ लाखापेक्षा जास्त रकमेस नियमबाह्य मंजुरी प्रदान करण्यात येणे, करवीर तालुक्यातील चुये, इस्पूर्ली, कंदलगांव, येवती, निगवे, वडकशिवाले, जैताळ, आमशी वाघोबावाडी, बोलोली या गावातील पाणंद रस्त्यांच्या कामामध्ये खुप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचेही उघडकीस येणे, उपरोक्त व इतर केलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर, यांनी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, कोल्हापूर, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर, कार्यकारी अभियंता, जि.प. (बांधकाम) कोल्हापूर, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर यांना चौकशीचे आदेश देऊनही आजपावेतो कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ या कालावधीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यामध्ये झालेल्या कामामध्ये जवळजवळ १५०० कोटींच्यावर अपहार झाल्याची शक्यता वर्तवण्यात येणे, याकडे शासनाचे होत असेलेले अक्षम्य दुर्लक्ष, मनरेगा अंतर्गत झालेल्या कामाची सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब :सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भ्रष्टाचाराचे हे प्रकरण आहे. यासंदर्भात माझे स्पेसिफिकली दोनच प्रश्न आहेत. या विषयाच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल पाठविलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालामध्ये या कामात अनियमितता झाल्याचे स्पष्ट म्हटलेले आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिलेल्या अहवालामध्ये शाखा अभियंता श्री.वाय.टी.जमादार व शाखा अभियंता श्री.जाधव तसेच उप अभियंता श्री.अ.वा.अवटे हे दोषी असल्याचे स्पष्ट दिसत असल्याने त्यांचे निलंबन आपण करणार आहात काय ? जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अहवालाप्रमाणे भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून रक्कम वसूल केली जाणार आहे काय, सदर रक्कम किती कालावधीत वसूल केली जाणार आहे ? तसेच उप अभियंता श्री.अ.वा.अवटे यांच्या संपत्तीची चौकशी होऊन त्यामध्ये ते भ्रष्टाचारी आढळल्यास त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तालुका स्तरावरील अभियंत्यांना शासनाच्या दि.3/8/2011 च्या निर्णयानुसार 25 लक्ष मर्यादेपर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे रुपये 50,000/- पेक्षा जास्त रकमेस तांत्रिक मंजुरी देणे ही बाब नियमबाह्य ठरत नाही. परंतु जैत्याळ, आमशी, वाघोबावाडी, बोलोली या गावातील कामांच्या बाबतीत चौकशी अहवालामध्ये नमूद केलेली मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रके, हजेरीपट इ. मुळ कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्यांकडून मागविण्यात आलेली आहेत. यासंदर्भातील संपूर्ण चौकशी करुन यामध्ये जर अनियमितता आढळली तर यामध्ये ... विभागीय रिपोर्ट आहे..... आपण मागे सुध्दा सभागृहात पाहिले आहे की, यामध्ये प्रॉपर चौकशी करुन दोषारोप झाले नाही तर ही मंडळी मॅटमध्ये सुटून जातात.

ॲड.अनिल परब :अहवालामध्ये अनियमितता झालेली आहे हे सिध्द झाले असून त्याची कॉपी मी आपल्याला सादर करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे काही सांगत आहेत ते सत्य मानून विभागीय चौकशीमध्ये पुढील दोन महिन्याच्या आत कारवाई केली जाईल. वसुली असेल तर वसुलीही केली जाईल. याबाबत सदस्यांनी निश्चिंत रहावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत 1500 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. जे काम मजुरांकडून करुन घ्यावयास पाहिजे होते ते काम जेसीबी, पोकलेन मशीन लावून श्री.अवटे यांनी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. या अधिकाऱ्याच्या विरोधात सर्व रिपोर्ट आलेले असल्यामुळे यासंदर्भात चौकशी करण्याची गरज नसून श्री.अवटे यांचे प्रथम निलंबन करुन त्यानंतर त्यांची चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघाशी सुध्दा सांगितले आहे की, या अगोदरच्या केसेसचा अहवाल पाहिला तर आपल्याला दिसून येईल की, नीट पध्दतीने काम झाले नाही तर हे अधिकारी मॅटमध्ये जातात व नंतर हे अधिकारी मॅटमधून सुटतात. त्यामुळे घाई घाईने निर्णय करावयाचा, पॉलिटिकली, संवेदनशिलपणे निर्णय घ्यावयाचा व नंतर हे अधिकारी मॅटमधून सुटतात त्यामुळे असे होऊ नये म्हणून नीट कायदेशीर चौकशी करुन आपण पुढे जाऊ व योग्य ती कारवाई करु एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ***पाचगणी (जि.सातारा) येथील टेबल लँडवर मागील ४० ते ४५ वर्षापासून घोडागाडी चालवून गरीब कुटुंब उदरनिर्वाह करीत होते परंतु*** एक वर्षापासून त्यांचा हा व्यवसाय बंद करण्यात आल्यामुळे या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ येणे

मु.शी. : ***पाचगणी (जि.सातारा) येथील टेबल लँडवर मागील ४० ते ४५ वर्षापासून घोडागाडी चालवून गरीब कुटुंब उदरनिर्वाह करीत होते परंतु*** एक वर्षापासून त्यांचा हा व्यवसाय बंद करण्यात आल्यामुळे या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ येणे यासंबंधी प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"***पाचगणी (जि.सातारा) येथील टेबल लँडवर मागील ४० ते ४५ वर्षापासून घोडागाडी चालवून गरीब घोडागाडीवाले आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत असून त्यांचा हा व्यवसाय धोक्यात आल्याचा गंभीर प्रकार माहे जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, टेबल लँड हे आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचे पठार असल्यामुळे हे पठार पाहण्यासाठी देश विदेशातील लाखो पर्यटक येत असणे, येथे येणारे पर्यटक घोडागाडीत बसून या विशाल पठारावरील विविध पॉईंट पाहत असणे, घोडागाडीच्या व्यवसायावर सुमारे ३०० हून अधिक कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असणे, या पठारावर गेल्या ५० वर्षापासून कोणत्याही प्रकारची वनस्पती जीवन नाही तरी सुध्दा घोडागाडीमुळे पर्यावरणाला धोका होणार असल्याचे खोटे भासविण्यात येवून घोडागाडी चालविण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे या घोडागाडी चालकांवर उपासमारीची वेळ येणे, पर्यावरणाला कोणताही धोका पोहचणार नसतानाही घोडागाडी बंद करणे ही गंभीर बाब असणे, यामुळे उदरनिर्वाहाचा एकमेव व्यवसाय असलेल्या घोडागाडी चालकांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब, घोडागाडी चालविण्याच्या व्यवसायावर बंदी न घालता त्यांना या व्यवसायासाठी टेबल लँडवरील ५ एकरचा ट्रॅक देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया.***"

श्री. प्रविण पोटे-पाटील (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, पाचगणी, जि.सातारा हे हिल स्टेशन असून या ठिकाणी गेल्या 40-50 वर्षापासून वंश परंपरेने घोडा-गाडी या स्वयंम रोजगाराच्या माध्यमातून 400 ते 500 परिवार उदरनिर्वाह करीत आहेत. एक वर्षापासून त्यांचा हा व्यवसाय बंद करण्यात आल्यामुळे घोडयांवर आणि घोडा-गाडीच्या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. या व्यवसायामध्ये गुंतलेली 90-95 मंडळी मागासवर्गीय असून त्यांनी कर्ज घेऊन घोडा-गाडीचा व्यवसाय सुरु केला होता. परंतु पर्यावरणाच्या नावाखाली बॉम्बे एनव्हायर्नमेंट ॲक्शन ग्रुपने कोर्टामध्ये बंदी घालण्याची मागणी केली. उच्च न्यायालयाने विशिष्ट अटी लादून त्यांना व्यवसाय करण्याची परवानगी दिली आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

प्रा.जोगेंद्र कवाडे....

पाचगणी गिरीस्थान नगरपरिषदेने उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून घोडागाडी चालविण्यासाठी परवानगी द्यावी असा ठराव केलेला आहे. नगरपरिषदेने फक्त घोडागाडीचालकांना आठ मीटर रुंदीचा रस्ता द्यावा, असा ठराव केलेला आहे. त्यांना घोडागाडी चालविण्यासाठी आठ मीटर रुंदीचा रस्ता दिला तर त्यांना घोडागाडीचा व्यवसाय करता येणार नाही. तेव्हा तेथील घोडागाडी धारकांनी नगरपरिषदेस उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका सादर करण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने नगरपरिषदेने 2014 च्या ठरावाद्वारे उच्च न्यालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याचा ठराव केला आणि तो जिल्हाधिकारी यांना कळविला आहे. माझा प्रश्न आहे की, जिल्हाधिकाऱ्यांनी सदर पुनर्विलोकन याचिका उच्च न्यायालयात लवकरात लवकर दाखल करण्याबाबत त्यांना निदेश देण्यात येतील काय ?

श्री. प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी या ठिकाणी जो विषय मांडलेला आहे तो नगर विकास विभागाशी संबंधित आहे. हा प्रदूषण नियंत्रण मंडळाचा विषय नाही. परंतु त्यांनी जो विषय मांडलेला आहे,त्याबाबत मी थोडी माहिती घेतली आहे. महाबळेश्वर येथील पाचगणी टेबल लँडवरील हा जुना व्यवसाय आहे. संबंधित लोकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने याचिका देखील दाखल केलेली आहे. न्यायालयाने आदेश दिले होते की, घोडागाडी धारकांच्या म्हणण्यानुसार त्यांना ट्रॅक आखून द्यावा. त्याप्रमाणे नगरपालिकेने तसा ट्रॅक आखून देण्याची व्यवस्था देखील केली होती. पण तेथील घोडागाडी धारकांनी त्यामध्ये अडथळा निर्माण करून सांगितले की, आम्हाला या ट्रॅकवरून घोडागाडी चालविणे शक्य होणार नाही. आम्हाला मोठा ट्रॅक पाहिजे, त्यांनी ते काम अडविले. नगरपालिकेने ते काम हाती घेतले आहे. त्यांनी तो विषय जिल्हाधिकारी यांच्याकडे मांडला आहे.यातून मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगण्यात येईल. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न आहे. त्यांचा 10-15 वर्षापासूनचा विषय आहे. त्यांचा रोजगाराचा विषय मार्गी लावू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी अतिशय चांगली लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. काबाडकष्ट करून जगणारी ही मंडळी आहेत. पाचगणी टेबल लँड येथील घोडागाडी धारकांचा प्रश्न आहे तसाच मुंबईतील घोडागाडी धारकांचा देखील तोच प्रश्न आहे. एकेकाळी मुंबईतील घोडागाडी ही पर्यटकांचे खास आकर्षण होती. आज त्या घोडागाडी धारकांवर उपासमारीची वेळ आली आहे. आपण महाबळेश्वर येथील घोडागाडी धारकांसोबत मुंबईतील घोडागाडी धारकांचा देखील विचार करणार आहात काय, या संदर्भात उच्च न्यायालयात फेरयाचिका दाखल केलेली आहे काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, होय.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय उच्च न्यालयाने त्यांच्या आदेशात नमूद केले आहे की, "So far as the permission to use horse-cart is concerned, High Level Monitoring Committee set up in 2004, has in terms held that ride of horse-carts cannot be allowed on the main table land and the same could be restricted to the portion of 20 acres specially demarcated for the purpose." फक्त 20 एकरची जमीन वापरु नये असे म्हटलेले आहे. आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची ही टेबल लँड आहे. त्या टेबल लँडवर गवताचे एकही पात नाही, झाडे नाहीत, त्यामुळे पर्यावरणाचा काही संबंध येत नाही. तरी सुद्धा पर्यावरणवाद्यांनी उच्च न्यायालयात ही याचिका दाखल केल्यामुळे 300 ते 400 कुटुंबांच्या पोटावर लाथ मारण्याचे काम त्यांनी केले आहे. या संदर्भात शासन पुढाकार घेऊन पाचगणी येथील टेबल लँडवरील घोडागाडी धारकांना न्याय देणार काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये एमपीसी बोर्ड न्यायालयात गेले नव्हते. बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुप जे पर्यावरण सांभाळण्याचे काम करीत आहेत त्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. त्या अनुषंगाने हा विषय येथे आलेला आहे. मी अगोदर सांगितले की, या लोकांची उपासमार होणार नाही त्या दृष्टीने नगर विकास विभागाशी बोलून जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, 10 एप्रिल, 2003 चे राजपत्र आहे, त्यामध्ये पाचगणी गिरीस्थान नगरपरिषदेच्या रस्त्यावर घोडे आणि घोडागाडी चालविण्यासाठी एक कायदा आहे. त्यांनी शासनाची परवानगी घेऊन लायसेन्स घेतलेले आहे. असे असताना मुंबईतील कोणा पर्यावरणवाद्यांनी न्यालयात जाऊन घोडे आणि घोडेगाडी धारकांवर अन्याय करायचा. ही अत्यंत चुकीची बाब आहे. तेव्हा शासनाने उच्च न्यायालयात अपील करुन या लोकांना न्याय मिळवून देणार काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, जिल्हाधिकारी आणि नगरपरिषद यांच्याशी चर्चा करुन लवकरात लवकर मार्ग काढण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुप यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. या लोकांना परदेशातून पैसा मिळतो. हे लोक विमानाने प्रवास करतात आणि येथे येऊन रुबाब करतात. माझे असे म्हणणे आहे की, घोडागाडी धारक, उंटगाडी धारक हे मागासवर्गीय आणि दलित समाजातील लोक आहेत. घटनेने दलितांना, मागासवर्गीयांना जगण्याची, उपजीविका करण्याची जी साधने दिलेली आहेत ती हिरावून घेण्याचे काम बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुपला आहे काय ? माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय आपणास बंधनकारक ठरतो. सन 2000 मध्ये आमच्या येथे बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुपने निसर्ग आणि वनाचा ऱ्हास होतो अशी याचिका केल्यामुळे 69 हजार झोपड्या बुलडोझरने तोडण्यात आल्या होत्या. आदिवासी लोकांची घरे तोडण्यात आली. आज ते विकासकांशी हातमिळवणी करीत आहेत. माझा प्रश्न आहे की, बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुप आणि ए.बी.गोयंका यांची चौकशी शासन करणार काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मांडलेल्या विषयाची चौकशी करण्यात येईल. पर्यावरणाचा संतुलन राखणे हे आपल्या सर्वांचे काम आहे. त्या अनुषंगाने ज्या ज्या महत्वाच्या गोष्टी असतील,रोजगाराचा विषय असेल त्याप्रमाणे माहिती घेण्यात येईल आणि त्यापद्धतीने कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुप हे जाणूनबुजून काही काम करतो की काय अशी शंका येते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या मताशी मी सहमत आहे. महाबळेश्वर येथील पाचगणी टेबल लँडवर जवळपास 300 ते 400 मागासवर्गीय लोक घोडागाडी चालविण्याचे काम करतात ते बॉम्बे एनव्हायरोमेंटल ॲक्शन ग्रुपला पहावत नाही काय ? माझा प्रश्न आहे की, अशा एनजीओवर ॲक्शन घेता येते काय, असल्यास तशी ॲक्शन लवकरात लवकर घेऊन घोडागाडी चालविणाऱ्या लोकांना न्याय देण्यात येईल काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माहिती घेऊन त्याप्रमाणे आदेश देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : या ठिकाणी महिला व बाल विकास मंत्री उपस्थित आहेत. मी काल त्यांच्याशी दूरध्वनीवर शिरूर तालुक्यातील एका घटनेच्या संदर्भात चर्चा केली. माननीय मंत्री महोदयांना तेथील परिस्थितीची जाणीव आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्या ठिकाणी बऱ्याच महिला मागील बारा-तेरा दिवसांपासून आंदोलनासाठी बसल्या आहेत. तेथे दोन मुलींवर बलात्कार झाला होता. तेथील दोन्ही सुरक्षारक्षकांना पोलिसांनी अटक केली होती. परंतु कालांतराने त्यांची सुटका झालेली आहे आणि पुन्हा ते वसतिगृहामध्ये कामावर आले आहेत. आपणास तेथे महिला अधीक्षक वर्ग- 2 ची जागा भरावयाची आहे, ती त्वरित भरली तर त्या वसतिगृहामध्ये शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या मुलींना संरक्षण मिळेल. त्या वसतिगृहामध्ये 41 मुली राहत होत्या. ती संख्या 28 वर आली आहे आणि कालपरवा पर्यंत ती संख्या 16 झालेली आहे. वसतिगृहातील मुलींची संख्या फार कमी झालेली आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी या बाबतीत तातडीने योग्य तो निर्णय घ्यावा.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, आपल्याशी काल चर्चा झाल्याप्रमाणे पुढील दोन-तीन दिवसांत निर्णय घेऊन ती जागा भरण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने 1 ते 204 लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 204 ही निवेदने कृपया छापावीत)

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.10 ते 12.15 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सचिव : आता बुधवार, दिनांक 22 जुलै, 2015 रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.संदीप बाजोरिया व इतर वि.प.स. यांचा "यवतमाळ शहरात शालेय पोषण आहारातील तांदूळ खुल्या बाजारात विकल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 7847 चर्चेला घेण्यात येईल.

यवतमाळ शहरात शालेय पोषण आहारातील तांदूळ खुल्या बाजारात विकल्याबाबत

(६) * ७८४७ श्री.संदीप बाजोरिया, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात विद्यार्थ्यांसाठी आलेल्या शालेय पोषण आहाराचा १३१ कट्टे तांदूळ कलश ब्रान्डच्या नावाखाली खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना विभागीय पोलीस अधिकारी यांनी पकडल्याची घटना दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास घडली तसेच हजार क्विंटल तांदूळ असलेले गोडाऊन सिल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक २१ मार्च, २०१५ रोजी यवतमाळ शहरात विद्यार्थ्यांसाठी आलेल्या शालेय पोषण आहाराचे ४० कट्टे तांदूळ कलश ब्रान्डच्या नावाखाली खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना विभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी पकडला आहे.

९१ कट्टे तांदूळ असलेले गोडाऊन सिल करण्यात आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी गुन्ह्याचा तपास केला असता असे आढळून आले की, मुलांचे शालेय पोषण आहाराचे तांदूळ वाहतूक करुन पुरविण्याचे काम ठेकेदार विनोद रमेशराव डोंगरे यांना देण्यात आले होते. त्यांनी अरशद बेग यांच्यासोबत करार करुन त्यांना वाहतूक करण्यासाठी नेमले होते. अरशद बेग यांनी पांढरकवडा बायपास रोड येथे गोडाऊन भाड्याने घेऊन तेथे तांदूळ ठेवले होते. त्यातील तांदूळ खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना अरशद बेग यांना पकडण्यात आले. या प्रकरणी अरशद बेग व त्यांच्या वाहन चालकाविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7847....

श्री.देवेंद्र फडणवीस....

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे गु.र.क्र.३०४५/२०१५, जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३, ७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यांच्याविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी उपस्थित असल्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन मी विचारु इच्छितो की, या सर्व प्रकरणाची नि:पक्षपातीपणे चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी जी तक्रार केलेली आहे त्या संदर्भात पूर्ण आणि नि:पक्षपातीपणे चौकशी केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रात्रशाळांना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्याबाबत

(१) * ७३०३ श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रकालीन शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १५ मार्च, २००७ मध्ये गठीत केलेल्या समितीच्या अहवालामध्ये रात्रशाळेंना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्याबाबत शिफारस करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने राज्यातील फक्त कोल्हापूर येथील आर्ट कॉमर्स नाईट महाविद्यालयाला पूर्णवेळ दर्जा दिला असून उर्वरित शाळांबाबत अद्याप निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.शिक्षण मंत्र्यांनी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, सदर निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?
श्री. विनोद तावडे : (१) होय हे खरे आहे.
(२) नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४), (५),च व (६) याबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आज गुरुपोर्णिमा आहे. त्यामुळे आज शिक्षकांच्या प्रश्नांना पूर्ण वेळ देऊ या. सर्व विषय आज नीट सोडवू. कारण शेवटी त्यांच्यामुळेच विद्यार्थी घडतो.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी गुरुपोर्णिमेच्या निमित्ताने जी घोषणा केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या घोषणेतून कृती होईल अशी अपेक्षा करतो. महोदय, राज्यातील.....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, याचा अर्थ सन्माननीय सदस्यांना माननीय मंत्र्यांच्या घोषणेबद्दल शंका आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, ही शिक्षक स्टाईल आहे.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, राज्यातील रात्रकालीन शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना पूर्णवेळ शाळांचा दर्जा देण्याबाबतचा हा प्रश्न आहे. दिवसाच्या शाळा आणि रात्रकालीन शाळा यांचा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि परीक्षा पध्दत सारखीच आहे. असे असताना सुध्दा रात्रकालीन शाळांना पूर्णकालीन शाळेचा दर्जा नाही. फक्त कोल्हापूर येथील आर्ट कॉमर्स नाईट महाविद्यालयाला पूर्णवेळ शाळेचा दर्जा दिला आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7303....

श्री. नागो गाणार ....

राज्यातील इतर रात्रकालीन शाळांना मात्र पूर्णकालीन दर्जा दिलेला नाही. हा भेदभाव आहे. हा भेदभाव दूर व्हावा अशी अपेक्षा आहे. शासनाने याबाबत एक समिती गठीत केली होती. समितीने रिपोर्ट सादर केला आहे. शासनाने त्या रिपोर्टचा आधार घेऊन निर्णय घ्यावा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत चालणाऱ्या रात्रकालीन महाविद्यालयांना पूर्णकालीन महाविद्यालयांचा दर्जा मिळतो. माझा प्रश्न असा आहे की, राज्यातील रात्रकालीन शाळांना पूर्णकालीन दर्जा शासन देणार का आणि किती कालावधीत देणार ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोल्हापूरच्या कॉमर्स कॉलेजचा उल्लेख केला आहे. ते डे कॉलेज होते, त्या डे कॉलेजला सन 1993 ला विशेष बाब म्हणून रात्र कॉलेजची मंजुरी दिली. मंजुरी देताना डे कॉलेजचे सर्व, जे काही होते ते आपोआप बंद झाले, त्यामुळे ते रात्र कॉलेजमध्ये शिफ्ट झाले. त्यामुळे स्वतंत्र रात्र महाविद्यालय असे काही नसून ते दिवसांचे होते ते रात्रीचे झाले, इतकाच त्यातील फरक केला आहे. मी अतिशय प्रामाणिकपणे सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणार आहे. महाराष्ट्रात शहरीकरण वाढत आहे. मला वाटते की, शहरीकरण वाढते तशी रोजगार करण्याची प्रवृत्ती अधिक होते. त्यामुळे रोजगार करून शिकता यावे यासाठी जेवढी व्यवस्था आवश्यक आहे तेवढी आपल्या राज्यात नाही. शिक्षण हक्क कायद्याचा नियम लावला तर आताच्या रात्र शाळांना शाळा म्हणताच येणार नाही. कारण तेवढे तास त्यांचे पूर्ण होत नाहीत. त्यामुळे त्याच्या पलीकडे जाऊन सरकारची कल्पना ही आहे की, अशा पध्दतीने आपण चांगल्या पूर्ण वेळच्या रात्र शाळा सुरू करू शकलो तर आपण त्या शाळांमध्ये रोजगार करणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देऊ शकतो. शिक्षकांच्या त्या पध्दतीच्या पूर्णवेळच्या नेमणुका होऊ शकतात. काही शिक्षक समायोजित सुध्दा होऊ शकतात. आपण काही शिक्षकांची नव्याने भरती करू शकतो. राज्यात रोजगाराची कौटुंबिक गरज असताना शिकण्याचीही व्यवस्था आहे अशाप्रकारचे चित्र राज्यात उभे करू आणि ही करणे सरकारची मानसिकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7303....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. मुंबईत 150 हून अधिक रात्र शाळा आहेत. जवळपास 125 ते 150 वर्षांची परंपरा मुंबईच्या रात्र शाळांना आहे. मात्र यांना मुख्य गरज आहे ती विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीची. माननीय मंत्र्यांनी आताच त्याबद्दल सांगितले आहे. सभापती महोदय, त्यांना अनुभवी शिक्षकांची गरज आहे, प्रयोगशाळा देण्याची गरज आहे आणि अभ्यासक्रमामध्ये विषयांची सवलत देण्याची गरज आहे, या तीन बाबतीत शासन काय भूमिका घेणार हा प्रश्न आहे. रात्र शाळा मुख्याध्यापक संघटना, शिक्षक संघटना आणि मासूक नावाची संस्था 4-5 वर्षांपासून या संदर्भात काम करीत आहे. पूर्वी शून्य टक्के निकाल लागणाऱ्या रात्र शाळांचे यावर्षीचा निकाल 63 टक्के लागला आहे. 90 टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढली आहे. दिवसा कष्ट करून रात्री शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांसाठी अनुभवी, तज्ज्ञ शिक्षकांची गरज आहे आणि ते परंपरेने उपलब्ध करून देण्याची गरज आहे. रात्र् शाळेत अनुभवी शिक्षक येण्यास तयार होत नाहीत ही अडचण आहे. कारण शिक्षण सेवक नावाची गोष्ट शिरल्यामुळे तेथे सुध्दा शिक्षकसेवक लावला जातो. त्यामुळे 2 हजार रुपयांवर शिक्षक तज्ज्ञ येत नाहीत. रात्र शाळेला शिक्षणसेवक देण्याची शिक्षणसेवक कायद्यामध्ये कुठेही तरतूद नाही. त्यामुळे शासन अनुभवी, तज्ज्ञ शिक्षक देण्यास तयार आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, चांगले शिक्षक दिले पाहिजेत आणि सरकारचीही देण्याची तयारी आहेच. शिक्षक अनुभवी, चांगले आहेत किंवा नाहीत या संदर्भातील व्याख्या करण्याची व्यवस्था आज आपल्याकडे नाही. सकाळच्या शाळांत जो शिक्षक शिकवितो, त्याला थोडे अर्धा वेळ या शाळांत शिकविण्यास देणे म्हणजे तो शिक्षक अनुभवी आहे का ? मला तर प्रामाणिकपणे असे वाटत नाही. आपल्याला याचे काही निकष ठरवावे लागतील. सर्व संबंधित घटकांची बैठक घेऊन अनुभवाच्या संदर्भात निकष ठरवू. नव्याने अनुभवी शिक्षकांची गरज पडली तर तशी भरती करू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7303....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर सातत्याने चर्चा होत आहे. शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन एक समिती गठीत केली होती. या समितीने केवळ त्या रात्र शाळांना पूर्णवेळ दर्जा देण्याच्या संदर्भातच नव्हे तर विद्यार्थी हिताच्या, अभ्यासक्रमाच्या, त्यांना मिळणाऱ्या पोषण आहाराच्या अशा वेगवेगळ्या विषयाच्या संदर्भात अभ्यास करून एक अहवाल शासनाला सादर केला आहे. मात्र तो अहवाल अद्यापही शासनाने स्वीकृत केलेला नाही. तो अहवाल येऊन 4-5 वर्षे झालेली आहेत. विद्यार्थ्यांच्या, शाळांच्या, त्यांच्या कार्यभाराच्या, वेतनाच्या, पेन्शनच्या संदर्भात त्या अहवालात ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्यांचा शासन गांभीर्याने विचार करणार आहे का ?

सभापती : माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे की, बैठक लावून .... असे काही माननीय मंत्री बोलले होते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अहवालामध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्यांची अंमलबजावणी होणे .... शालेय पोषण आहार शाळांमध्ये दिला पाहिजे. शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे ही शाळाच मान्य नाही तर देण्यामध्ये .... पुन्हा ऑडिटच्या क्वेरी निघतील. या सर्व गोष्टींची गुंतागुंत आहे. त्यातील या सर्व गोष्टींची गुंतांगुत संपून .... सन्माननीय सदस्यांची हा प्रश्न विचारण्यामागची भूमिका आहे ती पूर्ण् करण्याकडे शासनाकडून पावले टाकली जातील असा मी त्यांना विश्वास देतो.

सभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विद्यापीठात अधिसभा ही संस्था बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(2) * ७५८६ डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विद्यापीठात महत्वाची भूमिका बजविणारी अधिसभा ही संस्था बंद करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यामुळे विद्यापीठाच्या सर्वसमावेशक धोरणावर व विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होईल, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही
(2), (3) आणि (४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना उत्तरामध्ये बदल करावयाचा आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नाही.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, माननीय मंत्री म्हणत आहेत की, प्रश्नाने उत्तर "नाही" असे आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. अधिसभा रद्द करून वेगळे मंडळ आणण्याचे शासनाचे धोरण आहे असे आम्हाला समजत आहे, ज्यामध्ये या अधिसभेचे महत्त्व कमी करून त्यांची संख्या कमी करायची .... प्रत्येक विद्यापीठाचा या सर्व कामकाजामध्ये .... शेवटी हे विद्यापीठ जनतेसाठी असतात, जनतेचा सहभाग त्या ठिकाणी असला पाहिजे. आता जी अधिसभा आहे, ती सर्वसमावेशक आहे. तेथे विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, संस्थाचालकांचे, शिक्षकेत्तरांचे प्रतिनिधी आहेत. आता सोल नावाचे नवीन मंडळ करण्याचा शासनाचा धाकत आहे आणि त्या माध्यमातून या अधिसभा रद्द करून त्यांचे अधिकार संकुचित करण्याचे शासनाच्या मनात आहे अशी आमची दाट शंका आहे, त्याबद्दल माननीय मंत्री खुलासा करतील का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7586....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल विधेयक पारित केल्याच्या संबंधातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. निगवेकर समितीच्या अहवालात ज्याचा उल्लेख आहे, त्याच्याशी बहुधा आधीच्या सरकारमधील माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सहमत होते. त्यावेळी सुध्दा आणि आजसुध्दा निगवेकर समितीच्या सगळ्या अहवालाशी मी सहमत नाही. भूमिका ही आहे की, ॲकॅडेमिक गोष्टी आहेत त्यामध्ये कुलगुरुंना अधिक अधिकार असले पाहिजेत. ते खरे आहे. पण तरीही सर्वांमधून निवडून आलेली सिनेट किंवा सोल सर्वसमावेश असावी. कुलगुरुंना याला वर्षातून दोनदा-तीनदा आन्सरेबल राहिले पाहिजे, त्याशिवाय त्या विद्यापीठामध्ये चालणाऱ्या कामकाजामध्ये सर्वसमावेशक सहभाग राहणार नाही आणि तेथे काम करणारी मंडळी आन्सरेबल राहणार नाहीत. कॅबिनेट विधानमंडळ अधिवेशनात वर्षातून तीनदा उत्तर देते. असे उत्तर देणे गरजेचे आहे आणि त्या पध्दतीचा विचार आमचा आहे. आधीच्या सरकारमध्ये तो विचार होता. म्हणून याचे उत्तर 'नाही' असे आहे.

सभापती : मंत्री महोदय, काल मी आपणाला सूचना दिली होती की, केअर टेकर गव्हर्नमेंटच्या पध्दतीने लवकरात लवकर घ्यावे.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, आज 108 पर्यंत अधिसभेतील सदस्यांची संख्या आहे. ती संख्या तशीच ठेवतील का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ती संख्या आणि त्यांची कॉन्स्टिट्युअन्सी या संदर्भात थोड्या वेगळ्या करण्याचा विचार त्यामध्ये आहे. त्यामुळे संख्या तर कमी होणार नाही. मला तर वाटते की, एखादी वाढू शकते. नागपूरला डिसेंबर महिन्यामध्ये हा कायदा प्रत्यक्षात चर्चेला येईल. त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांना यामध्ये सहभाग घेऊन त्यात दुरुस्त्या सूचविता येतील. आपण ज्या दुरुस्त्या चांगल्या असतात, त्या स्वीकारतो हे सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनाही माहीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथील अंबाझरी तलावातील पाणी प्रदुषित झाल्याबाबत

(3) * ८२८० श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर येथील अंबाझरी तलावातील पाणी प्रदुषित झाले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, तलावात एमआयडीसी, वाडी व अन्य परिसरातील व नाल्याच्या स्त्रोतातून प्रदूषित पाणी जमा होते, हे ही खरे आहे काय,
(3) याबाबत काही पाहणी अहवाल शासनाकडे आहे काय,
(4) दूषित पाण्यामुळे नागरीकांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, प्रदूषित अंबाझरी तलाव स्वच्छ करण्यास शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. प्रवीण पोटे-पाटील, श्री. रामदास कदम यांच्याकरिता : (१) होय.
(2) अंशत: खरे असून अंबाझरी तलावात वाडी नगरपरिषद क्षेत्रातील घरगुती सांडपाणी मिसळत आहे.
(3) होय.
(4) अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही.
(5) वाडी नगरपरिषदेच्या क्षेत्रातील घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या अंबाझरी तलावाच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वाडी नगरपरिषदेस प्रदूषण कायद्याच्या कलम ३३ (अ) नुसार प्रस्तावित निर्देश दिले आहेत, तसेच अंबाझरी तलावामध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी सदर तलावाचा राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबतचा आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त प्रस्ताव दि. ८/१०/२०१२ रोजी केंद्र शासनास पाठविण्यात आला असून सद्यस्थितीत प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, नागपूर येथील अंबाझरी तलाव नागपूरवासीयांच्या करिता ऑक्सिजन देणारे एक स्थळ आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8280.....

श्री.प्रकाश गजभिये.....

सभापती महोदय, लेखी उत्तराच्या प्रश्न भाग 4 मध्ये "अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही," असे नमूद केले आहे. जर शासनाकडे अशी तक्रार प्राप्त झाली नसेल तर मग पुढील उत्तरात "कलम 33 (अ) नुसार प्रस्तावित निर्देश दिले आहेत," असे उत्तर कशाच्या आधारावर दिलेले आहे ?

सभापती महोदय, अंबाझरी तलाव हा नागपूर शहराच्या मध्यभागी आहे व त्याच्या बाजूला वाडी नगरपंचायत क्षेत्र आहे. या नगरपंचायत क्षेत्रातील सांडपाणीच नाही तर सिव्हरेज आणि या परिसराला लागून असलेल्या एमआयडीसीचे प्रदूषित पाणी या तलावात सोडल्यामुळे तलावाचे पाणी पिण्यायोग्य तर सोडाच पण अन्य कोणत्याही उपयोगाचे राहिलेले नाही. अंबाझरी तलावाच्या पाण्यावर नागपूर सुधार प्रन्यासचा स्विमिंग पुल सुरु आहे. माझा प्रश्न असा आहे की, वाडी नगरपंचायतीकडून त्यांच्या क्षेत्रातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया केंद्र सुरु करणार का ?

सभापती महोदय, एमटीडीसीव्दारा अंबाझरी तलावाचे सौदर्यीकरण करण्यात येणार असून ते एक पर्यटन स्थळ बनविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. एमआयडीसीमधून सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित पाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी हा विषय एवढा फिरवून फिरवून मांडला की, नेमके त्यांना काय विचारायचे आहे, हेच कळले नाही. तरी सुध्दा मी उत्तर देण्यास तयार आहे.

सभापती महोदय, अंबाझरी तलाव हा नागपूर महानगरपालिका क्षेत्रात येतो. वाडी नगरपंचायत क्षेत्रातील सांडपाणी या तलावामध्ये जाते. परंतु, सिव्हरेज जात नाही.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे. मंत्री महोदय असे सांगत आहेत की, सिव्हरेज जात नाही. मी हा प्रश्न दीड महिन्यापूर्वी विचारलेला आहे. मंत्री महोदयांनी तेथील वस्तुस्थिती पाहिलेली नाही. वास्तविक पाहता त्यांनी त्या भागाचा दौरा करावयास हवा होता. त्या तलावात संपूर्णपणे सिव्हरेज आणि एमआयडीसीचे दूषित पाणी जाते. याबाबत आपण काय उपाययोजना करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8280.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत, ती वस्तुस्थिती आहे. नगरपंचायत क्षेत्रातील सांडपाणी दोन्ही नाल्यांच्या माध्यमातून या तलावास जाऊन मिळते, ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात मी संबंधित मुख्याधिकाऱ्यांना आज बोलाविलेले आहे. कोणत्याही परिस्थितीत 30 दिवसांच्या आत 25 टक्के निधी नगरपंचायतीने राखून ठेवावा आणि 75 टक्के निधी केंद्र शासनाच्या माध्यमातून देऊन पाण्यावर प्रोसेस करूनच पाणी सोडले जाईल, अशा प्रकारचे नियोजन आपण करू.

सभापती : मंत्री महोदय आपण मुख्याधिकाऱ्यांना बोलाविले आहे व त्यांच्याबरोबर आपण बैठक घेणार आहात. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश राजभिये यांनाही बोलावून घ्यावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, एमआयडीसीमधील युनिटस् चे प्रदूषित पाणी या तलावाला जाऊन मिळते व त्यामुळे मोठ्या प्रमाणात तलावातील पाणी प्रदूषित होते, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. मला आपल्या माध्यमातून त्यांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ईटीपीव्दारा प्रक्रिया करून पाणी सोडण्यात यावेत, अशा प्रकारचे सक्तीचे आदेश एमआयडीसीमधील युनिटस्ना दिलेले आहेत का ?

सभापती महोदय, वाडी नगरपंचायत क्षेत्रातील सांडपाण्यामुळे या तलावाचे पाणी प्रदूषित होते, असेही उत्तरात सांगितले आहे. वाडी नगरपंचायत ही नव्याने झाली आहे. ही नगरपंचायत सांडपाणी प्रक्रिया केंद्र स्थापन करु शकते. तथापि, हा विषय नगर विकास विभागाशी संबंधित आहे. राज्य शासनाच्याही या संदर्भात दोन-तीन योजना आहेत. त्यामुळे राज्य शासनाच्या योजनेतूनही हे केंद्र आपण स्थापन करु शकतो. तशा प्रकारे त्या विभागाला मंत्री महोदय सांगतील का ?

सभापती महोदय, सदर तलावाचा राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेत समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविण्यात आल्याची माहिती देखील लेखी उत्तरात देण्यात आली आहे. सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8280.....

श्री.रामदस कदम : सभापती महोदय, सदर प्रस्तावाची सद्यःस्थिती जशी आहे, तशीच आहे. मी येत्या 4 ऑगस्टला स्वतः दिल्ली येथे जाणार आहे. या प्रस्तावासह आणखी चार-पाच प्रस्ताव केंद्र शासन स्तरावर प्रलंबित आहेत आणि ते धसास लावण्याचा प्रयत्न मी या दिल्ली भेटीत करणार आहे.

सभापती महोदय, एमआयडीसी संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती वस्तुस्थिती आहे. सीईटीपी बुटीबोरी येथे आहे. एमआयडीसीतील काही युनिट टँकरव्दारा सांडपाणी बुटीबोरी येथे पाठवितात तर काही युनिटचे स्वतःचे ईटीपी आहेत. प्रक्रिया न केलेले सांडपाणी तसेच सोडण्यात येत असल्याबाबत एखाद्या युनिटची स्पेसिफिक तक्रार सन्माननीय सदस्यांनी केली तर निश्चितपणे त्यामध्ये लक्ष घालून त्यांच्याविरुध्द कारवाई करू.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मागील अधिवेशनात याच विषयावर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती, त्यावर प्रदीर्घ चर्चा झाली होती व तत्कालीन राज्यमंत्री श्री.सतिश पाटील यांनी उत्तर दिले होते.

सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्यांनी पर्यटनाच्या दृष्टीकोनातून प्रश्न उपस्थित केला आहे व त्यास सन्माननीय राज्यमंत्री श्री.प्रविण पोटे-पाटील व सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी उत्तर दिले आहे.

सभापती महोदय, अंबाझरी तलाव मुख्यमंत्री महोदयांच्या मतदारसंघात आहे. या तलावाची अत्यंत दुर्दशा झाली आहे. झाडी, झुडपे वाढलेली आहेत आणि मुख्यत्वेकरुन हा तलाव आत्महत्यांचा अड्डा झाला आहे. मी अकरावी पर्यंत शिकलो आहे. मला 'हवाई अड्डा', 'दारु अड्डा', वगैरे शब्द माहीत आहेत. परंतु, 'आत्महत्या अड्डा' हा शब्द माहीत नव्हता. माझा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत या तलावात किती लोकांनी आत्महत्या केल्या आहेत आणि त्या रोखण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांच्या अध्यक्षतेखाली आणि सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांचा सहभाग असलेली समिती नेमण्याचा विचार शासन करणार आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) S-4

SRR/ प्रथम श्री.मंगेश..... 12:30

ता.प्र.क्र.8280.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांच्याकडून तपशिलवार माहिती घेईन. त्यांना याची अधिक माहिती दिसते. माझ्याकडे याबाबतची माहिती नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची माहिती मला आहे.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, हा तलाव म्हणजे आत्महत्यांचा अड्डा झाला आहे, ही पूर्वीपासूनची परिस्थिती आहे. प्रदूषणाचा विषय आता आला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आत्महत्या हा विषय संवेदनशील आहे. सन्माननीय सदस्यांनी म्हटले म्हणून तो अड्डा झाला, असे होत नाही. याबाबत अधिक माहिती सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी घेतली पाहिजे. तथापि, मी त्यांच्याकडून अधिकची माहिती घेईन. अशा प्रकारच्या आत्महत्या झाल्या आहेत का, कशामुळे झाल्या आहेत, शेतीला कंटाळून, गरिबीला कंटाळून आत्महत्या झाल्या आहेत का, याची माहिती घेऊन उपाययोजना करू.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, आत्महत्यांसंबंधीचा विषय लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत आला होता. तथापि, या तलावाची स्वच्छता झाली पाहिजे, हा विषय महत्वाचा आहे. जर हा तलाव स्वच्छ झाला नाही तर सौंदर्यीकरणाची योजना पूर्ण होणार नाही. अंबाझरी तलाव पर्यटन हब झाले पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. परंतु, सांडपाणी आणि एमआयडीसीचे दूषित पाणी रोखण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे का, त्याकरिता वाडी नगरपंचायतीव्दारा सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरु करणार आहात का ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये.....

तसेच, एमआयडीसीचे पाणी तलावात येऊ नये यासाठी तेथे काही तरी प्रक्रिया करावी लागेल. आपण या संदर्भात शासनाच्या वतीने कोणती उपययोजना करणार आहात ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी आपल्या मताशी शंभर टक्के सहमत आहे. कोणत्याही परिस्थितीत वाडी नगरपरिषदेचे सांडपाणी त्या तलावात जाता कामा नये. यासाठी आपण वाडी नगरपरिषदेला नोटीस देखील दिलेली आहे. आपण 30 दिवसाच्या आत 25 टक्के निधी तत्काळ राखून ठेवावा आणि तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावा, अशा प्रकारचे निर्देश देखील दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सागितल्याप्रमाणे आपण ज्यावेळी पुन्हा मुख्याधिकाऱ्यांना बोलावू त्यावेळी आपणाला देखील बोलावून बैठक घेण्यात येईल.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, सभागृहात चांगल्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. खरे तर नागनदीचा उगम वाडीमधील महादेव नगर येथे आहे आणि त्या नदीच्या पत्रात फार पूर्वी अंबाझरी तलाव तयार करण्यात आला आहे. माझी आपल्या माध्यमातून एवढीच विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी सांगितल्याप्रमाणे एमआयडीसीचे पाणी देखील त्या तलावात सोडले जाते. मंत्री महोदयांनी सांगितले की, नगरपरिषदेचे सांडपाणी नदीच्या पात्रातून जाते. माझा प्रश्न असा आहे की, महादेवनगर वाडी पासून नागनदीला नोटिफाईड रिव्हर म्हणून मान्यता दिली तर हे सर्व प्रश्न सुटतात. म्हणून या दृष्टीकोनातून शासन कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. याबाबत अधिकची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सभापती : मंत्री महोदय, आपण माजी मेयर साहेबांना देखील त्या बैठकीला बोलवावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या परिक्षेमध्ये अन्य विषयाचा प्रश्न देण्यात आल्यामुळे निर्माण झालेला गोधळ

(४) * ८११४ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या व्दितीय सत्राच्या परिक्षेत ऑपरेशन सप्लायचेन मॅनेजमेंटच्या पेपरामध्ये uडिसीजन सायन्सस या विषयाचा प्रश्न देण्यात आल्याचे निदर्शनास येताच पेपर संपण्याच्या अवघ्या २० मिनीटे अगोदर तो बदलून देण्यात आल्याने मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न प्रत्रिकेतील प्रश्न ६ मधील हा दुसरा प्रश्न बदलण्यापुर्वी काही विद्यार्थ्यांनी तो सोडवला होता, पण ऐनवेळी हा प्रश्न बदलल्याने विद्यार्थ्यांच्या वेळ वाया गेला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेपर सेट करताना झालेल्या या चुकीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये, म्हणून शासन याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेणार वा घेण्यात येणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) ***अंशत: खरे आहे.***
(२) नाही.
(३) प्राशिनकाकडून झालेल्या चुकीबाबत खुलासा घेऊन विद्यापीठाकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, एमबीए विद्यार्थ्यांच्या संदर्भात पहिला लेखी प्रश्न विचारण्यात आलेला आहे. शासनाने पहिल्या प्रश्नाला 'अंशत: खरे आहे' असे लेखी उत्तर दिलेले आहे. अंशत: काय खरे काय आहे, याबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. तसेच, शेवटच्या लेखी प्रश्नाला असे उत्तर दिलेले आहे की, कार्यवाही करण्यात येत आहे. या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला लेखी प्रश्न असा विचारला होता की, एमबीए प्रथम वर्षाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत ऑपरेशन सप्लायचेन मॅनेजमेंटच्या पेपरमध्ये "डिसीजन सायन्स" या विषयाचा प्रश्न देण्यात आल्याचे निदर्शनास येताच पेपर संपण्याच्या अवघ्या 20 मिनिटे अगोदर तो बदलून देण्यात आल्याने विद्यार्थ्यांचा मोठा गोंधळ निर्माण झाला वगैरे. तो 20 मिनिटे अगोदर नाही तर बऱ्यापैकी अगोदर दिला होता. दिला होता हे खरे आहे आणि तो 2 तास अगोदर दिला होता, हेही तेवढेच खरे आहे. परंतु, वस्तुस्थिती अशी आहे की, हा प्रश्न ऐनवेळी कळविल्यामुळे विद्यार्थ्यांनी तो अटेंड केला, त्याला उत्तरे दिली, काहींनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8114.....

श्री.विनोद तावडे.....

तो अटेंड केला नाही. विद्यापीठ कायद्याप्रमाणे या संपूर्ण विषयामध्ये ताबडतोब निकाल लागल्यानंतर तो 34 (अ) प्रमाणे समिती समोर येतो आणि या विषयातील तथ्य तपासून त्यावर कार्यवाही केली जाते. ती संपूर्ण प्रक्रिया विद्यापीठाने सुरु केलेली आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एमसीव्हीसीच्या शिक्षक निर्देशकांची विनाअनुदान काळातील सेवा ग्राह्य धरण्याबाबत

(५) * ७५१४ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागातील एमसीव्हीसीच्या शिक्षक निर्देशकांची विनाअनुदान काळातील सेवा ग्राह्य धरण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) उपरोक्त विषयी अद्याप कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) ***व*** (२) ***सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे***
(३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, एमसीव्हीसी म्हणजे किमान कौशल्याचा जो अभ्यासक्रम आहे तो इयत्ता 11 वी, 12 वीच्या समकक्ष आहे. माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज यांची शाळा संहिता एक आहे. आपण माध्यमिकसाठी जे नियम केलेले आहेत त्यामध्ये आपण सन 2006 पासून विनाअनुदान काळातील सेवा ग्राह्य धरतो. त्याच प्रमाणे, मग ज्युनियर कॉलेजचा देखील दिनांक 01.01.1996 पासूनचा प्रश्न असेल. आपण अन्य ज्युनियर कॉलेजसाठी ज्या सुविधा लागू केलेल्या आहेत त्या आपण एमसीव्हीसीला लागू करणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, एमसीव्हीसीचा अभ्यासक्रम बदलण्याचे ठरले आहे. खरे म्हणजे तो बोर्डाचा अधिकार असतो. परंतु बोर्डाबरोबर कोणतीही चर्चा न करता, केवळ संचालकांनी थोडी मनमानी करुन यावर्षी हा अभ्यासक्रम लादण्याचा प्रयत्न केला जात आहे. कोणत्याही सोईसुविधा नसताना हा अभ्यासक्रम लादण्याचा अट्टाहास नसावा. तो पुढील वर्षापासून लागू करण्याचा निर्णय मंत्री महोदय घेणार आहेत काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एमसीव्हीसीच्या शिक्षक निर्देशकांचा विषय मागील अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे. शिक्षक, पदवीधर आणि इतर सन्माननीय सदस्य देखील सातत्याने हा विषय उपस्थित करीत असतात. यामध्ये असे झालेले आहे की, आपण कनिष्ठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7514.....

श्री.विनोद तावडे.....

महाविद्यालयातील शिक्षकांना जे मान्य केले ते स्वाभाविकपणे एमसीव्हीसीच्या शिक्षकांना देखील मान्य असले पाहिजे. परंतु, एमसीव्हीसीचा अभ्यासक्रम तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येत असल्यामुळे शालेय शिक्षण विभागाचे पत्र निघाले, परंतु तंत्र शिक्षण विभागाचे पत्र निघाले नाही. ज्यावेळी संपूर्ण तपासणी झाली, शिष्टमंडळ, बैठका हे सर्व झाल्यानंतर वित्त विभागाला आम्ही या विषयी कळविले. परंतु, वित्त विभागाची याला मान्यता नाही. कारण, त्यावेळी जो निर्णय झाला, तो मंत्रिमंडळासमोर जाऊन घेण्यात आला होता. वित्त विभागाच्या निगेटिव्ह रिमार्कवर त्यावेळी निर्णय घेण्यात आला होता. त्याच पद्धतीने तंत्र शिक्षण विभागाला कार्यवाही करावी लागेल आणि ती आम्ही करीत आहोत. त्यामुळे आपण वर्षानुवर्षे जो विषय उपस्थित करीत आहात त्या विषयाला येत्या काळात न्याय मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खाजगी अनुदानीत मराठी शाळांसाठी करावयाची उपाययोजना

(६) * ७३६६ श्री.विजय गिरकरर:र सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील घाटकोपर येथील एकेकाळी २६ तुकड्या असलेल्या सर्वोदय शाळेत आता केवळ २५ विद्यार्थी असल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील गरीब विद्यार्थ्यांसाठी असलेल्या खाजगी अनुदानीत शिक्षणाचा एक मोठा स्त्रोत आता कायमचा बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थीच नसल्याने शिक्षकांची संख्याही तब्बल १३० वरुन २ वर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा बिकट परिस्थितीत असलेल्या खाजगी अनुदानीत मराठी शाळांसाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१), ***(२)*** व (३) ***सदर शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार १ मुख्याध्यापक व २ शिक्षकांची पदे मंजूर आहेत.***
(४) पालकांचा कल पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये घालण्याकडे आहे. इंग्रजी माध्यमाच्या बहुतांश शाळा या विनाअनुदानित आहेत. यामुळे विनाअनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण वाढत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांमध्ये सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार इ. योजनांचा लाभ देण्यात येत आहे. तसेच राज्यात गुणवत्तावाढीसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व सरल (Systematic Administrative Reforms for Achieving Learning by student- SARAL) इ. उपक्रम राबविण्यात येत आहेत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबईत जवळपास सर्वच ठिकाणी मराठी शाळा बंद होण्याच्या स्थितीत आहेत. घाटकोपर येथील सर्वोदय शाळेत पूर्वी 25 तुकड्या होत्या. आता तेथे फक्त 25 विद्यार्थी आहेत, अशी अवस्था आहे. गिरगाव येथील शाळा असतील, भायखळा येथील शाळा असतील, सर्वच मराठी शाळा बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत. शासन मुंबईत मराठी शाळा सुरु राहतील यासाठी धडक मोहीम राबविणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी 25 विद्यार्थ्यांच्या तुकडीची मान्यता असताना 40-40 विद्यार्थी गृहीत धरुन अनेक शाळा बंद पाडण्यासाठी किंवा शिक्षक काढून टाकण्यासाठी त्यांनी अशा प्रकारचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7366.....

श्री.भाई गिरकर.....

अन्यायकारक घाट घातलेला आहे. आपण मुंबई महानगरपालिकेत त्यांची याबाबत चौकशी करणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मराठी शाळांचा प्रश्न आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याचा आहे. आपण मराठी शाळांच्या प्रश्नांची मांडणी करताला काही वेळा खूप सरळ उत्तर काढतो. लेखी प्रश्नात घाटकोपर येथील शाळेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे जातात, हे तितकेच खरे आहे. घाटकोपर येथील मराठी आणि अमराठी लोकसंख्येचे प्रमाण किती बदलले आहे, याचाही आपण विचार केला पाहिजे. मध्यंतरी एका चर्चेच्या वेळी मला विचारण्यात आले की, पूर्वी दक्षिण मुंबईत एवढ्या मराठी शाळा होत्या आणि आता मराठी शाळा कमी झालेल्या आहेत. मी त्यांना सांगितले की, त्यावेळी त्या भागातील मराठी लोकसंख्येचे प्रमाण किती होते आणि आज काय आहे ? मला असे वाटते की, आपण केवळ भावनेच्या आधारावर न जाता, मराठी शाळा टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत, याचे निकष वेगळे असले पाहिजेत. समजा सेमी इंग्रजी केले तर हे उपयोगी आहे, का जुन्या काळात जे बायलँग्वल होते ते उपयोगी आहे. अशा अर्थाने प्रयोग करुन पाहिला पाहिजे आणि राज्यात काही मराठी शाळा अशा आहेत की, इंग्रजी शाळा सोडून विद्यार्थी त्या मराठी शाळांकडे येत आहेत. काही जिल्हापरिषदेच्या शाळांकडे येत आहेत. त्या शाळांमध्ये कोणते प्रयोग झाले, तेथे कोणत्या पद्धतीचे शिक्षण आहे, याचा आम्ही अभ्यास करीत आहोत. कारण, जगामध्ये सर्वच बाल मानसोपचार तज्ज्ञ आता मातृ भाषेतील शिक्षणाचा आग्रह धरत आहेत आणि येत्या काळात तो आग्रह वाढणार आहे. परंतु, त्याच वेळी लँग्वेज ऑफ एम्प्लॉय ब्युटी असणारी इंग्रजी आपल्या मुलाला आलीच पाहिजे, हा जो पालकांचा भाव आहे तो स्पोकन इंग्लीश सारखे काही विषय ॲड करुन आपल्याला करता येऊ शकतो काय, याचा बेसिक विचार करुन आपण येत्या काळात ते धोरण ठरवू. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर किंवा इतर सन्माननीय सदस्यांच्या मनात अशी भावना आहे की, मराठी शाळा टिकल्या पाहिजेत. केवळ तेथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळेचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7366.....

श्री.विनोद तावडे.....

सांगाडा, शाळेची इमारत टिकावी असे नाही. तर त्याला मातृ भाषेतील शिक्षणातून ज्ञान मिळणार आहे, हे टिकविण्याचे सर्वात मोठे उद्दिष्ट आपल्या समोर आहे आणि त्यासाठी आम्ही नक्की प्रयत्न करु आणि महानगरपालिकेची चौकशी करु

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7366....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई शहरात जागेचा सर्वात महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे, मुंबई महानगरपालिकांच्या अखत्यारित असणाऱ्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे असे कारण दाखवून तेथील वर्ग खोल्यांमध्ये युनियनची कार्यालये किंवा काही वेगवेगळ्या कामांसाठी भाड्याने दिल्या आहेत, काही शाळांमध्ये डेकोरेशनचे सामान ठेऊन ती गोडाऊन केली आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे दाखवून शाळांचे वर्ग बंद केले आहेत. गेल्या चार ते पाच वर्षापासून मोक्यांच्या शाळांतील खोल्यांमध्ये काही ठिकाणी संघटनांची कार्यालये सुरु झाली आहे. मंत्री महोदयांचा उद्देश चांगला आहे, विद्यार्थ्यांची संख्या कमी असेल तर त्या वर्ग खोल्या योग्य कामासाठी न वापरता दुसऱ्या कामांसाठी वापरल्या जात आहेत, अशा इमारती शासन ताब्यात घेणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय उच्च न्यायालयात सुरु आहे, माननीय उच्च न्यायालयाने महानगरपालिकांच्या शाळेत जी शिक्षणबाह्य कामे चालू आहेत ती तातडीने बंद करण्याचे आदेश दिले आहेत, त्याप्रमाणे आयुक्तांनी कार्यवाही सुरु केली आहे. त्यामुळे अविष्कार व ग्रंथाली अशा काही चांगला संस्था बंद पडत आहेत, ग्रंथाली बंद पडणे हे महाराष्ट्राच्या साहित्य संस्कृतीचे मोठे नुकसान आहे. त्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे. सुक्यासोबत ओले जळते असे प्रकार काही ठिकाणी चालू आहेत, डेकोरेशनवाले बाहेर पडतील किंवा ते बाहेर पडणार नाहीत, परंतु ग्रंथाली किंवा गांगल हे कायदा पाळणारे आहेत, ते नोटीस आल्यावर लगेच बाहेर पडले जे डेकोरेटर आहेत ते अजून तेथे टीकून आहेत, चांगल्या संस्थांना तेथे अभय मिळेल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदय या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात आपण असे म्हणाला की, जोपर्यंत आपण बाय लिग्विस्टीक धोरणाचा विचार करीत नाही, तोपर्यंत या सर्व गोष्टी आपणाला करता येणार नाहीत, असा माझा समज आहे. मातृभाषेबाबत सर्वांना प्रेम आहे व ते वाढत राहील हे खरे आहे. मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे रोजगाराची भाषा सर्व शाळांमध्ये शिकविली तर भविष्यात मुलांची अडचण होणार नाही, यापैकी हे एक कारण आहे. या विषयाबाबत या अगोदर देखील अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. या विषयाबाबत या अगोदर सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. जागेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7366....

श्री.भाई जगताप...

कर्मिशियल वापराबाबत हायकोर्टाने काही निदेश दिले आहेत. त्याबाबत शासन विचार करताना दिसत नाही. सभागृहात चर्चा करीत असताना आपण नेहमी असा विचार करतो की, दक्षिण मुंबईतील मराठी माणूस कमी झाला आहे, तो मराठी माणूस विक्रोळी, कांजूर मार्ग, भांडूप व ठाणे येथे गेलेला आहे. या ठिकाणच्या मराठी शाळांची अवस्था कमी अधिक प्रमाणात अशीच आहे, यासाठी शासनाला पॉलिसी निर्णय घ्यावा लागेल, ज्या मराठी शाळा आहेत त्या वाचविण्यासाठी व तेथील मुलांना दोन्ही भाषांचे ज्ञान मिळण्यासाठी शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ? पूर्वीच्या सरकारने याबाबत निर्णय घेतला होता याबाबत मंत्री महोदय उत्तर देतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघाशी असे सांगितले की, महाराष्ट्रात अशा देखल शाळा आहेत त्यामध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आळे फाटा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक चार राजोरी किंवा पिंपरी पेंढार येथील प्राथमिक शाळा, येथील मराठी शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातील शाळेतील मुले येऊन प्रवेश घेतात. या शाळांमध्ये विशेष आहे, या शाळांमध्ये वैशिष्टपूर्ण गोष्टी चालत आहेत, अशा बाबी मराठी शाळांमध्ये चालू केल्या तर संस्थाचालक, शिक्षक व सरकार यांना जास्तीचे योगदान द्यावे लागेल. येथे फक्त भावनात्मक बोलून चालणार नाही, यामध्ये ॲडिशनल योगदान द्यावे लागणार आहे. तरच आपण मराठी शाळा वाचविण्याचे आव्हान सहज पेलू शकू असा मला विश्वास आहे.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, दक्षिण मुंबईतील मराठी वर्ग इतर ठिकाणी गेल्यामुळे तेथे मराठी शाळांना जास्त वाव मिळत नाही. मंत्री महोदयांकडे सांस्कृतिक खाते देखील आहे. ज्या ठिकाणावरुन लोक स्थलांतर होतात त्या ठिकाणी मराठी शाळांना वाव देण्यासाठी शासनाने कोणती भूमिका घेतली आहे. मराठी शाळांना वाव देण्याबाबत शासनाची पॉलिसी काय आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.राहूल नार्वेकर यांनी अतिशय योग्य प्रश्न विचारला आहे. त्या ठिकाणचे लोक स्थलांतर झाले व तेथील वर्ग रिकामे आहे म्हणून गप्प न बसता त्यावर काही उपाय केला पाहिजे. हा प्रश्न मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असला तरी शैक्षणिक धोरणाबाबत मी मघाशी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी सेमी इंग्रजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शाळांऐवजी बायलिंगल शाळा सुरु केल्या पाहिजेत, किंवा स्पोकन इंग्लिशचे वर्ग सुरु केले पाहिजेत. त्यामुळे पालकांना वाटेल की, माझा पाल्य घरी आल्यावर इंग्रजी बोलतो म्हणजे ती शाळा योग्य आहे. या सर्व बाबींचा सारासार विचार करुन यासंदर्भातील धोरण शासन तयार करणार आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदय अतिशय चांगल्या पध्दतीने या प्रश्नाची उकल कशी करता येईल याबाबत उत्तर देत आहे. त्यांच्याकडे मराठी भाषा विभाग देखील आहे. मराठी भाषा विभाग अधिक सशक्त झाला पाहिजे. मराठी भाषा विभागाने मराठी माध्यमांच्या शाळांचा प्रश्नांचा देखील विचार केला पाहिजे. कारण त्या निमित्ताने मराठी भाषेचे धोरण ठरविताना मराठी ही ज्ञान व व्यवसाय भाषा व्हावी अशा प्रकारे उद्दिष्ट आपण ठेवले आहे. पायाभूत गरजांमध्ये शालेय शिक्षणाच्या स्तरावर मराठी माध्यम टिकवायचे असेल तर शालेय शिक्षण खात्याबरोबर मराठी भाषा विभागाचा फार मोठा संबंध आहे, यासाठी एक कार्यक्रम मराठी भाषा विभागातर्फे करुन ज्या शाळांमध्ये अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होईल त्या ठिकाणी त्यांना समुपदेशन किंवा इतर माध्यमे मराठी भाषेकडे आकर्षित करण्यासाठी काही योजना हाती घेण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मागे देखील सांगितले आहे की, सांस्कृतिक विभाग असेल, मराठी भाषा विभाग असेल या विभागात मी काम करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेबांच्या अनेक सूचनांचा उपयोग होत असतो, तशीच ही एक चांगली सूचना त्यांनी केली आहे, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मी महानगरपालिकेच्या मुंबई सेंट्रल येथील शाळेत मी शिक्षण घेतले आहे. मराठी शाळेत विद्यार्थी नसतात म्हणून जे वर्ग रिकामे आहेत ते इतरांना देण्यापेक्षा पूर्वी महानगरपालिकांच्या शाळांमध्ये बाईंडिंग, प्रिंटींग व इतर वर्ग चालविले जात असत. अशा प्रकारे मुंबईत आता प्लंबर, इलेक्ट्रीशियन ही माणसे मिळत नाहीत. अनेक टेक्निशियन मिळत नाहीत, संगणक ऑपरेटर मिळत नाहीत, अशा प्रकारचे कोर्सेस या शाळांनी सुरु केले तर त्या शाळांचा उपयोग होईल व टेक्निकल मुले तयार होतील. जे वर्ग रिकामे आहेत, त्या ठिकाणी असे कोर्सेस सुरु केले तर ते वर्ग भरतील व लोकांना टेक्निकल नॉलेज मिळेल. आजच्या समाजाला टेक्निकल लोकांची गरज आहे, ती पूर्ण होईल,या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7366...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय योग्य आहे, याबाबत मी नगर विकास विभागाशी चर्चा करीन. महानगरपालिकेचे धोरण ठरलेले नसल्यामुळे महानगरपालिकेच्या अनेक शाळा वर्षानुवर्षे रिकाम्या पडलेल्या आहेत. त्या शाळा कोणाला द्यावयाचा विचार केला तर कोणी तरी एनजीओ उभे राहतात व यामध्ये भ्रष्टाचार आहे. तुम्ही अमुक यांना का देता. या शाळा कोणाला दिल्या नाही तर इतक्या चांगल्या इमारती गंजून खराब होऊन तेथे घुशी फिरत आहेत, इतकी वाईट अवस्था त्या शाळांची झालेली आहे. शाळेच्या प्लॉटवर एसआए झाली व एसआरएमध्ये शाळा बांधण्यात आली ती शाळा कोणाला द्यावी म्हणून ती शाळा 12 ते 14 वर्षापासून बंद आहे. अशा अनेक शाळा मुंबईच्या हद्दीत आहेत. या विषयात केंव्हा तरी नगर विकास विभागाला किंवा महानगरपालिकेला एक धोरण तयार करावे लागेल. शैक्षणिक उपक्रम व कौशल्य विकासाची जी सूचना सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी केली त्याबाबत योग्य तो विचार करण्यात येईल, त्यासाठी नगर विकास खात्यासोबत चर्चा करण्यात येईल.

या नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मुंबई महापालिकांच्या शाळांबाबत मंत्री महोदयांनी अत्यंत चांगल्या प्रकारची भूमिका मांडली आहे. जिल्हा परिषदांच्या काही शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता चांगली असल्यामुळे इतर ठिकाणचे विद्यार्थी त्या ठिकाणी शिकण्यासाठी जातात. मुंबई महापालिकेच्या शाळा प्राईम लोकेशनमध्ये आहेत. त्या शाळांमधील विद्यार्थ्यांचा ओघ खाजगी शाळांकडे न जाता हे विद्यार्थी महापालिकेच्या शाळेमध्येच राहतील यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, तांत्रिक शिक्षक, कौशल्य शिक्षण देण्याची सोय केली जाईल काय? महापालिकेच्या शाळांमध्ये गैरकारभार चालतो, शाळांचा वापर कमर्शियल कारणासाठी केला जातो, या शाळा बंद पडाव्यात आणि ती जागा विकासकांच्या घशात घालण्याची योजना सुरु आहे काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अनुदानित शाळांमध्ये विशेष उपक्रम राबवावे लागतील, जेणेकरुन त्या उपक्रमामुळे आपली मुले शिकली तर त्यांच्या आयुष्यात खूप मोठा फायदा होणार आहे असा विश्वास त्यांच्या पालकांच्या मनामध्ये निर्माण होईल. परंतु असे कोणते उपक्रम राबवावे, कसे राबवावे त्याच बरोबर कौशल्य विकासाचा कार्यक्रम या अनुदानित शाळांमध्ये सुरु करण्याचा नक्की विचार करीत आहोत. मुंबई महापालिकेमध्ये असे षडयंत्र सुरु आहे का? सकृत्दर्शनी आपण सगळे जे अनुभवतो आहोत त्यानुसार अनेक पालकांचा इंग्रजी शाळांकडे ओढा असल्याचे दिसून येते. आवाहन हे आहे की, पालकांनी आपल्या पाल्यांना शिक्षण मातृभाषेतून दिले पाहिजे. मातृभाषेतून दिले जाणारे शिक्षण गुणवत्तापूर्ण आहे. हे आवाहन शासन यंत्रणेने स्वीकारले पाहिजे. ते आपण स्वीकारले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयात रुग्णांची तपासणी करणेबाबत

(७) * ७८५२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनील तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयासाठी कोटयवधी रुपये खर्च करुन महागडी उपकरणे खरेदी केली असता गरीब व सर्व सामान्य रुग्णांना खाजगी रुग्णालयातून पैसे खर्च करुन तपासणी करुन घ्यावी लागत आहे, `हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रुग्णांना करावी लागणारी तपासणी रुग्णालयातच व्हावी म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) ***हे खरे नाही.***
(२), (३) व (४) ***प्रश्न उद्भवत नाही.***

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी प्रश्नाला उत्तर देताना हे खरे नाही असे म्हटले आहे. हा ज्ञानेश्वर विद्यापीठासारखा प्रश्न नाही. गरीब लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. 25 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यानंतर सीटी स्कॅन मशीन, नेत्र तपासणी मशीन बंद असल्यामुळे निराधार, गरीब रुग्णांना महागड्या आरोग्य विषयक तपासण्या बाहेरुन करुन घेण्यास सुचविले जाते. रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याचे सांगून त्यांना बाहेरुन औषधे आणावयास सांगितले जाते, हे खरे आहे काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्ञानेश्वर विद्यापीठात शिकल्यामुळे मला प्रॅक्टिकल अनुभव मिळाला. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पेढीवर बसल्यामुळे चोपडीचा अनुभव मिळतो, शिकायचा मिळत नाही. प्रॅक्टिकल अनुभव घेतल्यामुळे, जो प्रॅक्टिकल शिकतो तो व्यावहारिक उत्तर देतो. यापूर्वी थेरॉटिकल उत्तर आले होते.

सभापती महोदय, जे उत्तर दिले ते खरे आहे. ज्या गोष्टी त्या रुग्णालयात झाल्या पाहिजेत, त्यात सीटी स्कॅन, एक्स रे, व्हेंटिलेटर या सुविधांची अपेक्षा असते. त्या सोयी आम्ही तेथे उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. अडचण अशी आहे की, याकरिता निधी दिला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7852.....

श्री.विनोद तावडे....

वैद्यकीय शिक्षण विभागाचे वार्षिक बजेट 342 कोटी रुपयांचे आहे. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण व त्या अंतर्गत असलेली रुग्णालये चालविणे या संदर्भातील बॅलन्स राखला जातो. या रुग्णालयामधून सुपर स्पेशालिटी सुविधांची अपेक्षा केली जाते. सर्वसाधारण रुग्णालयासारखा लोड त्या ठिकाणी असतो. त्यामुळे सुपर स्पेशालिटी होऊ शकत नाही. त्यामुळे जी विशेष अपेक्षा आहे त्याकरिता जो निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे तो न दिल्यामुळे त्या टेस्ट होत नाहीत. इतर ज्या टेस्ट होत आहेत त्या संदर्भातील सरकारची आकडेवारी मी देऊ शकतो. सीटी स्कॅन मशीन सुरु असून त्यावर किती टेस्ट झाल्या, एक्स रे, सोनोग्राफीच्या किती टेस्ट झाल्या याची आकडेवारी उपलब्ध आहे. ती देण्यापेक्षा यवतमाळ या दृष्टीने प्रगत होत आहे. रुग्णांना विशेष तपासण्या करुन घेण्याची व्यवस्था त्या ठिकाणी झाली पाहिजे. ती येत्या काळातील बजेटमध्ये काही तरतूद करुन नक्की करण्याचा विचार करु

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न वैद्यकीय शिक्षण विभागाशी निगडित नाही. या प्रश्नाचे उत्तर सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी देणे अपेक्षित आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालय वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित आहे.

श्री.सुनील तटकरे : तसे जर असेल तर वैद्यकीय महाविद्यालय चालविण्यापुरती 342 बेडची व्यवस्था करावी.

श्री.विनोद तावडे : माझे तेच म्हणणे आहे. वैद्यकीय शिक्षण आमच्याकडे द्या आणि रुग्णालये त्या विभागाकडे ठेवा. म्हणजे आम्ही शिक्षणावर लक्ष केंद्रीत करु. आधीच्या रचनेप्रमाणे ते आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत कंत्राटी तत्वावर मागील ९ वर्षापासून काम करणाऱ्या साधन व्यक्तींना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत

(८) * ८०७२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत कंत्राटी तत्वावर सध्या कार्यरत असणाऱ्या साधन व्यक्तींची संख्या किती आहे,
(२) मागील ९ वर्षापासून कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या साधन व्यक्तींना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत लोकप्रतिनिधी व संबंधित कर्मचाऱ्यांकडून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(३) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई या संस्थेच्या प्रकल्प संचालकांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणेबाबत दिनांक ५ मार्च, २००९ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालाचे व शिफारसींचे स्वरुप काय आहे,
(४) प्रकल्प संचालकांच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) ***सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत कंत्राटी तत्तावर सध्या १९७८ साधनव्यक्ती कार्यरत आहेत.***
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांनी दिनांक ५ मार्च, २००९ रोजी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत/जिल्हा परिषद सेवेत सामावून घेणेबाबत प्रस्ताव सादर केला होता.
(४) यापूर्वी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त झालेला प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्व शिक्षा अभियानांतर्गत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद सेवेत सामावून घेता येणार नाही असा निर्णय घेण्यात आला होता. तसेच त्यांना शासन सेवेतसुध्दा सामावून घेता येणार नाही असे त्यांना दिनांक १७.०३.२००६ आणि दि. ०७.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सबब, या प्रस्तावावर पुन्हा विचार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये कंत्राटी पध्दत लागू झाली आहे. शिक्षण सेवक आले, प्रत्येक क्षेत्रासाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नेमले जात आहेत. गेली 10-12 वर्षापासून सर्व शिक्षा अभियानामध्ये हे क्वालिफाईड कर्मचारी काम करीत आहेत. बी.ए.बी.एड, बी.एससी.बी.एड. शिक्षण घेतलेल्या या कर्मचाऱ्यांना 3 वर्षानंतर कायम करु असे सांगितले होते. त्यांना अनुभवाची अट होती. ते प्रशिक्षित पदवीधर असावेत. हे सर्व कर्मचारी शिक्षण क्षेत्रातून शासकीय सेवेत आले. 10 ते 12 वर्षापासून ते आजही मानधनावर काम करीत आहेत. मध्यंतरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8072....

श्री.रामनाथ मोते....

माननीय सभापतींच्या दालनामध्ये या संदर्भात बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, यांचा पॉझिटिव्ह विचार करावयास पाहिजे. प्रकल्प अधिकाऱ्यांनी या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. तो अद्यापही मान्य केलेला नाही. म्हणून 10 ते 12 वर्षे अल्प मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांनी शिफारस केली आहे. ती शिफारस शासन स्वीकारणार आहे काय?

सभापती महोदय, प्रकल्प अधिकाऱ्यांनी जो अहवाल दिला त्या अनुषंगाने 10 ते 12 वर्षे काम केलेल्या या कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा उलटून गेली आहे. त्यामुळे त्यांना इतरत्र काम करण्याची संधी नाही. म्हणून शासन त्यांना सेवेत सामावून घेणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या निमित्ताने एका विषयाची आपण चर्चा केलेली बरी. केंद्र सरकारच्या विविध योजना येतात. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे या राज्याचे वित्त मंत्री होते त्यांना या योजनांची चांगली माहिती आहे. अशा योजना 4 ते 5-7 वर्षे सुरु राहतात आणि नंतर त्यांचे अनुदान बंद होते. अशा 7, 8 किंवा 9 वर्षे चालणाऱ्या योजनांना परमनंट तत्त्व लावले आणि त्या योजना बंद झाल्या तर त्याचा सगळा आर्थिक भार शासनावर पडेल. तो आर्थिक भार सहन करणे शक्य नसते. पण हेही खरे आहे की, केंद्रीय योजनांच्या अनुदानावर चालणाऱ्या प्रकल्पांमध्ये जे सहभागी होतात, ते कमी वेतनावर आणि कंत्राटी पध्दतीने शासनाला सेवा देतात. योजना बंद पडली तर ज्यांना चांगल्या ठिकाणी नोकरी मिळते ते त्या ठिकाणी शिफ्ट होतात. शेवटी केंद्राचा प्रकल्प परिणामकारकपणे राबविण्यासाठी अशा पध्दतीने सहभाग देणारे जे असतात त्यांची सेवा प्रकल्प बंद झाल्यानंतर एकदम बंद करणे हे त्यांच्यावर अन्यायकारक असते. त्यामुळे अशा प्रकारच्या केंद्रीय योजना कोणत्या आहेत आणि त्यामध्ये शासकीय सेवेत असणारे... आयसीटीमध्ये आयटी शिकविणारे काही तरुण/तरुणी एमसीए व बीसीए झालेले आहेत. काही ठिकाणी इतर वेगवेगळया योजनांमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत. अशा योजना बंद होतात.

नंतर डब्ल्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8072....

श्री.विनोद तावडे...

केंद्र शासनाच्या अशा योजना बंद झाल्यानंतर त्यांना आपल्या शासकीय सेवेतील योजनेमध्ये जेव्हा केव्हा जागा रिक्त होतील तेव्हा वयाची अट क्षमापित करून घेण्यासंबंधीचे धोरण वित्त विभागाला विचारून केले तर त्या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याकडे आपण जाऊ शकतो. या कर्मचाऱ्यांना आपण सर्व सुविधा दिल्या आणि कायम केले तर सर्वोच्च न्यायालयाच्या उमराणी विरूद्ध तामिळनाडू केस नुसार ही बॅक डोअर एन्टी मानली जाईल. त्यामुळे त्यास देखील मान्यता मिळत नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे निदेश असले तरी यासंबंधी सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे. 8 ते 9 वर्षे ते काम करतात आणि त्यांना आपण काहीच देत नाही. त्यांना आपण वाऱ्यावर सोडतो ही मानसिकता निर्माण होईल. त्यामुळे केंद्र शासनाची कुठलीही योजना कायम स्वरूपी असेल तरच ती आपण स्वीकारायची नाही तर स्वीकारायची नाही अशी मानसिकता करावी लागले. त्या कर्मचाऱ्यांनी 8 ते 9 वर्षे काम केले आणि त्यांना काम दिले नाही तर मग पुन्हा आत्महत्या करतो अशा प्रकारचे एस.एम.एस.येतात. त्यामुळे त्यांच्या विषयी जेथे संधी असेल तेथे ती देण्याबाबत सहानुभूतीपूर्वक एक धोरण नक्की ठरविण्यात येईल. पण कोर्टाच्या निदेशानुसार आज तरी त्यांना कायम करता येणार नाही.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रपूर जिल्हा देशात भूजल प्रदूषणास प्रथम क्रमांकावर असल्याबाबत

(9) * ७४२० UUश्रीमती शोभाताई फडणवीससःस सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चंद्रपूर भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने सन २०१४-१५ या वर्षात ८४७ ग्रामपंयचायती मधील ११,२८० ठिकाणातील भूजलचे नमूने तपासले असता त्यापैकी ५८९३ नमुन्याततनायट्रेड, फ्लोराइड, क्लोराइड, लोह, पी.एच.अल्काली, टर्बिनिटी व हार्डनेसने प्रदूषण आढळून आले असून चंद्रपूर जिल्हा देशात भूजल प्रदूषणास प्रथम क्रमांकावर असल्याचे दिनांक २० मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, भूजल प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) केंद्रिय भुमिजल मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या अहवालात देशातील १९ राज्यांतील १६८ जिल्ह्यामधील भुजल फ्लोराईडने बाधित असल्याचे नमुद केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांचा समावेश असून त्यापैकी चंद्रपूर हा एक जिल्हा आहे.

चंद्रपुर जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत सन २०१४-२०१५ या वर्षात ८४७ ग्रामपंचायतीमध्ये ११,२८० पाणी नमुने तपासण्यात आले, त्यापैकी मुख्यतः ८८ (0.78%) पाणी नमुने क्लोराईड, २१३ (1.89%) पाणी नमुने हे टर्बिडीटी, २३८ (2.10%) पाणी नमुने आयर्न (लोह), ४१९ (3.71%) पाणी नमुने हे अल्कली, ६८४ (6.06%) पाणी नमुने हे पी.एच.९५२ (8.44%) पाणी नमुने हे फ्लोराईड, १५९३ (14.12%) पाणी नमुने हे हार्डनेस व ३७५५ (33.28%) पाणी नमुने हे नायट्रेटने बाधित आढळून आले आहे.
(2), (3) व (४) यास्तव चंद्रपूर जिल्ह्याच्या भूस्तरीय रचनेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, फ्लोराईड, लोह प्रामुख्याने तेथील असलेल्या गोंडवाना, रुपांतरीत इत्यादी खडकांच्या विघटनातून भूजलात मिसळते. या जिल्ह्यातील भूस्तर हा गोंडवाना व रुपांतरीत प्रकारच्या दगडांचा असून, यामध्ये फ्लोराईड लोह असणे ही नैसर्गिक बाब आहे. स्वीकारार्ह मर्यादेपक्षा जास्त असलेल्या भागात शुद्ध पाणी भुपृष्टीय स्त्रोतातून अथवा शुद्ध पाण्याच्या इतर स्त्रोतातून पुरविण्यात येते. याशिवाय जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत गुणवत्ता बाधीत गावांमध्ये (पथदर्शी स्वरुपात) शुद्ध पाणी पुरवठ्यासाठी विविध उपाययोजना घेण्यास शासनाने एप्रिल २०१४ पासून प्रकल्पास सुरूवात केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर खाणी आहेत. त्यामुळे पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर फ्लोराईडचे घटक जातात. त्यामुळे लोकांना हाड ठिसूळ होणे, दंत रोग इत्यादी आजार होतात. गेल्या तीन वर्षापासून जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी आपल्या विभागाकडे पाणी शुद्धिकरण करण्यासाठी जल स्वराज्य-2 अंतर्गत मागणी करूनही अद्यापि कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. तेव्हा यासाठी आपण ताबडतोब निधी उपलब्ध करून देणार आहात काय ? वैनगंगा नदीवर नळ पाणी पुरवठा योजना आहेत. वैनगंगा नदीचे पाणी कमी झाले की, त्यात 8 टक्के फ्लोराईड असते हे आढळून आलेले आहे. त्यामुळे त्याचा देखील तेथील लोकांवर परिणाम होतो. तेव्हा फ्लोराईड युक्त पाण्याचे शुद्धिकरण करून चंद्रपूर जिल्ह्याला शुद्ध पाण्याचा पुरवठा शासन करणार आहे काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, टप्पा-2 मध्ये 20 गावे जलस्वराज्य आराखड्यामध्ये समाविष्ट आहेत. त्यापैकी सौर ऊर्जेवरील दुहेरी पंपासाठी दहा गावांमध्ये फ्लोराईड कमी करण्याचे यंत्र बसविण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच, सौर ऊर्जेवरील दुहेरी पंप 8 गावांमध्ये, उर्वरित दोन गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड, भंडारा, गडचिरोली, या पाच जिल्ह्यांमध्ये फ्लोराईड बाधित 88 गावांमध्ये फ्लोराईड कमी करण्याचे यंत्र बसविण्यात आले आहे. या शिवाय राज्यातील अनेक घटकांनी बाधित असणाऱ्या 100 गावांमध्ये व वाड्यांमध्ये आर.ओ.मशीन बसविण्याचे प्रस्तावित आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून नळ योजनेला द्विपंप बसविण्याचे काम गेल्या तीन वर्षापासून सुरू आहे. या कामाचे अद्याप पैसे देखील दिलेले नाही. या योजना अर्धवट पडलेल्या आहेत. एकाही गावाची योजना ते पूर्ण करू शकलेले नाही. ग्रामपंचायतीला पाच लाख रूपये द्यायचे आहेत. ते पैसे या कार्यालयाने दडवून ठेवलेले आहेत. एकही पैसा ग्रामपंचायतीला दिला नसल्यामुळे योजना पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत. तेव्हा या अर्धवट असलेल्या योजना पूर्ण करण्याकरिता शासन ताबडतोब निधी देण्याची कार्यवाही करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, या आठवड्यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, चंद्रपूर हा देशातील सर्वात प्रदूषित जिल्हा आहे. तेथे हवेची व पाण्याची गुणवत्ता नाही अशी या जिल्ह्याची परिस्थिती आहे. खाणींमुळे नैसर्गिक स्रोताचे पाणी अशुद्ध होत असून त्यात ्फ्लोराईडचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे या जिल्ह्यात रोगराईचे प्रमाण आहे. त्यासंबंधातील अहवाल आपणाकडे वारंवार आलेले आहेत. मागे हा प्रश्न आल्यानंतर 20 गावांमध्ये काय काय केले ते सांगितले. आज देखील पुन्हा तेच सांगितले आहे. हे प्रदूषित पाणी शुद्ध करण्यासाठी आपण जी यंत्रणा बसविली आहे ती व्यवस्थित आहे काय ? एकदा यंत्रणा बसविली की, आपला प्रश्न सुटला असे होत नाही. त्याची वारंवार देखभाल दुरूस्ती योग्य पद्धतीने करावी लागते. तसे केले तरच हे प्रदूषण कमी होणार आहे. तेव्हा या सर्व जिल्ह्यांसाठी आपण तांत्रिक कामगारांची एक विशेष बाब म्हणून नियुक्ती करणार आहात काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, होय.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या सूचनेबाबत

सभापती : आज दिनांक 31 जुलै 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी सकाळी 10.55 वाजता "तलवडा, ता.गेवराई, जि.बीड येथे दिनांक 30 जुलै 2015 रोजी, दुपारी 12.00 वाजताच्या सुमारास बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या तलवाडा शाखेसमोर किरकोळ कारणावरून श्री.मनोहर गांधले या शेतकऱ्याला भर रस्त्यामध्ये दोन पोलिसांनी लाठ्या-काठ्याने अमानुष केलेली मारहाण, तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिसरात दहशत निर्माण करणे," या विषयावर म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. महाराष्ट्र विधान परिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंबंधीची सूचना देण्यात येते. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाज क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषयाचा कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, या विषयामध्ये शासनाने लक्ष घालावे.

.....

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय इंजिनिअरींग महाविद्यालय सुरु करण्याबाबत" या विषयावरील श्री.नागो गाणार व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 1079 ला दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्रीमती पंकजा मुंडे (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्य शासनाने मंजूर केलेले व मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेल्या महाराष्ट्र सावकारी नियंत्रण विधेयकाबाबत" या विषयावरील डॉ.नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 46977 ला दिनांक 16 डिसेंबर, 2013 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

..8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची सातवी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सातवी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची सातवी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

..9..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन 2013-2014 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन 2013-2014 या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचा सन 2013-2014 या वर्षाचा अहवाल सभागृहासमोर ठेवते.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अर्थसंकल्पीय चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014-2015 या वर्षाच्या अंतरिम अर्थसंकल्पीय चर्चेच्या वेळी श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी "मातंग समाजाच्या मोर्चावर लाठीमार करण्यात आलेल्या मुद्यासंदर्भात मा.तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिकची माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रविण पोटे-पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

(क) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचा सन 2006-2007 ते 2011-2012 या वर्षांचा वार्षिक अहवाल.

(ख) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल.

(ग) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन 2013-2014 या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

(क) हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन 2006-2007 व 2007-2008 या वर्षांचा अनुक्रमे तेहत्तीसावा व चौतीसावा वार्षिक अहवाल.

(ख) मॅफको महामंडळाचा सन 2011-2012, 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे एक्केचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल.

(ग) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च, 2014 रोजी संपलेल्या वर्षाचा स्थानिक संस्था अहवाल.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रविण पोटे-पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकाला संमती

सभापती : विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकाला विधानसभेची संमती मिळाल्यासंबंधीची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : खालील विधेयकाला विधानसभेची संमती मिळाली :-

सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 11- महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयक, 2015.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती शोभा फडणवीस (समिती सदस्य) **:** सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती स्मिता वाघ (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती : महिलांचे हक्क व कल्याण समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

....8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : औचित्याचे मुद्दे नंतर घेतले जातील. अंतिम आठवडा प्रस्ताव सुरुवातीला घेण्यात येईल. अंतिम आठवडयाच्या चर्चेनंतर बिले नंतर घेण्यात येतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आज सकाळी सभागृहाची विशेष बैठक 9.30 वाजता सुरु झाली. आता साधारणत: 1.30 वाजले आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, मध्यांतरासाठी सभागृहाचे कामकाज अर्ध्यातासाठी थांबवावे अशी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांची सूचना मी मान्य केली आहे. सभागृहाची बैठक मध्यांतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक 2.00 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.26 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यांतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

सभापती : मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.01 ते 2.05 पर्यंत स्थगित झाली.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, जयंत पाटील, हेमंत टकले, भाई जगताप, शरद रणपिसे, सय्यद मुझफ्फर हुसेन, सुभाष झांबड, प्रा.जनार्दन चांदूरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री अनंत गाडगीळ, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. अंतिम आठवडा प्रस्ताव वाचून दाखविण्यापूर्वी मी एक बाब सांगू इच्छितो की, या ठिकाणी कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. पण अंतिम आठवडा प्रस्तावाला एक वेगळे महत्व आहे. अंतिम आठवडा प्रस्तावाच्या वेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असणे अपेक्षित आहे. गृह विभागाचे राज्यमंत्री महोदयांना खूप उशीरा समजले की, आपला अंतिम आठवडा प्रस्ताव सुरु झाला. आपण खालच्या सभागृहात होतो अशा सबबी सांगणे बंद करावे. आम्ही देखील पंधरा वर्षे सत्तेमध्ये काम केलेले आहे. या ठिकाणी ज्या सबबी सांगितल्या जात आहेत त्या लांच्छनास्पद आहेत. एका बाजूला राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली असताना दुसरीकडे सरकारचे संसदीय कामकाजाचे गांभीर्य किती ढासळले आहे याचे उदाहरण पहावयास मिळत आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात मागील आठ महिन्यात कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण होणे, मुंबईच्या मालवणी भागात पोलीस आणि दारूमाफियांच्या संगनमताने विक्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

झालेली विषारी दारू प्याल्याने 104 जणांचा बळी जाणे, राज्यात गावठी दारुवर बंदी असतांनाही गृहमंत्र्यांच्या नागपूर शहरांसह संपूर्ण राज्यात गावठी दारुचा महापूर आलेला असणे, गृहमंत्री आणि गृहराज्य मंत्र्यांच्या गावातील कारागृहातून कैद्यांचे पलायन होणे, मुंबईतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलीस यंत्रणा एम.डी. ड्रगजच्या केसमध्ये अडकून पडणे, पोलिसांकडून सामान्य जनतेला संरक्षण मिळण्याऐवजी त्यांच्याकडूनच अन्याय व अत्याचार होणे, साकीनाका भागात मॉडेलवर झालेल्या बलात्कारात पोलिसांचाच सहभाग असणे, जालना येथील पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे दुसऱ्यांदा मुलीवर बलात्कार होणे, मुंबईसह परिसरात डान्सबार खुलेआमपणे सुरूअसणे, त्यातून पत्रकाराची हत्या होणे, डान्सबारमध्ये पोलीसच आढळून येणे, डायघर येथील डान्सबार वरील धाडीत पोलिसांच्याच नावाची नोंद आढळून येणे, कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येचा अद्याप तपास न लागणे, पुणे सारख्या सांस्कृतिक शहरात दहशतीचे वातावरण निर्माण होणे, सांताक्रुझ भागात वृत्त संकलनासाठी जाणाऱ्या महिला पत्रकाराची छेड काढून तिला मारहाण करण्यात येणे, हरसूल (जि.नाशिक) येथे पोलिसांच्याच गोळीबारात एका युवकाचा मृत्यू होणे, वाशिम येथील दंगलीत एकाचा बळी जाणे, सोनपेठ येथे पोलिसांच्या अत्याचाराला कंटाळून व्यापाराने आत्महत्या करणे, वाळूची वाढलेली तस्करी, वाळूमाफियांकडून अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले, वाळू माफियांना मंत्र्यांचाच असलेला पाठिंबा, आठ महिन्यात 2394 मुलांच्या अपहरणाच्या आणि 5250 महिलांच्या विनयभंग, बलात्काराच्या घटना घडणे, राज्यात दलितांवर वाढलेले अत्याचार, कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाल्याची आणि गृह मंत्र्याच्या खात्यावर वचक नसल्याची जाहीर टीका राज्य सरकारमधील मंत्रीच करीत असणे, आर्थिक गुन्ह्यामध्ये होत असलेली वाढ, पोलिसांच्या बदल्यामधील असंतोष, राज्यात सर्वच पातळीवर वाढलेल्या गुन्हेगारीमुळे राज्याला लागलेले असुरक्षिततेचे ग्रहण, जनतेच्या मनात त्यामुळे निर्माण झालेला पोलिसांविषयीचा रोष, कायदा व सुव्यवस्था ढासळल्याने नागरिकांच्या मनात निर्माण झालेले भीतीचे वातावरण, तसेच देशाची आर्थिक व राज्याची राजधानी असलेल्या मुंबई महानगराकडे महानगरपालिका, राज्यशासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

व एम.एम.आर.डी.ए. यांच्या होणाऱ्या दुर्लक्षामुळे मुंबईकरांचे असह्य झालेले जीवन, महानगरपालिकेतील भ्रष्ट कारभार, गेल्या दहा वर्षात नालेसफाईवर हजारो कोटी रुपये खर्च होऊन देखील दरवर्षी पावसाळ्यात मुंबई तुंबुन जनजीवन ठप्प होणे, रस्त्यांच्या व ट्रेंचेसच्या कामात ठेकेदार धार्जिण्या धोरणामुळे कामे निकृष्ट होण्याबरोबर हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होणे, महानगरपालिकेत सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादाने खुल्या जागा, पदपथावर अतिक्रमणास प्रोत्साहन मिळणे, मिठी नदीच्या संवर्धनासाठी करोडो रुपयांची तरतूद असतांनाही कामे पूर्ण न होऊन त्या ठिकाणची अनधिकृत बांधकामे हटविण्यास महानगरपालिकेस आलेले अपयश, मुंबईत विविध साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळविण्यास महानगरपालिकेस आलेले अपयश, आरे व महानंदसारख्या संस्थांच्या जागा खाजगी विकासकाच्या घशात घालण्याचा शासनाचा डाव, मुंबई मेट्रो प्रकल्पास शासनाच्या रिलायन्स धार्जिण्या धोरणामुळे मुंबईकरांवर येऊ घातलेले प्रचंड दरवाढीचे संकट, जनमानसांत शासनाविरुध्द निर्माण झालेला तीव्र संताप व असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, गेल्या 8 महिन्यांत राज्य सरकारच्या गृह विभागाच्या माध्यमातून कोणतेही काम झालेले नाही. राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली आहे. तरी सुध्दा या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करीत असताना गेल्या काही दिवसांत आणि गेल्या काही तासांमध्ये देशात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिशय संवेदनशील असलेल्या खटल्यातील याकूब मेमनला काल झालेल्या शिक्षेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत, मुंबईच्या परिसरात आणि संपूर्ण राज्यात शांतता राखण्यात पोलीस दलाला यश आल्याबद्दल मी विशेष करुन माननीय मुख्यमंत्री आणि पोलीस आयुक्त श्री.राकेश मारिया यांचे सुरुवातीलाच अभिनंदन करतो. महोदय, मी त्यांचे अभिनंदन केले याचा अर्थ गेल्या सात-आठ महिन्यात राज्य सरकारने जो कारभार केला आणि त्यामुळे राज्यात जी कायदा व सुव्यवस्था ढासळलेली आहे त्याच्या वास्तवतेपासून आम्ही दूर जात आहोत असे मानण्याचे कारण नाही. हे खरे आहे की, काल याकूब मेमनला जी शिक्षा झाली त्याला 1993 च्या घटनेची पार्श्वभूमी होती. तो प्रश्न संवदेनशील आणि भावनिक प्रश्न होता. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पोलीस दलाने आणि विशेषत: माननीय मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण घटनेकडे पूर्णपणे लक्ष केंद्रित केले होते. या बरोबरच मला मुंबईकर जनतेचे सुध्दा आभार मानले पाहिजेत. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्वच पातळ्यांवरुन सहकार्य मिळाले.

सभापती महोदय, एका बाजूला मुंबईच्या पोलीस दलाचे अभिनंदन करीत असताना, याच मुंबईमध्ये एक घटना अतिशय शरमेची घडली. महिन्या-दीड महिन्यापूर्वी मुंबईच्या मालवणी परिसरात दारुकांड घडले. महोदय, मागच्या कालखंडात रायगड जिल्ह्यात खोपडीची दारु प्यायल्यामुळे 30-35 माणसे मृत्युमुखी पडली होती. त्यावेळी हाहाकार माजला होता. त्यावेळी सबंध अधिवेशन सदरहू घटनेमुळे मृत्युमुखी पडलेल्या निरपराध लोकांच्या बाबतीत चर्चा करण्यात गेले. त्यावेळी राज्य सरकारने खूप सतर्कता आणि संवेदनशीलता दाखविली होती. परंतु दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, मालवणी येथील दारुकांडामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित हानी झाल्यानंतर सुध्दा जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना त्या ठिकाणी जाण्यासाठी चार दिवस वेळ मिळाला नाही. कोण कुठे डिग्री घेण्यासाठी किंवा आणखी काही शिकण्यासाठी गेले होते, हे मला माहीत नाही. परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

या घटनेविषयी त्यांना संवेदना असणे आवश्यक होते. या घटनेत मोठ्या प्रमाणावर निरपराध माणसे मृत्युमुखी पडली. ती माणसे दिवसभर मोलमजुरी करणारी होती. मी विचारु इच्छितो की, त्या भागातील लोकांवर एवढे मोठे संकट आलेले असताना आणि या घटनेमुळे अनेक माणसे मृत्युमुखी पडलेली असताना शासन म्हणून सरकारची काही नैतिक जबाबदारी आहे की नाही ? आपण संपूर्ण नैतिकता गुंडाळून सत्ता चालवायचे ठरविले आहे की काय, असा यक्ष प्रश्न या घटनेमुळे सर्वांच्या समोर निर्माण झाला आहे. महोदय, त्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना घटनास्थळी जाण्यास चार दिवस वेळ मिळाला नाही. ही घटना घडून दोन महिन्यांचा कालावधी झाला असला तरी, माननीय मुख्यमंत्र्यांना अजूनही त्या ठिकाणी जावेसे वाटले नाही. त्यांनी त्या ठिकाणी जाऊन परिस्थिती समजून घेतली नाही. घटनेनंतर काही दिवसांनी पालकमंत्री आणि गृह राज्यमंत्री त्या ठिकाणी गेले. परंतु अशी घटना ज्यावेळी घडते त्यावेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी घटनेच्या ठिकाणी जाणे अपेक्षित आहे. स्व.विलासराव देशमुख, माननीय सर्वश्री सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना, ज्यावेळी अशा स्वरुपाच्या घटना घडत त्यावेळी ते लगेच तेथे जायचे. ज्यावेळी राज्याच्या लातूर जिल्ह्यात भूकंपासारखी नैसर्गिक आपत्ती आली त्यावेळी सकाळ होण्याच्या आत तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.शरद पवार साहेब किल्लारीत पोहोचले. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी राज्याच्या प्रमुखांनी लगेच नव्हे पण नंतरच्या कालावधीत घटनेच्या ठिकाणी जाणे अपेक्षित होते. त्या प्रश्नाचे गांभीर्य समजून घेणे, पीडित आणि मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना धीर देणे आणि पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत या दृष्टिकोनातून उपाययोजना केल्या जातील हे त्यांना सांगणे आवश्यक होते. वास्तविक पाहता अशा घटना घडल्यानंतर माननीय गृह मंत्री आणि माननीय मुख्यमंत्र्यांवर राज्यातील जनतेला आश्वासित करण्याची नैतिक जबाबदारी येते. माननीय गृह राज्यमंत्री किंवा पालकमंत्री तीन-चार दिवसांनी त्या ठिकाणी गेले असतील. पण त्यांनी एक उपचार म्हणून जे काही करावयाचे होते ते केले. महोदय, या घटनेचा मागोवा घेतला तर अनेक गोष्टी उजेडात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, या राज्य सरकारकडून वारंवार गुजरात सरकारच्या बाबतीत डांगोरा पिटला जातो. आपल्या राज्यातील उद्योग गुजरातमध्ये जात आहेत याबद्दल केवळ आम्हीच बोलतो असे नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, तुमच्या पक्षाच्या सामना दैनिकातून या विषयी मोठ्या प्रमाणावर विचार मांडले जातात. सभापती महोदय, मालवणी येथे आलेला गुळ, रसायने हे गुजरातमधून आलेले होते. त्यामुळे या संदर्भात निश्चितपणे सखोल तपास करण्याची आवश्यकता होती. केवळ दोन-चार आरोपींना अटक करून तेवढ्यापुरता मुलामा देण्याचे काम सरकारकडून होता कामा नये. अशा प्रकारच्या अपप्रवृत्ती आणि समाज बिघडविण्याचे काम करणाऱ्यांविरुध्द कठोर पावले उचलण्याची आवश्यकता होती. सर्वच गोष्टी कायद्याने होतील असे नाही. महोदय, आज पोलीस दलाचा गुन्हेगारांना धाक किंबहुना वचक राहिलेला नाही, अशा प्रकारचे चित्र राज्यात निर्माण झालेले आहे. एकेकाळी मुंबई पोलिसांची तुलना स्कॉटलँड पोलिसांबरोबर केली जात होती. आजही तशीच परिस्थिती आहे असे आपण मानतो. परंतु पोलीस दलावर प्रशासनाचा वचक आहे की, नाही, या बाबत शंका येते. या घटनेवरून मी माननीय मुख्यमंत्र्यांचा राजीनामा मागणार नाही. किंबहुना, त्यांनी स्वतंत्र गृह मंत्री नेमावा अशीही मी मागणी करणार नाही. माननीय मुख्यमंत्री हे स्वत: गृह मंत्री असताना अशा प्रकारची स्थिती असेल तर वेगळे गृह मंत्री नेमल्यानंतर अजून वेगळे काय होईल ? मी तर म्हणेन की, वेगळे गृह मंत्री नेमल्यानंतर यापेक्षा हलाखीची परिस्थिती निर्माण होऊ शकेल. एखाद्या पेशंटला सलाईन लावली तर तो लगेच ठीक होईल किंवा वेगळ्या डॉक्टरांकडे घेऊन गेलो तर तो ठीक होईल, असे होऊ शकत नाही. त्यामुळे राज्याचे प्रमुख असलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह मंत्री पद असताना गेल्या आठ महिन्यात राज्यामध्ये अन्याय आणि अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. या संदर्भातील परामर्श मी आकडेवारीच्या माध्यमातून ठेवणार नाही.

सभापती महोदय, आज राज्यात कोणीही सुरक्षित नाही. राज्यात बालिका, भगिनी, व्यापारी, व्यावसायिक, शासकीय अधिकारी/ कर्मचारी, सर्वसामान्य माणूस सुरक्षित नाही. गेल्या सात-आठ महिन्यात राज्यात हजारोने बलात्काराच्या घटना घडत आहेत. याचा अर्थ समाजातील अपप्रवृत्ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाढत आहेत. अशा वेळी गुन्हेगारांवर पोलीस यंत्रणेचा धाक असला पाहिजे. परंतु दुर्दैवाने तो

श्री.सुनील तटकरे....

धाक संपुष्टात आल्याचे चित्र पहावयास मिळते. त्यामुळे लहान लहान बालिकांवर पाशवी अत्याचार करण्याची मानसिकता आणि विकृत मनोवृत्ती दिवसेंदिवस वाढल्याचे चित्र पहावयास मिळते. आपण कितीही गुन्हेगारी प्रवृत्तीचे काम केले तरी आपल्यावर काहीच कारवाई होणार नाही किंवा अशा प्रकारची प्रवृत्ती किती टोकाला जाऊ शकते याचे मूर्तिमंत उदाहरण आज दुर्दैवाने राज्य अनुभवत आहे. आज लहान लहान बालिकांवर, महिलांवर अन्याय, अत्याचार होतात. दुर्दैवाने त्या घटनांमध्ये आमचे कर्मचारी सहभागी झाल्याचे चित्र निर्माण होते. काही वेळा पोलीस दलातील अधिकारी महिलांशी छेडछाड करतात, अशी वास्तवता समाजासमोर निर्माण होते. महोदय, आज कायद्याचे रक्षकच भक्षक झाले आहेत. महोदय शोषण आणि पोषणामध्ये मी जाणार नाही. ज्यावेळी हा विषय येईल त्यावेळी त्यावर तपशीलवार जरूर बोलता येईल. महोदय, ज्यावेळी रक्षक हे भक्षक बनतात त्यावेळी जनतेने आधार म्हणून कोणाकडे बघावे ? परंतु आज अशा प्रकारची परिस्थिती राज्यात निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, गेल्या काही महिन्यात राज्यात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत गेली आहे. यातून कोणीही सुटला नाही. शासकीय कर्मचारी सुध्दा यातून सुटले नाहीत. अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदारांच्या अंगावर डंपर घातला जातो. वास्तविक पाहता तहसीलदारांना तालुका दंडाधिकाऱ्यांचा दर्जा दिलेला आहे. त्यांच्यासमोर अर्धन्यायिक प्रकरणे चालतात. परंतु ते ज्यावेळी वाळू माफियांवर कारवाई करण्यासाठी जातात त्यावेळी त्यांच्यावर डंपर घातला जातो. उलट अशा प्रकारे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करु नये म्हणून मंत्र्यांकडून फोन केला जातो. ते रेकॉर्ड करुन अधिकारी सांगतात की, माननीय मंत्र्यांनी फोन केल्यामुळे आम्ही कारवाई थांबविली आहे. महोदय, हे रेकॉर्डवर आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

खरे-खोटे माननीय मंत्री जाणतील, ते तहसीलदार जाणतील, नंतर तुम्ही रेकॉर्ड बदलाल, वगैरे-वगैरे काही कराल. परंतु जी वस्तुस्थिती लोकांच्या समोर या निमित्ताने आली ती तुम्हाला कधीही नाकारता येऊ शकणार नाही. प्रशासनाच्या वरील वकूब व धाक संपल्यानंतर या प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढल्या जाऊ शकतात. नागपूरच्या परिसरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले, त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री एक दिवस त्रागाने म्हणाले की, सर्व माध्यमांना आता नागपूरच दिसत आहे की काय, मी नागपूर येथील मुख्यमंत्री आहे हे तुम्हाला पाहवत नाही की काय ? एखादे मोठेपण मिळाल्यानंतर त्या गावाचे मोठेपण वाढते तसे त्या गावामध्ये घडलेल्या घटनांच्या पडसादांची जबाबदारी आपोआपच मोठेपणा घेणाऱ्यांच्या वर येत असते. आपण केवळ मिरविण्यासाठी मोठेपण वाढवू शकत नाही. कळत नकळत निर्माण होणाऱ्या सामाजिक स्थितीवर सुध्दा जे काही परिणाम होत असतील, त्याची जबाबदारी सुध्दा नैतिकदृष्ट्या आपल्यावर येत असते हे कधीही आपल्याला नाकारता येऊ शकत नाही. नागपूर ही राज्याची उप राजधानी आहे. सन 1952 मध्ये करार झाला आणि संयुक्त महाराष्ट्र करण्यासंबंधीची भूमिका घेतली गेली. जेव्हा स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या संबंधीचा करार केला तेव्हा नागपूरला उप राजधानीचा दर्जा देण्यात येईल असे त्यावेळी त्या करारामध्ये म्हटले गेले. आज काही वेगळा संघर्ष चालू असेल तर त्याबद्दलचे भाष्य मी करणार नाही. परंतु आज नागपूर आपल्या राज्याची उप राजधानी आहे. या सार्वभौम सभागृहाचे एक अधिवेशन आपण नागपूरला भरवतो. सुदैवाने राज्याचे मुख्यमंत्री नागपूरचे आहेत. गेल्या काही महिन्यात जे घडले त्या संदर्भात माननीय राज्यमंत्री सांगतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी केवळ आकडेवारीमध्ये सांगू नये, त्यांनी वस्तुस्थिती सांगावी की, गेल्या 8 महिन्यांत नागपूरमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण नेमके किती वाढले आहे ? पूर्वी नागपूरमध्ये घडत असलेली गुन्हेगारी आणि अलीकडे घडत असलेली गुन्हेगारी, तुरुंगात काय पध्दतीचे प्रकार होत आहेत या संदर्भातही सांगावे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी तुरुंगाला अचानक भेट दिली तेव्हा सुध्दा त्यांना तेथे मोबाईल आढळून आले असे दूरचित्रवाहिन्यांनी दाखविले, वृत्तपत्रांत सुध्दा वाचायला मिळाले, याचा अर्थ असा होतो की, जी बाब अगोदर प्रकाशित झाली होती, माध्यमांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

द्वारे समोर आली होती, ते वास्तव आहे की नाही हे पाहण्यासाठी राज्याचे माननीय गृहमंत्री म्हणजेच माननीय मुख्यमंत्री स्वतः त्यावेळी कारागृहात गेले होते, त्यावेळी सुध्दा कैद्यांकडे, गुन्हेगारांकडे मोबाईल सापडणे याचा अर्थ नेमका काय दर्शवितो ? कायदा व सुव्यवस्थेचे निघालेले धिंडवडे यातून पहायला मिळतात. आपल्याला हे धिंडवडे इतक्या मोठ्या प्रमाणात नागपूरसारख्या शहरात पहायला मिळाले. मी एक संवेदनशील प्रश्न विचारू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री भेट देण्यास जाण्याच्या 3-4 दिवसांपूर्वीच तेथील तुरुंग महानिरीक्षक का रजेवर गेल्या, असे नेमके काय घडले की त्यांना सुध्दा स्वतःला असुरक्षित वाटले की काय हे सुध्दा सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला कळणे अत्यंत आवयक आहे. शासनाने जी गोष्ट काल योग्य पध्दतीने हाताळली त्याबद्दल मी अभिनंदन करीतच आहे. पण याचेही उत्तर या निमित्ताने राज्यातील जनतेला मिळाले पाहिजे की, नेमकी अशी काय स्थिती निर्माण झाली की, तेथील तुरूंग महानिरीक्षकांना रजेवर जावे असे वाटले, त्या विषयाचा नेमका आशय काय आहे, नेमके असे काय घडले की ज्यावेळी या सर्व काही गाष्टी राखण्याची जबाबदारी येत असते त्यावेळी त्यांना तशा पध्दतीने रजेवर जाण्याची वेळ आली, अशी मानसिकता त्यांच्या मनात का निर्माण झाली ? कदाचित काही नैमित्तिक कारणे असू शकतील, त्याच्याबद्दल मला काही माहीत नाही. पण राज्यातील सर्व जनतेच्या मनात संभ्रम आहे की, अशाच वेळी नेमकी पोलीस दलातील प्रमुख रजेवर जातात.

सभापती महोदय, आपण अनेक वेळा रजेवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या रजा रद्द करतो आणि त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बोलवत असतो. परंतु अशा अत्यंत संवेदनशील वेळी असे महत्त्वाची उच्च पदस्थ अधिकारी रजेवर जातात, याचा सुध्दा जनतेला खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. अलीकडच्या काळात मुंबई शहरातील सर्व परिसरांत गुन्हेगारीमध्ये कमालीची वाढ झाली आहे. पोलीस दलाकडून नेमके काय चालले आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सोनपेठ हे परभणीसारख्या परिसरतील एक महत्त्वाचे गाव आहे. एक व्यापार उदीम करणारे, काबाडकष्ट करणारे मराठवाड्यातील एक शहर आहे. आमच्या सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तेथील घडलेल्या घटनेनंतर तेथे भेट दिली. आज आम्हाला, राज्यातील जनतेला उत्तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

मिळाले पाहिजे की, तेथील व्यापाऱ्याने आत्महत्या का केली ? तेथे कोणतीही धार्मिक दंगल झाली नाही, कोणत्याही समाजात ताण निर्माण झाला नाही. सोनपेठमध्ये जे घडले त्याचा खुलासा तुम्हाला सभागृहात निश्चितणे करावा लागणार आहे. कारण असे की एक निरपराध असलले ते व्यापारी असतील, त्यांच्याकडून काही चूक घडली की नाही, हा भाग तपशीलाचा राहील. पण त्यांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करून त्यांच्याकडून काही तरी गोष्टीची अपेक्षा करीत, त्या अपेक्षेची पूर्तता न झाल्याबद्दल त्यांची धींड काढली. त्यामुळे त्या व्यापाऱ्यांच्या मनामध्ये आत्मक्लेष मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. आम्ही इतके दिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहिल्या, पण एका प्रतिष्ठीत असलेल्या माणसाची आत्महत्या पाहिली नाही. तो कदाचित चुकला असेल, तो गुन्हेगार असेल, मला त्याची पाठराखण करण्याचे कारण नाही. पण ज्या पध्दतीने त्याची अवहेलना पोलीस दलाने केली, त्यामुळे त्याला आत्महत्या करावी लागली आणि या सर्व बाबींचा प्रक्षोभ जनमाणसांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आणि त्यामुळे सोनपेठच्या परिसरात अशांत वातावरण निर्माण झाले.

सभापती महोदय, हरसूलच्या परिसरात देखील असे घडले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व धर्मीयांना, सर्व समाजांना राज्यांत, देशात राहण्याचा घटनेद्वारे अधिकार दिला. कोणी संख्येने कमी असतील म्हणून त्यांना अल्पसंख्याक म्हणत असू पण त्यांना बहुसंख्याकांच्या बरोबरीने सुध्दा आपण सोबत वागविले पाहिजे ही भूमिका या राष्ट्राने सन 1947 मध्ये देश स्वतंत्र झाल्यानंतर स्वीकारली.

सभापती महोदय, हरसूलसारख्या घटनेचा मागोवा घेणे सुध्दा अत्यंत आवश्यक आहे. खरे तर हे सभागृह भरण्यापूर्वी ती घटना घडली. मी चुकत नसेल तर दर 12 वर्षांनी येणारा आपला धार्मिक कुंभमेळा सोहळा त्या परिसरात सुरू होण्याच्या तोंडावर तशी घटना नाशिकच्या परिसरात घडणे आणि ती घटना घडणार आहे अशी माहिती मिळाल्यानंतर सुध्दा केवळ या ठिकाणी खूप

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोठ्या प्रमाणापर अति महत्त्वाच्या व्यक्ती आलेल्या आहेत म्हणून सर्व पोलीस दल तेथे हलवून तेथे घटना घडल त्यासाठी मोकळेपणे त्यांना काम करण्याच्या संदर्भात, मुक्तपणे वावर करण्यासाठी

श्री. सुनील तटकरे ....

संधी देणे अशी स्थिती हरसूलच्या परिसरात निर्माण झाल्याचे पहायला मिळते. कुंभमेळा महत्त्वाचा आहेच, दर 12 वर्षांनी येणारी ही पर्वणी आपल्या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाची आहेच पण त्याचबरोबर नाशिकच्या परिसरातील हरसूलसारख्या गावात राहणाऱ्या अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी सुध्दा कल्याणकारी राज्याची आहे, हे वास्तव कदापिही तुम्हा-आम्हाला नाकारता येऊ शकणार नाही. तेथे योग्य पध्दतीचा बंदोबस्त लावला असता तर कदाचित निरपराध माणसांचे बळी गेले नसते, अनेक संसार उद्ध्वस्त झाले नसते. मी मघाशी म्हटले की, काही वेळा अशी स्थिती निर्माण झाली की, पोलिसांचा पूर्णपणे धाक गेला. काही वेळा अशा पध्दतीचे दुर्लक्ष केले जाते की, जणू काही गुन्हेगारांना काहीही गोष्टी करण्यासाठी पूर्णपणे मोकळीक दिली आहे. आपल्याला असे चित्र निर्माण झाल्याचे पहायला मिळत आहे. माझी मागणी आहे की, सोनपेठची घटना असेल, हरसूलची घटना असेल, ज्यावेळी अशा घटना घडतात, त्यावेळी असलेल्या सरकारने त्याची एन्क्वॉयरी कमिशन ॲक्ट खाली एन्क्वॉयरी सुध्दा केली पाहिजे, याही घटनांची चौकशी केली पाहिजे. आज आमचे सन्माननीय सदस्य श्री. बाबा जानी हे या सर्व परभणीच्या परिसरात आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा त्या ठिकाणी जाऊन भेट दिली आहे. समाजात अस्वस्थता निर्माण होते त्यावेळी कायद्याचे बडगे गळून पडतात. आपण अनेक वेळा म्हणतो की, ॲक्शन तेथे रि-ॲक्शन. आम्ही हे वक्तव्य ऐकले आहे. देशात वेगवेगळ्या राज्यांमध्ये घटना घडल्या, त्यावेळी तेथील प्रमुखांनी अशी वक्तव्ये केली. ॲक्शन असेल तर रि-ॲक्शन होते. ती रोखण्यासाठी आम्ही हे कायद्याचे सारे काही उभे केले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला घटना देताना ही सर्व व्यवस्था एवढ्यासाठी निर्माण केली कारण देशाची लोकसंख्या किती तरी मोठ्या संख्येने आहे. राज्याची लोकसंख्या खूप मोठी आहे. परंतु पोलीस दलातील पोलिसांची संख्या कमी आहे. पोलीस दलातील पोलिसांची संख्या कमी असून सुध्दा राज्यातील कायदा व सुव्यवस्था किंवा अनेक गोष्टी टिकू शकल्या आणि याचे कारण कायद्याचा व पोलिसांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धाक आहे. कायद्याचा व पोलिसांचा धाक अपप्रवृत्तीवर जितक्या मोठ्या प्रमाणात राहू शकतो, तितक्या मोगठ्या प्रमणात तो राखला गेला तर गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊ शकते. आज तुम्ही कदाचित आकडेवारीमध्ये सर्व काही सांगाल. आमचे सरकार आले तेव्हा कन्व्हिक्शन रेट वाढला

..5

श्री. सुनील तटकरे ....

असे आकडेवारीमध्ये सांगण्याचा प्रयत्न कराल. दाखल झालेले गुन्हे पूर्वीच्या काळातील असतील. अलीकडच्या काळात इतका कन्व्हिक्शन रेट येणे शक्य नाही. तुम्ही एखाद्याला विना लायसन्य पकडले, त्याला लगेच न्यायालयात नेले आणि त्याला 100 रुपये दंड करून न्यायालयाने सोडले तर हा कन्व्हिक्शन रेट झाला असे तुम्ही दाखवित असाल तर असा कन्व्हिक्शन रेट तुम्हाला वाढविता येतील. मी म्हणतो की, त्यांचे त्यांच्याकडेच राहो. परंतु त्यातील वास्तव समोर येण्याची आवश्यकता आहे. आपण सांगितले की, कन्व्हिक्शन रेट वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. सरकारी वकील यांनी आर्ग्युमेंट करताना किती बाबतीत यश मिळविले, त्यांना ठेवले जाईल, त्यांचे यश कमी असेल किंवा अपयश असेल तर त्यांना काढण्यात येईल.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

हे सरकार कशा पध्दतीने नवीन सरकारी वकिलांची नेमणूक करीत आहे, हे आमच्या कानावर येत आहे आणि त्याचाही खुलासा या सभागृहात होणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये हे सुरु आहे. या नेमणुका कशा पध्दतीने केल्या जात आहेत, हे मी गृह राज्यमंत्री महोदयांना सांगतो. पूर्वी अशा प्रकारच्या नेमणुका करीत असताना जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस अधीक्षकांचा समावेश असलेली समिती होती. आता कानावर मात्र वेगळे येत आहे आणि त्याबाबतची वस्तुस्थिती आम्हाला आपल्यामार्फत कळणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या बरोबर सरकारने दोन नामांकित वकील नेमलेले आहेत. जे एका विचारसरणीचे, वर्षानुवर्षांचे, जन्माला आल्यापासूनचे आहेत, ते त्यांना सल्ला देण्यासाठी आहेत. मी कोणत्याही संघटनेचे, कोणत्या व्यक्तीचे, कोणत्या बागेचे किंवा विचारणीचे नाव घेतलेले नाही. अशा विचारसरणीची माणसे त्यांना सहाय्य करण्यासाठी आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असल्यामुळे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी वकिलांना काही प्रश्न विचारणे अपेक्षित असते. परंतु, या दोघांनाही गप्प ठेवले जाते आणि हे लोक प्रश्न विचारतात, यादी देतात आणि त्यांची निवड होते, असे ऐकिवात आहे. या चर्चेच्या उत्तरातून याबाबतचा खुलासा शासनाने करावा. वेगवेगळ्या जिल्ह्यात काय चालले आहे हे आम्ही येत्या नागपूरच्या अधिवेशनात पुराव्यानिशी देणार आहोतच. कालही सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अनेक पुरावे दिले. तुम्हाला त्यावर पडता टाकायचा असेल तर युक्तिवाद करण्यासाठी आपल्याकडे वाक्चातुर्य आहे, आपला युक्तिवाद प्रखर आहे. (अडथळा.....) काही गोष्टी आमच्याकडून तुम्हाला शिकाव्या लागत असतील आणि त्या तुम्ही शिकला असाल तर मी तुमचे अभिनंदन करतो. परंतु, आमच्या कालावधीमध्ये असे कधीही घडलेले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी याच सभागृहात पंढरपूरच्या आषाढी एकादशीची वारी आणि पुजेच्या बाबतीत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी सभागृहाचे नेते आणि महसूल मंत्री महोदयांनी सांगितले की, "उद्या मी सोलापूरच्या जिल्हाधिकारी यांना बोलाविले आहे, आपल्या आणि वारकऱ्यांच्या मनामध्ये जो प्रश्न निर्माण झाला आहे, त्याबाबत उद्याच त्यांना सांगण्यात येईल आणि सभागृहात निवेदन होईल." परंतु माझ्या माहितीप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

जिल्हाधिकारी आपण बोलावूनही आलेच नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून पंढरपूरच्या विठ्ठलाची पुजा महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते केली जाते, हा प्रघात आहे. श्री.देवेंद्र फडणवीस यांनी वैयक्तिकरित्या नाही तर राज्याचे मुख्यमंत्री म्हणून पुजा करणे अभिप्रेत आहे. 12 कोटी जनतेचे मुख्यमंत्री म्हणून पुजा करणे अभिप्रेत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो प्रश्न उपस्थित केला, त्याची गांभीर्याने नोंद घेतली असती, घेतली गेली असावी, पण आज प्रशासन मुजोर झाले आहे. (अडथळा.....) गेल्या दहा वर्षात नाही तर पहिल्यांदाच असे घडले आहे. याबद्दल जरा जरी मनाची संवेदना असेल, आत्मसन्मान असेल, महाराष्ट्रातील जनतेचा आत्मसन्मान असेल, आपल्या मुख्यमंत्र्यांच्याबद्दल आत्मसन्मान असेल तर आज हे अधिवेशन संपण्यापूर्वी अशा मुजोर अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे धाडस आपण दाखवा, अशी मी सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करते. हा प्रश्न कोणत्या अधिकाऱ्याचा किंवा व्यक्तीचा नाही तर व्यवस्थेचा आहे. आपण या व्यवस्थेचे भाग आहोत. कदाचित आज तुम्ही त्या बाकावर असाल, आम्ही या बाकावर असू. परंतु, व्यवस्था ही व्यवस्था आहे. देशामध्ये आपण न्याय व्यवस्था, प्रशासकीय व्यवस्था आणि लोकशाहीच्या माध्यमातून आपली व्यवस्था निर्माण केली आहे. होय, मला आणि तुम्हाला पाच वर्षातून एकदा लोकांसमोर जावे लागते आणि जनतेला उत्तर द्यावे लागते, त्यामध्ये जर आपण कमी पडलो तर नापास व्हावे लागते. मग यांना उत्तरदायित्व असू नये, यांचे उत्तरदायित्व कोणी स्विकारायचे ?

सभापती महोदय, प्रशासनावरील सरकारचा वकूब किती संपला आहे, हे आपण बघा. राज्याचे माननीय मुख्यमंत्र्यांना रात्री 12.00 वाजल्यानंतर 20 मिनिटे ताटकळत थांबावे लागते, या सारखी नामुष्कीची दुसरी गोष्ट राज्यात घडलेली नाही. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाच्या निमित्ताने आमच्या भगिनीने सभागृहात प्रश्न उपस्थित केला आणि वारकऱ्यांच्या मनातील भावनेची जाणीव करून दिली होती. मुख्यमंत्री महोदयांनी महापुजा करण्याचे केव्हा ठरले ? ज्या काळामध्ये ठरले होते तेव्हा वारकऱ्यांच्या मनामध्ये असे आले की, विठ्ठलाच्या महापुजेला राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी यावे. मला आठवते की, श्री.शरद पवार साहेब सन 1978 मध्ये राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांना सर्व वारकरी भेटले. आपण आपल्या 38 वर्षाच्या आयुष्यात देवळात गेला नाही, पंढरपूरच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

विठ्ठलाची पुजा करण्यासाठी आपल्याला यावे लागेल, कारण तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात, अशी गळ त्यांनी पवार साहेबांना घातली. जन्माला आल्यापासून मुख्यमंत्री होईपर्यंत देवळात न जाणारे पवार साहेब दर्शनासाठी आणि महापुजेसाठी पंढरपूरला गेले, मुख्यमंत्री म्हणून गेले. परंतु, जिल्हाधिकारी विठ्ठलाची पुजा करीत आहेत म्हणून राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना 20 मिनिटे ताटकळत थांबावे लागते, महसूल मंत्री महोदय, ज्यांना ताईंनी जाणीव करुन दिली होती, त्यांना समजल्यानंतर ते रागाने विश्रामगृहामध्ये निघून जातात, याचा अर्थ काय ? याचाही खुलासा आज या चर्चेच्या माध्यमातून राज्याच्या जनतेसमोर येणे आवश्यक आहे. यामधून अनेक गोष्टी निर्माण होत असतात. अनेकवेळा नजरेसमोर असा प्रश्न येतो की, नेमके राज्य कोण चालवितो आहे ?

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता यांना सांगू इच्छितो की, आपले राजकीय मतभेद असतील. परंतु, ज्यावेळी मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आपले खातेवाटप जाहीर होते त्यावेळी आपल्या विभागाच्या सचिवांनी आपल्याला येऊन आपले अभिनंदन करणे हे नैतिकतेमध्ये आणि कार्यप्रणालीमध्ये आहे. मी आपली अवहेलना करणार नाही, मी आपल्या सोबत आहे. आपल्या संबंधीही अशाच प्रकारची घटना घडली होती, असे आमच्या ऐकिवात आहे. ही स्थिती आहे राज्यातील मंत्री महोदयांची आणि राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांची ? अशी परिस्थिती असेल तर आमचे प्रशासन कसे चालणार ? कायदा व सुव्यवस्था कशी अबाधित राहणार ? बारा कोटी जनतेच्या मनात असुरक्षिततेची, अशांततेची भावना निर्माण झाली आहे. महिलांच्या मनात, बालिकांच्या मनात आज भीतीचे वातावरण आहे. शाळेला गेलेली आपली मुलगी परत येईल किंवा नाही, याची साशंकता आईच्या मनामध्ये असेल तर तीने आपले दैनंदिन जीवन कसे जगायचे, असा यक्षप्रश्न आज निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, टीकाटिप्पणी करण्यासाठी हा प्रस्ताव आम्ही दिलेला नाही. राज्यात अत्यंत वेगळ्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीवर सर्वांनी मिळून उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. आपले विचार वेगळे असू शकतील, राजकीय मतभिन्नता असू शकेल पण गुन्हेगारी प्रवृत्तीबाबत दुमत असण्याचे काही कारण नाही, त्यांना पाठीशी घालण्याचे काही कारण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

असू शकत नाही. मी मघाशी सांगितले की, वेगवेगळे अधिकारी महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सहभागी झाल्याचे उघडकीस येत आहे, कर्मचारी सहभागी झाल्याचे उघडकीस येत आहे. मी मघाशी उल्लेख केला की, रक्षकच जर भक्षक बनले तर जनतेने कोणाकडे जायचे, या निष्पाप मुलींनी कोणाकडे जायचे ? औरंगाबादच्या परिसरामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणाऱ्या अभिनेत्रीवर मानधन वसुलीसाठी जात असताना बलात्कार होतो, पोलिसांना कळल्यानंतर दुसऱ्यांदा बलात्काराची घटना घडते. जुई गडकर ही अभिनेत्री (अडथळा.....) मी वेगळ्या जुई गडकरांबाबत बोलत आहे, त्यांच्या पूर्ण आयुष्याची मला कल्पना आहे. त्यांना धमकी आली. हे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. या मुंबईच्या पोलीस अधिकाऱ्यांनी कधी काळी गुन्हेगारांचे कंबरडे मोडले होते. पूर्वी मोठ्या प्रमाणावर टोळी युध्द होत होती, त्यावर उपाययोजना केल्या गेल्या. एवढेच नव्हे तर गुन्हेगारांना पेव फुटले होते. ग्रामीण भागातील सर्व संसार उदध्वस्त होत गेले. स्वतः माननीय कै.आर.आर.पाटील यांनी निडरपणा दाखविला आणि राज्यात डान्स बार बंदी करण्याचे खूप मोठे धाडस दाखविले. त्यांच्यावर दडपण आले नव्हते का ? हे बार सुरु ठेवण्याबाबत कुणी काही सांगितले नव्हते का ? तरी सुध्दा त्यांनी कुणाचेही ऐकले नाही. या राज्यातील भगिनींचे मंगळसूत्र आणि जीवन कायम ठेवायचे असेल, येणारी नवीन पिढी उद्ध्वस्त होण्यापासून वाचवायची असेल तर डान्स बार बंदी केली पाहिजे, ही भूमिका त्या काळामध्ये त्यांनी घेतली आणि आज मुंबईमध्ये खुलेआमपणे डान्स बार सुरु आहेत, असे ऐकिवात आहे. याबाबत नेमकी काय परिस्थिती आहे ?

सभापती महोदय, कोण गुन्हेगार आहेत, हे पोलीस दलाला लगेच समजू शकते. माझ्या आयुष्यातील एक किस्सा मी या ठिकाणी आपल्याला सांगतो. माझे वडील वारले होते. आम्ही कुटुंबासह मुंबईला आलो होतो आणि सम्राट हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलो होतो. हॉटेलबाहेर वाहन उभे करुन आम्ही आतमध्ये गेलो.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

आम्ही जेवण करुन बाहेर आलो तर आमची गाडी चोरीला गेली होती. ही सन 1986 मधील घटना आहे. 7-8 दिवस झाले तरी गाडीचा तपास लागला नव्हता. त्यावेळी श्री.जोग साहेब पोलीस महासंचालक होते आणि ते रोहा येथील श्री.गांगल कुटुंबीयांचे जावई होते. मी श्री.गांगल कुटुंबीयांकडे जाऊन त्यांना सांगितले की, आमची गाडी चोरीला गेलेली आहे, आम्ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केलेली आहे, तरी सुद्धा गाडी मिळत नाही, म्हणून आपण याबाबत श्री.जोग साहेबांबरोबर बोलावे. माझ्या वडिलांची आणि श्री.जोग साहेबांची ओळख होती. श्री.गांगल साहेबांनी श्री.जोग साहेबांना फोन करुन सांगितले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आपण सुनीलला सांगा की, 24 तासाच्या आत तुझी गाडी मिळेल. मी शपथेवर सांगतो की, विसाव्या तासाला गाडी मिळाली. याचा अर्थ काय आहे ? याचा अर्थ असाच आहे. गुन्हेगार कोण आहे, कोण गुन्हे करतो याबाबतची सर्व माहिती पोलीस दलाला असू शकते आणि मनात आणल्यानंतर कोणत्याही गोष्टीचा ताबडतोब तपास लागू शकतो. माझ्या आयुष्यात घडलेले हे छोटेसे उदाहरण आहे. म्हणून मी सांगितले की, मुंबईच्या पोलिसांची तुलना स्कॉट लॅन्ड यार्डबरोबर केली जाते.

सभापत महोदय, मुंबई पोलिसांनी कालचा प्रकार ज्या पद्धतीने हाताळला त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु, मुंबई शहरात ज्या पद्धतीने मालवणी हत्याकांड झाले त्याची जबाबदारी सुद्धा आपल्यावर येते, हे तुम्हाला नाकारता येणार नाही. ही जबाबदारी नेमकी कोणाची आहे ? राज्य उत्पादन शुल्क विभागाने जबाबदारी घ्यावयाची, की पोलीस विभागाने जबाबदारी घ्यावयाची याबाबत काही तरी वाद केला गेला. त्यानंतर दारु पकडण्यात आली. परंतु, ती दारु कोण गाळते, कोण काय करते याचा शोधच नाही. पकडायचे आणि बेवारस म्हणूनच त्याची नोंद करावयाची आणि आम्ही एवढ्या साठा पकडला अशा प्रकारचा आभास निर्माण करावयाचा ? परंतु, ते निर्माण कोणारी कोण अपप्रवृत्ती आहे, याचा तपास मात्र घ्यायचा नाही. गुजरात राज्यातून घातक रसायन आले. खरे म्हणजे, गुजरात राज्यापर्यंत मुंबई पोलिसांची लिंक जाणे अत्यंत आवश्यक होते की, हे घातक रसायन कोठून आले आणि त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

मुंबईतील 104 निष्पाप बळी गेले, याचा शोध लागणे अतयंत आवश्यक आहे. माननीय श्री.मेहता साहेब, मी गुजरातचा उल्लेख वेगळ्या अर्थाने केलेला नाही. ते घातक रसायन शेजारच्या राज्यातून आले, ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भातील भावना सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. सांगण्याचा मतितार्थ एवढाच आहे की, पोलीस दल सक्षम असेल, सतर्क असेल, इच्छा शक्ती असेल आणि असे बोलले जाते की, राजकीय पक्षामध्ये राजकीय इच्छा शक्ती असेल तर अनेक प्रश्न सुटू शकतात. येथे पोलीस दलाची इच्छा शक्ती असेल तर गुन्हेगारीवर निश्चितपणे वचक राहू शकतो. परंतु, आता आमच्या सरकारची इच्छा शक्तीच संपलेली आहे. आम्ही दिवसेंदिवस प्रशासनावरील अंकुष कमी केला, आम्ही कोणालाही बेगुमाणपणे वागण्याची सवलतच देणार असू तर या घटना त्या निमित्ताने निश्चितपणे होऊ शकतात आणि यातून निर्माण होणारे प्रश्न भवितव्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. काल ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी सोशल मीडियावर मुंबई पोलिसांनी पूर्णपणे वचक बसविला. परंतु, यापूर्वी याच सोशल मीडियामार्फत अनेक महत्वाच्या व्यक्तींची जी काही अवहेलना करण्याचा प्रयत्न झाला त्याबाबत उपाययोजना करण्याची मानसिकता का दाखविण्यात आली नाही, हा प्रश्न सुद्धा या निमित्ताने निर्माण होतो. मी मघापासून 4 वेळा बोललो आणि आता पुन्हा सांगतो की, एकदा पोलीस दलाने मनात आणले तर समाज विघातक पद्धतीची कोणतीही गोष्ट सोशल मीडियावर जाऊ शकत नाही. मागील 1 महिन्यापासून, 15 दिवसापासून वेगवेगळ्या पद्धतीच्या ज्या बातम्या येतात त्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न झाला असता तर याचा वापर चांगल्या कारणासाठी होऊन ज्यावेळी विकृत मनोवृत्तीच्या माध्यमातून गुन्हेगारीमध्ये वाढ होण्यासाठी होतो त्यावेळी या प्रश्नाचे गांभीर्य खूप मोठ्या प्रमाणावर आहे.

सभापती महोदय, टी.व्ही. बघितल्यानंतर मुलांच्या मनामध्ये वेगवेगळ्या भावना निर्माण होतात. त्यामुळे त्यांचे मन आपोआप गुन्हेगारीकडे वळत असते. एका सन्माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करताना याबाबत सांगितले होते. त्यांच्या बालकानेच प्रश्न विचारला की, तुम्ही सुद्धा यामध्ये आहात काय ? काल त्यावर चर्चा झाल्यामुळे मी त्याबाबत आणखी काही बोलू इच्छित नाही. मी दुसऱ्या अर्थाने याचा असा चांगला अर्थ काढतो की, टी.व्ही. बघून, मालिका बघून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

बालकांच्या मनावर वेगवेगळे परिणाम होतात आणि त्याबाबत ते पालकांना प्रश्न विचारतात. मग पालकांच्या बद्दलचे प्रश्न असले तरी विचारतात आणि नसले तरी वेगवेगळ्या प्रश्नांचे कंगोरे त्यांच्या मनात निर्माण होत असतात. आपण बाल मनावर योग्य पद्धतीने संस्कार करून त्यांचे जीवन चांगल्या पद्धतीने उभे करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याच वेळी त्यांच्या मनावर होणाऱ्या विकृत मनोवृत्तीच्या परिणामांमुळे त्यांचे संस्कार तर बिघडतातच, परंतु त्यांचे संपूर्ण आयुष्य धोक्यात येण्याची स्थिती अनेक वेळा निर्माण झाल्याची स्थिती आपल्याला त्या निमित्ताने बघावयास मिळते.

सभापती महोदय, केवळ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत असे नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत आणि ती दुर्दैवी घटनाच आहे. परंतु, अलीकडच्या काळात अधिकाऱ्यांकडून, पोलीस दलाकडून वेगवेगळ्या प्रकारचे काही अन्याय झाल्यामुळे सुद्धा दुर्दैवाने आत्महत्या व्हायला लागल्या, हे महाराष्ट्रातील इतिहासात आम्ही यापूर्वी कधीही बघितले नाही. गुन्हेगारी मोडण्यासाठी कायदे जरूर केले जावेत. म्हणून राज्यातील, मुंबईतील टोळी युद्ध मोडले गेले. ते टोळी युद्ध पुन्हा सुरु होते की काय, अशा प्रकारची साशंकता निर्माण व्हायला लागली आहे. कारण, सामान्य कुवतीचा गुन्हेगार सुद्धा एखादा गुन्हा करण्यासाठी उद्युक्त होऊ शकत असेल तर सराईत पद्धतीने गुन्हे करणारे गुन्हेगार कशा पद्धतीने गुन्हेगारीच्या दृष्टीकोनातून वाटचाल करु शकतील, असा प्रश्न त्या निमित्ताने निर्माण होऊ शकतो. खंडणी गोळा करणे, वेगवेगळ्या लोकांना धमक्या देणे, असे अनेक प्रश्न त्या निमित्ताने निर्माण होतात. ड्रग्ज माफिया देखील खूप मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. मध्यंतरीच्या कालावधीत ती बाब देखील निदर्शनास आली. त्यानंतर त्याच पोलीस दलातील कोणावर तरी अन्याय झाला म्हणून त्यांनी सेवा निवृत्ती नंतर वाहिन्यांना मुलाखती दिल्या होत्या. मुख्यमंत्री महोदयांनी यातील सत्य देखील समोर आणले पाहिजे. श्री.गोखले नावाचे निवृत्त अधिकारी यामध्ये गोवले गेले, त्यांना अटक झाली आणि अटक झाल्यानंतर त्यांचा निवृत्तीचा किंवा त्यांच्या पदोन्नतीचा काळ जवळ आलेला होता. ते निवृत्त झाल्यानंतर त्यांनी वाहिन्यांना मुलाखत देताना ते कसे निरपराध आहेत आणि त्यांना कशा प्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गोवले, हे सांगण्याचा प्रयत्न केला. पोलीस बदलामध्ये जर बेदिली निर्माण झाली, वेगवेळी स्पर्धा निर्माण झाली, कोणाला कोणत्या स्थानावर नेमावे, कोणाला कोणती पोस्टिंग द्यावी, याबाबत जर एकमेकांच्या मनात असूया, द्वेष निर्माण झाला तर कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाल्याशिवाय राहणार नाहीत, असे चित्र आज राज्यात निर्माण झालेले आहे. आपण आकडेवारी जरूर सांगावी. उत्तर देताना सांगितले जात होते की, त्यावेळी एवढी गुन्हेगारी होती, आता एवढी गुन्हेगारी झाली. आम्ही प्रस्तावात उल्लेख केलेला आहे की, मागील 8 महिन्यात 2394 मुलांचे अपहरणाच्या आणि 5250 महिलांचा विनयभंग, बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत.

सभापती महोदय, अंधश्रद्धेच्या विरोधात सतत लढणारे कै.दाभोळकर यांची हत्या झाली त्यावेळी राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री, एक अभ्यासू आमदार आणि विद्यमान सभागृह नेते, त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेते यांनी त्यावेळी सभागृहात केलेली भाषणे मुद्दाम आपण वाचली पाहिजेत. त्यांनी देखील उत्तर देण्यापूर्वी ती भाषणे वाचली पाहिजेत. कारण, या प्रस्तावावरील चर्चेला ते उत्तर देतील, अशी अपेक्षा आहे. त्यानंतर कॉ.गोविंद पानसरे यांची हत्या झाली. त्यावेळी विरोधी पक्षात असताना त्यांनी जी भाषणे केली ती भाषणे आता त्यांनी आठवावी आणि या हत्येबद्दल शासनाने खुलासा करावा. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील साहेब अशी वदंता आहे की, गुन्हेगार सापडले आहेत. काही प्रसार माध्यमांमध्ये तसे येत आहे, चर्चाही आहे. परंतु, शासनाचे गुन्हेगारांना हात लावण्याचे धाडस नाही. त्यांना माहिती आहे. गुन्हेगार सापडले आहेत. परंतु, शासनाचे त्यांना हात लावण्याचे धाडस नाही. याचा अर्थ नेमका काय आहे ? याचा अर्थ या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला समजणे अत्यंत आवश्यक आहे. मी सांगितले की, एखाद्याचे विचार वेगवेगळे असतील, कोणाला पसंत असतील किंवा नसतील. आम्ही जर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला असेल, पत्रकारांचे संरक्षण करण्यासाठी कायदा करावा अशी आम्ही भूमिका घेतो. एक महिला पत्रकार चित्रिकरण करण्यासाठी जात असताना तिच्यावर सांताक्रुझ परिसरात हल्ला होतो, हे नेमके कशाचे द्योतक आहे ? कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे हे द्योतक आहेच. परंतु, असे गुन्हे करणारी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर धाडस करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

आहे. कारण, आता तयांना धाकच राहिलेला नाही. आपल्याला याबाबत पोलीस दल पकडू शकते, आपल्याला कायद्याच्या चौकटीत शिक्षा होऊ शकते, असा धाक गुन्हेगारांच्या मनात निर्माण झाला नाही तर अशा घटना दिवसेंदिवस निश्चितपणे वाढतील, ही चिंता आम्हाला या निमित्ताने व्यक्त करावयाची आहे. म्हणूनच मी मघाशी म्हटले की, स्वतंत्र गृहमंत्री नेमावा अशी मागणी मी या ठिकाणी करणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री, मुख्यमंत्री आहेत. जरी अनेक विभागांचा कारभार वेगवेगळे मंत्री बघत असले तरी मुख्यमंत्री महोदयांचा इतर विभागांवर सर्वोच्च अधिकार आहे. त्यांच्या विभागात जर या पद्धतीने होत असेल तर दुसरी व्यक्ती नेमून त्यात आणखी काय होणार आहे ?

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

मी राजकीय अभिनिवेश बाळगून भाषण करीत नाही, सत्ताधाऱ्यांना अत्यंत प्रखर युक्तीवाद करता येतो. सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे म्हणून कोणाच्या पदव्या खऱ्या आहेत की, खोट्या आहेत, याबाबत आम्ही काहीही बोललो नाही. काल उद्योग मंत्री माननीय श्री.सुभाष देसाई यांनी केलेल्या स्टेटमेंटनुसार महाराष्ट्रात जनरल मोटर्सचा कारखाना येणार व त्यातून चार हजार कोटी रुपयांची आर्थिक गुंतवणूक होणार व स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळतील. याबाबत मला असे म्हणावयाचे आहे की, शासनाने आता चार-चार महिन्याचे कोर्स तयार करावेत, त्यातून पदवीधर व इंजिनिअर तयार होतील व लगेच त्यांना नोकरी मिळेल, अशी व्यवस्था तयार झाली तर तीन-तीन, चार-चार वर्षे पदवी प्राप्त करण्यासाठी वेळ देण्याची गरज पडणार नाही. युपीएससी व एमपीएससीचा अभ्यास करण्याची गरज पडणार नाही. चार महिन्याचा कोर्स करायचा डीग्री दाखवली की, जनरल मोटर्समध्ये नोकरी लागेल. (अडथळा...)

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता मला सांगत आहेत की, अजून या विषयावर बोला, अजून कोणाला दुसऱ्याला पदवी देता येत असेल तर ती देण्याचा प्रयत्न करा. मी बोलत असताना फक्त तेवढ्यापुरता विषय स्पष्ट केला. मुख्य प्रतोद सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर देखील मला खाली बसून म्हणतात की, बोला. मला बोटाने इशारा करुन सांगत आहेत की, या विषयावर अजून बोला, तुम्ही काल काहीच बोलला नाही. (अडथळा...) माननीय मंत्री श्री.प्रकाश महेतांच्या जे मनात आहे ते मी मांडल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मला वाचावयास मिळत आहे, यापेक्षा दुसरी कोणतीही गोष्ट असू शकत नाही. माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता साहेब शिवसेना आपल्याबरोबर सत्तेत आहे, गेल्या महिन्यापासून सामना दैनिकात राजीनामा मागितला असे लिहून येत आहे. मंत्री महोदयांच्या बाबतीत देखील बोलले गेले ते आपणासोबत सत्तेत आहेत, सामुहिक जबाबदारी आहे असे आपण म्हणता. सामुहिक जबाबदारी नेमकी कोणाची व कशासाठी आहे, काल या विषयावर चर्चा झाली तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी खाली बसून कॉमेंटस् केले की, हे कधी बाहेर जातात याची आम्ही वाट पाहत आहोत कारण आम्हाला तिकडे यावयाचे आहे, मी प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष म्हणून आपणाला सांगतो की, आम्ही तुमच्यासोबत कधीही सत्तेत बसणार नाही, असे मी या सभागृहात सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

आम्ही तुमच्यासोबत येणार आहोत असा त्यांच्यावर धाक कशाला दाखवित आहात. या धाकाखाली त्यांना किती दिवस वावरावयास लावत आहात, तुम्हाला दिलेल्या मंत्रीपदाच्या विभागावर तुम्ही समाधान मानलेच पाहिजे. नाही तर बोल जातोस का ते तयार आहेत. (..अडथळा...) सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे मी आपणाला सांगतो. आम्ही पहिल्यांदा पाठिंबा जरूर जाहीर केला होता. त्या भूमिकेचे आम्ही आजही समर्थन करतो. दिल्ली राज्यात पहिल्यांदा ज्यावेळी केजरीवाल यांचे सरकार आले, आताचे नाही आता त्यांना पाशवी बहुमत मिळाले आहे. पहिले सरकार आले तेव्हा तेथे अस्थिरता निर्माण झाली होती व देशाच्या राजधानीत राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. देशाच्या आर्थिक राजधानीत लगेच राष्ट्रपती राजवट येऊ नये या हेतूने त्यावेळी सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याची भूमिका आमच्या पक्षाने घेतली होती. त्यामुळे कदाचित देवाण-घेवाणीमध्ये तुमचे थोडेसे महत्व कमी झाले असावे. काही लोकांना गृहमंत्री व्हावयाचे होते ते त्यांचे स्वप्न राहिले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यासाठी देखील वेगवेगळे कंगोरे आहेत. एचआरडी मंत्री म्हणून तुम्हाला ते अनुभवायला मिळत आहे. दुसरे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जात आहेत, ही सर्वजण स्वप्ने पाहत होती, हा विनोदाचा भाग आपण सोडून देऊ या.

सभापती महोदय, महत्वाच्या गंभीर विषयावर मी बोलत आहे, राज्यात अस्थिरता नको. आज तुमच्याकडे बहुमत आहे, बहुमताच्या जोरावर विधानसभेत कामकाज चालू आहे. एखादे लोकोपयोगी काम असेल तेव्हा आम्ही देखील सहकार्य करतो. राज्यावर जेव्हा संकट येते तेव्हा संकटाचा मुकाबला केवळ सरकार करते असे नव्हे तर विरोधी पक्षाला सोबत घेऊन संकटाचा मुकाबला आपण केला पाहिजे. म्हणून कालच्या घटनेच्या संदर्भात कोणतीही प्रतिक्रिया आमच्या सन्माननीय सदस्यांनी दिली नाही. कारण राष्ट्राच्या आणि राज्यांच्या संविधानाचा तो प्रश्न होता. वेगवेगळ्या विषयावर राजकीय मतभेद असू शकतील, राजकीय भूमिका तुमची व आमची वेगळी असू शकेल. राष्ट्र, राष्ट्राची एकात्मता, अखंडता याबाबत कोणाच्याही मनात दुमत असण्याचे कारण नाही. लोकशाहीच्या लढाईत लढत असताना आपण एकमेकांबाबत बोलू. तुम्ही जसे विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी बोलला तसेच पुढील पाच वर्षानंतर आम्ही देखील जरूर बोलू. त्याचा अर्थ असा नव्हे की, राज्य आणि देश जेव्हा संकटात येईल तेव्हा आम्ही मूग गिळून बसू व तुम्ही काय ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

पाहून घ्यावे, अशी बघण्याची भूमिका आम्ही कधीही घेणार नाही. त्यावेळी आम्ही आपल्या बरोबरीने काम करु आता तुम्ही भक्कम पाठबळावर आहात, आता अस्थिरता नाही, सरकार भक्कम आहे हे कृतीतून दिसत नाही. दिवसेंदिवस अत्याचार वाढत आहेत, बलात्काराच्या घटना वाढत आहेत, आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे, हे लांच्छनास्पद आहे. बहुमत असेल तेव्हा करारीपणे सरकार चालविण्याची हिंमत दाखविली पाहिजे. सरकारी अधिकाऱ्यांनी हिंमतीने कामे केली पाहिजेत. रयतेचे राज्य आहे असे आपण सांगत आहात, त्याच रयतेच्या एका सरदाराने अन्याय केला म्हणून त्याच्या तंगड्या तोडणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि आज पाठराखण करणारे आपण, त्यामुळे स्वतःची तुलना आपण कोणाशी करीत आहात. दुर्दैवाने तुलना करण्याचा प्रयत्न करु नका. त्यांच्या जवळपास फिरकण्याची तुमची क्षमता नाही.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव जरुर घ्या, त्यांचे नाव घेण्याचा सर्वांना अधिकार आहे, नाव घेत असताना त्यांच्या कृतीप्रमाणे वागण्याची मनोभूमिका, ताठरपणा, कणखरपणा प्रशासनातून दाखविण्याची आवश्यकता आहे. या व्यवस्थेबाबत सर्वांच्या मनात एक शंका निर्माण झाली आहे, नाशिक परिसरात गुन्हेगारी वाढली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव व सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले याबाबत बोलणार असल्यामुळे त्या विषयांवर मी बोलत नाही.

सभापती महोदय, परवाच्या दिवशी पंढरपूरच्या वारीत चेंगराचेंगरी झाली, शॉक लागला म्हणून काही वारकऱ्यांची पळापळ झाली व दुर्दैवाने काही वारकऱ्यांचा त्यात मृत्यू झाला. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे, पंढरपूरच्या वारीत आतापर्यंत अशी घटना घडलेली नव्हती. लाखो वारकरी त्या ठिकाणी येतात, पोलीस नसले तरी वारकरी वैष्णवांचा मेळावा अतिशय उत्तम पध्दतीने पार पाडतात. पंढरीच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी आस लागलेला वारकरी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून येतो व तेथे शांतपणे पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन घेतो. त्या ठिकाणी अशी घटना का घडली याबाबत राज्य सरकारने खुलासा करणे आवश्यक आहे.

सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते आपण आता आलात, मुख्यमंत्री महोदयांना 20 मिनिटे ताटकाळत लावणारे जिल्हाधिकारी मुजोर आहेत. त्यांना काही संवेदना आहेत किंवा नाहीत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

याबाबत सरकार काही करणार आहे किंवा नाही ? आता सरकारने असे परिपत्रक काढले की, लोकप्रतिनिधी आल्यावर अधिकाऱ्यांनी उठून उभे राहिले पाहिजे. असे परिपत्रक बॅरिस्टर ए.आर.अंतुले मुख्यमंत्री असताना देखील काढण्यात आले होते. मुख्यमंत्री महोदयांना अशा प्रकारे वागणूक मिळत असेल तर आमच्या सारख्यांचे काय होणार. त्यामुळे अशी 100 परिपत्रके काढली तरी काहीही फरक पडणार नाही. याबाबत काय कारवाई करण्यात येईल हे सरकारने सांगितले पाहिजे, तरच सरकारला स्वत:ची प्रतिष्ठा आहे. ही प्रतिष्ठा कोणत्या एका व्यक्तीची नाही, ही प्रतिष्ठा श्री.देवेंद्र फडणवीस यांची नाही, ही प्रतिष्ठा श्री.सुनील तटकरे किंवा श्री.दिवाकर रावते किंवा श्री.प्रकाश महेता यांची नाही. राज्याचे मुख्यमंत्री व मंत्री यांची ती प्रतिष्ठा आहे. याबाबत वेगवेगळे विवाद असतील तेव्हा आपण जरूर बोलू. यासंदर्भातील भूमिका देखील नि:पक्षपातीपणाची असली पाहिजे. पोलीस दलात आत्मविश्वास निर्माण करण्याची भूमिका सरकारने घेतली पाहिजे. गुन्हेगारी प्रवृत्ती ठेचून काढण्याच्या दृष्टीने सरकारने पावले उचलली पाहिजेत, यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा विषय यामध्ये आहे, या देशातील निम्म्यापेक्षा जास्त राज्यांच्या अर्थसंकल्प जितक्या रकमेचा आहे, त्यापेक्षा जास्त रकमेचा अर्थसंकल्प मुंबई महानगरपालिकेचा आहे. 26 जुलै 2005 मध्ये घडलेली घटना सोडून द्यावी, या वर्षी पाऊस पडण्याअगोदर सर्वांनी नालेसफाईचा दावा केला होता. सर्व मान्यवर लोकांनी नाले सफाईच्या कामाला भेटी दिल्या होत्या. सर्वांचे फोटो वर्तमानपत्रात छापून आले होते. तुम्ही आमच्या रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे तुमचा फोटो वर्तमानपत्रात छापून आला नव्हता. नालेसफाईच्या कामाची पाहणी केली म्हणून इतर सर्वांचे व वेगवेगळ्या राजकीय नेत्यांचे फोटे वर्तमानपत्रात छापून आले होते. जून महिन्यात पहिला पाऊस पडला तेव्हा या पहिल्या पावसाने पूर्णपणे मुंबई ठप्प झाली होती. नाले सफाई व रस्त्यांची कंत्राटे कोणाची आहेत. 15 वर्षाच्या आघाडी सरकारच्या कारभाराबाबत आपण बोलत आहात. त्यासाठी आमची चौकशी सुरु करण्यात आली आहे, मी मागेच सांगितले आहे की, चौकशी चालू राहू द्या. याबाबत देखील शासनाने चौकशीचे धाडस दाखविले पाहिजे. एकाला एक न्याय व दुसऱ्याला दुसरा न्याय लावणे योग्य होणार नाही. काल विरोधी पक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) DD-5

VVK/ प्रथम श्री.बोरले... 14:50

श्री.सुनील तटकरे...

नेते श्री.धनंजय मुंडे यांनी सर्व पुरावे दिले होते. आमच्या सरकारच्या 15 वर्षाच्या कालावधीतील आपण चौकशी करा, यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही. ही चौकशी करताना मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. नागपूर येथील विधानसभेच्या सन 2012 च्या हिवाळी अधिवेशनात एसआयटीद्वारे चौकशी करा म्हणून आपण ते अधिवेशन चालू दिले नव्हते. त्योवळी आपल्या आग्रहास्तव एसआयटी नेमली होती. आता देखील एसआयटी नेमून मुंबई महानगरपालिकेचे लेखापरीक्षण होऊ द्या ? नालेसफाईवर नेमका किती व कोठे खर्च होतो. माझ्या रायगड जिल्ह्यात नालेसफाई करताना नाल्यात पडलेला गाळ तेथून काढून टाकला जातो असे दाखविण्यात आले आहे.

या नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

तेथे ट्रक सुध्दा कधी गेला नाही. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते, याची चौकशी कधी करणार की नाही? केवळ आम्ही सत्तेवर आहोत म्हणून आम्ही पाठराखण करणार, विरोधकांनी गेल्या 15 वर्षात काय काय खरेदी केली या बाबतचा राजकीय हिशोब करण्याचा हा आखाडा नाही. विधानसभा आणि विधानपरिषद हे कायदे मंडळ आहे. या सभागृहात कायदे बनविण्याचे काम केले जाते. जरूर चुकलो तर त्यावर कारवाई करा. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. कालचे शब्द काय होते? माननीय मुख्यमंत्री बोलले, ते शब्द मागे घेतले. तो शब्दप्रयोग मी करणार नाही. हा न्याय समान पध्दतीने का नाही? न्याय लावायचा असेल तर समान पध्दतीने लावावा. दूध का दूध आणि पानी का पानी होऊ द्या. त्या संदर्भातील भूमिका समोर येऊ द्या. आज एवढ्या रक्कमेची खरेदी झाली, एवढ्या रक्कमेचा भ्रष्टाचार कसा झाला? आम्ही हेच म्हणत आलो. 1952 पासून 2012 पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सगळ्या धरणांवरील खर्च 72 हजार कोटी रुपये असताना 70 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार कसा झाला? हेच आम्ही बोलत आलो. आज आपल्यावर आरोप झाले तेव्हा आपल्याला वेदना झाल्या. कोणी तरी म्हणाले की, मला रात्री झोप येत नाही. कोणी तरी म्हणाले की, मला रात्रीचे जेवण जात नाही. एक आरोप झाल्यावर रात्रीची झोप येत नाही, रात्रीचे जेवण जात नाही. आम्ही एक हजार दिवस आरोपाखाली जगत आहोत.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही आज जात्यात आहोत, तुम्ही सुपात आहात, टोपलीत सुध्दा आहात. ही वेळ तुमच्यावर सुध्दा येईल, हे मी आज सांगतो. याबाबत कोणी कोणाबद्दल बोलण्याचा प्रयत्न करु नये. जे घडले त्याला सामोरे जाण्याची प्रत्येकाच्या मनामध्ये हिंमत असली पाहिजे. तुम्ही युक्तिवादातून, वाक्प्रचारातून एक गोष्ट वेगळी कशी आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला तरी संपूर्ण वास्तव नाकारले जाणार नाही. निःपक्षपातीपणा म्हणत असाल तर महापालिकेचे लेखापरीक्षण करावे. आणखी कोणत्या गोष्टीची चौकशी म्हणत नाही. लेखापरीक्षण होऊन मार्च, 2016 च्या अधिवेशनात त्याचा अहवाल सभागृहापुढे येऊ द्या. मुंबई महापालिकेच्या श्वेतपत्रिका प्रसिध्द करा, एमएमआरडीए बाबत श्वेतपत्रिका प्रसिध्द करा. आम्ही श्वेतपत्रिका काढली होती. त्याबाबत मनामध्ये प्रवाद असेल तर जरूर प्रश्न विचारले जावेत. तुम्ही श्वेतपत्रिका काढा. कोणता प्रकल्प कधी हाती घेतला, किती मूळ किंमत होती, किती किंमत वाढली, नेमकी किंमत कशामुळे वाढली हे लोकांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE.2

SGB/ 15:00

श्री.सुनील तटकरे...

समोर येऊ द्या. एका बाजूला हे बोलत असताना तेवढ्या पुरते बोलायचे, दुसरीकडे मात्र तसेच सुरु ठेवायचे. आपले ठेवायचे झाकून.....मान खाली करुन करुन..(अडथळा)...तसे होत नाही. तो वाक्प्रचार आहे. ती म्हण आहे. ती नाकारता येत नाही. तुम्हाला आता सवय करावी लागेल. सवय करावयाची असेल तर आपला प्रशासनावर वचक वाढविला पाहिजे. जिल्हाधिकारी काय? कोणाकडेही सरकारकडून आदेश गेले तर त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. तुम्हाला कॅबिनेटमध्ये ठराव करावा लागला. घोषणा केली की, याची अंमलबजावणी करा. असा ठराव कॅबिनेटमध्ये करावा लागतो का? केवढी नामुष्की. मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी खालच्या स्तरावर झाली नाही असे कधी घडले नाही. असे कणखर मुख्यमंत्री महाराष्ट्राने पाहिले आहेत. आम्हाला कॅबिनेटमध्ये ठराव करावा लागतो याचा अर्थ सरकारची नामुष्की आहे. सरकारचा प्रशासनावर वचक नाही. सांगण्याचा मतितार्थ असा की, धाक संपुष्टात येतो. प्रशासनावरचा वचक संपतो. पोलीस दल लोकांचे संरक्षण करण्यासाठी आहे. पोलीस दल काम करण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कमी पडते, त्यावेळेला अशा अनेक गोष्टी निर्माण होत असतात. त्या निर्माण होत असलेल्या प्रत्येक गोष्टीवर उपाययोजना करण्याची मानसिकता, राजकीय पाठबळ, इच्छाशक्ती दाखविण्याची आवश्यकता आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. तुम्ही कितीही आकडेवारी द्या, त्या आकडेवारीवरुन राज्यातील जनतेचे समाधान होत नाही. मंत्री सुरक्षित नाहीत. राज्यात असुरक्षिततेची भावना सर्व स्तरावर निर्माण झालेली आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून आम्ही याच गोष्टीची अपेक्षा करीत आहोत. याबाबत तुम्ही उपाययोजना करण्यासाठी काय पावले उचलली आहेत? मालवणी येथील विषारी दारु प्यायल्यामुळे हे हत्याकांड घडले त्याला जबाबदार असणाऱ्यांवर नेमकी काय कारवाई केली? राज्य उत्पादन शुल्क की पोलीस दल यामध्ये सर्वसामान्य माणसांना भरडू नका. त्याच बरोबर राज्यातील प्रत्येकाचे संरक्षण, सर्व धर्मीयांचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. काही लोकांच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असेल तर त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दाभोळकरांची हत्या करणारे, कॉ.पानसरे यांची हत्या करणारे आरोपी अद्याप सापडलेले नाहीत. याबाबत खुलासा होणे गरजेचे आहे.

...3..

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE.3

SGB/ 15:00

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी उदाहरण दिले. Ceasar's wife should be above suspicion. आज त्या उदाहरणाच्या संदर्भात नेमकी राज्याची स्थिती काय आहे हे सांगण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शेवटच्या दिवशी कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा होत आहे. पण या चर्चेच्या माध्यमाधून सभागृहाकडे राज्यातील सामान्य जनतेचे लक्ष लागले आहे. राज्य सरकारकडून उत्तर अपेक्षित होते. राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा प्रस्ताव सभागृहात मांडला होता. शेतकरी पावसाची आतुरतेने वाट पहात होते, त्यांना याची अपेक्षा होती की निदान सरकारकडून मदतीची घोषणा होईल. परंतु त्यांचा अपेक्षाभंग झाला. राज्यातील प्रत्येक माणूस असुरक्षिततेच्या भावनेमध्ये वावरत असून त्यांच्या मनामध्ये सुरक्षितता निर्माण करण्यासाठी तुम्ही काय उपाययोजना करणार आहात? नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात तुम्ही केलेल्या उपाययोजनातून कन्व्हीक्शन रेटबद्दल बोलू नका, गुन्हेगारी किती प्रमाणात खाली आली, गुन्हेगारांवर काय कारवाई केली हे दाखविण्याचा प्रयत्न करा. माननीय मुख्यमंत्र्यांचा राजीनामा न मागता त्यांनीच गृह खाते सांभाळावे. राज्याच्या गृहमंत्र्यांनी आतापर्यंत जो वचक दाखविला तो दाखविण्याचा प्रयत्न करावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE.4

SGB/ 15:00

पृ.शी.: शिवनेरी बसेसमध्ये महिलांसाठी आरक्षित आसने

मु.शी.: शिवनेरी बसेसमध्ये महिलांसाठी आरक्षित आसने

यासंबंधी माननीय परिवहन मंत्री यांचे निवेदन

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतचे धोरण

मु.शी.: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतचे धोरण यासंबंधी माननीय परिवहन मंत्री यांचे निवेदन

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी राखी पौर्णिमेची आठवण ठेवून घोषणा केलेली आहे. मी त्यांचे मनःपर्वूक आभारी आहे. श्री.रावते साहेब गाडीमधून प्रवास करीत असताना शेजारी अनोळखी माणूस असला की, काय कुचंबणा होते हे सांगण्याची आवश्यकता नाही. प्रत्येक महिलेला कधी ना कधी याला सामोरे जावे लागते. त्यातून आपण दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. या निर्णयाबद्दल पुरूष वर्ग देखील आभारी असेल.

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्यावतीने आज कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

मला सुरूवातीलाच सांगितले पाहिजे की, सन्माननीय मुख्यमंत्री व दोन्ही सन्माननीय गृह राज्यमंत्री आमच्या ज्या ज्या काही तक्रारी असतात त्यास ताबडतोब प्रतिसाद देतात, सहकार्य करतात. त्याबद्दल मी त्यांचे सुरूवातीलाच आभार मानते. एसएमएस पाठविल्यानंतर देखील कारवाई करण्यात येते. तरी पण मला येथे मांडणे अपरिहार्य होत आहे. आपली ववस्था अनेक वर्षापासून बिघडलेली आहे. त्यात आपण दुरूस्ती कशी काय करणार आहात ? मला येथे काही उदाहरणे द्यायची आहेत. त्यासाठी कृपया आपण सहकार्य करावे. याच सभागृहामध्ये नगर जिल्ह्यातील सोनई पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकाऱ्याने दुर्लक्ष केल्यामुळे गावातील एका वादातून एका महिलेवर बलात्कार झाल्याची घटना घडली होती. सोनई पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याची आम्ही चौकशी करू असे सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये निवेदन केले होते. मी स्वतः मे महिन्यामध्ये नगरला गेले होते. तेथील पोलीस अधिकाऱ्यांच्या नुकत्याच बदल्या झाल्या होत्या. मी ज्यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालयात गेले होते त्यावेळी त्या पीडित महिलेचे कुटुंब देखील दुसरे काही तरी निवेदन घेऊन आले होते. त्यावेळी मी त्यांना विचारले की, आपला त्रास काही कमी झाला आहे काय ? आपली तक्रार घेतलेली आहे. त्या अधिकाऱ्याची चौकशी झाली काय, त्याची बदली झाली आहे काय ? तेव्हा त्यांनी सांगितले की, असे काही झाले नाही. मला असे वाटले की, कदाचित त्यांना काही कळले नसेल. त्यामुळे जे नवीन पोलीस अधीक्षक आले होते त्यांच्याकडे विचारणा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली. त्यावेळी जुने अतिरिक्त पोलीस अधीक्षक देखील होते. त्यांना विचारले की, आम्ही मार्च महिन्यामध्ये विधिमंडळामध्ये सोनई पोलीस स्टेशन मधील अधिकाऱ्यांचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी सोनई पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्याची चौकशी करून कारवाई करूअशा प्रकारचे उत्तर दिले होते. त्यासंबंधी कोणती चौकशी झाली ? तेव्हा ते मला म्हणाले की, मी चौकशी करून उद्या आपणाला सांगतो. नगर जिल्ह्याचे जे पोलीस अधीक्षक होते त्यांचे खरेच कौतुक करायला पाहिजे. त्यांनी सांगितले की, ताई, आम्हाला चौकशीचे कुठलेही आदेश आलेले नाहीत. आपण मला सांगत असल्यामुळे मी त्याची चौकशी करतो आणि पुढील कारवाई करतो. सभागृहात आपण चौकशी करण्याचे आदेश देतो. पण जिल्हाधिकारी किंवा जिल्हा प्रशासनाकडे ते आदेश पोचत नाहीत. येथील चर्चा स्थानिक पातळीवरील लोक निगरगट्टपणे पचवून त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे केवढी मोठी यंत्रणा कुरण पोसते आहे याचा आपण विचार करू शकतो. सोनई प्रकरणासंदर्भात सन्मानीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊन सुद्धा नगर पोलिसांपर्यंत आदेश पोहोचले नव्हते. तेव्हा यासंबंधात सर्व प्रथम आम्हाला माहिती देण्यात यावी अशी माझी आपणास नम्र विंनती आहे.

पुण्याला पर्वती परिसरामध्ये 7 जुलै रोजी दंगल सदृश परिस्थती निर्माण झाली. यातील जे पीडित लोक होते त्यांनी माननीय गृह राज्य मंत्री डॉ.रणजित पाटील यांची भेट घेतली आहे. मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. अपराध्यास शिक्षा व्हायला पाहिजे. त्यावेळी माननीय गृह राज्यमंत्र्यांनी असे जाहीर केले होते की, महिला पोलीस अधिकाऱ्यांतर्फे या सर्व प्रकरणाची चौकशी करू. तेव्हा माझी सरकारला विनंती आहे की, त्या अहवालात काय आलेले आहे ? महिलांची छेडछाड करणारे, महिला टॉयलेटला जात असताना त्यांचे गुपचूप रेकॉर्डींग करणारे जे समाजकंटक आहेत त्यांच्याबद्दल या महिला पोलीस अधिकाऱ्यांकडून काही माहिती आली असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. त्या समाजकंटकांना कडक शिक्षा झाली पाहिजे. जे निरपराध आहेत त्यांच्यावर स्थानिक पोलीस स्टेशनच्या माध्यमातून मध्यस्थ दबाव आणत आहेत. तेव्हा या संदर्भात स्वत: लक्ष घालावे अशी मला मन:पूर्वक विनंती करावीशी वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

दुसरी घटना देखील पुण्यातीलच आहे. पुण्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर, नगर विकास विभागाच्या प्रश्नांवर भरपूर चर्चा होते. या अधिवेशनात पुण्यातील नगरविकास विभागाच्या एकाही प्रश्नावर नीट चर्चा झालेली नाही. आता कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा सुरू झालेली आहे. आम्हाला नागपूर अधिवेशनामध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, पुण्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींबरोबर मिटींग घेऊन त्यांच्या व्यथा व प्रश्नांचा पाठपुरावा करण्यात येईल. या सरकारचे हे तिसरे अधिवेशन आहे. दुर्दैवाने या प्रश्नासाठी माननीय मुख्यमंत्र्यांसोबत एकही बेठक झाली नाही. कचऱ्याच्या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर अनेक बैठका झाल्या. पण पुणे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आलेले नाही. तशी बैठक आपण आयोजित करावी असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

पुण्यामध्ये 27 जून रोजी एक घटना घडली. त्यात 82 दुचाकी 4 मोटारी भस्मसात करण्यात आल्या. संपूर्ण शहरामध्ये कोलाहल माजला होता. सकाळी उठल्यानंतर प्रत्येक ठिकाणी होळी पेटली आहे काय, असे वाटत होते. काही लोक कसे तरी जीव बचावून बाहेर पडले आहेत. नंतर सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक समाजकंटक सापडला. त्याला अटकही झाली. रात्रीच्या वेळी पेट्रीलिंग असते. अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. पण पुण्याचे हे आऊटस्कट आहेत त्या भागाकडे आपले लक्ष नसावे असे मला वाटते. या माथेफिरू माणसाने मोठ्या संख्येने दुचाकी जाळून टाकल्यामुळे गाडीचा विमा देखील मिळणार नाही. अशा पीडितांना दिलासा देण्यासंबंधी येथे कोणतीही चर्चा झालेली नाही. असेच प्रकार पूर्वी नाशिक, औरंगाबादसह अनेक ठिकाणी घडलेले आहेत. मुद्दाम कोणी गटबाटीतून, टोळी युद्धातून या गोष्टी करतात. अशा गुन्हेगारांवर वेळ पडल्यास एमपीडीए लावला पाहिजे. जेणे करून त्यांना कडक शिक्षा होईल. तेव्हा या संदर्भातील वस्तुस्थिती कळावी म्हणून मी आपले लक्ष वेधत आहे.

आमच्या पुणे शहर पोलीस आयुक्तालयाची व पोलीस वसाहतीची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. मंत्रालयाला जशी शॉर्ट सर्किट होऊन आग लागली तशी आज पुणे पोलीस आयुक्तालयाची अवस्था आहे. गेली चार-पाच वर्षे पुणे शहर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

पोलीस आयुक्तालय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विनंती करीत आहे. पण त्यांच्या दुरूस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभाग करीत नाही. आम्ही दौंड आणि शिवाजी नगर येथील पोलीस वसाहतीला भेट दिली. या पोलीस वसाहतींमध्ये घुशींचे साम्राज्य होते. इलेक्ट्रिफिकेशन 100 वर्षापूर्वीचे जुने होते. पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरामध्ये पाहिले तेव्हा वसाहतीतील भिंती गळत होत्या. त्याही परिस्थितीत तेथे एक ओली बाळंतीण राहात होती. या वसाहतींची दुरूस्ती 10-10 वर्षे झाली नव्हती.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ...

म्हणून माझी मागणी आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग स्वत: पैसे खर्च करुन बांधकाम करुन देते त्याऐवजी पोलीस दलाचा जो गृहनिर्माण विभाग आहे त्यांनी यासंदर्भात निधी घेऊन स्वत: बांधकाम केले तर पोलीस वसाहतींमध्ये लवकर दुरुसत्या होऊ शकतील व पोलिसांच्या घरांचे बांधकाम सुध्दा वेळेवर होऊ शकेल. सन्माननीय मुख्यमंत्री व गृहमंत्री एकच असल्याने त्यांनी यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रश्नासंदर्भात मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. बारामती येथील दिपाली दिवेकर ही मुलगी विद्याविभूषित होती. सदर मुलगी विद्या प्रतिष्ठानमध्ये शिकवत होती. परंतु तिला कौटुंबिक हिंसाचारामध्ये जाळून टाकण्यात आले. या मुलीचा नंतर भीषण पध्दतीने मृत्यू झाला. मला या निमित्ताने सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांना दोन सूचना करावयाच्या आहेत. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांसाठी डोमेस्टीक व्हायलन्स ॲक्टची अंमलबजावणी कशी होते आहे याचा आढावा घेण्यासाठी आपण लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. या घटना नोंदवितांना पोलीस चालढकल करीत असल्याचे आम्ही प्रत्येक ठिकाणी बघतो. समझोता झाला तर तो रेकॉर्डवर घेतला पाहिजे. जळीताच्या केसमध्ये आरोपीच्या बाजूने 99 टक्के पोलीस असतात व पोलीस या तक्रारी घेण्याचे काम पुढे पुढे ढकलत असतात. जेणेकरुन मुलीचा मधल्या मध्ये मृत्यू झाला तर मृत्यूपूर्व जबानी घेतली जाणार नाही. अशा वेळेस डॉक्टर सांगतात की, मुलगी तेवढी कॉन्शिअस नाही. व्हीडीओ फिल्मसच्या माध्यमातून तसेच मॅजीस्टेटने यासंदर्भात जी प्रश्नावली केलेली आहे त्यामध्ये पहिल्या चोवीस तासात तिची ट्रॅट्रीओस्टोमी म्हणजे दोन तीन तासामध्ये महिलेची जबानी घेतली गेली तर आरोपी पकडणे शक्य होते, नाही तर या मुलींवर दबाव आणला जातो. दिवेकरच्या घटनेत आरोपी पकडले गेले असले तरी माझी यासंदर्भात सूचना राहील की, डोमेस्टीक व्हायलन्स ॲक्टच्या संदर्भात पूर्वीच्या युती सरकारने स्वतंत्र न्यायालये केली होती. ज्या प्रमाणे मोठया शहरामध्ये हुंडाबळीसारख्या केसेसच्या संदर्भात शासनाने स्वतंत्र न्ययालयाचा विचार करावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी जो उल्लेख केला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, मी वृत्तपत्रात असे वाचले होते की, माजी मंत्री तसेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ...

विधानसभेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ आमदार यांनी असे सांगितले आहे की, कॉ.पानसरे यांचे मारेकरी सापडलेले आहेत. हे आरोपी पकडले जावेत अशी आपल्या सगळ्यांची अपेक्षा आहे. एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना असे सांगितले आहे की, पानसरेंचे हत्यारे मिळालेले आहेत. मी सभागृहात अशी मागणी करते की, हसन मुश्रीफांकडून यासंदर्भातील माहिती घेवून ती माहिती सरकारला द्यावी, मुख्यमंत्र्यांना द्यावी, गृहराज्यमंत्र्यांना द्यावी. या विषयाच्या संदर्भात एसआयटीमधील अधिकाऱ्याला जे काही माहिती आहे त्या माहितीचा उपयोग झाला आणि आपण त्या हत्याऱ्यांपर्यंत पोहचलो तर चांगले होईल. माजी कामगार मंत्री हे सांगत असल्यामुळे त्यांच्या शब्दाला खूप महत्व आहे. तसेच दुसऱ्या खुनांच्या प्रकरणात पूर्वी जे गुन्हे घडले आहेत त्यासंदर्भातही शासनाला मदत होऊ शकेल. म्हणून मी अशी सूचना करु इच्छिते की, माननीय श्री. हसन मुश्रीफांकडून ही माहिती घेऊन शासनाने यासंदर्भात चौकशी करावी असे मी या ठिकाणी सूचवू इच्छिते.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, ...

डॉ. नीलम गोऱ्हे :मी सन्माननीय श्री.मुश्रीफांची चौकशी करा असे सांगितले नाही तर त्यांच्याकडून माहिती घ्यावी असे मी म्हणाले आहे. मी चुकीचे काही सुध्दा बोलले नाही.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ते आमदार कोण आहेत, कोणत्या पक्षाचे आहेत त्यांचा या ठिकाणी उल्लेख करण्याची काही एक गरज नाही. राष्ट्रवादीचे आमदार श्री. हसन मुश्रीफ यांचे नाव या ठिकाणी घेण्याची काही गरज नाही. ते या सभागृहाचे सदस्य नाहीत. पोलीस यंत्रणा सक्षम आहे. पोलीस यंत्रणा सक्षम नसेल तर गृहविभाग सक्षम आहे. गृहमंत्री आणि मुख्यमंत्री सक्षम आहेत, राज्य मंत्रीही सक्षम आहेत. आताचे सत्ताधारी विरोधी पक्षात होते त्यावेळेस तेच म्हणावयाचे की, डॉ.नरेंद्र दाभोळकरांची हत्या करणारे कोठे गेले ? तेव्हाचा विरोधी पक्ष आता सत्तेमध्ये आहे. त्यामुळे त्यांनी या प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लावला पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कोणत्याही सदस्यांचे नाव घेऊ नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये हे आंबेडकरी चळवळीचे सदस्य आहेत. या ठिकाणी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उल्लेख केल्यामुळे त्यांना वाईट वाटले. ठीक आहे. मी बोलण्याच्या ओघात उल्लेख केला. याचा अर्थ सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लोक संघटीत होऊन सर्व गुन्हेगारांची माहिती घेऊन बसले आहेत असे मी काही बोलले नाही. त्यामुळे तुम्ही अजिबात टेन्शन घेऊ नका. माझी मागणी अशी आहे की, सन्माननीय सदस्य श्री.हसन मुश्रीफ याच्या संदर्भात त्यांच्याकडून माहिती घेवून डॉ. दाभोळकरांच्या हत्यांच्यापर्यंत सरकारने लवकरात लवकर पोहचावे अशी मी या ठिकाणी मागणी करते.

सभापती महोदय, पोलिसांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि पोलिसांकडून एकमेकाचे केले जाणारे खून हा गंभीर विषय आहे. पोलीस निरीक्षक श्री. विलास जोशी आणि बाळासाहेब अहेर यांच्यावर सहाय्यक फौजदार दिलीप शिर्के यांने गोळ्या झाडून दि. 2 मे, 2015 रोजी हत्या केली आणि स्वत:वरही गोळया झाडून घेतल्या होत्या. त्याच वेळी नवी मुंबईच्या खाडी पुलावरुन एका पोली कॉन्स्टेबलने उडी मारुन आत्महत्या केली होती. औरंगाबाद येथे सुध्दा असाच प्रकार घडला होता. मला असे वाटते की, माननीय आबा हे जेव्हा गृहमंत्री होते तेव्हा ते सारखी घोषणा करीत असत की, आम्ही समूपदेशन करु, मानसिक मदत देऊ त्यामुळे त्यांच्या घोषणेचा काय फालोअप झाला हे बघून कोठेना कोठे एकमेकाचा जो ताणतणाव आहे तो दूर करण्यासाठी आपण काय करु शकतो यासंदर्भात आम्हाला शासनाकडून काही निवेदन अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मुंबईचे पोलीस आयुक्त श्री. राकेश मारिया हे मध्यंतरी महिला पोलिसांच्या प्रश्नासाठी दरबार घेणार होते अशी बातमी आम्हाला कळाली होती. ही अतिशय महत्वाची घोषणा आहे. त्यामुळे मुंबई पोलीस आयुक्तांचे तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती यांचेही मी मनपूर्वक अभिनंदन करते. यासंदर्भात मी सरकारला सांगू इच्छिते की, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी, प्रत्येक आयुक्तालयाच्या ठिकाणी महिला पोलिसांच्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी अंतर्गत यंत्रणा शासनाने सक्षम करावी अशी विनंती करते.

सभापती महोदय, टाईम्स नाऊवर दि.29 जुलै, 2015 रोजी म्हणजे याकूब मेमनला फाशी होण्याच्या अगोदरच्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री. राहूल नार्वेकर चॅनलवर बोलत होते. ते बोलत असताना एमआयएमच्या आमदारांनी असे विधान केले की, "धीस इज नॉट माय लँड".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ...

यामुळे श्री. राहूल नार्वेकरांनी त्यांच्याशी खूप संघर्ष केला. मला असे वाटते की, एखादा विद्यमान आमदार मग ते कोणत्याही पक्षाचे असोत पण जेव्हा ते म्हणतात "धीस इज नॉट माय लँड" त्यासंदर्भात त्यांची चौकशी केली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करते.

सभापती महोदय, राज्य घटनेनुसार मानवी अधिकारासाठी लढण्याचा अधिकार दिलेला आहे. यामध्ये अनेक लोक कायमस्वरुपी फाशीला विरोध करीत आलेले असून त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. धनंजय कलकत्त्याला फाशी गेला होता त्यावेळी सुध्दा ते तेथे आवाज उठवित होते. अंजनाबाई गावितला उद्या फाशी देण्याची वेळ आली तर काही लोक त्यासंदर्भातही बोलतील आणि ती त्यांची भूमिका आहे. परंतु सुप्रीम कोर्टाने ज्या आरोपीला शिक्षा जाहीर केली त्या आरोपीच्या संदर्भात विधान परिषदेतील काही पक्षाचे आमदार व विधानसभेतील काही पक्षाचे आमदार यांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाबद्दल हस्तक्षेप करुन आरोप करावा काय ? मुंबई हल्ल्याचा जो कट आहे तो अंतरराष्ट्रीय स्वरुपाचा कट आहे. त्यामुळे मला असे वाटते की, लोकप्रतिनिधींची जी गरिमा आहे त्या गरिमेला यामुळे धक्का पोहचतो. पक्षाने जाहीर केले आहे की, त्यांची ती वैयक्तिक मते आहे. परंतु यासंदर्भात आमची तुमच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. आम्ही तुम्हा सर्वांना भगिनी आणि बंधू मानतो. ज्यांच्यामुळे मुंबई उद्धवस्त झाली त्याच्यासाठी आपल्या पोटात कळवळा का येतो? मग प्रश्न पडतो की, पुतना मावशीचे प्रेम यालाच म्हणतात काय ? त्यामुळे यासंदर्भात आमदारांच्या भूमिका तपासल्या गेल्या पाहिजेत. आपल्याला कल्पना आहे की, मनोरा आमदार निवासात एक अतिरेकी राहून गेला होता. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची आवश्यकता आहे. या गोष्टीबद्दल आपण सर्वांनी अलर्ट असणे अतिशय आवश्यक आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षाने कायदा व सुव्यवस्थेसबंधी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने चर्चा उपस्थित केली आहे. आमची अपेक्षा आहे की, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील घटना पर्वती येथील दुचाकी जाळण्याची असो, कौटुंबिक हिंसाचाराची असो, हसन मुश्रीफांची असो किंवा गृह विभागाची असो. त्यासंदर्भात सन्माननीय गृहमंत्री उत्तर देतील परंतु आम्ही यासंदर्भातील घटनांची जी काही माहिती दिली आहेत त्यासंदर्भातील लेखी उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजेत अशी अपेक्षा करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ...

सभापती महोदय, मी जेव्हा मुद्दे मांडले तेव्हा सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते नव्हते त्यामुळे मी सांगू इच्छिते की, नेवासा येथील सोनई पोलीस स्टेशनमधील संबंधित पोलीस अधिकाऱ्याची आम्ही चौकशी करु असे सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी यासभागृहात सांगितले होते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

मी त्या ठिकाणी मे महिन्यात भेट दिली असता मला पोलीस अधीक्षकांनी सांगितले की, आम्हाला चौकशी करण्याचे आदेश मिळालेले नाहीत. आपण सांगत आहात तेव्हा आम्ही चौकशी करतो. त्यानंतर त्यांनी चौकशीला सुरुवात केली. तेव्हा आपण या संदर्भात एक बैठक बोलवावी. सभागृहात जे काही निर्णय होतात ते संबंधित विभागाचे अधिकारी लिहून घेतात. पण ते निर्णय त्या त्या पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचत नाहीत तेव्हा विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहाचे लोकांच्या नजरेमधील महत्व शून्य आहे हे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जे.सी.चांदूरकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावावर ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचे भाषण झाले त्यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचे भाषण झाले. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री देखील उपस्थित नाहीत. This is very important discussion. तेव्हा आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करावे. आम्ही अभ्यास करुन येथे विषय मांडल्यानंतर त्या प्रश्नांना उत्तरे मिळत नसतील तर त्याचा काय उपयोग ?

सभापती महोदय, माननीय गृहराज्यमंत्री सभागृहात उपस्थित झाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर आपले विचार मांडले. या प्रस्तावाच्या शेवटच्या ओळीमध्ये ".. जनमानसात शासनाविरुद्ध निर्माण झालेला तीव्र संताप व असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी." यावर माझे विचार मांडावयाचे आहेत.

सभापती महोदय, ऑक्टोबर महिन्यात विधानसभेच्या निवडणुका चालू असताना आताचे माननीय मुख्यमंत्री आणि त्यावेळचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री.देवेंद्र फडणवीस यांनी एक पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, हे सरकार बदलले पाहिजे आणि पुढे राजकीय भाषण केले. त्यावेळी त्यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला की, राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची अतिशय वाईट परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे हे सरकार बदलले पाहिजे. हे सांगत असताना त्यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर काय म्हणाले त्याचा उल्लेख केला. ज्या सरकारची कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडलेली आहे त्या सरकारला औषध दिले पाहिजे. म्हणजे सरकार बदलले पाहिजे जेणेकरुन कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती ठीक होईल. आम्ही सत्तेवर आल्यानंतर काय करु हे त्यांनी सांगितले. त्यामध्ये राज्यातील संपूर्ण यंत्रणा हायटेक करण्यात येईल,लवकर निर्णय लागण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु करण्यात येईल, महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती सोडवू. राज्यात गुन्हेगारांचे प्रमाण वाढले आहेत, दलितांवरील अत्याचारात वाढ झालेली आहे, महिलांवरील बलात्काराच्या घटनेत वाढ झाली आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जर्नादन चांदूरकर...

त्यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपणास हे सर्व ठीक करावयाचे असेल तर जिल्ह्याच्या ठिकाणी आम्ही महिलांसाठी एक वेगळे पोलीस स्टेशन सुरु करण्यात येईल. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील. सायबर पोलीस स्टेशन करण्यात येईल जेणेकरुन गुन्हेगाराला ताबडतोब डिटेक्ट करता येईल अशाप्रकारची अनेक आश्वासने त्यांनी आपल्या जाहीरनाम्यामध्ये दिली होती. त्यानंतर ते सत्तेवर आले. सत्तेवर आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी विधानसभेमध्ये राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर भाषण केले. सरकार सत्तेवर येऊन फार कमी दिवस झाले होते. कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असताना त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये आणि जाहीरनाम्यामध्ये जे सांगितले होते त्याला ट्विस्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महिलांकरिता स्वतंत्र पोलीस स्टेशन तयार करावे, हे जरी खरे असले तरी ते फार अवघड आहे. म्हणजे निवडणुकीला सामोरे जाताना एक भाषा आणि सत्तेवर निवडून आल्यानंतर दुसरी भाषा करण्यास सरकारने सुरुवात केली आहे. त्यांनी आपल्या भाषणामध्ये पुढे असे सांगितले की, महिलांवरील गुन्हे नोंदविण्यासाठी राज्यामध्ये टप्प्याटप्प्याने 100 टक्के पोलीस स्टेशनमध्ये महिला कक्ष स्थापन करण्यात येईल. त्याच बरोबर महिलांवरील गुन्ह्यांचा लवकरात लवकर निकाल लागण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टची सातत्याने मागणी केली जात आहे. त्याबाबत राज्य शासनाने पुढाकार घेतलेला असून त्याकरिता 22 कोर्टस डेसिगनेट करण्यात आली आहेत. या सरकारला सत्तेवर येऊन आठ महिने झालेले आहेत, परंतु त्यांनी जी आश्वासने दिलेली आहेत त्या संदर्भातील कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही, हा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेवर भाषण करीत असताना ती किती ढासळली आहे हे देखील त्यांनी आपल्या भाषणामध्ये कोट केले होते. मी त्यांच्या भाषणातील रेफरन्स देत आहे. गोंदिया जिल्ह्यात जमिनीच्या वादातून दलित तरुणाला जीवंत जाळल्याची घटना घडली आहे. औरंगाबादमध्ये मातंग समाजातील तरुणाला विहिरीत फेकून देण्याची घटना घडली आहे. नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशनाच्या अगोदर एका शिक्षिकेवर बलात्कार झाल्याची घटना घडली आहे, त्यांनी अशी अनेक उदाहरणे दिली.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर....

माननीय मुख्यमंत्र्यांनी डिसेंबर महिन्यामध्ये म्हणजेच सत्तेवर आल्यानंतर एक महिन्याच्या काळात मान्य केले की, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती मागील सरकारच्या तुलनेत घसरलेली आहे. त्यांनी त्यावेळी असे सांगितले होते की, मी आताच सूत्रे हाती घेतलेली आहेत आणि मला हे नीट करण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक 17 मार्च, 2015 रोजी पुन्हा एक भाष्य केले. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी भाषणात उल्लेख केला की, माननीय मुख्यमंत्री नेहमी मागच्या सरकारच्या काळात घडलेल्या घटना आणि या सरकारच्या काळात घडलेल्या घटना यांची तुलना करतात. मला वाटते दिनांक 17 मार्च रोजी आकडेवारी देताना माननीय मुख्यमंत्र्यांच्या लक्षात एक गोष्ट आली नाही. त्यांनी मागच्या 15 वर्षाच्या काळातील घटनांची नवीन सरकारच्या काळात घडलेल्या घटनांशी तुलना केली. महोदय, मी मागच्या सरकारचा कालावधी 15 नव्हे तर केवळ 5 वर्षाचा पकडतो आणि नवीन सरकारचा कालावधी सहा महिन्याचा पकडतो. हा कालावधी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वतः दिलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, मागील शासनाच्या काळामध्ये खून झालेल्या घटनांची संख्या 405 होती आणि आता आमच्या सरकारच्या सहा महिन्याच्या काळात ही संख्या 363 झाली आहे. म्हणजे गेल्या चार वर्षात 405 घटना घडल्या होत्या आणि नवीन सरकारच्या सहा महिन्यांच्या काळात 363 घटना घडल्या. महोदय, या कालावधीतील घटनांची तुलना केली तर पूर्वीच्या सरकारच्या तुलनेत या सरकारच्या काळात खुनाच्या घटना वाढलेल्या आहेत. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, मागील शासनाच्या काळात खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या घटना 420 होत्या, ती संख्या आता 384 वर आली आहे. महोदय, पाच वर्षात ही संख्या 420 होती, परंतु नवीन सरकारच्या सहा महिन्यांच्या काळात ती 384 वर आली. याचा अर्थ या घटना कमी नव्हे तर, उलट त्या वाढल्या आहेत. मागच्या सरकारच्या काळात दरोड्यांची संख्या 172 होती आणि नवीन सरकारच्या सहा महिन्यांच्या काळात ती 132 वर आली. महोदय, कालावधीची तुलना केली तर या घटना कमी नव्हे तर वाढल्या आहेत. महोदय, अशा प्रकारची आकडेवारी देऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यात अन्याय, अत्याचार किंवा अन्य घटना कमी नव्हे तर एकप्रकारे वाढल्याचे मान्य केले आहे. हे स्वतः माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर....

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईतील काही घटनांबाबतचा सुध्दा उल्लेख केला होता. त्यांनी सांगितले होते की, मुंबईमध्ये नवीन सरकारच्या काळात विनयभंग आणि बलात्काराच्या 577 घटना घडल्याची नोंद आहे. यामध्ये क्लोज फॅमिली मेंबर्सनी बलात्कार केल्याच्या घटना 28 आहेत, नातेवाईकांनी बलात्कार केल्याच्या घटना 37 आणि ओळखीच्या लोकांनी बलात्कार केल्याच्या घटना 421 आहेत. नंतर त्यांनी सांगितले की, काही घटनांची नोंद झाली नसली तरी शासन बलात्काराच्या घटनांवर अंकुश ठेवू शकत नाही. महोदय, या विषयाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, या घटनांवर आळा घालण्यासाठी समाजामध्ये जागरूकतेची भावना निर्माण झाली पाहिजे. महोदय, ऑक्टोबर महिन्यात पत्रकार परिषद घेऊन मोठ्या अविर्भावात सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आता ट्विस्ट करुन स्वत:ची जबाबदारी समाजावर टाकली आहे. सहा महिन्यांच्या काळात त्यांच्या लक्षात आले की, ही गुन्हेगारी समाजाने कमी केली पाहिजे. महोदय, हे खरे आहे की, अशा प्रकारची गुन्हेगारी समाजाने कमी केली पाहिजे. परंतु समाज संपूर्ण गुन्हेगारी कमी करु शकत नाही. ही गुन्हेगारी डिटरंट पनिशमेंट व फर्म गव्हर्नमेंट याच्याशिवाय कमी होणे शक्य नाही.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात अनेक मुद्दे सांगितले होते. ते डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येबाबत बोलले. नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येकऱ्यांना राज्याचे पोलीस दल पकडू शकले नाही. त्यामुळे नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येचा तपास राज्य सरकारला सी.बी.आय.कडे द्यावा लागला. हा तपास सी.बी.आय. कडे देऊन राज्याच्या पोलीस दलात या हत्येचा तपास लावण्याची कुवत नाही हे एकप्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केले आहे. नवीन सरकारच्या सहा महिन्यांच्या काळात अशा प्रकारे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली होती.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार काम करीत आहे. त्यांनी राज्यातील जनतेसाठी 'अच्छे दिन' येणार असल्याची घोषणा केली होती. परंतु गेल्या आठ महिन्यांच्या काळात राज्यातील आणि देशातील जनतेच्या नशिबी अच्छे दिन नव्हे तर पश्चातापाचे दिन आले आहेत. हा या मागील महत्त्वाचा मुद्दा आहे. आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर....

राज्यातील जनतेवर केलेल्या चुकीच्या बाबतीत पश्चाताप करण्याची वेळ आलेली आहे. अशा पध्दतीचे वातावरण राज्यात संपूर्ण ठिकाणी निर्माण झाले आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने काही बाबी निदर्शनास आणून देतो. आज सरकारमध्ये एकमत नाही. भाजपा आणि सेना या दोन्ही पक्षाचे सरकार सध्या अस्तित्वात आहे. परंतु या सरकारच्या कॅबिनेट मंत्र्यांमध्ये एकवाक्यता नाही. या सरकारमधील राज्यमंत्री हे कॅबिनेट मंत्र्यांच्या विरोधात आहेत. कॅबिनेट मंत्री हे राज्यमंत्र्यांना दाद देत नाहीत किंवा राज्यमंत्री हे कॅबिनेट मंत्र्यांना किंमत देत नाहीत. अशा प्रकारची एकंदर परिस्थिती संपूर्ण राज्यात निर्माण झालेली आहे. याचे रिफ्लेक्शन संपूर्ण राज्यात उमटलेले आहेत. मीडिया, चॅनेल्स, वर्तमानपत्रांमध्ये या बाबतीत रोज जबदरस्त चर्चा ऐकावयास आणि पहावयास मिळते. आपल्याला माहीत आहे की, या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते माननीय श्री.धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत. सरकारमध्ये भाजपा आणि शिवसेना यांच्यामध्ये एकमत नसल्यामुळे, समाजाला असे वाटते की, शिवसेना हा विरोधी पक्ष आहे. अशा प्रकारची परिस्थिती आज राज्यात तयार झालेली आहे. आज शिवसेना आणि भाजपा यांच्यामध्ये संघर्ष सुरु आहे.... (अडथळा)

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी कायदा व सुव्यवस्थेवर बोलत आहे. या संपूर्ण भांडणात सरकारला निर्णय घेता येत नाही. माननीय मुख्यमंत्री निर्णय घ्यायला घाबरतात आणि त्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. राज्याच्या जनतेमध्ये चर्चा सुरु आहे की, सरकारमध्ये एकमत नाही.

सभापती महोदय, यामध्ये अजून एक अतिरिक्त फॅक्टर तयार झालेला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने अन्न सुरक्षा विधेयक राज्यात लागू केले होते. त्यानुसार राज्यातील आठ-साडेआठ कोटी गरीब जनतेला 2 रुपये किलोने गहू आणि 3 रुपये किलोने तांदूळ मिळत होते. परंतु त्यातील 1 कोटी 70 लाख गोरगरिबांचे अन्नधान्य या सरकारने बंद केले आहे. परवा मी गावी गेलो होतो. तेथील लोक म्हणत होते की, पूर्वीचे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच सरकार बरे होते. ते आम्हा गोरगरिबांना कमी भावाने गहू, तांदूळ देत होते. आता नवीन सरकारला आमच्याकडे येऊ द्या. आम्ही त्यांना दाखवून देतो. अशा प्रकारची भावना आज संपूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर....

राज्यामध्ये निर्माण झाली आहे. आपल्याला वाईट वाटण्याचे कारण नाही. मी केवळ वस्तुस्थिती सांगितली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काँग्रेस सरकारने 1976 साली ॲनिमल प्रिझर्व्हेशन ॲक्ट तयार केला होता. भारतीय घटनेतील तरतुदीप्रमाणे गायीची हत्या करायची नाही अशा पध्दतीचा कायदा 1976 साली काँग्रेस सरकारने केला होता. भाजप-शिवसेना मागे एकदा सन 1995 मध्ये सत्तेवर आले होते. त्यांनी कायदा अमेंड केला आणि अमेंड करून गायींबरोबर बाकीच्यांची, बैलांची हत्या करायची नाही म्हणजे गोवंश हत्या करायची नाही असे त्यामध्ये घातले. त्यामुळे राज्यातील बीफ खाणाऱ्या लोकांचा फार मोठा प्रॉब्लेम निर्माण झाला. (अडथळा) त्यामुळेच कायदा व सुव्यवस्था बिघडली. बीफ खाणाऱ्यांवर फार मोठा परिणाम झाला आणि यामुळे राज्यातील 30 ते 40 टक्के जनता आता यांना पाण्यात बघत आहे, यांना लवकर घरी घालविले पाहिजे अशी भावना जनतेमध्ये आज निर्माण झाली आहे. त्यामुळे लोकांसाठी वेलफेअर मेजर घेण्याऐवजी असे काम करण्यात आले. बीफ खायचे बंद केले, बीफ खायचे नाही अशी आर्डर दिली.

सभापती महोदय, बीफ हे काही लोकांचे फूड आहे. जसे चावल-रोटी काही लोकांचे फूड असते तसे बीफ हे काही लोकांचे फूड आहे. याचा अर्थ असा आहे की, भारतीय घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाऱ्यांना सुध्दा तुम्ही राज्यात बंदी घालत आहात. आपल्या वागण्याचा असा अर्थ होतो. त्यामुळे सर्व बाबी आहेत. सदर प्रस्तावामध्ये आणखी सुध्दा काही मुद्दे आहेत. आपण ते वाचलेले नाहीत. त्यामध्ये भ्रष्टाचाराचा सुध्दा मुद्दा आहे. काल सदनात या संदर्भात फार चांगली चर्चा झाली. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी खूप जोरात हा विषय मांडला आणि चारी मुंड्या साफ करून टाकले, एवढे त्यांनी पुरावे सभागृहामध्ये माननीय सभापतींना दिले. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सुध्दा चांगले भाषण केले. मुंबईत एक शब्द वापरला जातो, परंतु तो मी वापरू इच्छित नाही, मुंबईमध्ये वाट लावली असे म्हणतात. तो शब्द मी वापरत नाही. (अडथळा) भ्रष्टाचाराच्या संदर्भात शेवटी माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण झाले.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ आर्डर आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, सभागृहात ऑन पाईट ऑफ ऑर्डर उभे राहत असताना कोणत्या नियमान्वये तुम्ही पॉईंट ऑफ आर्डर आहे हे सांगितले पाहिजे, आपण ते विचारून घ्यावे. सन्माननीय सदस्यांना नुसते बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्य कोणत्या नियमान्वये पॉईंट ऑफ ऑर्डर रेज करीत आहेत ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या भाषणात व्यत्यय आणत नाही. सन्माननीय सदस्यांनी मघाशी म्हटले की, चारी मुंडे चीत झाले, त्यांनी मुंड्या म्हणावे, मुंडे म्हणणे हे बरोबर दिसत नाही. कारण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे आडनाव श्री. मुंडे हे आहे. (गोंधळ)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी भाषण सुरू ठेवावे. इतर सन्माननीय सदस्यांनी आपापसांत बोलू नये.

प्रा. जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे साहेबांच्या भाषणाला उत्तर देताना रेट कॉंट्रॅक्टच्या संदर्भात उल्लेख केला. टेंडर दिले नाही. (अडथळा) भ्रष्टाचार हा विषय देखील या प्रस्तावामध्ये आहे. आपण व्यवस्थित वाचावे. मनपाचाच नाही तर संपूर्ण राज्यातील भ्रष्टाचार आहे. सत्ताधारी पक्षाने स्वतःची लक्तरे तोडून घेण्यासाठी तयार असले पाहिजे. विरोधी पक्षाचे ते काम आहे आणि आम्ही ते करीत आहोत. तुम्ही ते ऐकून घेतले पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित केला होता, त्याचे उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी शक्कल लढविली. कॉमन शब्दप्रयोग आहे. आघाडी सरकार होते, तेव्हा रेट कॉंट्रॅक्टची कल्पना त्यावेळी सुरू झाली होती. 10 लाख रूपयांपेक्षा कमी रक्कम असेल आणि त्याचे रेट कॉंट्रक्ट द्यायचे असेल तर रेट कॉंट्रॅक्टचे ॲप्रूव्हल करून घेतले जाते. ते रेट कॉंट्रॅक्ट जीएडीकडून ॲप्रूव्ह करून घेतले. आता आपण काय केले ? आम्ही सुध्दा तेच केले. आघाडी सरकारने जीएडीकडून ते रेट कॉंट्रॅक्ट ॲप्रूव्ह करून घेतले होते, ते तुम्ही पुढे केले आहे. कोणाला उल्लू बनवित आहात, तुम्ही सत्तेत कसे आहात ? भ्रष्टाचार निर्मूलन करणे हे तुमचे निवडणुकीच्या वेळी दिलेले प्रॉमिस होते. निवडणुकीच्या वेळी आम्ही भ्रष्टाचारी आहोत असे लोकांना वाटले असेल म्हणून तुम्हाला निवडून दिले. आम्ही यासाठी इकडे बसलो, आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

तुम्ही तेथे आला आहात. तुम्ही भ्रष्टचाराच्या संदर्भात जे काही लूपहोल्स आहेत ते मिटविले पाहिजेत. तुम्ही म्हणता की, जीएडीची ऑर्डर आहे. जीएडी ही काय इंटरनॅशनल ॲथोरिटि आहे का ? जीएडी हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या हाताखालील एक खाते आहे. माननीय मुख्यमंत्री एका मिनिटात आदेश देऊ रेट कॉट्रॅक्टची पध्दत बंद करू शकतात. आम्ही ते सुरू केले, आम्ही भ्रष्टाचारी होतो का, पण तुम्ही का सुरू ठेवले ? तुम्हाला तो भ्रष्टाचार पुढे सुरू ठेवायचा आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या संदर्भात काल पुरावे दिले आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी ते सिध्द केले. काल या सभागृहात सिध्द झाले आहे. विरोधी पक्षाचा माननीय मुख्यमंत्र्यांवर हा हल्लाबोल झाल्यानंतर त्यांना येथे काहीही करता आले नाही. माननीय मुख्यमंत्री फार चांगले आहेत. He is a very intelligent person. त्यांचे ओरेटर म्हणून फार मोठे, चांगले स्किल आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर इंडिया टूडे या मॅग्झिनमध्ये त्यांची माहिती आली होती. मी सांगू इच्छितो की, त्यांची मेमरी फार स्ट्रॉंग आहे. हिंदी फिचरमधील 200 गाणी त्यांना तोंडपाठ आहेत, ते सांगू शकतात, अशी माहिती इंडिया टूडे या मॅग्झिनमध्ये आली होती. आम्हाला त्यांच्या कॅलिबरबद्दल, क्षमतेबद्दल बिलकूल शंका नाही. मात्र ते काही करून दाखवित नाहीत, त्यामुळे प्रोब्लेम तयार झाला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडून आल्यानंतर आजपर्यंत जर काही महत्त्वाचे कॉंट्रिब्यूशन दिले असेल तर ते म्हणजे आश्वासन. आश्वासनावर आश्वासन, त्यांनी आश्वासनांचा पाऊस पाडला. त्यांनी जाहीर केले होती की, जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात औरंगाबादमध्ये कृत्रिम पाऊस पाडण्यात येईल. कुठे पडला आहे पाऊस ? नैसर्गिक पाऊसही पडला नाही. आश्वासनांचा पाऊस पाडण्याशिवाय माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा तुमच्या सरकारने आजपर्यंत काहीही केलेले नाही. तुम्ही काही करायला गेलात तरी इकडे शिवसेनेवाले बसलेले आहेत. श्री. उद्ध्व ठाकरे यांनी स्वतःच्या फोटोंचे प्रदर्शन लावले आणि त्यामध्ये जे पैसे जमले ते आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी दिले. याचा अर्थ सरकारमध्ये जरी ते पार्टनर असले तरी सुध्दा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार कुचकामी ठरले आहे, हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

श्री. उद्ध्व ठाकरे यांनी मान्य केले आहे. अशाप्रकारे हे चाललेले हे सरकार आहे.

सभापती महोदय, सांगलीमध्ये माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांचे भाषण झाले, त्यांनी एवढा मोठा स्कॅथिंग ॲटॅक केला की, आम्हाला काही बोलण्याची गरज नाही. पण यांना त्याचे काही वाटतच नाही. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी पोलीस यंत्रणेच्या संदर्भात, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात भाजपच्या सरकारला फाडून काढले. तुम्ही काय बोलू शकता का ? मघापासून मी ओरडत होतो. आता काही तरी बोला, आता बोलू शकत नाही. तुम्ही उत्तर काय देणार ? याचे उत्तर देणे फार अवघड आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदुरकर.....

माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी कायदा व सुव्यवस्था राखणे, ही सरकारची जबाबदारी आहे, अशा प्रकारचा एवढा जोरदार ॲटॅक केला की त्याची चर्चा संबंध महाराष्ट्रात आणि निरानिराळ्या वाहिन्यांवर होऊ लागली आहे. मंत्री महोदयांनी मुख्यमंत्री महोदयांवर टीका केली. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये राजकारण आणण्याची गरज नाही. परंतु, त्या चर्चेमध्ये एक गोष्ट सिध्द झाली किंवा उघड झाली, असे आपण म्हणू की, मुख्यमंत्री महोदयांकडे विविध अनेक विभागांचा कार्यभार आहे व त्यामुळे त्यांना गृह विभागाकडे लक्ष देण्यास बिलकूल वेळ नाही. अशी चर्चा झाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळे वातावरण तयार झाले आहे.

सभापती महोदय, शिवसेनेचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी यापूर्वीच भाषण केले आहे. आपण असे म्हणाल की, आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य आहोत, आम्ही सरकारविरुध्दच बोलणार. पण सत्तारूढ पक्षाचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी असा मुद्दा मांडला की, राज्यात डान्स बार पुन्हा सुरु झाले आहेत. डान्स बार समोर पोलिसांची व्हॅन उभी असते. त्यामुळे जेव्हा डान्स बार समोर पोलिसांची व्हॅन उभी असते त्यावेळी तो डान्स बार सुरु असतो, असे ओळखावे, असेही त्यांनी सांगितले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी असा मुद्दा मांडला की, गृह मंत्री महोदयांनी दिलेले आदेश खाली, पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचलेच नाहीत. मग सभागृहात होणाऱ्या चर्चा जर आपण थट्टा समजत असाल तर सरकार चालविण्याची लायकी तुमच्यामध्ये नाही, हेच सिध्द होते. अशा प्रकारे हे सरकार चालले आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या डोक्यामध्ये रिफॉर्मच्या, जलद प्रशासनाच्या, जलद डिसिजन ऑफ जस्टिसच्या काही नवीन कल्पना असतील आणि त्यादृष्टीने त्यांनी काही निर्णय घेतले आहेत. मंत्रालयातील नगर विकास विभागामध्ये कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येईल, असाही एक निर्णय त्यांनी घेतला आहे. कर्मचाऱ्यांची भरती करण्यासंबंधी भारतीय संविधानामध्ये तरतूद आहे. ही भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत झाली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदुरकर.....

(अडथळा....) आपण जरा वाचा, आपण वाचत नाही म्हणून प्रॉब्लेम आहे. या प्रस्तावामध्ये हा विषय देखील आहे.

सभापती महोदय, लोकांसमोर असा प्रश्न तयार झाला आहे की, या सरकारचा भारतीय संविधानावर विश्वास आहे की नाही ? या सरकारचा विध्वास नाही, अशी शंका जनतेच्या मनामध्ये आहे व त्याचे कन्फर्मेशन अशा प्रकारे निर्णय घेऊन या सरकारने दिलेले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याचा खुलासा उत्तरातून झाला पाहिजे. अन्यथा, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे "आंधळ दळतयं आणि कुत्र पीठ खातयं", अशी अवस्था होईल. अशा प्रकारे सरकार चालत नाही.

सभापती महोदय, या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोणतेही राज्य असो, कोणताही देश असो, त्या देशाची किंवा राज्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित असेल, चांगल्या पध्दतीची असेल तर त्या देशामधील उद्योग, व्यवसाय, सामाजिक परिस्थिती चांगली आहे, असे समजले जाते. यासाठी कायदा व सुव्यवस्था सुदृढ असणे फार महत्वाचे आहे.

सभापती महोदय, या राज्याचे युवा मुख्यमंत्री राज्यात चांगली गुंतवणूक व्हावी आणि त्या माध्यमातून राज्यातील युवकांना, महिलांना मोठ्या संख्येने रोजगार मिळावा, यासाठी प्रयत्न करीत आहेत. परंतु, हा प्रयत्न करीत असताना गुंतवणूक करु इच्छिणाऱ्या गुंतवणुकदारांना, उद्योगपतींना, व्यावसायिकांना राज्यात खरोखरच कायदा व सुव्यवस्थेची स्थिती आहे का, असा प्रश्न पडला तर त्यांच्या प्रयत्नांना यश येणार नाही. मी हे यासाठी सांगतो आहे की, नॅशनल क्राईम रेकॉर्ड बोर्डाने जून महिन्यामध्ये गुन्ह्यांसंबंधी आकडेवारी प्रसिध्द केली आहे. केवळ पाच ते सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये 1585 बलात्काराच्या, 5250 विनयभंगाच्या, 2394 अपहरणाच्या घटना घडलेल्या आहेत. ज्यावेळी आम्ही वर्तमानपत्र वाचत असतो, वृत्त वाहिन्या बघत असतो त्यावेळी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या ज्या बातम्या आमच्या समोर येतात त्या अतिशय गंभीर स्वरुपाच्या आहेत.

सभापती महोदय, मुंबईमधील एक बातमी प्रसिध्द झाली आहे. प्रत्येक महिन्याला साधारणपणे 800 ते 850 लोक बेपत्ता आहेत. यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी डान्स बार संबंधीचा मुद्दा मांडला आहे. पोलिसांच्या रंगेल पार्ट्या, विषारी दारु हत्याकांड हा विषय देखील झाला आहे. पुण्यामध्ये एका रात्रीत 80 वाहने जाळून टाकण्यात आली. चेंबुर परिसरात ड्रोनव्दारा छायाचित्रे काढण्यात आली. ही छायाचित्रे कोणी काढली, कशाकरिता काढली, त्याचा वापर कशासाठी करण्यात येणार आहे, असा सर्व हा गंभीर विषय आहे. हे सर्व घडत असताना पोलीस यंत्रणा काय करीत होती ? नोकरीचे अमिश दाखवून अनेक बेरोजगारांना फसविण्यात आले आहे. अपहरणाच्या बाबतीत तर लहान मुलींना सुध्दा सोडलेले नाही. 5 ते 8 वयोवर्षाच्या मुली गायब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंतराव जाधव.....

आहेत. नाशिकमध्ये घोलप नावाचा अभियांत्रिकी महाविद्यालयातील युवक किराणा दुकानात काही वस्तू आणण्यासाठी जातो आणि आजतागायत त्याचा पत्ता लागत नाही. मागील अधिवेशनात देखील मी हा मुद्दा उपस्थित केला होता.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

मग प्रश्न असा निर्माण होतो की, खरोखर पोलिसांचा वचक राहिलेला आहे काय ? आपण महामार्गावर जाऊन बघावे. महामार्गावरील ढाब्यांवर राजरोसपणे दारु विकली जाते. कोणाचेही बंधन नाही, घाबरणाचे कारण नाही. एखादा हवालदार, फौजदार आला तर हॉटेलचा वेटर त्याच्याकडे जाऊन त्याच्या हातात पुडी देतो. मग गाड्या पुढे निघून जातात. महिला डॉक्टर असो, पुरुष असो त्यांना शिविगाळ दमदाटी करण्याचा प्रयत्न होतो. राज्यातील दलितांवरील अत्याचाराच्या घटना आपण बघितलेल्याच आहेत. मंत्र्यामंत्र्यांमधील आरोपांच्या विषयावर मी बोलणार नाही. आमच्या प्रांताध्यक्षांनी गोरेगावचा विषय मांडलेला आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. ज्या पद्धतीने बनावट दारु विकली जाते त्याच पद्धतीने बनावट शितपेय सुद्धा विकली जातात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेवर सकाळी सभागृहात चर्चा झाली. जो किरकोळ गुटखा विक्री करणारा होता त्याला पकडण्यात आले. मग त्या कर्तव्य दक्ष पोलीस अधिकाऱ्याला त्याच्या गळ्यातील माळ घालून धिंडवडे काढण्याची भावना निर्माण झाली तर ? आजही राज्यात गुटखा तयार केला जातो. मग गुटखा बनविणाऱ्या कारखान्यांवर कधी धाडी पडल्या काय ? मंत्री महोदय आपण मंत्रालयाच्या परिसरामध्ये गेला तरी त्या ठिकाणी सहजपणे गुटखा मिळतो. जो उत्पादक आहे, कारखानदार आहे त्या कारखानदारांवर आपण कोणते अंकुष आणले ? कोणतेच नाही ?

सभापती महोदय, यातून दूध देखील सुटलेले नाही. मुंबई शहरात दूध भेसळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. आज महिला, सर्वसामान्य जनता सुरक्षित नसताना पोलीस देखील सुरक्षित आहेत की नाहीत, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण, राज्यात महिला कॉन्स्टेबललाच पेटवून देण्याचा प्रयत्न झालेला आहे. का ? तर लाचखोरी वाढलेली आहे. सर्वसामान्य माणसाला पासपोर्ट काढावयाचा असला तरी त्याला स्थानिक लोकप्रतिनिधीला बरोबर घेऊन पोलीस स्टेशनमध्ये जावे लागते. का ? तर हे घे आणि दे काही तरी. पासपोर्ट देण्यापूर्वी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

संबंधित व्यक्तीची चौकशी करावयाची असते. परंतु, पोलीस स्टेशनमधून निरोप जातो आणि ते सांगतात की, आता प्रा.कवाडे सरांचा पासपोर्ट तयार करावयाचा आहे. म्हणून आपण माहिती देण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये यावे. त्यामध्ये असे अभिप्रेत आहे की, पासपोर्ट देण्यासाठी संबंधित व्यक्ती योग्य आहे किंवा नाही, याबाबत ती व्यक्ती जेथे राहते तेथील शेजाऱ्यांना विचारणा केली पाहिजे. परंतु, शे-पाचशे रुपयांसाठी भ्रष्टाचाराच्या डोंबाची सुरुवात झालेली आहे.

सभापती महोदय, वाळू माफियांबद्दल सभागृहात चर्चा झालेली आहे. जुन्नर येथे वाळू माफिया आणि स्थानिक ग्रामस्थांमध्येच मारामारी झाली. मग प्रश्न असा निर्माण होतो की, जी महिला पोलीस समाजाची सक्षणकर्ती आहे ती सुरक्षित आहे काय ? ती सुरक्षित नाही ? या समाजाचा चौथा स्तंभ म्हणून ज्या पत्रकारीतेकडे बघितले जाते ती पत्रकारीता सुरक्षित आहे काय ? आज पत्रकार सुद्धा सुरक्षित नाहीत. का ? तर डान्सबारची बातमी छापली म्हणून पत्रकारांना मारहाण केली जाते. जाळून टाकण्यात आले. श्री.दुबे नावाचे पत्रकार होते. एक महिला पत्रकार बातमी घेण्यासाठी गेली असता काही युवक तिच्या तोंडात मारतात. आम्हाला आता लाज वाटायला लागली आहे. कोठे चाललो आहेत आपण ? मग जर पोलीस सुरक्षित नाहीत, पत्रकार सुरक्षित नाहीत, सर्वसामान्यांच्या हक्कासाठी आमचा शेतकरी रस्त्यावर उतरला तर त्याला लाठीचा प्रसाद मिळतो. (...अडथळा...) माननीय मंत्री.....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे भाषण सुरु असताना मंत्री महोदय बसून बोलतात, हे सभागृहाच्या प्रथा, परंपरेला धरुन नाही.

तालिका सभापती : मंत्री महोदयांनी बसून बोलू नये.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, आम्हाला राजकीय दृष्ट्या टिकात्मक बोलावयाचे नाही. सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आशेने, विश्वासाने जनतेने तुम्हाला समोरच्या बाकांवर बसविले आहे. तुम्हाला समोरच्या बाकांवर का बसविले ? तुम्ही जनतेला भरमसाठ आश्वासने दिलेली आहेत. स्वप्नरंजक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

झाले होते. या ठिकाणची संपूर्ण यंत्रणा असेल, लोकांच्या खात्यात 15-15 लाख रुपये जमा होणार होते. मी हे बोलणार नव्हतो. आपण कृपा करुन मला माझ्या भाषणात राजकारण आणायला लावू नका. मला राजकीय बोलण्याची इच्छाही नाही आणि जर मला कोणी बोट लावत असेल तर माझी ती सुद्धा तयारी आहे.

सभापती महोदय, सभागृहातील एका सन्माननीय सदस्यांची धुळे येथे गोल्ड रिफायनरी आहे. दिवसाढवळ्या करोडो रुपयांचा माल लुटला जातो. परंतु, अद्याप चोरांचा थांगपत्ता लागत नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी हरसूल येथील दंगलीचा विषय मांडला. आजही त्या गावातील हिंदू, मुस्लिम गुण्यागोविंदाने राहत आहेत. तो भाग माझ्या जिल्ह्यात येतो. तेथे माझे काही हिंदू, मुस्लिम मित्र आहेत. ज्या गावात लूट झाली, वाहने जाळण्यात आली त्या संबंधित गावातील ती तेढ नव्हती. ती जी तेढ निर्माण करण्यात आली. ते कोणत्या राज्यातून आले, का आले होते, ते कोणाच्या निर्देशानुसार आले होते, ती दंगल कशी घडवून आणण्यात आली आणि गोरगरिबांच्या संसाराची राखरांगोळी कशी करण्यात आली, याचे सुद्धा आपल्याला उत्तर द्यावे लागणार आहे. मी विरोधक म्हणून आपल्याकडे हे उत्तर मागत नाही. परंतु, बाहेरच्या राज्यातून येऊन गुण्यागोविंदाने राहत असणाऱ्या आमच्या हिंदू, मुस्लिम बांधवांमध्ये कोणी तेढ निर्माण करुन स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्यांना आपण क्षमा करु नका. त्या ठिकाणी आमचा एक आदिवासी बांधव मृत्यूमुखी पडला. मुख्यमंत्री, पालकमंत्री तातडीने त्या ठिकाणी मदत जाहीर करतात. आता ही घटना घडून किती दिवस झाले ? त्या आदिवासी बांधवाच्या जीवावर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. तो मुलगा मरण पावला. आजही त्या परिसरातील लोक आशेने बघत आहेत की, शासन आपल्याला काही तरी देईन. परंतु, आपण अपयशी झालेलो आहोत. मंत्री महोदय, ही टिका समजू नका. तुम्ही या सूचना समजा आणि या सुचनांच्या माध्यमातून आम्ही ज्या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे, त्यातून जर आपल्याला काही निष्पन्न करता आले, त्यातून काही सुधारणा करता आल्या आणि राज्यातील कायदा व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

सुव्यवस्था यशस्वी करता आली तर त्याचा आपल्याच फायदा होणार आहे. मग तो राजकीय फायदा असो किंवा इतर कोणताही असो. कारण, हे सर्व करीत असताना कोणाची तरी दुवा आपल्याला मिळणार आहे.

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या बाबतीत सर्वांनी सांगितले आहे की, मुख्यमंत्री युवक आहेत, त्यांच्याकडे गृह खाते आहे, या पार्श्वभूमीवर मला अशी शंका येते की, मुख्यमंत्री महोदयांच्या मुख्यमंत्री पदाखाली राज्याचा गृहमंत्री कोठे तरी दडपला गेला आहे काय ? गृहमंत्री, मुख्यमंत्री यांच्या कक्षेतून बाहेर पडणार आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री महोदय पुजेसाठी बाहेर ताटकळत उभे होते. ही केवढी मोठी सहिष्णुता आहे. परदेशात जात असताना एका अधिकाऱ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री महोदयांना तासभर विमानात खोळंबून बसावे लागले होते. त्याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री महोदयांना द्यावे लागले. कोणाचा पासपोर्ट राहतो म्हणून मुख्यमंत्री तासभर विमानात खोळंबतात, जिल्हाधिकारी सांगतात म्हणून मुख्यमंत्री महोदयांच्या पत्नी मंदिरात व मुख्यमंत्री बाहेर हे असे बरोबर नाही.

सभापती महोदय, असा विषय असेल किंवा नसेलही, परंतु एक लक्षात घेणे आवश्यक आहे की, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य पुन्हा पुन्हा सांगत आहेत की, या ठिकाणी मंत्री महोदय बसले आहेत ते कोणत्याही पक्षाचे असले तरी जनतेकरिता व आमच्याकरिता तुम्ही मंत्रीच आहात. माननीय डॉ.रणजित पाटील व माननीय श्री.प्रवीण पोटे-पाटील हे आमच्या सभागृहाचे सदस्य मंत्री झाले आहेत, त्यामुळे आम्हाला अभिमान वाटतो. आपल्या सभागृहातील एका सहकाऱ्याला मंत्री पदाची संधी मिळते. मंत्री पदाची जेव्हा संधी मिळते तेव्हा त्यांना अधिकार मिळतात काय ? प्रशासन त्यांचे ऐकते काय ? याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी अतिशय नम्रपणे सांगतो की, मला या ठिकाणी कोणाचीही अवहेलना करायची नाही. मला कोणावर टीका करायची नाही. माझ्या नाशिक शहरातील श्री.युवराज पाटील पोलीस कॉन्स्टेबल यांनी गुन्हांच्या चांगला तपास केला म्हणून त्यांना 250 अवॉर्ड मिळाले आहेत, डॉ.रणजित पाटील गृह राज्यमंत्री झाल्यावर नागपूरच्या अधिवेशनात मी त्यांना एक पत्र दिले होते. अधिवेशन संपल्यानंतर दुसरे स्मरणपत्र दिले. तिसरे व चौथे स्मरणपत्र दिले आहे. मी मंत्री महोदयांना सांगितले की, मी आता स्मरणपत्र देणार नाही, या विषयाबाबत आपण कार्यवाही करावी. पोलीस अधिकाऱ्यामध्ये वाद आहेत, पोलीस कॉन्स्टेबल श्री.युवराज पाटील हे माझे जुने मित्र आहेत, त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने नाशिक शहरात काम केले आहे. त्यांच्या कामामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव...

तत्कालीन गृहमंत्री कै.आर.आर.पाटील, पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त या सर्वांनी श्री.युवराज पाटील पोलीस कॉन्स्टेबल यांना चांगल्या कामाबाबत 250 अवॉर्ड दिले आहेत. परंतु दोन स्थानिक अधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाल्यामुळे पोलीस कॉन्स्टेबल यांची बदली हिंगोली येथे करण्यात आली. त्याच्या संदर्भात असा रिपोर्ट तयार करण्यात आला आहे की, पोलीस कॉन्स्टेबल यांचे गुन्हेगारांशी संबंध आहेत. 250 अवॉर्ड मिळविणाऱ्या हवालदाराचे गुन्हेगाराशी संबंध होते काय ? जर गुन्हेगाराशी संबंध होते तर 250 अवॉर्ड देतांना पोलीस यंत्रणा झोपली होती काय ? एकीकडे आम्ही असे म्हणतो की, पोलिसांची नैतिकता वाढली पाहिजे. मागील काळात अनेक एन्काऊंटर झाले आहेत. विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे व मी एका पोलीस अधिकाऱ्यांना भेटावयास गेलो होतो, मुंडे साहेबांनी एक विषय त्यांना सांगितला, त्यावेळी त्या पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, अभी कोई झंझट हमारे सरपर मत रखो, आम्ही आता हे रिकामे उद्योग करण्यास तयार नाहीत. आम्ही का सर्वांना उत्तरे द्यावीत, आम्ही चांगले काम करुन देखील आम्हाला आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे राहावे लागते. आज पुरुष व महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी 12 ते 14 तास रस्त्यावर उभे राहत आहेत, तुम्ही जेवण केले काय असे त्यांना विचारले जाते काय ? तुम्हाला डबा आला होता काय, आपण कोठे राहता, 14 तास ड्युटी केल्यावर त्याचे घर किती लांब आहे, याचा कोणी विचार करतो काय ? यामुळे या फंदात पडायला आम्ही तयार नाही, अशा पध्दतीची मानसिकता पोलिसांची होते, तेव्हा आमच्या सारख्या सर्वसामान्य समाजकारण करणाऱ्या कार्यकर्त्यांसमोर प्रश्न निर्माण होतो. आता पोलीस अशा पध्दतीने हतबल झाले असतील तर सर्व सामान्य जनतेला पोलीस काय न्याय देतील. आम्ही फक्त कौतुकाची थाप देतो, अमुक अमुक घटनेमध्ये पोलिसांनी अतिशय चांगल्या पध्दतीची यंत्रणा राबविली आणि चांगल्या पध्दतीने परिस्थिती हाताळली.

सभापती महोदय, प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात, अनेक पोलीस अधिकारी चांगले आहेत, त्यांचे संरक्षण झाले पाहिजे. अनेक अधिकारी वाईट देखील आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. दुर्दैवाने शासनकर्ते अनेक वेळा फक्त होय चे बहुमत, होय चे बहुमत म्हणून अनेक विषय पारीत करतात, त्या पारीत केलेल्या विषयामुळे आपल्या लक्षात येत नाही की, आपण कोणते अधिकार आपणाकडे ठेवतो व कोणते अधिकार समोरच्या व्यक्तीकडे देतो. त्यामुळे असे काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव...

अधिकारी आपणाला जुमानत नाहीत. आपण शासनकर्ते आहोत, जनतेचे विश्वस्त आहोत, जनतेने आपणाला विश्वस्त म्हणून येथे पाठविले आहे. त्यावेळी राज्यकर्त्यांनी या यंत्रणेकडून चांगली कामे करुन घेणे अपेक्षित असते. चांगली कामे करुन घेताना प्रशासनावर अंकुश ठेवला पाहिजे, हा अंकुश आपण आज गमावून बसलो आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड जनार्दन चांदूरकर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांनी 12 डिसेंबर रोजी आर्थिक गुन्हेगारी संदर्भात उत्तर दिले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, एनपीआयडी नुसार आम्ही कठोर पावले उचलू. कठोर पावले उचलताना ज्यांचा आर्थिक गुन्हेगारीत सहभाग असेल, जे प्रमुख आरोपी असतील, त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यात येतील व सर्वसामान्य लोकांना आम्ही न्याय देऊ. मला अतिशय नम्रपणे सांगायचे आहे की, मुख्यमंत्री महोदय याबाबत कारवाई करीत असतील. मला खात्री आहे की, या राज्याला खरोखर चांगला मुख्यमंत्री मिळाला आहे.

सभापती महोदय, नाशिक शहरात इमू घोटाळा झाला, त्याची चौकशी करण्यासाठी एसपी स्तरावरील अधिकाऱ्याची घोषणा करण्यात आली. परंतु चौकशी करण्यासाठी कोणताही अधिकारी अद्याप आलेला नाही. इमूच्या घोटाळ्यानंतर विकल्प घोटाळा आला, त्यामध्ये अनेक लोकांचे करोडे रुपये पाण्यासारखे वाहून गेले आहेत. त्यानंतर केबीसीचे प्रकरण संपूर्ण राज्यात गाजले, परभणी, बीड येथील लोकांनी नाशिकमध्ये पैसे गुंतविले. या अधिवेशनात अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले, त्याबाबत मंत्री महोदयांनी अशी उत्तरे दिली की, पुढील तपास सुरु आहे, त्यावर कारवाई का झाली नाही, तर तपास सुरु असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही. आता कोठे तरी आपण बदलले पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी कडकपणे केली पाहिजे. मी मागे देखील सांगितले होते की, अजय देवगण एका सिनेमात असे सांगतो की, पोलीस यंत्रणेने ठरविले तर राज्यातील व देशातील कोणत्याही मंदिराच्या बाहेरील चप्पल उचलण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. त्या पोलीस स्टेशनच्या अखत्यारित असे उद्योग होत असतील तर मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, पोलीस स्टेशनच्या अखत्यारित आर्थिक गुन्ह्यांची जेव्हा सुरुवात होते त्याची जबाबदारी स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याकडे दिली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या नंतर श्री.भोगले...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

त्या स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याला जर जबाबदार धरले पाहिजे. त्याला माहीत असते की, मटक्याचा अड्डा कुठे सुरु आहे, दोन नंबरचे धंदे कुठे सुरु आहेत, दारु कुठे गाळली जाते याची त्यांना पूर्ण माहिती असते. जर मी कर्तव्यात कसूर केली तर माझी नोकरी जाईल हा धाक त्याच्या मनामध्ये शासनाने निर्माण केला तर हे अवैध धंदे ताबडतोब बंद होतील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या प्रस्तावाकरिता किती वेळ देण्यात आला आहे? कामकाजाची वेळ निश्चित केली आहे काय? अजून शासकीय विधेयके चर्चेला यावयाची आहेत.

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : या प्रस्तावावरील चर्चेसाठी 2 तास 40 मिनिटे इतका वेळ दिलेला आहे. 4.45 वाजेपर्यंत ही चर्चा पूर्ण करावयाची होती. आवश्यकता भासल्यास वेळ वाढवावा लागेल. माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी अंमली पदार्थाच्या विषयाकडे गांभीर्याने सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. अंमली पदार्थाच्या प्रकरणाची गती एवढी संथ आहे की, 24 वर्षात केवळ 313 आरोपींना शिक्षा झालेली आहे. असे का झाले असावे? याचा गांभीर्याने विचार केला असता असे दिसून आले की, ज्यावेळी पोलीस यंत्रणेची काळजी घेतली जाते त्याच यंत्रणेतील काही भाग अंमली पदार्थाच्या कुटील कारस्थानामध्ये सहभागी झालेले असतात. कोण बेबी पाटणकर? कुठल्या तरी झोपडपट्टीत रहात होती. तिचा संबंध पोलीस अधिकाऱ्याशी आल्यानंतर त्या पोलीस अधिकाऱ्याने तिच्याशी संगनमत केले. पोलीस अधिकाऱ्याच्या ड्रॉवरमध्ये अंमली पदार्थासारखी वस्तू सापडली. पोलीस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर असलेला दारुचा अड्डा यांना दिसत नाही. परंतु पोलीस स्टेशनच्या टेबलातील ड्रॉवरमध्ये अंमली पदार्थ सापडतात हे तेथील स्थानिक अधिकाऱ्यांना दिसत नाही. शासनाकडून संबंधित अधिकाऱ्याची त्या पोलीस स्टेशनमधून दुसऱ्या ठिकाणी बदली करण्याची कारवाई केली जाते.

सभापती महोदय, आज आपल्या देशातील युवा पिढीला एम.डी.टॅबलेटचा सर्वात मोठा धोका आहे. मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना हात जोडून कळकळीची विनंती केली होती की, मला तुमची मदत पाहिजे, नाशिक शहरामध्ये तुमची उपस्थिती आवश्यक आहे. आम्ही ठरविले होते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

आणि त्यांनी सुध्दा मान्यता दिली होती. आम्ही दोघे दुचाकीवरुन नाशिक शहरामध्ये फिरुन वस्तुस्थितीची पाहणी करणार होतो. एम.डी.नावाच्या टॅबलेटचा विळखा मुंबईपुरता मर्यादित राहिलेला नाही. जळगावमधून त्याचा पुरवठा व्हायचा. नाशिकमधील फक्त कॉलेज नव्हे तर शाळांमधील लहान लहान मुलांना याचे व्यसन जडविण्याचा प्रयत्न काही ठराविक कंपन्या करीत आहेत. या बाबीकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. या देशाच्या युवा पिढीला उद्ध्वस्त होण्यापासून वाचवायचे असेल तर वेळीच पावले उचलली पाहिजेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी नागपूरच्या अधिवेशनात सांगितले होते की, आम्ही कठोर कारवाई करीत आहोत. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे स्पष्ट दिसत असताना किती शाळा आणि कॉलेजच्या बाहेर धाडी घातल्या, गस्त घातली किंवा कोम्बिंग ऑपरेशन करुन पडताळणी केली? या गोष्टीला पायबंद घालण्यासाठी काहीही केल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, पोलीस खात्याने चार गोष्टी कमी केल्या तरी आम्ही तुम्हाला माफी देऊ. परंतु या अंमली पदार्थाच्या दृष्टीने कडक कारवाईचे धोरण राबविले पाहिजे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना हात जोडून कळकळीची विनंती आहे की, एमडी टॅबलेटच्या संदर्भात गांभीर्याने पावले उचलावीत. अन्यथा उद्याची पिढी तुम्हाला माफ करणार नाही. मग सत्तेत तुम्ही असाल किंवा आम्ही असू. सभापती महोदय, दारुच्या संदर्भात एक तांत्रिक गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. शासनाने देशी दारुवरील उत्पादन शुल्कामध्ये 200 टक्के वाढ केली. शासनाला महसूल वाढविण्याचा हक्क आहे. वाढीव महसुलातून विकासाची लोकोपयोगी कामे झाली पाहिजेत. या देशात आणि राज्यात देशी दारुप्रमाणे विदेशी दारु सुध्दा विकली जाते. प्रामुख्याने देशी दारु सेवन करणारा कामगार वर्ग आहे. मी या देशी दारुच्या किंमतीबाबतची माहिती घेतली. हा विषय थोडा हास्यास्पद वाटू शकतो. परंतु देशी दारुवरील कर 200 टक्के वाढविल्यामुळे देशी दारुची विक्री रोडावली आहे. त्यामध्ये डाऊनफॉल आलेला आहे. म्हणजे देशी दारु सेवन करणाऱ्यांनी दारु पिणे सोडले का? तसे घडलेले नाही. त्यांनी दारु पिणे सोडलेले नाही. त्यांना देशी दारु पिणे परवडत नाही, त्यामुळे ते विषारी दारुकडे वळले आहेत. परिणामी विषारी दारु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

बनविणाऱ्यांचे पेव फुटले आहे. मोठया प्रमाणात विषारी दारु तयार केली जात आहे. या विषयाचा गांभीर्याने विचार करुन पायबंद घालणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, लाल फितीचा कारभार कसा असतो याचे एक उदाहरण देऊ इच्छितो. शेकडो लोकांचे प्राण वाचविण्याचे काम पोलीस दलातील श्वानांकडून केले जाते. पोलीस दलाला बॉम्बसदृश वस्तू ठेवल्याबाबतची माहिती मिळाली तर घटनास्थळी पोलीस दलाचे श्वान आणले जातात.

नंतर 2ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

श्वानांच्या मार्फत स्फोटके आहेत किंवा नाही याची खात्री केली जाते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, त्या श्वानांना जो खाद्य पुरवठा केला जातो त्या पुरवठादाराचे 11 लाख रूपयाचे बिल दिलेले नाही. त्या पुरवठादाराचे नाव मोहम्मद खान आहे. या पुरवठादाराने सांगितले की, 11 लाख रूपयाचे बिल झालेले आहे. मी सर्वसामान्य पुरवठादार आहे. आपणाकडून मला रूपये 11 लाख येणे आहे. आपण मला पैसे दिले नाहीत तर मी या श्वानांना खाद्य पुरवठा करू शकणार नाही. अशा पद्धतीने लाल फितीचा कारभार होत असेल तर ते चुकीचे आहे. शेकडो, लाखो लोकांचे प्राण वाचविणाऱ्याबद्दल आपल्याला सहानुभूती वाटत नसेल तर त्याला काहीच अर्थ नाही. आपण 11 लाख रूपये रिलीज कराल. परंतु, हे 11 लाख रूपये का थकले आहेत याची आपण गांभीर्याने माहिती घ्यावी. वाटल्यास, आपण संबंधितांवर कारवाई करू नका. पण भविष्यात असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी. हे श्वान रिटायर्ड होतात. त्या श्वानांनी प्रामाणिकपणे सेवा केलेली असते. पण नंतर नंतर त्यांची ससेहोलपट होते. त्यांच्याकडे बघायला कोणी नसते. त्यांचे ट्रेनर बदलले जातात. त्या ट्रेनरशी त्यांची अटॅचमेंट असते. त्यांच्यापासून ते दुरावले जातात. आपण जनावरांच्याबाबत देखील असंवेदनशील झालो आहोत का ? तेव्हा या कडे आपण अतिशय गांभीर्याने बघावे.

सभापती महोदय, विषय खूप आहेत. खूप बोलायचे आहे. पण आता मी माझ्या नाशिकचा विषय गांभीर्याने घेतो. नाशिकमध्ये आता कुंभमेळा होऊ घातला आहे. तो आमचा अशासाठी की आम्ही होस्ट आहोत आणि आपण गेस्ट आहात. त्यामुळे मी एक नाशिककर म्हणून आपणा सर्वांना कुंभमेळ्याचे निमंत्रण देखील देतो. परंतु, हे निमंत्रण देत असताना माझ्या मनामध्ये थोडी भीती आहे. नाशिकमध्ये जानेवारी ते मे या कालावधीत 29 खून झाले आहेत. 20 खुनाचे प्रकार, 14 बलात्कार, 3 दरोडे, 113 घरफोडी, 71 जबरी चोरी, इतर वाहनांच्या चोऱ्या, 47 विनय भंग, असे किती तरी गुन्ह्यांचे प्रकार घडलेले आहेत. यासंबंधी आम्ही खाजगीत चर्चा देखील करीत असतो. मी जबादारीने सांगत आहेत. माझ्याकडे कागदपत्र उपलब्ध आहेत. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव...

सभापती महोदय, नाशिकमध्ये पोलीस प्रशासनाचा गुंडांवर वचक राहिलेला आहे काय, असा प्रश्न आम्हाला पडत आहे. हा चेष्टेचा विषय नाही. एका झोपडपट्टीमध्ये सार्वजनिक शौचालयावरून वाद झाला. एक कुप्रसिद्ध गुंड मध्यवर्ती कारागृहातून बाहेर आला. सार्वजनिक शौचालयाजवळ काही तरी भानगड झाली. त्याने सुरा काढला आणि जागच्या जागी भोसकले. पत्रकारांनी पालकमंत्र्यांना विचारले की, हा प्रकर काय आहे ? पालक मंत्री म्हणाले की, आम्ही काय सार्वजनिक शौचालयावर आता बसायचे काय ? हा चेष्टेचा विषय नाही. हा विषय गांभीर्याचा अशासाठी आहे की, काल सेंट्रल जेलमधून सुटून आलेला एक आरोपी, गुंड हल्ला करतो. आमच्या नाशिकच्या सिद्धार्थ नगरमध्ये दिवसाढवळ्या कोणाला लग्न लावायचे असेल तर त्यासाठी त्या गुंडाने रेट ठरवून दिलेले आहेत. तेथे बारसे, वाढदिवस करायचे असेल तर त्या गुंडाला तेवढे पैसे द्यावे लागतात. त्या शिवाय तेथे कोणीही कार्यक्रम करू शकत नाही. अशी नाशिकची परिस्थिती आहे. नाशिकमध्ये दिवसाढवळ्या गरीब कामगाराला बाहेर काढून त्याच्या पत्नीवर अतिप्रसंग करण्याची हिंमत गुंडांमध्ये झाली आहे. त्याला चाप बसविणार आहात की नाही ? सोनसाखळी खेचण्याचे प्रकार किरकोळ झाले आहेत. भर दिवसा गुंड घरामध्ये शिरतो. नवऱ्याची गचांडी धरतो आणि त्याला बाहेर काढतो व तिच्यावर अतिप्रसंग करतो. हे कुठल्या कायदा व सुव्यवस्थेचे लक्षण आहे? एकीकडे आम्ही म्हणायचे की, आम्हाल आमचा कुंभमेळा निर्विघ्न पार पाडायचा आहे. लाखो-करोडो लोक आमच्या नाशिकमध्ये येणार आहेत. आमच्या गावातील नागरीक सुरक्षित नाही. आमच्या गावातील महिला सुरक्षित नाही. आमच्या गावातील आठ-आठ वर्षाच्या मुली सुरक्षित नाही. त्यामुळे कोणत्या तोंडाने मी आपणाला या आणि सहभागी व्हा असे सांगू. मी वारंवार माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, नाशिकसाठी आपण वेळ द्यावा. मी राज्यमंत्र्यांना देखील सांगितले. रस्त्यावरून चालणाऱ्या एका माणसाला दुचाकी वरून जाणाऱ्याला हटकले तरी त्यास बोलण्याची कोणाची हिंमत राहिलेली नाही.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ प्रस्तावावरील चर्चा संपे पर्यंत वाढविण्यात येत आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी शासनाला अतिशय गांभीर्याने विनंती करतो. नाशिक शहरामध्ये डीसीपी श्री.स्वामी, एसीपी श्री.राजपूत, एसीपी श्री.गणेश शिंदे, पोलीस इन्स्पेक्टर श्री.बाजीराव शिंदे या पोलीस अधिकाऱ्यांनी चांगली कामगिरी केली आहे. त्यांना परत आमच्या नाशिकमध्ये पाठवून द्यावे. हे सर्व अधिकारी नाशिकमधून गेल्यानंतर एकदाही कोबिंग ऑपरेशन झालेले नाही. त्यांची गाडी जरी गेली तरी गुंड घाबरत होते, एवढी त्यांची दहशत होती. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून या चांगल्या पोलीस अधिकाऱ्यांना नाशिक मधील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, पूर्वपदावर आणण्याकरिता पुन्हा नाशिकमध्ये आणावे अशी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीत आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपण बोलू द्यावे. या प्रस्तावावर आता पर्यंत फक्त चार सन्माननीय सदस्य बोलले आहेत. सन्माननीय सदस्य प्रस्ताव सुरू केल्यानंतर जसे भाषण करतात तसे ते बोलत आहेत. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, प्रा.जनार्दन चांदूरकर साहेब बोलले आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे किती अल्पावधीत बोलल्या हे आपल्याला माहीत आहे. त्यामुळे आपण यावर वेळेचे बंधन घालावे. कारण यावर आम्हाला देखील बोलायचे आहे. या चर्चेसाठी आपण वेळ निश्चित केला आहे की नाही ? आपण सत्ताधारी व विरोधी पक्षासाठी किती वेळ दिला आहे याचे नियोजन केले आहे की नाही ? त्यामुळे आपण आता वेळेचे नियोजन वाचून दाखवावे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी शेवटच्या दोन मिनिटांमध्ये मी माझे भाषण पूर्ण करतो. अहमदनगर येथील शेगावमधील श्री.दीपक कोलते हा पोलीस शहीद झाला आहे. असे जे शहीद पोलीस असतील त्यांना आपण शासकीय मदत केली पाहिजे. मी येथे माझ्या सूचना मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. शासन किती गंभीर आहे हे रिप्लायमधून कळणार आहे. मागच्या अधिवेशनामध्ये देखील आम्ही रिप्लाय ऐकले आहेत. त्या रिप्लायचे पुरावे देखील आमच्याकडे आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी राखी पौर्णिमेची आठवण ठेवून घोषणा केलेली आहे. मी त्यांचे मन:पर्वूक आभारी आहे. श्री.रावते साहेब गाडीमधून प्रवास करीत असताना शेजारी अनोळखी माणूस असला की, काय कुचंबणा होते हे सांगण्याची आवश्यकता नाही. प्रत्येक महिलेला कधी ना कधी याला सामोरे जावे लागते. त्यातून आपण दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. या निर्णयाबद्दल पुरुष वर्ग देखील आभारी असेल.

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्यावतीने आज कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

मला सुरुवातीलाच सांगितले पाहिजे की, सन्माननीय मुख्यमंत्री व सन्माननीय गृह राज्यमंत्री आमच्या ज्या ज्या काही तक्रारी असतात त्यावेळी ताबडतोब त्यास प्रतिसाद देतात, सहकार्य करतात. त्याबद्दल मी त्यांचे सुरुवातीलाच आभार मानते. एसएमएस पाठविल्यानंतर देखील कारवाई करण्यात येते. तरी पण मला येथे मांडणे अपरिहार्य होत आहे. आपली ववस्था अनेक वर्षापासून बिघडलेली आहे. त्यात आपण दुरुस्ती कशी काय करणार आहात ? मला येथे काही उदाहरण द्यायची आहेत. त्यासाठी कृपया आपण सहकार्य करावे. याच सभागृहामध्ये नगर जिल्ह्यातील सोनई पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकाऱ्याने दुर्लक्ष केल्यामुळे गावातील एका वादातून एका महिलेवर बलात्कार झाल्याची घटना घडली होती. सोनई पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याची आम्ही चौकशी करू असे सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये निवेदन केले होते. मी स्वत: मे महिन्यामध्ये नगरला गेले होते. तेथील पोलीस अधिकाऱ्यांच्या नुकत्याच बदल्या झाल्या होत्या. मी ज्यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालयात गेले होते त्यावेळी त्या पीडित महिलेचे कुटुंब देखील दुसरे काही तरी निवेदन घेऊन आले होते. त्यावेळी मी त्यांना विचारले की, आपला त्रास काही कमी झाला आहे काय ? आपली तक्रार घेतलेली आहे. त्या अधिकाऱ्याची चौकशी झाली काय, त्याची बदली झाली आहे काय ? तेव्हा त्यांनी सांगितले की, असे काही झाले नाही. मला असे वाटले की, कदाचित त्यांना काही कळले नसेल. त्यामुळे जे नवीन पोलीस अधीक्षक आले होते त्यांच्याकडे विचारणा

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली. त्यावेळी जुने अतिरिक्त पोलीस अधीक्षक देखील होते. त्यांना विचारले की, आम्ही मार्च महिन्यामध्ये विधिमंडळामध्ये सोनई पोलीस स्टेशन मधील अधिकाऱ्यांचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी सोनई पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्याची चौकशी करून कारवाई करूअशा प्रकारचे उत्तर दिले होते. त्यासंबंधी कोणती चौकशी झाली ? तेव्हा ते मला म्हणाले की, मी चौकशी करून उद्या आपणाला सांगतो. नगर पोलीस स्टेशनचे जे पोलीस अधीक्षक होते त्यांचे खरेच कौतुक करायाला पाहिजे. त्यांनी सांगितले की, ताई, आम्हाला चौकशीचे कुठलेही आदेश आलेले नाहीत. आपण मला सांगत असल्यामुळे मी त्याची चौकशी करतो आणि पुढील कारवाई करतो. सभागृहात आपण चौकशी करण्याचे आदेश देतो. पण जिल्हाधिकारी किंवा जिल्हा प्रशासनाकडे ते आदेश पोचत नाहीत. येथील चर्चा स्थानिक पातळीवरील लोक निगरगट्टपणे पचवून त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे केवढी मोठी यंत्रणा कुरण पोसते आहे याचा आपण विचार करू शकतो. सोनई प्रकरणासंदर्भात सन्मानीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊन सुद्धा नगर पोलिसांपर्यंत आदेश पोहोचले नव्हते. तेव्हा यासंबंधात सर्व प्रथम आम्हाला माहिती देण्यात यावी अशी माझी आपणास नम्र विंनती आहे.

पुण्याला पर्वती परिसरामध्ये 7 जुलै रोजी दंगल सदृश परिस्थती निर्माण झाली. यातील जे पीडित लोक होते त्यांनी माननीय गृह राज्य मंत्री डॉ.रणजित पाटील यांची भेट घेतली आहे. मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. अपराध्याने शिक्षा व्हायला पाहिजे. त्यावेळी माननीय गृह राज्यमंत्र्यांनी असे जाहीर केले होते की, महिला पोलीस अधिकाऱ्यांतर्फे या सर्व प्रकरणाची चौकशी करू. तेव्हा माझी सरकारला विनंती आहे की, त्या अहवालात काय आलेले आहे ? त्या अनुसार महिलांची छेडछाड करणारे, महिला टॉयलेटला जात असताना त्यांचे गुपचूप रेकॉर्डींग करणारे असे जे समाजकंटक आहेत त्यांच्याबद्दल या महिला पोलीस अधिकाऱ्यांकडून काही माहिती आली असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. त्या समाजकंटकांना कडक शिक्षा झाली पाहिजे. जे निरपराध आहेत त्यांच्यावर स्थानिक पोलीस स्टेशनच्या माध्यमातून मध्यस्थ दबाव आणत आहेत. तेव्हा या संदर्भात स्वत: लक्ष घालावे अशी मला मन:पूर्वक विनंती करावीशी वाटते.

दुसरा घटना देखील पुण्यातीलच आहे. पुण्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर, नगर विकास विभागाच्या प्रश्नांवर भरपूर चर्चा होते. या अधिवेशनात पुण्यातील नगरविकास विभागाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकाही प्रश्नावर नीट चर्चा झालेली नाही. आता कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा सुरू झालेली आहे. आम्हाला नागपूर अधिवेशनामध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, पुण्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींबरोबर आम्ही मिटींग घेऊन त्यांच्या व्यथा व प्रश्नांचा पाठरपुरावा करण्यात येईल. या सरकारचे हे तिसरे अधिवेशन आहे. दुर्दैवाने प्रश्नासाठी माननीय मुख्यमंत्र्यांसोबत एकही बेठक झाली नाही. कचऱ्याच्या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर अनेक बैठका झाल्या. पण पुणे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आलेले नाही. तशी बैठक आपण आयोजित करावी असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

पुण्यामध्ये 27 जून रोजी एक घटना घडली. त्यात 82 दुचाकी 4 मोटारी भस्मसात करण्यात आल्या. संपूर्ण शहरामध्ये कोलाहल माजला होता. सकाळी उठल्यानंतर प्रत्येक ठिकाणी होळी लालगी आहे काय, असे वाटत होते.काही लोक कसा तरी जी बचावून बाहेर पडले आहेत. नंतर सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक समाजकंटक सापडला. त्याला अटकही झाली. रात्रीच्या वेळी पेट्रीलिंग असते. अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. पण पुण्याचे हे आऊटस्कट आहेत त्या भागाकडे आपले लक्ष नसावे असे मला वाटते. या माथेफिरू माणसाने मोठ्या संख्येने दुचाकी जाळून टाकल्यामुळे गाडीचा विमा देखील मिळणार नाही. अशा पीडितांना दिलासा देण्यासंबंधी येथे कोणतीही चर्चा झालेली नाही. असेच प्रकार पूर्वी नाशिक, औरंगाबादसह अनेक ठिकाणी घडलेले आहेत. मुद्दाम कोणी गटबाटीतून, टोळी युद्धातून या गोष्टी करतात अशा गुन्हेगारांवर वेळ पडल्यास एमपीडीए लावले पाहिजे. जेणे करून त्यांना कडक शिक्षा होईल. तेव्हा या संदर्भातील वस्तुस्थिती कळावी म्हणून मी आपले लक्ष वेधत आहे.

आमच्या पुणे शहर पोलीस आयुक्तालयाची व पोलीस वसाहतीची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. मंत्रालयाला जशी शॉर्ट सर्किट होऊन आग लागली तशी आज पुणे पोलीस आयुक्तालयाची अवस्था आहे. गेली चार-पाच वर्षे पुणे शहर पोलीस आयुक्तालय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विनंती करीत आहे. पण त्यांच्या दुरूस्तीचे कामे सार्वजनिक बांधकाम विभाग करीत नाही. आम्ही दौंड आणि शिवाजी नगर येथील पोलीस वसाहतीला भेट दिली. या पोलीस वसाहतींमध्ये घुशींचे साम्राज्य होते. इलेक्ट्रिफिकेशन 100 वर्षापूर्वीचे जुने होते. पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरामध्ये पाहिले तेव्हा वसाहतीतील भिंती गळत होत्या. त्याही परिस्थितीत तेथे एक ओली बाळंतीण राहात होती. या वसाहतींची दुरूस्ती 10-10 वर्षे झाली नव्हती.

यानंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धलेखन प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव .....

हे मला रिप्लायमधून कळेल परंतु मागच्या अधिवेशनातही आम्ही आपले रिप्लाय पाहिले आहेत. त्या रिप्लायचे पुरावे सुध्दा आमच्याकडे आहेत. आम्हाला रिप्लायवर अवलंबून न ठेवता शासनाने यासंदर्भात चांगल्या प्रकारे कारवाई केली, मंत्र्यांनी आपापसात गप्पा न मारता त्यांनी सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकून घेतले तर निश्चितपणे आपल्याला त्यावर कार्यवाही करता येईल असे मला या निमित्ताने वाटते.

सभापती महोदय, या सरकारच्या संदर्भातील माझ्या भावना मी चार ओळीच्या माध्यमातून मांडतो. त्या उपहासक किंवा टीकात्मक म्हणा त्या ऐकाव्यात अशी विनंती आहे.

निसर्गाने हाणले,
पोलिसांनीही मारले
ऊरलं सुरल बाकी
ते सरकारने गिळले
त्रस्त झाली जनता
शेतकरी देशोधडीला लागले
गुन्हेगारी वाढली
गुन्हेगार लपले
खुन,दरोडे,चोऱ्यांनी
सारे त्रस्त झाले,
दाद मागावी कुठे
जेथे सरकारच झोपले
यांचाच यांच्यावर विश्वास नाही (एकमेकावर)
गृहावर स्वत:च्याच
डाग चंद्राचे लागले (मा.चंद्रकांत दादा काही तरी म्हणाले होते असे तुम्हीच म्हणाले होते.)
दाभोळकर मारले हो,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव .....

पानसरेही पचवले
पुरोगामीत्व महाराष्ट्राचे
खुटीवर टांगले
विद्यार्थ्यांचे आंदोलन
दडपती गोळीने
शेतकरी रस्त्यावर
खातो मार काठीने
बाया बापडयांचे सौभाग्य
रत्यावर ओढले
पोलिसांच्या बैठकीला गुन्हेगार बसले
आणा नाय खिशात
दाणा नाय पोटात
मायबाप उपाशी
पोरग रडत्य दारात
निर्लज्ज सरकार
हसतय गालात
साध्या भोळया जनतेला खोटया स्वप्नांनी फसवले
वाढत्या गुन्हेगारीने साऱ्या राज्याला रडवले
एकच सांगतो शेवटी
अंत नका पाहू
जनतेच्या हक्कांचच मागतो
सन्मानानेच घेऊ
जातांना तरी पुण्य घ्या
कारण तुमचे दिवस थोडेच राहिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव .....

वर्षभरातच तुमचे

पापाचे घडे भरले

पापाचे 99 घडे होऊन 100 वे पापाचे घडे भरण्याच्या आत राज्यातील कायदा व सुव्यवस्था सुधरवा एवढी कळकळीची विनंती करुन आपली रजा घेतो.

धन्यवाद.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पदवीधर आणि शिक्षक मतदार संघ मोडीत काढण्याची सरकारने तयारी करणे.

मु.शी.: पदवीधर आणि शिक्षक मतदार संघ मोडीत काढण्याची सरकारने तयारी करणे याबाबत श्री. कपिल पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील यांनी पदवीधर आणि शिक्षक मतदार संघ मोडीत काढण्याची सरकारने तयारी करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री. दीपकराव साळोखे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(निवेदन)

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: डोंबिवली ठाकुर्ली रेल्वे स्थानक परिसरातील मातृकृपा इमारत कोसळून त्याखाली 6 जणांचा मृत्यू होणे.

मु.शी.: डोंबिवली ठाकुर्ली रेल्वे स्थानक परिसरातील मातृकृपा इमारत कोसळून त्याखाली 6 जणांचा मृत्यू होणे याबाबत सर्वश्री धनंजय मुंडे,माणिकराव ठाकरे,सुनील तटकरे,शरद रणपिसे,किरण पावसकर,जयंत पाटील,हेमंत टकले,संजय दत्त,ॲड.निरंजन डावखरे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे,सुनील तटकरे, शरद रणपिसे, किरण पावसकर, जयंत पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, ॲड.निरंजन डावखरे यांनी डोंबिवली ठाकुर्ली रेल्वे स्थानक परिसरातील मातृकृपा इमारत पडून त्याखाली 6 जणांचा मृत्यू होणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(निवेदन)

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील आडोशी बोगद्याजवळ दि.19 जुलै, 2015 रोजी दरड कोसळणे.

मु.शी.: मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील आडोशी बोगद्याजवळ दि.19 जुलै, 2015 रोजी दरड कोसळणे यासंबंधी माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती

(चर्चा पुढे सुरु .....

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावर बोलत असताना जणूकाही आठ महिन्यामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात अत्याचार झाले. या राज्याची कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अतिशय बिघडलेली आहे अशा पध्दतीचे चित्र विरोधी पक्षातील सदस्य सभागृहात उभे करित असल्यामुळे मला आश्चर्य वाटले. आझाद मैदानावर रजा अकादमीच्या लोकांनी मोर्चा काढला होता त्यावेळी पोलिसांवर झालेले अन्याय आणि महिला पोलिसांवर झालेले अत्याचाराच्या संदर्भात त्यावेळी कोणत्या गुंडांना पकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती ?

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

एका महिला पोलीस कर्मचाऱ्यांने कविता लिहून ती फेसबुकवर टाकली म्हणून तिचे किती हाल झाले, तत्कालीन सरकारने तिला माफी मागायला लावली. तेव्हा आपण कोणत्या पोलिसांबद्दल सहानुभूती घेऊन बोलत आहात ? तत्कालीन सरकारला महिला पोलिसांबद्दल सहानुभूती नाही, तर ते राज्यातील महिलांबद्दल काय सहानुभूती असणार ? राज्यातील महिलांबद्दल बोलत असताना त्यांना कोणत्या पद्धतीचे अश्रू आले आहेत ? तत्कालीन सरकारच्या काळात महिलांवर अत्याचार झाले होते तेव्हा राधे सूता तुझा धर्म कोठे गेला होता असे मला म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, मला सांगण्यास दु:ख वाटते की, भिवंडी येथे पोलीस स्टेशनची जागा पाहण्यासाठी दोन पोलीस गेले होते. त्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांना भिवंडी येथे जाळून मारण्यात आले, त्यावेळी किती लोकांना अटक करण्यात आली, किती पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाठिशी सरकार राहिले ? त्यावेळी आपणास या पोलिसांची आठवण झाली नाही. आता आपल्या डोळ्यात कोणते नक्राश्रु येत आहेत याचा आपण विचार करावा.

सभापती महोदय, आपण नागपूरचे अक्कू यादवचे प्रकरण आठवावे. तो गुंड घरातील मुलींना उचलून त्यांच्यावर बलात्कार करीत होता. तत्कालीन सरकारच्या काळातील त्या गुंडा विरोधात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुन घेण्यात येत नव्हती. कारण तत्कालीन सरकार गुंडाच्या पाठीमागे उभे राहत होते. आम्ही आतापर्यंत शांतपणे समोरच्या सदस्यांची भाषणे ऐकली आहेत. तत्कालीन सरकार अक्कू यादवच्या कारवायांवर कोणत्याही प्रकारचे बंधन आणू शकले नाही. पोलीस विभाग न्याय देऊ शकत नव्हता म्हणून अक्कू यादवला मारण्याचे काम जनतेने केले.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, किमान वर्षातून एकदा तरी कायदा आणि सुव्यवस्थेवर चर्चा होत असते आणि त्या त्या घटनांची त्या त्यावेळी सभागृहात चर्चा झालेली आहे. नवीन सरकार आल्यानंतर त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी कोणत्या चांगल्या गोष्टी केल्या हे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी सांगितले पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्या मागील विषय मांडून विषयांतर करीत आहेत. मागील नऊ महिन्यामध्ये काय केले ते त्यांनी आपल्या भाषणात सांगावे. चुकीच्या दिशेने चर्चा चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी देत नसाल तर मी येथून निघून जाते. आम्ही समोरच्या बाकावरील सदस्यांची भाषणे शांतपणे ऐकली आहेत. आम्ही बोलायला उभे राहिल्यावर समोरच्या बाकावरून विरोध का होत आहे ? आपण मला बोलू द्यावे किंवा मी बोलू नये असे सांगावे, मी येथून निघून जाते.

सभापती महोदय, कोणतीही गोष्ट अगोदर होणाऱ्या परिणामावर अवलंबून असते. मागील दहा वर्षापासून जे काही झाले ते निपटून काढण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे. अक्कू यादवच्या प्रकरणामध्ये महिलांना पुढाकार घ्यावा लागला. स्वतःची मुलीची आणि सूनेची इज्जत जात असताना त्यांना कोणी वाचवू शकले नाही. पोलिसांनी त्याकडे लक्ष दिले नाही म्हणून महिलांना त्या गुंडाचा खात्मा करावा लागला. वसंत नगरमध्ये त्याच प्रकारची घटना घडली. या गुंडांना कोणी प्रोत्साहन दिले, कोणाच्या काळात दिले, ? आज त्या लोकांना शिस्त लावण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे,याचा आपण विचार करावा. आम्हाला सत्तेमध्ये येऊन आठ महिन्यांचा कालावधी झालेला आहे, आमच्यावर आरोप करण्यापेक्षा मागील 15 वर्षात झालेल्या दुष्परिणामांचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी महिलांवरील अत्याचाराच्या, हुंडाबळी आणि बलात्काराच्या संदर्भातील आकडेवारी सांगण्यात आली. सन 2012-13 मध्ये महिलांवरील अत्याचाराच्या केसेस 24 हजार 895 होत्या. सन 2013-2014 मध्ये ही संख्या 33 हजाराच्या वर गेली. हा नॅशनल क्राईम ब्युरोचा रिपोर्ट आहे. मध्यंतरी झालले बॉम्बस्फोट आपण विसरु शकत नाही. मी त्या घटनेचा येथे उच्चार करणार नाही. त्यावेळी पोलिसांना साधे बुलेटप्रुफ जॅकेट देखील मिळाले नाही. सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले नव्हते. तत्कालीन गृहमंत्री कै.आर.आर.पाटील यांचा मी आदर करते. त्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश देऊन सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नाहीत. आम्ही आबांना डान्सबार बंदीसाठी मदत केली. मी आबांना लेखी पत्र दिले की, डान्स बार बंद करावेत,आम्ही सर्वजण आपल्या पाठीशी आहोत. कारण आम्हाला संस्कृती बिघडू द्यायची नव्हती. तसेच तरुणांना वाईट मार्गाला लागू द्यायचे नव्हते. समोरच्या सदस्यांनी मागील आठ महिन्यांची आकडेवारी सांगितली. महिलांवर झालेल्या बलात्काराच्या केसवरील निकालांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

आकडेवारी सांगण्याची गरज मला वाटते. मी आपणास सन 2010-2011 आणि सन 2011-2012 या वर्षाची आकडेवारी सांगते. रजिस्टर्ड झालेल्या केसेसची संख्या 1483, चार्जशीट दाखल झालेल्या केसेसची संख्या 1433 त्यापैकी फक्त 182 जणांना सजा झाली. सन 2011-2012 मध्ये रजिस्टर्ड झालेल्या केसेसची संख्या 1599, चार्जशीट दाखल्या केसेसची संख्या 1458 यापैकी फक्त 146 जणांना सजा झाली. अशा पद्धतीने गुंड सुटत असतील तर ते गुंडागर्दी करणार नाहीत काय ?

सभापती महोदय, माझे आणि एका काँग्रेसच्या सदस्यांचे एका स्टेजवर भाषण होते. त्यांनी मला सहज विचारले की, ताई, राज्यात गुन्हेगारांची संख्या कमी करण्यासाठी आपल्याला काहीतरी केले पाहिजे. मी त्यांना सांगितले की, आपल्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. कोणतीही गोष्ट एक पक्ष करु शकत नाही. सरकार करु शकत नाही, पोलीस विभाग करु शकत नाही. जेव्हा समाज पूर्णपणे पाठीशी उभा राहील त्यावेळी हे घडू शकते. मी त्यांना पुढे असेही सांगितले की, आपण दोघांनी एक गोष्ट केली तर हे होऊ शकते. त्यावर त्यांनी मला विचारले कोणती गोष्ट ? मी त्यांना सांगितले की, पोलीस स्टेशनच्या केसेसमधील लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप संपेल त्या दिवशी 50 टक्के गुन्हेगारी कमी होईल आणि त्यांनी देखील हे मान्य केलेले आहे. ही गोष्ट करणे आवश्यक आहे. कारण केवळ एकमेकांवर बोट दाखवून तुम्ही काय केले, आम्ही काय केले हे सांगण्यापेक्षा समाजाला लागलेली कीड संपवावयाची असेल तर सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे.

सभापती महोदय, ॲन्टी करप्शनच्या किती केसेस झाल्या ? मी याच सभागृहात चिमूर तहसीलदाराच्या विरोधात ॲन्टी करप्शनची केस मांडली आणि आणि सभागृहात त्याच्या निलंबनाची घोषणा झाली. पण त्या तहसीलदारावर तीन वर्षे कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. तो अधिकारी त्याच ठिकाणी काम करीत होता. आमच्या सरकारने हिम्मत दाखवून ॲन्टी करप्शनच्या केसेसमधील अर्ध्याहून जास्त केसेसमध्ये संबंधितांना जेलमध्ये टाकण्याची हिम्मत केली. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांमध्ये एक भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, रेती घाटाचा प्रश्न आहे. रेती घाटाचे स्मगलर आता आले काय ? हे गुंड आणि स्मगलर कित्येक वर्षापासून पोसले जात आहेत एखादा गुंड सरकारी अधिकाऱ्यावर, जिल्हाधिकाऱ्यांवर, पोलिसांवर, तहसीलदारांवर सर्रास गाड्या घालण्याची हिमत करीत असेल तर त्याच्या पाठीमागे गॉड फादर असल्या शिवाय ते असे कधीच करु शकणार नाहीत. कारण आजही लोकांमध्ये कायद्याचा धाक आहे हे समजून घेतले पाहिजे. फक्त दुसऱ्याकडे बोट दाखवून हे सर्व होणार नाही. गुंडांना कोणतीही जात नसते, गुंडांना कोणताही पक्ष नसतो, गुंडांना फक्त पैसे कमाविणे आणि गुंडागर्दी करणे हाच त्यांचा धर्म असतो. त्यांचा हा धर्म सोडवावयाचा असेल तुम्ही आम्ही एकत्र येऊन या गुंडांना संपविण्याची शपथ घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रेती घाटाचा लिलाव जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात होतो. या कामाचा ठेका एप्रिल महिन्यात मिळतो आणि त्या कामाची मुदत सप्टेंबर महिन्यात संपते. आपण रेती घाटाच्या बाबतीत नियम केले पाहिजेत. शिस्त लावली पाहिजे. आपण नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये रेती घाटाचे ठेका द्यावा. पोसलेल्या गुंडावर कारवाई करण्याची अत्यंत आवश्यकता आहे आणि आपण ती केली पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, आज प्रौढ कुमारीकांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. यवतमाळ जिल्ह्यात या महिलांसाठी विशेष वस्ती आहे. महोदय, ही गोष्ट अभिमानाची नव्हे तर विचार करण्यासारखी आहे. या आदिवासी महिला आपली मुले घेऊन अंधाऱ्या कोठडीत राहतात. त्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे, त्या महिलांच्या अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे, त्यांच्या राहण्याचा प्रश्न आहे. समाजाने बाहेर टाकलेल्या महिलांची वस्ती असणे ही बाब आपल्याला कदापि शोभनीय नाही. मी सरकारला विनंती करु इच्छिते की, या महिला आणि त्यांच्या मुलांना न्याय देऊन, त्यांच्यासमोर असलेले प्रश्न तातडीने सोडविले पाहिजेत. तसेच त्यांच्यात इज्जतीने, अभिमानाने आणि स्वाभिमानाने जीवन जगण्याचे सामर्थ्य निर्माण केले पाहिजे. महोदय, त्या महिलांवर अन्याय कोणी केला हे मला माहीत नाही. ती मुले कोणापासून झाली हे त्या महिला सांगत नाहीत. महोदय, समाजामध्ये कोणी काय केले हे मला माहीत नाही. परंतु त्या आदिवासी महिलेच्या घरी मी एक सुंदर मुलगी बघितली. मला खूप वाईट वाटले. त्या मुलीच्या आईला समाजाने दूर केले असेल तर त्या मुलीच्या आयुष्याचे पुढे काय होणार, अशा परिस्थितीत त्या मुलीचे संरक्षण कोण करणार ? सभापती महोदय, अत्याचार आणि बलात्कार मोठ्यांच्या मुलींवर होत नाहीत. अत्याचार आणि बलात्कार हे गरीब आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलींवर होतात. कारण त्यांच्यामागे कोणी गॉडफादर नसतो. त्या गुंडांना आवर घालण्यासाठी या गरीब मुलींच्या मागे कोणी नसते, म्हणून या घटना मोठ्या प्रमाणावर घडतात. त्यामुळे तुम्ही-आम्ही सर्वांनी एकत्र येऊन यावर विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे सहा वर्षाच्या मुलीचे अपहरण करण्यात आले होते. परंतु लोकांनी मोठ्या धाडसाने त्या अपहरणकर्त्यांला पकडून पोलीस स्टेशनमध्ये बंद केले. या बाबतची माहिती मिळाल्यानंतर मी स्वत: पोलीस स्टेशनमध्ये गेले. मी माहिती घेतली असता मला समजले की, तो मुलगा एका वेश्येकडे काम करणारा होता. तो मुलगा त्या मुलीला रात्री 11.00 वाजेच्या गाडीत टाकून तिचे अपहरण करणार होता. त्या मुलाला पकडून देऊन सुध्दा त्याच्यावर साधी केस लावून त्याला सोडून देण्यात आले. तत्कालीन गृह मंत्री कै.आर.आर.पाटील यांनी त्या मुलावर फेरकेस दाखल करण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु ते होऊ शकले नाही. महोदय, ही जी सवय लागलेली आहे ती सुटण्यासाठी वेळ लागणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, भंडाऱ्यामध्ये तीन मुलींचा खून करण्यात आला होता. त्यांचा व्हीसेरा तपासणीसाठी तीन ठिकाणी पाठविण्यात आला. वास्तविक पाहता त्यांचा व्हीसेरा एकदाच तपासणीसाठी पाठवायला पाहिजे होता. परंतु तो तीन ठिकाणी पाठविला गेला. त्या मुलींचा खून करणारे गुंड सुटले. परंतु त्या मुलींचे मरणे तसेच वाया गेले. त्या मुलींच्या कुटुंबीयांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला नाही. महोदय, जर अशा प्रकारे केसेस दाबल्या जात असतील तर, या सर्व प्रकाराला वळण लावण्यासाठी नवीन सरकारला थोडासा वेळ लागेल. या गोष्टीसाठी तुम्हा-आम्हाला मी दोष देणार नाही. मी समाजाला दोष देणार आहे. जोपर्यंत समाज जागृत होत नाही, जोपर्यंत तो पाठिशी उभा राहत नाही तोपर्यंत या गोष्टी होत राहणार आहेत. महोदय, माझ्या डोक्यात असा विचार आहे की, गुंड दिसला की 10-12 महिलांनी त्याला झोडपून काढल्यानंतरच त्याला पोलीस स्टेशनकडे सुपूर्द करावे. तरच महिलांची दहशत निर्माण होईल. किंबहुना महिलांची ताकद निर्माण होईल. हे काम केवळ आपण एकमेकांवर दोष देऊन होणार नाही.

सभापती महोदय, पोलिसांना हिंमत देण्यासाठी या राज्य सरकारने काही गोष्टी केलेल्या आहेत. पूर्वी पोलिसांच्या बदल्या मंत्रालयातून होत होत्या. त्या ठिकाणी काय होत होते हे माहीत नाही. परंतु गावातील छोटा माणूस बदलीसाठी मंत्रालयापर्यंत येऊ शकत नव्हता. तो माणूस या फंदात न पडता गडचिरोलीमध्ये 10-10 वर्षे सेवा करीत होता. परंतु आमच्या सरकारने पोलिसांच्या बदल्यांचे विकेंद्रीकरण केले. आता पोलिसांच्या इच्छेनुसार त्यांच्या बदल्या होत आहेत. त्यामुळे पोलीस अधिकारी/कर्मचारी खूष आहेत. तसेच दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पूर्वी पोलिसांना व्ही.आय.पी. ला सलामी देण्यासाठी त्यांना 10-10 तास वाट पहावी लागत होती. परंतु आमच्या सरकारने व्ही.आय.पी. ला सलामी देणे बंद केले. ही हिंमत या सरकारने दाखविली आहे. या निर्णयामुळे पोलीस अधिकारी/कर्मचारी खूष आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, या सरकारने आम्हाला व्ही.आय.पी. ला सलामी देण्यासाठी जी 5-10 तास वाट बघायला लागायची, ती संपविल्यामुळे आम्ही या सरकारला सलाम करतो. महोदय, हे माझे नव्हे तर त्या पोलिसांचे वाक्य आहे.

सभापती महोदय, पोलिसांच्या घरांचा प्रश्न सुध्दा महत्त्वाचा होता. या सरकारने पोलिसांच्या घरांचा प्रश्न सोडविला आहे. पोलीस बांधव कोणत्या परिस्थितीत राहतात हे मला माहीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

परंतु त्यांच्या घराचा प्रश्न खऱ्या अर्थाने या सरकारने सोडविला आहे. महोदय, पोलिसांचे पगार आणि भत्ते वाढवून त्यांना अभिमानाने जीवन जगायला लावणारे हे सरकार आहे. त्यामुळे राज्यातील पोलीस या सरकारच्या पाठिमागे राहून राज्यातील गुन्हेगारी संपविण्याचा प्रयत्न करीत आहेत, एवढेच या निमित्ताने सांगते व माझे भाषण पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदीप दळवी या मुलाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. सध्या सभागृहामध्ये कायदा व सुव्यवस्थेसारख्या गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. गृह विभागाच्या चर्चेवर बोलत असतना पोलिसांना लागणाऱ्या गोष्टींबद्दल, त्यांच्या कर्तृत्वाबद्दल बोललेच पाहिजे. परंतु जर अयोग्य गोष्टींवर बोट ठेवावयाचे नसेल तर या ठिकाणी नेमके काय करावयाचे ? सहा महिन्यापूर्वी लोणावळा येथील हॉटेलमध्ये एका छोट्या मुलीवर बलात्कार करणारा भाजपाचा कार्यकर्ता होता, हे आपण विसरला आहात काय ? मी वारंवार सांगतो की, दुसऱ्याकडे बोट दाखवित असताना तीन बोटे स्वत:कडे असतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

सभापती महोदय, चार दिवसांपूर्वी संदीप अविनाश दळवी, रा.रमाबाई नगर, जुन्या आर.टी.ओ. कार्यालयाजवळ राहणाऱ्या 20 वर्षाच्या मुलाला चेंबूरचे पोलीस घेऊन जातात आणि त्या बाबत दोन दिवस नोंद होत नाही, हे योग्य नाही. त्यानंतर त्या मुलाला घाटकोपरचे क्राईम ब्रँचचे युनिट क्रमांक-7 घेऊन जाते आणि त्या मुलाचा पोलीस कोठडीत मृत्यू होतो. अशा वेळी आम्ही काय करायचे ? आम्ही त्यांचा सत्कार करायचा काय, त्यांना मेडल द्यायचे काय ? माझी विनंती आहे की, या प्रकरणी सरकारच्या माध्यमातून निवेदन झाले पाहिजे. महोदय, 20 वर्षाच्या मुलाला पोलिसांकडून घरातून उचलले जाते. कायद्यानुसार ज्यावेळी एखाद्याला डिटेन करतो त्यावेळी त्या बाबत पोलीस स्टेशनमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तद्नंतर चार दिवसांनी त्या मुलाचा ताबा दुसऱ्या युनिटच्या पोलिसांना दिला जातो आणि कोठडीत त्याचा मृत्यू होतो. ही घटना अतिशय गंभीर आहे. त्यामुळे या घटनेची गंभीर दखल घेऊन या विषयी सरकारच्या वतीने स्वतंत्र निवेदन करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रिलायन्स कंपनीची ए.सी.बी.कडून चौकशी करण्याबाबत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक 26 मार्च, 2015 रोजी मी निदर्शनास आणून दिले होते की, ठाणे महापालिकेच्या हद्दीमध्ये रिलायन्स कंपनीकडून फोर-जी टेक्नॉलॉजीचे फायबर केबल टाकण्याचे काम सुरु आहे. या कामामध्ये फार मोठा गैरव्यवहार आहे. या कंपनीकडून करण्यात आलेल्या खोदकामाचा नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. पावसाळा सुरु असताना सुध्दा केबल टाकण्यासाठी नवीन रस्त्याचे खोदकाम केले जाते. मी सरकारला विचारु इच्छितो की, रिलायन्स हा कोणाचा जावई आहे काय ? माननीय मंत्र्यांनी या संदर्भात ए.सी.बी. कडून चौकशी करण्याचे घोषित केलेले आहे. त्यामुळे या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : माननीय मंत्र्यांनी या बाबत दखल घ्यावी.

डॉ.रणजित पाटील : होय.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस भाषण करीत होत्या त्यावेळी त्या असे म्हणाल्या की, महिलांविरुध्दचा कोणताही गुन्हेगार जर का रस्त्यावर सापडला तर त्याला 8-10 महिलांनी पकडून मारावे. मला वाटते की, हे एक अतिशय गंभीर आणि चुकीचे वक्तव्य सभागृहात झाले आहे. सभागृहाचे काम कायदे बनविणे आहे. सभागृहाचे काम कायदे बनवूण त्याचे पालन होते की नाही ते पाहणे आहे. आपली अशा काळात जबाबदारी आहे. आपण ती जबाबदारी अशा काळात निभावली पाहिजे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य रेकॉर्डवरून काढावे अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य तपासून निर्णय घेण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्याच्या जनतेच्या विषयीचा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. संबंधित माननीय मंत्री सभागृहात आले आहेत. शासनाने महाराष्ट्र टोल फ्री करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मुंबईतील जे टोल आहेत, 5 एन्ट्री पॉईंट्स आहेत, त्याबाबतची समिती बनविली होती आणि या अधिवेशनात तो निर्णय अपेक्षित होता. मात्र आम्हाला असे कळत आहे की, समितीला आणखी 3 महिने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे की, हा वेळकाढूपणा आहे. शासन याबाबत निर्णय घेणार नाही का ? माझी विनंती आहे की, माननीय मंत्र्यांनी याबाबत खुलासा करणे गरजेचे आहे. लोकांमध्ये त्याचा मेसेज जाणार आहे. माननीय मंत्र्यांनी त्या बाबतीत खुलासा करावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, समिती बनविली होती. आपण त्याबाबत म्हटले होते की, समितीचा रिपोर्ट 30 जुलैपर्यंत येईल, तो रिपोर्ट आल्यानंतरच निर्णय होणार आहे. परंतु तो रिपोर्ट 30 जुलैर्पंत येऊ शकत नाही. कारण खूप नवनवीन ऑप्शन्स आहेत. बाकी सर्व टोलनाके बंद केले आहेत. 53 टोलनाक्यांवर छोटी वाहने टोलमुक्त केली आहेत, स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसेस, स्कूल बसेस टोलमुक्त केल्या आहेत. 12 आऊटराईट बंद केले आहेत. आता मुंबई एन्ट्री पॉईंट, मुंबई-पुणे सुपर एक्सप्रसे हायवे आणि कोल्हापूरचे 9 टोल एवढेच पीडब्ल्यूडी-एमएसआरडीसीचे टोल राहिले आहेत. बाकी सर्व टोल नॅशनल हायवेचे आहेत. आपण त्या विषयात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

काही करू शकत नाही. केंद्र सरकारची यातील भूमिका लवकरात लवकर स्पष्ट होईल. जे राहिले आहेत त्यातील मुंबई एन्ट्री पॉईंटच्या बाबतीत एसीएस श्री. आनंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली, 30 जुलैपर्यंत रिपोर्ट येणे अपेक्षित होते. पण लक्षात असे आले की, यावर खूप काम केले पाहिजे. कारण राज्यातील बाकी टोलनाक्यांवर टोलमधून लहान वाहनांना सूट दिली त्याप्रमाणे तितका हा सोपा विषय नाही. अजून काही आकडेवारी येणे आवश्यक आहे. नवनवीन ऑप्शन्स त्यामध्ये आले आहेत की, हे कशापध्दतीने करायचे आहे. हे नक्की आहे की, मुंबईकरांना, मुंबई एन्ट्री पॉईंटमधून ये-जा करणाऱ्यांना, सर्वांना रिलिफ मिळेल. त्यामुळे याचा अभ्यास करायला थोडा वेळ लागेल. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी असा निर्णय घेतला की, समितीला 3 महिन्यांची मुदतवाढ द्यावी.

सभापती महोदय, कोल्हापूरच्या बाबतीत पुनर्मूल्यांकन समिती तयार झाली, तिचा रिपोर्ट आला आहे. मुंबईत 11 तारखेला माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर टोल विरोधी कृती समितीची बैठक होईल. आता जे मूल्यांकन झाले, त्याच्या आधारे प्रक्रिया सुरू होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : दिनांक 1 ऑगस्ट, 2015 या महसूल दिनांकापासून महाराजस्व अभियान राबविणे.

मु.शी. : दिनांक 1 ऑगस्ट, 2015 या महसूल दिनांकापासून महाराजस्व अभियान राबविणे संबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

सभापती महोदय, एक महिन्याच्या आत फेरफार नोंदी झाल्याच पाहिजेत अशी व्यवस्था करणे आहे. असे जर राहिले तर त्यामध्ये कोणी येऊन तक्रार करू शकेल, या संदर्भातील प्रश्न वेगाने ग्रामीण पातळीवर सुटावेत यासाठी हे महाराजस्व अभियान राबविण्याचे शासनाने ठरविले आहे.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक महत्त्वाचा विषय येथे मांडत आहे. आज पीक विमा भरण्याचा शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाच्या सुरवातीसच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्यावर झाली होती. सरकारकडून त्यांना कर्जमाफीही नाही आणि व्याजमाफीही मिळाली नाही. शासनाने कमीत कमी पीक विमा भरण्याची मुदत 1 महिना तरी वाढवून द्यावी. जेणेकरून या योजने फायदा ज्यांची पेरणी झाली आहे, ज्यांचे पीक जळून गेले आहे अशा शेतकऱ्यांना होऊ शकेल. सदर विषयाच्या बाबतीतीलही निवेदन आज होणे आवश्यक आहे. कारण आज आपले अधिवेशन संपत आहे. सदर विषयी त्या संबंधीचा आहे. सरकारने या संदर्भात निवेदन करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

तालिका सभापती : माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा प्रश्न परवा उपस्थित केला होता. वस्तुस्थिती अशी आहे की, विम्याच्या संदर्भात बऱ्याचशा ठिकाणी शेतकऱ्यांच्या लाईन लागल्या आहेत. बऱ्याचशा जिल्हा बँकांमध्ये विमा भरण्यासाठी शेतकऱ्यांना वेळ कमी पडत आहे. त्यामुळे काही ठिकाणी बरीच गडबड झाली. परवा सभागृहात सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचना केली, त्यानुसार काल आम्ही राज्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव श्री. डी.के. जैन यांना दिल्लीला या कामासाठी पाठविले. मी स्वतः माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांशी बोललो. परवा दिवशी संध्याकाळीच मी त्यांच्याशी बोललो होतो. त्यांनी पाठवा असे सांगितल्यामुळे आम्ही पाठविले. आपले अधिकारी काल दिवसभर दिल्लीमध्ये होते. विमा कंपन्यांच्या सोबत माननीय केंद्रीय कृषी मंत्री, राज्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव यांच्या 3 बैठका झाल्या. परंतु विमा कंपन्या यासाठी तयार नाहीत. कारण देशभरातील निर्णय त्यांना घ्यावा लागेल. केंद्र सरकार असेल किंवा राज्य सरकार असेल, आपला डायरेक्ट विमा कंपन्यांशी संबंध नाही. आपण एक हप्ता भरतो. परंतु तरीही या संदर्भात मुदत वाढवून द्यावी म्हणून .... (अडथळा) आपण मुदत वाढवत नाही. विमा कंपनीला मुदत वाढवावी लागते. आजही या संदर्भात आपले अधिकारी दिल्लीत बसून आहेत. आमचा स्वतःचा संपर्क झालेला आहे. आता एक तासापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनाही मी विनंती केली आहे. आम्ही माननीय केंद्रीय कृषीमंत्र्यांशी संपर्क साधत आहोत. माननीय केंद्रीय वित्ती मंत्र्यांशीही संपर्क साधून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

विमा कंपन्यांची बैठक तातडीने घ्यावी आणि मुदतवाढ देण्याच्या संदर्भात आग्रह धरावा किंवा आदेश निर्गमित करावे अशी आता चर्चा झाली आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असा हा विषय आहे, यापेक्षा दुसरा महत्त्वाचा विषय असू शकत नाही. शासनाने या संदर्भात फक्त प्रयत्न करीत आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. शेतकऱ्यांना मुदतवाढ देण्याच्या संदर्भात दिल्लीचे सरकार आपल्याला प्रतिसाद देत नाही का, या संदर्भात भूमिका स्पष्ट झाली पाहिजे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आमची स्पष्ट भूमिका आहे. सरकारचा या विमा कंपन्यांशी फक्त मध्यस्थ म्हणून संबंध आहे. प्रत्यक्ष विमा काढणाऱ्या विमा कंपन्या आहेत, त्यांनी किती तारीख ठरवावी, किती घ्यावे हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र तरीही सरकार त्यामध्ये शेतकऱ्यांचा हिस्सा भरते. आमचा प्रयत्न आहे. आमची काही इच्छा नाही का ? आमची इच्छा आहे. शेवटी हा व्यवसाय विमा कंपन्यांचा आहे. सरकारची इच्छा आहे. आम्हाला वाटते की, महिनाभर वाढवून द्यावे, आम्ही त्याला नकार देत नाही. आमचे प्रयत्न सुरू आहेत आणि म्हणून काल सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या सभागृहात परत्वा विषय काढल्याबरोबर राज्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना मी दिल्लीला पाठविले, बैठका झाल्या, आजही ते तेथे बसून आहेत. आमचा या संदर्भात प्रयत्न सुरू आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर काही विषय चुकीचे जाऊ नयेत. पूर्वी अशी मुदतवाढ दिलेली आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

शेतकऱ्यांची मुदतवाढीची मागणी आहे. आपण शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली नाही, इतर कोणत्याही मागण्या मान्य केल्या नाहीत. किमान विम्याचा प्रिमियम भरण्याची मुदत वाढवून देण्याची त्यांची मागणी सरकारने मान्य करावी. राज्य शासनाने आपला 700 कोटी रुपयांचा, केंद्र सरकारने त्यांचा 700 कोटी रुपयांचा हिस्सा यापूर्वीच दिलेला आहे. आता शेतकऱ्यांचा स्वत:चा हिस्सा शिल्लक आहे. तो भरण्यासाठी त्यांना मुदत वाढवून हवी आहे. ती आपण वाढवून द्यावी, एवढीच आमची मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या संदर्भात आम्ही जरुर प्रयत्न करु, आजही करीत आहोत. यापूर्वी शेतकऱ्यांकडून पीक विमा योजनेला एवढा प्रतिसाद मिळत नव्हता, तो या वर्षी मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परंतु, विमा कंपन्या खाजगी आहेत व 31 जुलै पर्यंत प्रिमियम मिळाला पाहिजे, असा त्यांचा नियम आहे. या तारखेपूर्वी 7/12 वर कोणते पीक दाखविलेले आहे, ते त्यांना दिसले पाहिजे. तथापि, महाराष्ट्रातील अडचण आम्ही त्यांच्या लक्षात आणून दिलेली आहे. पहिली पेरणी होऊ शकली नाही, दुबार पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे आणि त्यामुळे प्रिमियम भरण्यास मुदतवाढ मिळावी, अशी विनंती त्यांना केली आहे. मुख्यमंत्री महोदय आणि मी स्वत: केंद्र सरकारशी संपर्क साधून आहोत आणि ही मुदत वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे मनपा तसेच रिलायन्स जिओ इन्फोकॉम कंपनी यांच्या संगनमताने झालेला गैरव्यवहार याबाबत पीठासीन अधिकाऱ्यांचा निर्णय

तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) : मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दिनांक 26 मार्च, 2015 रोजी सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी ठाणे महानगरपालिका हद्दीत फोर-जी टेक्नॉलॉजीचे ऑप्टीकल केबल टाकण्याकरिता रिलायन्स कंपनीला देण्यात आलेले कंत्राट रद्द करणे या विषयाबाबत लक्षवेधी सूचना दिलेली होती. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने या आसनावरुन 'ठाणे मनपाचे संबंधित अधिकारी तसेच रिलायन्स जिओ इन्फोकॉम कंपनी यांच्या संगनमताने मनपामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिसून येत आहे. या आर्थिक गैरव्यवहाराची तत्काळ ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत चौकशी करावी व त्याचा अहवाल सादर करावा' असे निर्देश देण्यात आलेले होते. हा प्रश्न नागरिकांच्या जीविताशी निगडीत असल्याने या प्रकरणीची चौकशी अतिशिघ्रतेने करावी आणि पुढील अधिवेशनाच्या पहिल्या सप्ताहात याचा अहवाल सभागृहाला सादर करावा, असे शासनाला निर्देश देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, जयंत पाटील, हेमंत टकले, भाई जगताप, शरद रणपिसे, सय्यद मुझफ्फर हुसेन, सुभाष झांबड, प्रा.जनार्दन चांदूरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री अनंत गाडगीळ, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही. पाच ते सात मिनिटांमध्ये मी माझे वक्तव्य संपविणार आहे. यापूर्वी आपण माझे नाव पुकारल्यानंतर अडथळे सुरु झाले. कायदा व सुव्यवस्था या विषावर अतिशय गंभीरपणे, पध्दतीशीरपणे चर्चा सुरु होती. चर्चा एका टप्प्यावर गेली असताना मध्येच अडथळे आल्यामुळे या चर्चेचा टेम्पो गेला. हरकतीचा मुद्दा उपस्थित झाला, त्यानंतर मग पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन उपस्थित झाला. या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेले मुद्दे देखील महत्वाचे होते आणि ही चर्चा देखील महत्वाची आहे. तथापि, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, हे सरकार सत्तारूढ झाल्यापासून गेल्या काही महिन्यात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. मागील 15 वर्षात काय झाले, हा भाग वेगळा आहे. मागील सरकारच्या चुकांमुळे राज्यातील जनतेने त्यांना धडा शिकविला आणि विरोधामध्ये बसविले, हे नाकारण्यात काही अर्थ नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बोलत असताना मंत्री महोदय आपापसात बोलत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त साहेब आपण माझे मित्र आहात. आपले हे नेहमीचेच आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी गप्प आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : आपल्या गप्पपणाचाच जास्त आवाज येत आहे.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती गंभीर झाली आहे. गेल्या 15 वर्षाचा वारंवार उल्लेख केला जातो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनीही गेल्या 15 वर्षात काय झाले, काय झाले नाही, त्यांचे संचित आमच्याकडे आले, अशा प्रकारचा उल्लेख केला आहे आणि आणखीही काही सदस्य करण्याची शक्यता आहे. परंतु, गेल्या आठ महिन्यात चिंता निर्माण करण्यालायक कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली आहे, ही फार गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, सत्तारूढ पक्षाला अडचणीत आणण्यासाठी हा विषय आम्ही अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने उपस्थित केलेला नाही. गेल्या आठ महिन्यात ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारावी आणि राज्यातील जनतेला या स्थितीबाबत आश्वस्त करावे, यासाठी हा अंतिम आठवडा प्रस्ताव विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आला आहे.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेचे महत्व याकरिता आहे की, आपल्या राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे मुख्यमंत्री पदही आहे आणि गृह मंत्री पदही असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न वाढलेले आहेत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यात गुंडगिरी, सांप्रदायिक तणाव, दंगल, अत्याचार, पोलिसांची गुन्हेगारी, अशा अनेक प्रकारच्या गुन्हेगारीमध्ये वाढ झाली आहे. नागपूर येथील तुरुंगात, ज्या ठिकाणी काल एका अपराध्याला फाशी दिली गेली, त्या तुरुंगातील कैदी पळून गेले होते. पत्रकारांवर हल्ले होत आहेत. एसआरअेच्या बिल्डरकडून गुंडगिरी सुरु आहे, त्यांची दहशत वाढली आहे. राज्यात माफियांची संख्या वाढत चालली आहे. वाळू माफिया, तेल माफिया, दारु माफिया, ड्रग माफिया अनेक प्रकारच्या माफियांची संख्या वाढत चालली आहे. आर्थिक क्षेत्रातही गुन्हेगारी वाढत चालली आहे. हे सर्व पाहिल्यानंतर असे वाटते की, राज्याचे सरकार माफिया तर चालवीत नाही ना ? ही परिस्थिती गेल्या आठ महिन्यांच्या कालखंडात निर्माण झाली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, भ्रष्टाचाराबाबतही चर्चा झाली. आज राज्यात पोलिसांची संख्या कमी आहे. पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराबाबत उठसुठ आपण बोलतो. पण कोणत्या क्षेत्रात भ्रष्टाचार नाही, हे सांगा. सर्व क्षेत्रात भ्रष्टाचार आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस खात्यावर आहे. पण तेच पोलीस खाते भ्रष्ट असेल, कुंपणच शेत खात असेल तर कोणाकडे तक्रार करावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, पोलीस भरती होते. त्याकरिता आपल्या राज्यातील बेरोजगारांना नोकरी मिळविण्यासाठी लक्षावधी रुपयांची गुंतवणूक करावी लागते. मी 'गुंतवणूक' 'Investment' असे म्हणतो आहे. काहींना बैलजोडी विकावी लागते, काहींना शेती विकाली लागते आणि हात गरम केल्याशिवाय पोलीस खात्यामध्ये भरती होता येत नाही. जे पोलीस अशा प्रकारे 5-10 लाख रुपये देऊन पोलीस खात्यात भरती होतात, गुंतवणूक करतात, तेव्हा गुंतवणुकीवरील परतावा मिळविण्यासाठी असे प्रकार घडतात. हे सर्व कुठे तरी थांबले पाहिजे.

सभापती महोदय, पोलिसांना राहण्यासाठी उत्कृष्ट घरे असली पाहिजेत, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची उत्कृष्ट व्यवस्था असली पाहिजे, त्यांच्या कामाचे तास निर्धारित करुन दिले पाहिजेत, त्यांच्यावर मानसिक ताण पडणार नाही, याचीही दखल शासनाने घेतली पाहिजे. पोलिसांना ज्या ज्या सुविधा देण्याची आवश्यकता असेल त्या सर्व सुविधा शासनाने त्यांना दिल्या पाहिजेत व हे सर्व केल्यानंतर त्यांच्याकडून उत्कृष्ट सेवेची अपेक्षा केली तर त्याबद्दल कोणाची तक्रार असण्याचे कारण नाही.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

प्रो.जोगेंद्र कवाडे.....

आपल्या देशात डॉक्टरांवर हल्ले केले जातात. औरंगाबाद येथे डॉक्टरवर हल्ला झाला. त्याबाबत डॉक्टरांच्या संघटनेने, मॉर्डने आंदोलन केले. डॉक्टर, पत्रकार यांच्यावरील हल्ले वाढत आहेत. सायबर क्राईम देखील वाढत आहे. व्हॉट्सॲप, फेसबुकवर थोर पुरुषांबद्दल वाईट रिमार्क्स लिहिले जातात. त्यामुळे सामाजिक, सांप्रदायिक तणाव निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. परंतु, सायबर क्राईम पाहिजे तशा प्रकारची दखल घेत नाही.

सभापती महोदय, आपल्याला माहिती असेल की, पुणे, नाशिक, औरंगाबाद येथे दुचाकी गाड्या जाळण्याचे प्रकार घडले. ते प्रकार कोणी घडविले, का घडविले, त्यांना पकडले किंवा नाही, याचा काहीही पत्ता नाही. त्यामुळे दहशत निर्माण झाली. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना वाढत आहेत. कौटुंबिक हिंसाचारावर नियंत्रण कसे ठेवता येईल यासाठी पोलीस विभागाला विशिष्ट प्रकारचा सेल, प्रशिक्षण देण्याची गरज असेल तर ते देखील दिले पाहिजे. अनेक बाबींमुळे पोलीस देखील आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी आपण सर्वच प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहोत, सरकारही करीत आहे. मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. परंतु, आपण शेतकऱ्यांची कर्जमाफी करु शकलो नाही, त्यांना मदत करु शकलो नाही. कमीत कमी त्यांना पीक विम्याचे पैसे मिळावेत, अशा प्रकारची मागणी करण्यात आली. दादा, आपण ती मागणी मान्य केली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. पोलीस आत्महत्या करीत आहेत. पोलिसांनी पोलिसांवर गोळीबार करुन ठार केले, अधिकाऱ्यांना ठार केले. ही परिस्थिती का निर्माण होते ? पोलिसांचे मानसिक स्वास्थ्य कसे चांगले ठेवता येईल, या संदर्भात प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, शांतता व सुव्यवस्थेचा संबंध विकासाशी, प्रगतीशी आहे. घरात, समाजात, राज्यात, देशात शांतता व सुव्यवस्था नसेल तर आर्थिक सामाजिक दृष्टीकोनातून प्रगती होऊ शकत नाही. उद्योगात गुंतवणूक करावयाची असेल तर राज्यात शांतता व सुव्यवस्था असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रो.जोगेंद्र कवाडे.....

तरच गुंतवणुकदार राज्यात येतील नाही तर ते गुजरात, छत्तीसगढ, राजस्थान, केरळ राज्यात जातील. राज्यातील शांतता व सुव्यवस्था चांगली असेल, आश्वस्थ करणारी असेल तर उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढण्याची शक्यता असते. राज्याची आर्थिक, सामाजिक उन्नती देखील राज्यातील शांतता व सुव्यवस्था कशी आहे यावर अवलंबून असते, हे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, राज्यात आर्थिक फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. मग नाशिक असेल किंवा नागपूर असेल. गोरगरिब जनतेची फसवणूक करुन लाखो, करोडो रुपये लुटले जातात आणि त्यांच्यावर क्षुल्लक कारवाई होते, त्यांना जामीन मिळतो. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, अशा प्रकारे जे फसवणूक करतात त्यांची मालमत्ता जप्त करु, त्यांच्या मालमत्तेवर टाच आणू. आपण कारवाई केली तर आर्थिक फसवणुकीच्या प्रकारांना आळा बसेल, असे मला वाटते.

सभापती महोदय, अलीकडे लहान मुलांवर अत्याचार आणि मुलांचे अपहरण करण्याचे प्रकार वाढलेले आहेत. अपहरण केल्यामुळे जी मुले बेपत्ता होतात त्यांचा पत्ताच लागत नाही. या संदर्भात देखील शासनाने दखल घेण्याची गरज आहे. आम्ही वारंवार या गोष्टीचा उल्लेख करतो की, डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.गोविंद पानसरे यांची निघृणपणे हत्या करण्यात आली. आम्ही तर याची चिंता करीतच आहोत, परंतु सत्ताधारी पक्ष देखील चिंता करीत आहे. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या होऊन आता वर्ष, सव्वावर्षे झालेले आहे. कॉ.गोविंद पानसरे यांची हत्या होऊन आता 8-9 महिने झालेले आहेत. परंतु, अद्याप गुन्हेगारांचा तपास लागलेला नाही. मघाशी उल्लेख करण्यात आला की, श्री.हसन मुश्रीफ साहेब विधानसभेचे सदस्य आहेत, माजी मंत्री आहेत. त्यांना कोणत्या तरी सोर्सकडून बातमी मिळाली की, कॉ.गोविंद पानसरे यांच्या मारेकऱ्यांना अटक करण्यात आली आणि अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रात छापून आली. या संदर्भात आमच्या गृह विभागाने काळजी घेतली तर कॉ.गोविंद पानसरे, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचे हत्यारे पकडले जातील. हे का सुरु आहे ? एकीकडे असे म्हटले जाते की, डॉ.दाभोळकर आणि कॉ.पानसरे यांचे हल्लेखोर, हत्यारे, खुनी आमच्या दृष्टीपथात आहेत. परंतु, त्यांच्या हातात हतकड्या पडत नाहीत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रो.जोगेंद्र कवाडे.....

याची आम्हाला काळजी आहे. विधानसभेचे सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना देखील अशा प्रकारच्या धमक्या देण्यात आल्या. राज्यात जर असे होत असेल तर त्याची काळजी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महत्वाची गोष्ट अशी आहे की, आपला देश 33 कोटी देवांचा देश आहे आणि देवांची संख्या वाढतच आहे. हे सर्व बघितल्यानंतर असे वाटते की, आमचा देश देव निर्माण करण्याची फॅक्टरी तर बनलेला नाही ना ? मी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, राज्यात दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्यामुळे राज्यातील दलितांमध्ये दहशत आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खैरलांजी येथील घटनेपासून दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचा प्रवास सुरु झालेला आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नेवासा तालुक्यातील सोनेर गावात महिलेवर झालेल्या अत्याचाराचा उल्लेख केला. सोनेर येथे तीन दलित तरुणांची हत्या करण्यात आली. जामखेड येथे आमच्या मातंग समाजाच्या तरुणाची हत्या करण्यात आली. खर्डा येथे 14 वर्षाच्या दलित तरुणाची हत्या करण्यात आली. जवखेडा येथे जाधव परिवारातील मायलेकांची हत्या करण्यात आली. त्यांच्या 20 वर्षाच्या मुलाचे तुकडे-तुकडे करण्यात आले. काल परवा शिर्डी येथे आमचे सेजवळ....

उप सभापती : या प्रस्तावावर आणखी 18 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. मघाशी प्रस्तावावरील चर्चेची वेळ 1 तास वाढविण्यात आली होती. आता त्याला जवळपास 2 तास झालेले आहेत. आता आणखी किती सन्माननीय सदस्यांना बोलायला द्यायचे ?

श्री.किरण पावसकर (बसून) : सभापती महोदय, प्रस्तावावरील चर्चा संपेपर्यंत...

उप सभापती : संपेपर्यंत म्हणजे यानंतर विधेयके आहेत. विधेयके पुढील अधिवेशनात घ्यायची काय ? गृहराज्यमंत्री महोदयांना निवेदन करावयाचे आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ही चर्चा संपेपर्यंत ते सभागृहात थांबणार आहेत. मला असे वाटते की, या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर तेच देणार आहे. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे काळजी करण्याची आवश्यकता नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रो.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, दलितांवर होणारे अत्याचार मग तो बौद्ध समाज असेल, मातंग समाज असेल, चर्मकार समाज असेल, भटक्या विमुक्त समाज असेल यांच्यावरील अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, राज्यात इतर गुन्हेगारी वाढत चालली आहे. परंतु, जातीय गुन्हेगारी जास्त प्रमाणात वाढत आहे. जातीय अत्याचार जास्त प्रमाणात वाढत आहे. खैरलांजी येथील घटनेपासून दलितांवरील अत्याचाराचे भयानक सत्र सुरु झाले आणि नवीन सरकार सत्तेवर येऊन देखील ते थांबत नाही, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. नगर जिल्ह्यातील नेवासे तालुक्यातील सोनेर गावात दलित तरुणाची हत्या करण्यात आली. नगर जिल्ह्यात जास्त घटना का घडतात, हे मला कळत नाही. नगर जिल्ह्याला काय झोंबले हे समजत नाही. सोनेर गावात वाल्मिकी समाजाच्या, भंगी समाजाच्या तरुणाचे तुकडे करुन त्याला मारुन टाकण्यात आले.

श्री.भाई गिरकर (बसून) : सभापती महोदय, भंगी शब्द कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मेहतर समाजाच्या तरुणाची तुकडे करुन हत्या करण्यात आली.

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, जामखेड व सोनगांव या ठिकाणी अशा प्रकारचा अत्याचार करण्यात आला आहे. मातंग समाजाच्या आमच्या तरुण तडफदार कार्यकर्त्याला मारुन टाकण्यात आले. खर्डा या गावात देखील असाच प्रकार घडला आहे. शिर्डी येथे सागर शेजवळ या 22 वर्षाच्या तरुणाचा अत्यंत निघृण पध्दतीने खून करण्यात आला. कोठे पंचशीलचे ध्वज फाडले जात आहेत, कोठे निळे झेंडे तोडले जात आहेत, कोठे बुध्दविहार तोडले जात आहेत, पंचशीलचे ध्वज वाचविण्यासाठी बौध्द व दलित समाज प्रयत्न करतो, तेव्हा पोलिसांच्या मदतीने दलितांवर अत्याचार केले जातात हे आम्ही पाहिले आहे.

सभापती महोदय, आपण धर्म निरपेक्षतेची ग्वाही देतो, राज्य घटनेचा सन्मान करतो असे म्हणतात, एका समाजासाठी एक कायदा व दुसऱ्या समाजासाठी दुसरा कायदा हा जो प्रकार चालला आहे तो योग्य नाही. कायद्यापुढे सर्व समान असल्याची भूमिका दिसत नाही. मी एक गोष्ट आपणाला सांगतो व माझे भाषण संपवितो.

सभापती महोदय, जालना जिल्ह्यात जाफ्राबाद तालुका आहे, तेथे वरुर बु.नावाचे गांव आहे, 30-35 वर्षापूर्वी या वरुर गावातील दलित तरुणांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक लावला होता. आता अलीकडे पाच ते सहा वर्षापूर्वी त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र लावण्यात आले, अहिल्यादेवी होळकर यांचा देखील तेथे फलक लावण्यात आला, तेव्हा काहीही झाले नव्हते. 30-35 वर्षापूवी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तैल चित्र मैदानात लावण्यात आले होते, ती जागा ग्रामपंचायतीची होती. त्या गावातील गव्हाण नावाच्या सरपंचांनी उद्घाटन केले होते. काल परवा गव्हाण नावाच्या सरपंचांनी अशी तक्रार केली की, हे चित्र येथून हटवा. ज्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व अहिल्यादेवी होळकर यांचा फलक होता त्याच्या बाजूला त्यांनी प्लॉट घेतला व त्या ठिकाणी चार मजल्याची इमारत उभी केली, त्यामुळे माझ्या इमारतीसमोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व अहिल्यादेवी होळकर यांची चित्रे कशासाठी पाहिजे. फूस लावून ही चित्रे तेथून हटविण्यात आली. हे सरपंच सत्ताधारी पक्षाचे आहेत, जिल्हापरिषदेचे सदस्य आहेत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य आहेत, गव्हाण नावाच्या व्यक्तीची चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील प्रदेशाध्यक्ष श्री.रावसाहेब दानवे यांचा लोकसभेचा हा मतदारसंघ आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 2015-2016 या वर्षात 125 वी जयंती सामाजिक समता व सामाजिक न्याय म्हणून आपण साजरी करणार आहोत, ज्या पक्षाने व ज्या सरकारने ही घोषणा केली त्या ठिकाणी असे प्रकार घडावे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, सरकारला माझी विनंती आहे की, काल काय झाले ते जाऊ द्यावे. आज आपल्या सरकारकडे महाराष्ट्रातील जनता मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत, ते आपणाला विसरता येणार नाही. मागील चुकांचा कोळसा उगाळत बसलो तर त्या कोळशातून पांढरे काही किंवा चांगले काही निघणार नाही. मागच्या चुका लक्षात घेऊन आताच्या सरकारने भ्रष्टाचार व गुन्हेगारीपासून अलिप्त राहिले पाहिजे अशी आम्ही अपेक्षा करु शकतो. याबाबत सरकारने योग्य ती दक्षता घेतली पाहिजे.

सभापती महोदय, परिस्थिती अशी आहे की, उकळत्या पाण्यात प्रतिबिंब दिसत नसते. पाणी शांत असेल तर प्रतिबिंब दिसते. महाराष्ट्रातील वातावरण एकंदरीत शांत होईल तेव्हाच विकासाचे प्रतिबिंब दिसेल. आम्हाला याची काळजी आहे, हीच काळजी सरकारने केली पाहिजे. एक ही गलती हम बार बार दोहरा रहे है. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी अतिशय चांगली कविता सभागृहात सांगितली आहे. एक ही गलती हम बार बार दोहरा रहे है, धुल चेहरे पर है और आईना पोछ रहे है. धूळ चेहऱ्यावर म्हणजे चेहरा माखलेला आहे आणि हे आरसा पुसत आहेत. चेहरा साफ करा तेव्हा आरशात चांगले दिसेल.

उप सभापती : आपल्या म्हणीप्रमाणे आम्हाला तुमची प्रतिमा आता दिसू लागली आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मैं आपका डायलॉग भूल नहीं सकता, साहेबांचा एक शेर मी विसरलो नाही. अपने ही दुश्मनों को गले मत लगाओ यारों, अपने गले के लिए तलवार मत मांगो यारों, या आपल्या दोन ओळी मी अजून विसरलो नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जनार्दन चांदूरकर यांनी सांगितले आहे की, गल्लीपासून दिल्लीपर्यंत आज आश्वासनांची खैरात चालू आहे, आश्वासनांचा पाऊस पाडला आहे, शेवटी काहीच झाले नाही. या आठ महिन्यांच्या कालखंडात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडली आहे. माफियांचे राज्य आले काय असे वाटावयास लागले आहे. आश्वासनांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

खैरात राज्यात सुरु आहे, कृत्रिम पाऊस पाडण्याची सुरुवात करण्यात येत आहे. तरी देखील पाऊस पडला नाही. मात्र आश्वासनांचा पाऊस मात्र पडला आहे. एक कवी असे म्हणतात की, सब कुछ है इस देश में, रोटी नहीं तो क्या ? वादें लपेट लो, लंगोटी नहीं तो क्या ? अशी अवस्था आमच्या राज्याची होता कामा नये. अशी मी सरकारला विनंती करतो. राज्यात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे हा कळीचा मुद्दा आहे, राज्याची वैभवशाली परंपरा कायम ठेवण्यासाठी राज्याचा विकास आणि प्रगतीचे चित्र मोठे करण्यासाठी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शासनाने पराकाष्ठेचे प्रयत्न करावेत आम्ही आपल्या सोबतच आहोत, एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद, जयभीम.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत गतीमान वैरण विकास कार्यक्रम.

मु.शी.: राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत गतीमान वैरण विकास कार्यक्रम यासंबंधी माननीय कृषी मंत्र्यांचे निवेदन.

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेसः येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

....5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विविध शासकीय कार्यालये, उपक्रम, स्वायत्त संस्था इत्यादींना लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीबाबत शासनाचे धोरण

मु.शी.: विविध शासकीय कार्यालये, उपक्रम, स्वायत्त संस्था इत्यादींना लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीबाबत शासनाचे धोरण यासंबंधी माननीय उद्योग मंत्र्यांचे निवेदन.

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेसः येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

या नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या ठिकाणी काल भ्रष्टाचाराबाबत चर्चा झाली. सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप व आम्ही सगळयांनी दिनांक 18 डिसेंबर, 2014 च्या 3 लाखावरील खरेदीच्या संदर्भातील जी.आर.चा उल्लेख केला होता. तुमची निविदा रेट कॉन्ट्रॅक्ट ऐवजी रेट फिक्सिंगची आहे, ती नियमबाह्य आहे, बेकायदेशीर आहे हे आम्ही सांगितले. पूर्वीचा निर्णय तुम्ही मान्य करीत आहात. यापूर्वी झालेली खरेदी ही रेट कॉन्ट्रॅक्ट ऐवजी रेट फिक्सिंगने झाल्याचे तुम्ही मान्य करीत आहात. ती खरेदी चुकीच्या पध्दतीने झाली त्यामुळे शासनाला पश्चातबुध्दी झाली, हे सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

श्री.एकनाथराव खडसे : हे करायचे नाही का?

श्री.शरद रणपिसे : आम्ही आवाज उठविला म्हणून तुम्हाला जाग आली.

श्री.एकनाथराव खडसे : त्यापेक्षा अधिक पारदर्शकता यावी म्हणून हे धोरण आणले आहे. तुमची इच्छा असेल तर हे धोरण आम्ही मागे घेतो. त्यामध्ये काही काळेबेरे नाही. आमची प्रामाणिक इच्छा आहे. यापेक्षा अधिक पारदर्शकता आली पाहिजे. जे धोरण आणले आहे त्यामध्ये तुमच्याकडून सूचना मागविल्या आहेत. त्यामध्ये काही वस्तूंना सूट दिलेली आहे. नैसर्गिक आपत्ती, पूर, कुंभमेळा, चेंगराचेंगरी किंवा अन्य परिस्थितीत औषधांची खरेदी असेल अशा वस्तू तत्काळ खरेदी करण्याच्या संदर्भात सवलत देण्यात आली आहे. अंध, अपंग संस्थांना सवलत दिलेली आहे. तुम्हाला मान्य नसेल तर धोरण मागे घ्यायला आमची काही हरकत नाही.

श्री.शरद रणपिसे : आमच्यामुळे हे केलेले आहे.

श्री.एकनाथराव खडसे : मागचा अनुभव लक्षात घेऊन आम्ही ते केलेले आहे. कित्येक वर्षाचा तुमचा अनुभव लक्षात घेऊन आम्हाला हे धोरण आणावे लागले. तुम्हाला जमले नाही ते करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. तुमच्यामुळे करीत नाही. हे आम्ही नाकारीत नाही. तुम्ही यासाठी 100 टक्के जबाबदार आहात. म्हणून हे धोरण आणले आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, या धोरणाचे श्रेय ज्यांना घ्यायचे असेल त्यांनी घ्यावे. त्याला आमची ना नाही. परंतु चांगले धोरण आम्ही आणले आहे. हे धोरण काटेकोरपणे अंमलात आणले जाईल. त्यासाठी आम्ही दोन महिन्यांची मुदत दिली आहे. अधिक सूचना मागवित आहोत. सन्माननीय सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्या कराव्यात, आम्ही स्वागत करु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानाची अंमलबजावणी

मु.शी.: केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानाची अंमलबजावणी यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नागपूर-अमरावती-औरंगाबाद-घोटी-मुंबई कम्युनिकेशन सुपर एक्स्प्रेस वे

मु.शी.: नागपूर-अमरावती-औरंगाबाद-घोटी-मुंबई कम्युनिकेशन सुपर एक्स्प्रेस वे यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 50 कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करामधून सूट देणे

मु.शी.: 50 कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करामधून सूट देणे यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

नंतर 2एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 46 अन्वये निवेदन करण्याबाबत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विधिमंडळात झालेल्या चर्चेच्या उत्तरात ज्या घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केल्या होत्या, त्या सर्व घोषणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्याला मंत्रिमंडळ निर्णयात परावर्तित करण्यात आले असून या सर्व बाबतीत जीआर सुद्धा जारी करण्यात आले आहेत. पाच वर्षांमध्ये 25000 कोटींचा कालबद्ध कार्यक्रम शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यास सरकार वचनबद्ध असून शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्याची हमी आणि शिक्षणाचा अधिकार या तिन्ही बाबतीत भक्कम करण्यासाठी सरकारने पुढकार घेतला आहे. शेतकऱ्यांना कर्ज सह उपलब्ध व्हावे, त्यांना कमीत कमी व्याज आकारले जावे याचीही काळजी सरकारतर्फे घेण्यात येत आहे. सभागृहाच्या माहितीसाठी म.वि.प.नियम 46 अन्वये निवेदन करण्यास आपण मला अनुमती द्यावी.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. शेतकऱ्यांच्याबाबतीत माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे निवेदन करीत आहेत. सभागृहाचे नेते येथे उपस्थित आहेत. कृषी विभाग देखील त्यांच्याकडे आहे. निवेदन मात्र ज्यांच्याकडे कृषी खाते नाही त्या राज्यमंत्र्यांकडून होत आहे. हा झाला पाहिला विषय. या निवेदनाच्या आधी माननीय राज्य मंत्र्यांनी एलबीटीवर निवेदन केले आहे. आपण महानगरपालिकांच्याबाबतीत शब्द दिला होता तो पाळत आहात. या निवेदनात नागरी भागातून प्राप्त असा उल्लेख आहे. म्हणजे नगरपालिकेमधून प्राप्त होणारे उत्पन्न देखील आपण महानगरपालिकेकडे वळते करणार आहात काय ? ग्रामीण भागातून मिळणारे उत्पन्न आपण वळते करणार आहात काय ? कृषी खात्याचे निवेदन कृषी मंत्र्यांनी द्यावे अशी आमची मागणी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांनी सदनामध्ये जाहीर केले होते की, आम्ही एलबीटी रद्द करू. एलबीटी रद्द केल्यामुळे सात हजार कोटी रुपयांचा बोजा पडत आहे. तो बोजा ग्रामीण भागावर किंवा नगरपालिकांच्या हद्दीमध्ये येऊ नये असा आमचा आग्रह आहे. सात हजार कोटी रुपयांच्या आर्थिक बोजासाठी शासनाने वेगळा फंड उभा केला पाहिजे. हा ग्रामीण भागावर अन्याय आहे. तेव्हा यासाठी आपण निधी आणणार कुठून हे स्पष्ट करावे. आपण 25 हजार कोटी कसे देणार आहात हे देखील सांगितले नाही. सात हजार कोटी रुपयांचा भूर्दंड कोणावर पडणार आहे हे प्रथम आपण स्पष्ट केले पाहिजे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना एकच उदाहरण सांगणार आहे. त्याचे स्पष्टीकरण आपण करावे. आपण आमचे समाधान केले तर आम्हाला आनंदच आहे. एलबीटी रद्द करू असे आपण सांगितले होते. तो शब्द आपण पाळला नाही. आता आपण 50 कोटी रुपयांवर आला आहात. पुणे महानगरपालिकेमध्ये 50 कोटी रुपयांच्या वर ज्यांची उलाढाल आहे असे फक्त 122 एलबीटीधारक आहेत. आता फक्त 70 हजार एलबीटीधारक आहेत. या निर्णयानुसार 70 हजार मधून फक्त 122 वजा होतील आणि तेच एलबीटीधारक होतील. ....(अडथळा)..... पुणे महानगरपालिकेला 70 हजार एलबीटीधारकांपैकी फक्त 122 एलबीटीधारकच उत्पन्न देतील. 122 एलबीटीधारकांनी उत्पन्न दिले तर आज जे उत्पन्न येत आहे ते फक्त 25 टक्क्यांवर येईल. त्यामुळे पगार भागविण्यासाठी देखील पैसे राहणार नाहीत. मग हा जो पैसा आहे तो शासन कुठून देणार आहे ? व्यापाऱ्यांना जो फायदा होतो त्यातून एलबीटी गोळा झाला पाहिजे. एलबीटी आपण सर्वसामान्यांवर लावू नका अशी माझी विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या सरकारने आणि प्रामुख्याने आम्ही निवडणुकीमध्ये दिलेला शब्द पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या राज्यातील महानगरपालिका एलबीटी मुक्त झाल्या पाहिजेत या दृष्टीने कालच्या मंत्रिमंडळामध्ये या राज्यातील एलबीटी 1 ऑगस्टपासून मुक्त करण्याचा निर्णय घेतला. ज्या व्यापाऱ्यांची उलाढाल 50 कोटी रुपयांच्या वर आहे अशांना एलबीटी भरण्याचा निर्णय आम्ही ठेवला आहे. साधारणत: 99.85 टक्के व्यापारी हे एलबीटीमधून मुक्त होतील. या महानगरपालिकांना 50 कोटी रुपयांच्यावरील उत्पन्न देण्यात येईल. आपल्या मनामध्ये स्टॅम्प ड्युटीसंबंधी देखील काही शंका आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची नवीन स्टॅम्प ड्युटी लावली जाणार नाही. त्या शहरामध्ये दरवर्षी 100 ते 150 कोटी रुपये इतकी स्टॅम्प ड्युटी जमा होत असेल तर ती स्टॅम्प ड्युटी जशीच्यातशी त्या महानगरपालिकेला देण्यात येईल. आज स्टॅम्प ड्युटी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा होते. हा निधी नगरपालिका किंवा महानगरपालिकांना द्यायचा असेल तर तो परत बजेटच्या माध्यमातून द्यावा लागतो. तो सरळ देता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

येत नाही. मागण्या किंवा सप्लीमेंटरी डिमांडच्या माध्यमातून हा निधी विधिमंडळाकडूनच देता येईल. त्यामुळे स्टॅम्प ड्युटीपोटी दर महिन्याला जो निधी जमा होईल तो परस्पर त्यांना दिला जाईल. यासाठी एक समिती नियुक्त केली जाईल. जिल्हाधिकारी त्या समितीचा अध्यक्ष असेल. त्यात ट्रेझरीमधील अकौंटस ऑफिसर्स असतील, महानगरपालिकेचे आयुक्त असतील. स्टॅम्प ड्युटीद्वारे गोळा झालेला निधी येथे न पाठवता तो परस्पर महानगरपालिकेला देण्याचा निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे महानगरपालिकेला देखील सरळ निधी उपलब्ध होईल. एलबीटीच्या माध्यमातून महानगरपालिकेला निधी उपलब्ध होत होता जवळपास तेवढा किंवा त्यापेक्षा अधिक निधी त्यांना प्राप्त होईल.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .....

एलबीटीच्या माध्यमातून 50 कोटी रुपयांच्यावर ज्या व्यापाऱ्यांचा व्यवहार आहे त्यांनी कर दिल्यानंतरही पूर्वीच्या 5 वर्षाची सरासरी काढून अधिकाधिक उत्पन्न मिळत होते ते गृहीत धरुन त्यामध्ये जर काही कमी पडत असेल तर राज्य सरकार त्या महानगरपालिकेला अनुदान स्वरुपामध्ये देण्याचा प्रयत्न करेल असा निर्णय झालेला आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्य सरकारचा स्टॅम्प डयूटीच्या संदर्भात राज्य शासनाचा जो एकत्रित फंड असतो त्यामध्ये तो फंड जाईल आणि तेथून मग तो महानगरपालिकेला स्टॅम्प डयुटीच्या माध्यमातून जेवढा फंड आला असेल तो कमिटीच्या माध्यमातून त्या महानगरपालिकेला जाईल. आपणच सांगत आहात की, यामधून फार मोठा फंड उपलब्ध होणार नाही, सरळ सरळ सरकार भरणार नाही. आपण पुढे असेही सांगत आहात की, जर तफावत असेल तर आम्ही त्याचा विचार करु. याचा अर्थ यामध्ये आपली स्पष्टता दिसून येत नाही. स्टॅम्प डयुटीच्या माध्यमातून हा फंड जरी आला नाही तरी शासन एकत्रित फंडामधून 7 हजार कोटी रुपये एलबीटीच्या नावाने भरुन देईल.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हा विषय सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना समजला नसावा त्यामुळे हा विषय त्यांना समजून द्यावा लागेल. अनुदान याचा मदत असा होतो. कमी पडल्यास अनुदान स्वरुपात देण्यात येईल असा शब्द मी वापरला आहे. यापेक्षा अधिक स्पष्ट मी शिकलो नाही. यासंदर्भात आम्ही निधी कमी पडू देणार नाही,उलट यासंदर्भात आम्ही असे म्हटले आहे की, 5 वर्षाची सरासरी लक्षात घेऊन सर्वात अधिक उत्पन्न आले असेल ते सरासरीमध्ये गृहीत धरुन, लागल्यास त्यासाठी 8 टक्के अधिकचे देऊ. परंतु महानगरपालिकेला नुकसान पोहचू देणार नाही हा आमचा निर्णय आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, एलबीच्या माध्यमातून 7 हजार कोटी रुपये ....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, खरे म्हणजे तुम्ही एलबीटी लावली असून ती माफ करण्याची वेळ आमच्यावर आली आहे. तुम्ही करायचे, आणि आम्ही फेडायचे, आणि पुन्हा चार प्रश्न विचारावयाचे ? आहे ते मान्य करुन स्वागत करुन काही तरी मोठेपण दाखवा ? या सरकारने शब्द पाळला यासंदर्भात तरी तुम्ही मोठेपण दाखवावयास पाहिजे होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे :सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी असे शब्द वापरणे योग्य नाही. एलबीटीच्या संदर्भात महानगरपालिकेला जे उत्पन्न होणार नाही ते राज्य शासनाच्या तिजोरीतून 100 टक्के देऊ असे राज्य शासनाने सांगावे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मघाशी मी यासंदर्भात सांगितले आहे. या निर्णयाला सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचा विरोध असेल तर एलबीटीचा निर्णय अभ्यास करुन आपण पुढील वर्षी घेऊ, बजेटमध्ये घेऊ. तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्या आग्रहास्तव हा निर्णय स्थगित करतो. यामध्ये व्यापाऱ्यांशी चर्चा करुन 90 टक्के देणार की, 100 टक्के देणार यासंदर्भात वर्ष दोन वर्षात निर्णय झाल्यानंतर तुमच्या आग्रहास्तव लागू करु. यासंदर्भात तुमची तयारी असेल तर सांगा.आम्ही देऊ शकतो की, देऊ शकत नाही यापेक्षा आम्ही जे केले त्याचे तुम्ही कौतुक केले पाहिजे. तुम्ही हा निर्णय करु शकला नाही त्यामुळे माननीय श्री. ठाकरे साहेबांचे दु:ख मी समजू शकते. असा निर्णय घेतल्यामुळे कधी कधी माणसाला पोटशूळ उठतो. 99.85 टक्के लोकांना या निर्णयाचा लाभ होणार आहे हा आपल्या दृष्टीने मोठा निर्णय नाही ? मी महानगरपालिकेच्या संदर्भात सांगितले आहे की, तरीही उत्पन्न कमी पडत असेल तर त्यांना सरकार अनुदान स्वरुपात देईल. एलबीटी माफ करण्याच्या संदर्भात जी मागणी होती त्या मागणीच्या संदर्भात मार्ग काढण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. 100 टक्के व्यापाऱ्यांशी चर्चा करुन हा निर्णय झालेला असून व्यापाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधीशी आम्ही बोललो आहोत. यासंदर्भात जे काही ते आम्ही क्लिअर केले आहे. (अडथळा) जास्त पारदर्शक दाखवले तर ते बरे नसते. आम्ही 99.85 टक्क्यापर्यंत आलो असून .15 टक्क्याच्या संदर्भात राज्य सरकारकडून गरज भासल्यास अनुदान स्वरुपात देऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

मु.शी.: शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्याचे निवेदन.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, जयंत पाटील, हेमंत टकले, भाई जगताप, शरद रणपिसे, सय्यद मुझफ्फर हुसेन, सुभाष झांबड, प्रा.जनार्दन चांदूरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री अनंत गाडगीळ, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वसामान्य जनतेला कोण राज्यकर्ते आहेत यापेक्षा राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था कशी चांगली राहील यादृष्टीकोनातून ते अपेक्षा करीत असतात. मागील आठ-दहा महिन्यांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे आणि कुठे ना कुठे या गोष्टीला शासन जबाबदार आहे हे नाकारता येत नाही.

सभापती महोदय, हयुमन रिर्सोसेस आणि ॲडमिनिस्ट्रेशन हा एक मापदंड लावला तर राज्यातील दहा कोटी लोकसंख्येसाठी किमान पाच लाख पोलीस कर्मचारी असणे आवश्यक आहे. तेव्हा कोण राज्यकर्ते होते आणि आता कोण राज्यकर्ते आहेत ही गोष्ट महत्वाची नाही. पण आजवर गृह खात्यासाठी पाहिजे तेवढी अर्थसंकल्पीय तरतूद झालेली नाही ही गोष्ट मात्र निश्चित आहे.

सभापती महोदय, राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अतिशय चांगली आहे असे सरकारचे मत आहे. त्या अनुषंगाने हे सरकार 70 हजार पोलीस कर्मचाऱ्यांची भरती करणार आहे. माझ्या मते दीड लाख पोलीस कर्मचाऱ्यांनी भरती करण्याची आवश्यकता आहे. सरकार तेवढी भरती करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

सभापती महोदय, राज्याचे शहरीकरणाचे प्रमाण 50 टक्के आहे. राज्यामध्ये शहरीकरण वाढते तेव्हा समस्या वाढत असतात. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते. याचे कारण म्हणजे जे लोक स्थलांतरित होतात त्यामध्ये फक्त राज्यातील लोकांचा समावेश असतो असे नाही तर अन्य राज्यातील लोकांचा देखील समावेश असतो. आपण मागील काही वर्षातील चोरी, चैन स्नॅचिंग, मोलास्टेशन, रेप, अशा गुन्ह्यांमध्ये पडकलेले आरोपी पाहिले तर ते स्थलांतरित असल्याचे दिसून येईल. हे प्रमाण साधारणतः 70 ते 75 टक्के आहे. आपणास या गुन्हयावर नियंत्रण आणायचे असेल तर पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, पोलीस ट्रेनिंगसाठी चांगले इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याची गरज आहे. हे इन्फ्रास्ट्रक्चर शासन उभे करणार आहे काय असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, जिल्हा, तालुका स्तर आणि मोठ्या पोलीस स्टेशनला इकॉनॉमिक ऑफेन्स विंग्ज आहेत. तत्कालीन सरकारने त्या उभ्या केल्या आहेत. महिलांच्या प्रश्नांसाठी महिला अधिकारी नेमले आहेत. समाजामध्ये दंगे होऊ नयेत म्हणून किंवा अन्य गोष्टी होऊ नयेत म्हणून अल्पसंख्याक भागामध्ये अल्पसंख्याक समाजातील पोलीस अधिकारी नेमलेला आहे. पोलीस स्टेशनमधील इकॉनॉमिक ऑफेन्स विंग्जसाठी एक पी.एस.आय किंवा एक पी.आय. किंवा एक अधिकारी आणि दोन महिला अधिकारी नेमण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्याला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकणातील किनारपट्टीवर कायदा आणि सुव्यवस्थेचे खूप मोठे आव्हान आहे. केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे तत्कालीन सरकारने सागरी आयुक्तालय आणि पोलीस स्टेशन उभे करण्याचे काम हाती घेतले होते. काही ठिकाणी पोलीस स्टेशन्स झाली, पण ती पाहिजे त्या प्रमाणात झाली नाहीत. ही सर्व कामे आपण किती ताकदीने करणार आहात, किती दिवसांत करणार आहोत, मागील काही महिन्यांमध्ये काही काम झालेले आम्हाला दिसले नाही. माझी शासनाला विनंती आहे की, बजेटमध्ये कोणतीही नव्याने तरतूद केली नाही. तेव्हा आपण या बाबतीत काय करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

सभापती महोदय, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहण्यासाठी आपणास पोलिसांचे मनोबल वाढविले पाहिजे. परंतु या सरकारच्या कार्यकाळात पोलिसांच्या खच्चीकरणाचे काम होत आहे. पोलीस दलाला सुद्धा पोलिटीलायझेशन करण्यात आलेले आहे. अमूक एक अधिकारी तत्कालीन राज्यकर्त्यांच्या जवळचे होते, लांबचे होते असे पाहिले जात आहे. असे होता कामा नये. आपण पोलिसांचे मनोबल वाढले पाहिजे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सीआरपीसीमधील 41 (अे) मध्ये सुधारणा झाली. सेक्शन 41 (अे)मध्ये असे म्हटले आहे की, एखादी तक्रार प्राप्त झाल्यावर पोलिसांनी ताबडतोब कारवाई करुन अटक करावी. तर 41 (बी) मध्ये असे म्हटले आहे की, ज्या गुन्ह्यामध्ये सात वर्षापेक्षा कमी सजा आहे अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी न्यायालयाची परवागनी घ्यावी. ज्याच्या विरोधात तक्रार आली आहे, त्याला नोटीस बजावावी. मी आपणास सांगू इच्छितो की, चोरी, चैन स्नॅचिंग, मोलास्टेशन, रेप या गुन्ह्यांमध्ये सुद्धा सात वर्षाची कारावासाची शिक्षा आहे. पोलिसांवर राजकीय दबाव खूप असतो. महिला आणि लहान मुलांवरील अत्याचारात वाढ झाली आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सेक्शन 41 (अे) मध्ये जी सुधारणा झालेली आहे त्याचा सदुपयोग होत आहे आणि दुरुपयोगही होत आहे. आपणास कायदा आणि सुव्यवस्था चांगली ठेवायची असेल तर आपणास पोलीस दल बळकट करुन त्यांचे मनोबल वाढविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, पोलिसांवर राजकीय दबाव असतो. ते राजकीय दबावाखाली वावरत असतात. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे सीआरपीसी ॲक्टमध्ये जी सुधारणा आलेली आहे त्याचा सदुपयोग आणि दुरुपयोगही होतो. कोणीही जातो आणि कोणाच्याही विरोधात तक्रार नोंदवितो. माझा मुद्दा एवढाच आहे की, पोलीस सात वर्षापेक्षा जास्तीची शिक्षा असलेले सेक्शन लावतात.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारण ते गुन्हे त्या स्वरूपाचे आहेत. अशाप्रकारे राज्यात महिलांचे, मुलांचे अपहरण करणे, त्यांच्यावर बलात्कार करणे, चेन स्नॅचिंग, चोरी, दरोडे, घरफोडी यासारखे अनेक प्रकार वाढलेले आहेत.

सभापती महोदय, सीआरपीसीच्या सेक्शन संदर्भात मी एक उदाहरण सांगतो. आमच्या परिसरात एका राजकीय पक्षाच्या नगरसेवकाने 12 वर्षाच्या मुलीचा विनयभंग केला. परंतु पोलिसांनी राजकीय दबावाखाली सेक्शन-41 (B) नुसार त्या नगरसेवकाला नोटीस दिली. त्यानंतर त्या नगरसेवकाने त्या नोटीशीच्या अनुषंगाने न्यायालयातून अँटीसिपेटरी बेल आणली. महोदय, मी न्याय पालिकेवर टीका करीत नाही. माननीय न्यायालयाचे आदेश सर्वमान्य आहेत. परंतु सदरहू अँटीसिपेटरी बेलवर न्यायालयामध्ये सातत्याने दोन महिने सुनावणी चालली. दोन महिन्यानंतर न्यायालयाने त्या नगरसेवकाची अँटीसिपेटरी बेल कायम ठेवली. तद्नंतर त्या नगरसेवकाने अर्ज केला. परंतु त्या दिवशी पोलिसांचे म्हणणे ऐकून न घेता न्याय पालिकेने अँटीसिपेटरी बेल दिली. महोदय, अशी अनेक उदाहरणे आहेत. मी पुन्हा सांगतो की, राज्यामध्ये महिला व मुलांवरील अत्याचार वाढलेले आहेत. मी विचारु इच्छितो की, सीआरपीसीच्या सेक्शन-41 मध्ये ज्या सुधारणा झाल्या त्या बाबतीत शासन काय कार्यवाही करणार आहे ? महोदय, मी अतिशय गंभीर आणि सर्वसामान्य जनतेशी निगडित असा विषय मांडत आहे. राज्यात गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक ठिकाणी खूनच होतात असे नाही. त्यामुळे या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, पोलीस दलाने गुन्हे नोंदवून राज्यातील कायदा व सुव्यवस्था योग्यप्रकारे राखली पाहिजे. पोलिसांनी नोंदविलेल्या गुन्ह्यांचा कन्व्हीक्शन रेट ज्यावेळी जास्त असेल आणि गुन्हेगारांना आपल्याला शिक्षा मिळेल अशी भीती जोपर्यंत वाटत नाही तोपर्यंत गुन्ह्यांचे प्रमाण कमी होणार नाही. त्यामुळे जोपर्यंत गुन्हेगारांना अशा प्रकारची भीती वाटत नाही तोपर्यंत कितीही उपाययोजना केल्या तरी राज्यातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रणात येणार नाही.

सभापती महोदय, स्मार्ट सिटी, प्रगत महाराष्ट्र राज्य या विषयी केवळ घोषणा करून काही होणार नाही. या ठिकाणी एल.बी.टी. बाबत निवेदन करण्यात आले. राज्य सरकारने एक काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

केले. परंतु मुंबईतील टोल नाक्यांच्या बाबतीत या सरकारने निर्णय घेतला नाही. महोदय, या राज्य सरकारला स्मार्ट सिटी आणि प्रगत राज्य घडवून आणावयाचे असेल तर, जोपर्यंत राज्यातील कायदा व सुव्यवस्था योग्यप्रकारे राखली जात नाही तोपर्यंत या राज्यात फॉरेन इन्व्हेस्टमेंट, डोमेस्टीक इन्व्हेस्टमेंट येणार नाही. तसेच इंडस्ट्रीअलायझेशन, एम्पॉवरमेंट, एम्प्लॉयमेंट किंवा शहरे जोपर्यंत सुरक्षित होत नाहीत तोपर्यंत स्मार्ट सिटी आणि प्रगत राज्याची घोषणा ही केवळ होर्डींग आणि टी.व्ही. जाहिरातींमध्येच दिसत राहील, एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे भाषण संपवितो.

उप सभापती : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या अंतिम आठवडा प्रस्तावावर आतापर्यंत सहा सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या प्रस्तावावरील चर्चा अजून किती वेळ चालवायची आहे ?

आता सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी दोन मिनिटांत आपले भाषण संपवावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी माझे भाषण लवकरात लवकर संपविण्याचा प्रयत्न करते.

सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 259 अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे. महोदय, या प्रस्तावावरील चर्चेवर बोलण्यासाठी मी अनेक मुद्दे काढले होते. परंतु आता वेळेची मर्यादा आल्यामुळे मी त्यातील दोन-चार महत्त्वाच्या मुद्यांवर बोलणार आहे.

सभापती महोदय, दिनांक 14 मे, 2015 रोजी ठाणे जिल्ह्यातील कल्याण स्टेशनच्या यार्डमध्ये एका बांगलादेशी महिलेवर बलात्कार झाला. त्या केसची माहिती घेण्यासाठी आम्ही तेथे गेलो असता मला सांगण्यात आले की, कलकत्ता किंवा बांगलादेश येथून मुलींना या ठिकाणी आणून त्यांची खुलेआम विक्री केली जाते. या ठिकाणी आणण्यापूर्वी त्यांना सांगितले जाते की, तुम्हाला घरकाम करण्यासाठी घेऊन जात आहोत. महोदय, केंद्र सरकारच्या अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा-1956 चे पोलिसांकडून पालन होताना दिसत नाही. रेड लाईट एरियामध्ये मुलींना आणून विकले जाते हे अनेक पोलीस स्टेशनला माहीत असूनही पोलिसांनी या कायद्याचा उपयोग करुन कारवाई केल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, नेरळमध्ये तीन तरुण मुलींनी तसेच अनेक महिलांनी तक्रार केली की, त्यांना एक गावगुंड सतत त्रास देतो. या संदर्भात 2004 पासून 2015 पर्यंत गावातील अनेक लोकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करुन सुध्दा त्याचा काहीच उपयोग झालेला नाही. ज्या मुलींनी तक्रार केली त्यांना आई नाही. महोदय, तेथील पोलीस उप अधीक्षक श्री.शालीग्राम आणि वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.आर.बी.पाटील यांना मी 15 दिवसांपूर्वी फोनवर सांगितले होते की, हे प्रकरण गंभीर असून, त्या मुलींची तक्रार घ्यावी. यावर त्या पोलीस अधिकाऱ्यांनी मला असे सांगितले की, त्या मुलींवर आम्ही ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल केलेले आहेत. यावरुन दिसून येते की, तेथील पोलीस गुंडांना मदत करीत आहेत. तेथील गुंड पोलिसांना त्या महिलांच्या विरुध्द ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यास सांगतात व पोलीस सुध्दा त्यांचे ऐकतात. अनेक ठिकाणी अशा घटना घडलेल्या आहेत. या घटनेतील गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम पोलीस स्टेशन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

खुलेआम करीत आहेत. या घटनेची माहिती घेण्यासाठी मी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती ज्योती कलानी पोलीस स्टेशनमध्ये गेलो होतो. आम्ही तक्रार करीत असताना तेथे अनेक गावकरी जमले. त्यांनी सांगितले की, आम्ही संबंधित गुन्हेगाराच्या विरोधात वारंवार तक्रारी करुन सुध्दा पोलिसांनी साधा एफआयआर देखील नोंदविला नाही. उलट जे लोक तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते त्यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. काही लोकांवर तशा प्रकारचे गुन्हे सुध्दा दाखल करण्यात आले. माननीय न्यायालयाला हे लोक कोण आहेत हे माहीत असल्याने न्यायालयाने सांगितले की, पोलिसांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंदवू नये. माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे गृह विभाग असल्यामुळे त्यांच्यावर राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे. त्या गावातील गाव गुंड तेथील लोकांना 15 वर्षे त्रास देत होता. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी उलट ग्रामस्थांवर ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्यात आले. या माध्यमातून मी विचारु इच्छिते की, गावकऱ्यांवर खोटे ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस उप अधीक्षक श्री.शालीग्राम पाटील आणि वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.आर.बी.पाटील यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात येईल काय ?

सभापती महोदय, मानखुर्द येथे दिनांक 5 एप्रिल, 2014 रोजी पीएमजीपी कॉलनीमध्ये सुरेश लोहत यांना काही गुंडांनी पूर्ववैमनस्यातून मारहाण करुन त्यांची हत्या केली. त्या पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शंकरसिंह राजपूत हे त्या गुंडांना आणि त्याच्या साथीदारांना मदत करीत आहेत. महोदय, आज मयत सुरेश लोहत यांची पत्नी, त्यांची मुलगी तसेच त्या भागातील लोक अत्यंत भयभीत झालेले आहेत. अशा प्रकारची हत्या होऊन सुध्दा पोलीस स्टेशन त्या लोकांना न्याय देत नसेल आणि त्यांच्या तक्रारी नोंदवून घेत नसेल तर हा एक गंभीर गुन्हा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.कांबळे....

श्रीमती विद्या चव्हाण ....

शासनाने याची दखल घेतली पाहिजे. राज्यात कायदा व सुव्यवस्था गरजेची आहे. मला अनेक विषयांवर बोलायचे होते. हे विषय खूप महत्त्वाचे आहेत. पोलीस स्टेशनला सर्वसामान्य माणूस जातो तेव्हा त्याचे अनुभव भयंकर असतात. सर्वसामान्य माणूस म्हणतो की, मी पोलीस स्टेशनची पायरी चढणार नाही. कारण मला त्याचा त्रास होईल. मात्र गुंडांना काहीही होणार नाही, त्यांच्या केसाला सुध्दा धक्का लागू शकणार नाही असा एक समज जनतेमध्ये निर्माण झाला आहे. लोकांना खरोखर कायदा व सुव्यवस्थेची गरज आहे. कायदा व सुव्यवस्था हा एका गंभीर विषय आहे. आपण आज त्या विषयावर चर्चा करीत आहोत. आम्ही तळगाळात काम करतो, महिलांमध्ये जातो, गावोगाव फिरतो, तेथे अनेक लोकांच्या तक्रारी आहेत. आता आपण सर्वजण भाषण करताना सुरूवातीला बोलतो की, गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. सभापती महोदय, हे प्रमाण का वाढले आहे तर गुन्हेगार प्रत्यक्ष पोलीस स्टेशनला जाऊन बसतात, पोलिसांचे आणि त्यांचे सलोख्याचे संबंध असतात. त्यामुळे गुन्हेगारांना कसलीच भीती नसते. मात्र सर्वसामान्य माणूस मात्र आज पोलिसांना घाबरून राहतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाचले आहेत, मग ते तुमचे सरकार असो वा आमचे सरकार असो. आम्ही कुठेतरी गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही ? महिलांवर, मुलींवर अत्याचार होत आहेत. प्रत्येक शहरात रेड लाईट एरिया आहेत, तेथे मुलींना कोंडून जबरदस्तीने त्यांना शरीर विक्री करायला लावतात, त्यांचे लैंगिक शोषण होते आणि तरी सुध्दा कायद्याचे पालन केले जाणार नसेल तर तर कायदा व सुव्यवस्थेवर बोलणे यास काहीही अर्थ राहत नाही. ठीक आहे. सभापती महोदय, मला वाटते की, आता आपण बेल वाजविली आहे. आपण मला बोलण्यास 2 मिनिटे संधी दिली. धन्यवाद !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर बरीच चर्चा झाली आहेत आणि त्यामध्ये सव विषयही झाले आहेत. त्यामुळे मी अधिक वेळ न घेता या प्रस्तावावर 5 मिनिटे बोलणार आहे. जास्त वेळ घेणार नाही. अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करताना राज्यातील कायदा व सुव्यवस्था हा विषय प्रामुख्याने चर्चिला गेला. परंतु राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री यांच्या गावात नागपूरमध्ये गेल्या 8 महिन्यांत काय परिस्थिती आहे ? आपण गेल्या 8 महिन्यांतील तेथील परिस्थिती पाहिली आहे, तेथे 5 आरोपी जेल फोडून पळून गेले, दिवसाढवळ्या दुकाने लुटली गेली. अशी कितीतरी प्रकरणे माननीय मुख्यमंत्र्यांच्या गावात नव्हे तर त्यांच्या घराजवळ घडल्याचे आपण गेल्या 8 महिन्यांत पाहिले आहेत. जनतेने ज्या अपेक्षांनी हे सरकार आणले, ते सपशेल फेल गेले आहे. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड असंतोष आहे, असे प्रस्तावामध्येही म्हटले आहे. अजूनही आपल्याला सर्व सुधारणा करण्यासाठी खूप वाव आह. माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेक वेळा असे चित्र उभे केले की, आता हे राज्य सुजलाम-सुफलाम होईल, राज्यात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हायटेक करण्यात येईल. परंतु तसे काहीही झाले नाही. राज्यात दारूबंदीचा कायदा आणण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर प्रयत्न केले जातात. यवतमाळमध्ये विरेंद्र राठोड नावाचे सरपंच होते, ज्यांना गावात दारूबंदी झाली पाहिजे म्हणून एका महिलेने फोन केला, ते त्या बैठकीसाठी गेले. विरेंद्र राठोड यांनी त्याच ठिकाणाहून वडगाव पोलीस स्टेशनला फोन केला आणि तेथील पोलीस प्रमुखांना सांगितले की, तुम्ही लवकर येथे यावे, बैठकीत येथे थोडी वादावादी सुरू आहे. आपण या बैठकीत यावे. मात्र वडगाव पोलीस स्टेशनने त्याकडे लक्ष दिले नाही. ते आले नाहीत. राज्यातील पोलिसांना कोणत्याही प्रकारच्या संवेदना उरलेल्या नाहीत. सभापती महोदय, एक तासामध्ये विरेंद्र राठोडची अक्षरशः डोक्यात दगड मारून मारून, दगडाने डोके ठेचून त्यांची हत्या करण्यात आली. पोलीस त्यावेळी आले असते तर विरेंद्र राठोड यांची हत्या झाली नसती. ते केवळ सरपंच नव्हते, त्या गावातील तंटामुक्ती अभियानाचे अध्यक्ष होते, पोलीस पाटील होते, त्यांचे 25 गावांमध्ये चांगले नाव होते, अशा या विरेंद्र राठोड नावाच्या व्यक्तीला तेथे मृत्युमुखी पडावे लागले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड ....

विरेंद्र राठोड हे दारूबंदीसाठी शहीद झाले आहे असे मी म्हणेन. दारूबंदीच्या संदर्भातील कार्य त्यांच्या हातून घडलेले आहे. सभापती महोदय, अनेक प्रकार घडले आहेत. कालच आमच्या उंबरीला एक लाख रूपयांची हातभट्टीची दारू पकडली गेली. उंबरी मिशन हॉस्पिटल आहे. मुंबई मालवणीमध्ये विषारी दारूमुळे 104 जण मृत्युमुखी पडले.

सभापती महोदय, मी ऐकत आहे की, राज्यात, मुंबईत बोगस लॉटरी, कॅसिनिओ, इन्स्टंट लॉटरी यांची दुकाने प्रत्येक वॉर्डात उभी आहेत. परवा एक जैन वृध्द व्यक्ती माझ्याकडे आली, त्यांनी मला विनंती केली आणि ते म्हणाले की, राठोड साहेब अशा प्रकारची लॉटरी, इन्सटंट लॉटरी चालते, त्यामध्ये माझा मुलगा बरबाद झाला आहे. माझ्या मुलाला मी एक दुकान उघडून दिले, त्याला संपूर्ण उभे करून दिले, परंतु त्याची सवय काही जात नाही, आपण यामध्ये काही तरी करावे, आपण राज्याच्या विधानपरिषदेत आहोत, आपण हा प्रश्न सरकारपुढे मांडावा. सभापती महोदय, मी ही लॉटरी बघितलेली नाही. परंतु माझी आपल्याला विनंती आहे की, अशा प्रकारच्या लॉटऱ्या सुरू असतील तर त्या सरकारने बंद कराव्यात. सरकार त्या बंद करणार आहे की नाही ?

सभापती महोदय, पत्रकारांवर खूप हल्ले होत आहेत. प्रामाणिकणे काम करणाऱ्या, भ्रष्टाचार उघड करणाऱ्यांवर हल्ले होत आहेत. विरेंद्र राठोड यांच्यासारखीच त्यांचीही हत्या होत आहे. सभापती महोदय, या प्रकरणाची दुसरी बाजू अशी की, पत्रकारांच्या नावाने फित पत्रकारिता चालते, बोगस पत्रकार आहेत, जे छोट्या वृत्तपत्रांत कामे करतात. आपल्याला एका-एका तालुक्यात 200-300 वृत्तपत्रे पहावयास मिळतील. कोणीही आपले कार्ड छापतो आणि मी पत्रकार आहे असून सांगून माहिती मिळवितो. सभापती महोदय, त्यांना माहिती मिळवायची नसते. हे पत्रकार गुंडगिरी करून वसुली, हप्ता वसुली असे प्रकार करीत असतात. एका उच्च पोलीस अधिकाऱ्यांनी मला विनंती केली की, साहेब, आपण हे कधी तरी विचारा. सभापती महोदय, पत्रकार अशा पध्दतीने पुढच्या माणसाला त्रास देतात आणि त्यामधून हत्या होते. माझी शासनाला विनंती आहे की, पत्रकारांना ओळखपत्र द्यावे, पोलिसांद्वारे प्रमाणपत्र द्यावे की हे पत्रकार खरोखर पत्रकार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड ..

आहेत, ते पत्रकार आहेत की नाहीत याचा पुरावा, मोजदादा असला पाहिजे. काही पत्रकार पत्रके काढून फिरतात आणि मी पत्रकार आहे असे सांगतात, अशा बाजारू वृत्तपत्रांकडून अशा पध्दतीने होत असेल तर पत्रकांरावरील हल्ले थांबणार नाहीत तर ते उलट वाढतील. मी हे सर्व खऱ्या पत्रकारांचा सन्मान ठेवून बोलत आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

पत्रकारांचा सन्मान ठेऊन त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. परंतु, अशा प्रकारचा अन्याय वाढू नये, असे वाटते. पोलीस खात्यावर प्रचंड ताण आहे, हे कोणी नाकारु शकत नाही. परंतु, पोलीस खात्यामध्ये रजेसंबंधी, सवलती संबंधी किंवा पोलिसांच्या वागणुकीसंबंधी ब्रिटिशकालीन कायदे आहेत. पोलील अधीक्षकांच्या घरात, मोठ्या अधिकाऱ्यांच्या घरात त्यांच्या सेवेसाठी 10-10 शिपाई असतात आणि ते त्या पोलिसांना ब्रिटिशांसारखे वागवितात. ब्रिटिश काळामध्ये जे नियम होते, ते अजूनही आहेत. त्यामुळे ब्रिटिशकालीन अधिकाऱ्यांसारखी वागणूक या राज्यातील पोलिसांची आहे व त्यामुळे पोलिसांवर प्रचंड मानसिक ताण येतो. मागील अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, जर आम्ही पोलिसांना रजा देऊ शकलो नाही तर एक दिवसांचा पगार त्यांना देऊ. या घोषणेचे काय झाले आहे ? याबाबत अद्याप निर्णयच झालेला नाही. याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी केला पाहिजे. एकीकडे पोलिसांना राहण्यासाठी घरे नाहीत. मुंबई शहरात तर पोलीस झोपडपट्टीत राहतात. ते 12-12 तास डयुटी करतात. आपण पोलिसांकडून अपेक्षा करतो. पण त्यांच्याही काही अपेक्षा शासनाकडून आहेत आणि त्या शासनाने पूर्ण केल्या पाहिजेत.

सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत नेहमीच ऐकतो. पण काल एका शिक्षकाने आत्महत्या केली आहे. भटक्या व विमुक्तांच्या 141 आश्रमशाळेतील 2 ते 3 हजार लोक गेल्या 9 दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.दिलीप कांबळे यांनी त्यांना भेट दिली. पण आश्वासनाशिवाय त्यांना काही दिले नाही. कालपरवापर्यंत गेल्या तीन दिवसांपासून तो शिक्षक आझाद मैदानामध्ये होता व तेथून जाऊन त्याने आत्महत्या केली. मागासवर्गीयांबाबत हे शासन एवढे उदासिन का आहे ? भटक्या व विमुक्तांबद्दल प्रश्न उपस्थित झाला की, त्याबाबत निर्णय होत नाही. अनुसूचित जातीच्या 288 आश्रमशाळांबाबत अद्याप निर्माण झालेला नाही. त्यामुळे शिक्षक आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाले आहेत. हे शिक्षक 12-12 वर्षे वेतनाविना काम करीत आहेत. एखादा दिवस आमच्या पगाराला विलंब झाला तर आम्ही लगेच त्याबाबत चौकशी करतो. हे लोक अनेक वर्षापासून विनावेतन काम करीत आहेत आणि सरकारकडून काही तरी निर्णय होईल, या आशेवर आहेत.

सभापती महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या प्रस्तावावर चर्चा करीत असताना प्रामुख्याने राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. परंतु, या अंतिम आठवडा प्रस्तावातील शेवटच्या चार ओळी म्हणजे "मुंबई महानगराकडे महानगरपालिका, राज्य शासन व एम.एम.आर.डी.ए.यांच्या होणाऱ्या दुर्लक्षामुळे मुंबईकरांचे असह्य झालेले जीवन, महानगरपालिकेतील भ्रष्ट कारभार, गेल्या दहा वर्षात नालेसफाईवर हजारो कोटी रुपये खर्च होऊन देखील दरवर्षी पावसाळ्यात मुंबई तुंबुन जनजीवन ठप्प होणे....." याबाबत कोणीही विचार मांडलेले नाहीत. मी मुद्दाम या विषयावर बोलणार आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये केंद्रीय समिती आली होती. त्यांनी मुंबईसमोर पर्यावरणाच्या जटील समस्या म्हणजे जल, वायू, ध्वनी प्रदूषण, खारफुटीचे संकट, मलनिस्सारण, घनकचरा व्यवस्थापन, सीआरझेड नियमांची अंमलबजावणी, मच्छिमारांच्या समस्या असा पर्यावरणीय दृष्टीकोनातून वेध घेतला. मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारावर या सभागृहात आपण अनेक वेळा बोललो आहोत. मुंबई महानगरपालिकेचे माजी महापौर म्हणून ज्यांनी काम पाहिले आणि आता जे परिवहन मंत्री आहेत, असे सन्माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सभागृहात उपस्थित आहेत. असंख्य वेळा मी मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचारावर बोललो आहे. परंतु, त्याबाबत काही करायचेच नाही, असे तुम्ही ठरविलेले आहे. सरकारमध्ये आपण आहात, महानगरपालिकेचा कारभारही आपल्याच हातात आहे. मी मागील 18 वर्षाचे सांगतो आहे. या काळात भरपूर भ्रष्टाचार झाला आहे. खरे म्हणाल तर पावसाचे पाणी तुंबल्यानंतर मुंबई ठप्प होते. हे पाणी बाहेर काढण्यासाठी ब्रिम स्ट्रोवेड प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली होती. परंतु, या प्रकल्पाचे काम मुंबई महानगरपालिकेच्या दिरंगाईमुळे थांबले आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने 80 टक्के निधी दिला आहे आणि तो महानगरपालिकेला प्राप्तही झाला आहे. असे असताना काम मात्र केवळ 27 टक्केच झाले आहे. मुंबई पाण्यामध्ये गेली, असे आपण म्हणतो पण ती कोणामुळे गेली, हे आपण शोधत नाही. ब्रिमस्ट्रोवेड प्रकल्पासाठी पक्षाचे प्रमुख जातात, नारळ फोडतात, सुरुवात केली, असे सांगतात, करुन दाखविले, असेही सांगतात आणि पाऊस आल्यानंतर मुंबई तुंबते. इतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

भागामध्ये आपण पाण्याअभावी शेती करु शकत नाही आणि मुंबईमध्ये मात्र पाण्यामुळे आपण बाहेर पडू शकत नाही, अशी अवस्था आहे. मुंबई शहरातील 64 टक्के नागरीक मालमत्ता कर भरतात. पण त्याचा मोबदला महानगरपालिका त्यांना देत नाही. मग हा पैसा जातो कोठे, ते तरी शोधा. गटारातून पाणी जाऊ शकत नसेल तर केंद्राने दिलेला पैसा कोठे जातो, ते तरी शोधा.

सभापती महोदय, मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्यांची पावसाचे पाणी वाहून नेण्याची क्षमता ताशी 50 मि.मि.ने वाढविणे, नदी,नाल्यांचे रुंदीकरण आदी कामे सुरु आहेत व त्यासाठी 3500 कोटी रुपयांची गरज आहे, असे सांगितले गेले आहे. ब्रिमस्ट्रोवेड प्रकल्पाचे किती पैसे आले, किती पैसे आतापर्यंत खर्च झाले, कॉंट्रॅक्ट कोणाला दिला, मी नावे घेणार नाही, पण याबाबतची माहिती उत्तरातून आम्हाला मिळाली पाहिजे. या प्रकल्पाचे आतापर्यंत केवळ 27 टक्के काम झाले असेल तर जबाबदारी कोणाची आहे ? यामध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराला सरकार कसा आळा घालणार आहे. आपल्याबरोबर ते सत्तेमध्ये आहेत. कदाचित आपण फार मोठी कारवाई करु शकणार नाही, कदाचित करु देत नसतील, पाठिंबा काढून घेतला तर काय करायचे, ही भीती असेल. पण त्यासाठी मुंबईच्या सर्व नागरिकांना असहाय्य जीवन भोगायला का लावत आहात ? कुठे तरी कारवाईला सुरुवात करा.

सभापती महोदय, रस्ते अपघातात मृत्यू ओढवण्यामध्ये भारताचा पहिला क्रमांक असून मुंबईचा पाचवा क्रमांक आहे. मुंबईतील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून महापालिकेने नरिमन पॉईंट ते मालाड-मार्वे रोड पर्यंत 35.5 किलो मीटर लांबीच्या कोस्टल रोडची योजना आखली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळातील एका मंत्री महोदयांनी मुंबईत येऊन असे सांगितले की, या प्रकल्पाला 10 हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. या प्रकल्पाची रुपरेषा काय आहे, माहीत नाही, प्रकल्प कधी पूर्णत्वाला जाणार, माहीत नाही. 10 हजार कोटी रुपये मोठ्या मनाने, ढोबळमानाने आपण काढलेले आहेत. हे सुध्दा एक कुरणच होईल. अजून पर्यंत रस्त्याचा पत्ता नसताना रस्त्याला नाव कोणाला द्यायचे याबाबत वाद होत आहे. स्व.शिवसेना प्रमुखांचे नाव द्या, ही एक मागणी आली. ही रास्त मागणी आहे. आम्ही सुध्दा म्हणतो की, शिवसेना प्रमुखांचे योगदान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

महाराष्ट्रासाठी आणि मुंबईसाठी आहे, त्यांचे नाव द्या. काल बघतो तर समाजवादी पार्टीच्या नेत्यांनी स्व.अब्दुल कलामांचे नाव द्यावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे कोणाचे नाव द्यायचे, हे सरकारने ठरविले पाहिजे. अजून प्रकल्प कशात नाही, पैशांची तरतूद झाली किंवा नाही, माहीत नाही, आराखडा तयार नाही. ज्याप्रमाणे ब्रिम स्ट्रोवेड प्रकल्पाचा खर्च 3500 कोटी रुपये आहे, असे सांगितले त्याप्रमाणे या 10 हजार कोटी रुपयांचे आहे. खरोखर रस्त्याला 7 हजार कोटी रुपये लागतात की, 8 हजार कोटी रुपये लागतात की, 2 हजार कोटी रुपये बाजूला काढत आहात, हे आम्हाला कसे कळणार ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

म्हणजे मुंबई महानगरपालिकेला आपण खुलेआम सोडून दिलेले आहे. तुम्ही वाटेल ते करा, सरकार त्यावर काहीही निर्णय घेणार नाही, भ्रष्टाचार वाटेल तेवढा करा. आपण 33 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करता. मी आरोग्य विभागाचे एकच उदाहरण देऊन थांबणार आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरात असंख्य लोक ग्रामीण भागातून उपचार घेण्यासाठी येतात. मुंबईमध्ये अद्ययावत हॉस्पिटल्स आहेत. कोठेही उपचार होणार नाहीत. परंतु, मुंबई शहरात उपचार होतील, अशा प्रत्येक जिल्ह्यातील लोकांच्या भावना आहेत. कॅन्सरचे रुग्ण टाटा हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्यासाठी येतात. ते लोक रस्त्यावर झोपतात. परंतु, टाटा हॉस्पिटलमध्ये उपचार घेतात. मुंबईची खरी परिस्थिती काय आहे, हे जरा जाणून घ्यावे. मुंबई शहरात स्वाईन फ्लू, डेंग्यू, मलेरीया, क्षयरोग इत्यादी रुग्ण मोठ्या प्रमाणावर आहेत. सन 2011 ते 2014 या कालावधीत डेंग्यू रोगाची लागण झाल्यामुळे 52 लोकांनी आपले प्राण गमविले. मागील वर्षी क्षयरोगामुळे 7075 लोक मृत्यूमुखी पडले. भाई, ही माहिती आपल्याकडे देखील असेल. जानेवारी, 2015 मध्ये 10427 लोकांना क्षयरोगाची लागण झाली. त्यापैकी 610 रुग्णांचा मृत्यू झाला. क्षयरोगाची लागण झाल्यामुळे हॉस्पिल्समधील डॉक्टर, नर्स यांचा देखील मृत्यू झालेला आहे. आपल्याकडे त्यावरही उपाय नाही. एखाद्या ग्रामीण भागातील रुग्णालय असेल तर मी समजू शकतो. परंतु, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई शहरातील हॉस्पिटल्सची ही परिस्थिती आहे. लेप्टोचा धोका तर वाढलेला आहेच. लेप्टोचे 26 रुग्ण होते. त्यापैकी 12 रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. सन 2014 मध्ये लेप्टोचे 79 रुग्ण होते. त्यापैकी 4 रुग्णांचा मृत्यू झाला. मुंबई महानगरपालिकेने 33 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. आरोग्य विभाग मात्र दाखविते की, 223 कोटी रुपये आरोग्य विभागासाठी आणि रुग्णालयांसाठी 7314 कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यापैकी 11.50 इतकी रक्कम खर्च झालेली आहे. काय परिस्थिती आहे ? मग पैसा कोठे गेला, हे तरी शोधावे. आपण सरकार म्हणून याचा शोध घ्यावा. ज्यावेळी आपण विरोधी बाकावर बसत होता, त्यावेळी हे सर्व आरोप होत होते. तुम्ही 33 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

मांडत असाल तर यातील पैसे जातात कोठे ? मलेरीया हा संसर्गजन्य रोग आहे. आपण संसर्गजन्य रोगापासून लोकांचे प्राण वाचवू शकत नसाल तर 33 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प कशासाठी मांडायचा ? अशा भुलथापा देऊन लोकांच्या जीवाशी खेळ करावयाचा असेल तर यावर कारवाई होण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, विलेपार्ले येथे दिनानाथ नाट्यगृह आहे. मराठी नाट्यगृह असलेच पाहिजे. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सभागृहात उपस्थित आहेत. आम्ही इंग्रजी शब्दप्रयोग केल्यानंतर आम्हाला ताबडतोब थांबविणारे ते एकमेव व्यक्ती आहेत. आम्हाला अभिमान आहे. माननीय श्री.रावते साहेब मी हे चांगल्या मताने बोलत आहे. दिनानथ नाट्यगृहाची बांधणी झाली पाहिजे. मी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण तेथे गेलो होतो. त्यावेळी ते नाट्यगृह दोन वर्षापासून बंद होते. लवकरात लवकर कधी करणार आहात, किती पैसा आला, महानगरपालिकेने काय केले ? मी मे महिन्यात पुन्हा ते नाट्यगृह बघितले. त्या नाट्यगृहाचे उद्घाटन झाले, चांगली फुल वगैरे लावण्यात आली. परंतु, तिकडे काय आहे ते दिसले नाही. तुम्ही उद्घाटन केले आणि निघून गेले. परंतु, त्या नाट्यगृहाची अवस्था एवढी दयनीय आहे की, लोकसत्ता वृत्तपत्रात नाट्यगृहाचे फोटो छापून आले होते. ते फोटोग्राफ्स बघितल्यानंतर असे वाटले की, एवढा करोडो रुपयांचा खर्च करण्यापेक्षा पूर्वी जे होते तेच बरे होते. तुम्ही ते नाट्यगृह दोन वर्षे बंद ठेवता, त्याची दुरुस्ती केली जाते आणि दुरुस्तीसाठी करोडो रुपये खर्च केल्यानंतर विलेपार्ले येथील दिनानाथ नाट्यगृहाची अवस्था पूर्वीपेक्षाही वाईट आहे. आपण त्याची चौकशी करणार आहात काय ? त्यासाठी किती पैसे खर्च केले आणि खरोखर त्या वास्तूवर किती पैसे खर्च झाले, याचा तपशील आपण मांडणार आहात काय आणि हा तपशील मांडल्यानंतर ज्यांनी अशा पद्धतीने भ्रष्टाचार केला असेल त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

सभापती महोदय, बेस्टचे चेअरमन होणे हे फार मोठे आहे. माजी मुख्यमंत्री श्री.नारायण राणे साहेब बेस्टचे चेअरमन झाले आणि त्यांच्या कर्तृत्वाला उजाळा मिळाला. भाई, तुम्ही तिकडे काम केलेले नाही. तुम्ही हसत आहात, तुम्हाला कल्पना आहे. बेस्टचे चेअरमन म्हणजे काही तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

मोठे पद आहे. दक्षिण मुंबईतील रहिवाशांना बेस्ट उपक्रमातर्फे वीज पुरवठा केला जातो. विजेची बिले भरमसाठी आलेली आहेत. दूरचित्रवाहिन्यांवर सुद्धा काही बिले दाखविण्यात आली. जे लोक घरात राहत नव्हते, जे लंडन वगैरे गेले होते, त्यांना देखील 5-10 लाख रुपये बिल आलेले आहे. तुम्ही एप्रिल, मे आणि जून महिन्यात काय केले ? तर तुम्ही रॅन्डम बिले पाठविली. रॅन्डम बिल म्हणजे काय ? एप्रिल, मे महिन्यात जी बिले असतील तीच आपण पुढील महिन्यात घेऊ. त्याच पद्धतीने तुम्ही पुढील महिन्यात बिले काढली. कारण, तुमची इलेक्ट्रॉनिक डाटा सिस्टीम कोलॅप्स झाली होती. ही सिस्टीम कोलॅप्स झाल्यामुळे आपण ते काम एजन्सीला दिलेले आहे. बेस्टचे चेअरमन आहेत. परंतु, तुम्ही एजन्सीला काम विभागून दिले. ते सर्व दूरचित्रवाहिन्यांवर दाखविण्यात आले. रॅन्डम बिलांविषयी सर्वांनी प्रश्न उपस्थित केले. आम्ही परवा या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी सांगण्यात आले की, एप्रिल, मे महिन्यात अशी परिस्थिती झालेली आहे, आम्ही एजन्सीला सांगितले आहे. पुढील बिले त्याच पद्धतीने आल्यावर बेस्ट काय म्हणते ? जे बिल आलेले आहे ते प्रथम भरा, पुढील वेळी ॲडजेस्ट करू. एखाद्या व्यक्तीला 10 लाख रुपये बिल आले असेल तर तो बिल कसे काय भरणार आहे ? तसेच, ज्येष्ठ नागरिकांना सांगण्यात आले की, आपण बिल भरण्यासाठी वीज भरणा केंद्रात जाण्याची आवश्यकता नाही. आपल्या बँक खात्यातून थेट पैसे वळते होतील. ज्येष्ठ नागरिकांना 1 लाख, 50 हजार तर कोणाला 10 लाख रुपये बिल आलेले आहे. मग त्यांनी बिल कसे काय भरावयाचे ? त्यांना जे बिल आलेले आहे त्यातील 50 टक्के रक्कम घ्यावी, हे बँकेला कोण सांगणार आहे ? जे बेस्टचे चेअरमन आहेत त्यांना याची जाणीव असावी किंवा पक्षप्रमुखांनी तरी सांगावे की, जेणेकरुन याचा फायदा ज्येष्ठ नागरिकांना आणि इतर लोकांना होईल. मी भ्रष्टाचार यासाठी म्हटले की, अशी अनेक प्रकरणे काढता येतील आणि या प्रकरणांवर आपण कोठेही बोलायला तयार नाही. मी तुम्हाला आकडेवारी आणि फॅक्ट्स देतो. या संदर्भात जे काय आहे ते आपण सांगा आणि सरकार म्हणून कोठे तरी महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराला आवरावे. कारण, एक दिवस उद्रेक होईल आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

लोक रस्त्यावर येतील. म्हणजे, त्यासाठी महानगरपालिकेच्या निवडणुकाच घ्याव्या लागतील असे नाही. हॉस्पिटल्स, रस्त्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. त्यामुळे माननीय श्री.मेहता साहेब, एक दिवस लोक रस्त्यावर उतरतील.

सभापती महोदय, मी दत्तक वस्ती योजनेच्या संदर्भातील एक प्रकार सांगतो. मुंबई महानगरपालिकेच्या वतीने गलिच्छ वस्त्यांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी दत्तक वस्ती योजना सुरु करण्यात आली आहे. त्यामध्ये तुम्ही काय नमूद केले आहे ? त्यामध्ये असे नमूद केले आहे की, दत्तक वस्ती योजनेमध्ये 1 हजार लोकसंख्येसाठी 1 सफाई कामगार या प्रमाणे सफाई कामगारांची नेमणूक करण्यात आली आहे. आपण त्यांना पगार किती देता ? तुम्ही प्रत्येक माणसाला 2350 व 3700 रुपये अनुदान देत आहात. मध्यंतरी शिवसेना पक्षाच्या एक सन्माननीय नगरसेविका निवडणुकीसाठी उभ्या होत्या. त्यांचा निवडणुकीत पराभव झाला. त्यांचे पती एसीपी आहेत. दत्तक योजनेमध्ये त्या एसीपींचा देखील पगार काढला जात होता. म्हणजे एसीपी पदाचा पगार कमी पडतो म्हणून श्री.बागवे यांचा पगार काढला जात होता, हे कशासाठी ? काय परिस्थिती आहे ? मी आपल्याला वॉर्डनिहाय माहिती देऊ शकतो. अंधेरी, दहिसर या ठिकाणी 71 लाख रुपये लाटण्याचा प्रयत्न झाला. दत्तक वस्ती योजने अंतर्गत संस्थांची निवड केली जाते. त्यांना सन 2008-09 मध्ये के पूर्व विभागातून 7 लाख 65 हजार रुपये अनुदान दिले जाते. अशीच बिले काढली गेली. तसेच, आर उत्तर म्हणजे दहिसर भागात सन 2008-09 व 2009-10 मध्ये दत्तक योजने अंतर्गत 33 लाख 22 हजार रुपये काढण्यात आले. मी तुम्हाला आकडेवारी देऊ शकतो. ही योजना कशासाठी आहे ? तुमचे जे नगरसेवक आहेत, त्यांच्यासाठी पार्ट टाईम जॉब म्हणून हे सुरु केलेले आहे काय ? अनुदान किंवा पैसा कमी पडतो म्हणून कोणाची तरी नावे द्यावीत, जेवढी लोकसंख्या आहे त्याप्रमाणे 1 हजार लोकांमागे 1 सफाई कामगार याप्रमाणे नावे द्यावीत आणि त्यातून ही योजना चालविली जाते काय ? भाई, ही योजना म्हणजे लुटमार योजना आहे. या योजनेचे दत्तक योजना हे नाव बदलून लुटमार योजना असे नाव ठेवावे. असेच पैसे वळते केले तरी यातून फायदा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

होण्यासारखा आहे. माननीय श्री.रावते साहेब, मुंबई महानगरपालिकेत भ्रष्टाचार बोकाळला आहे, असे मी म्हणत नाही. श्री.दीक्षित साहेब ॲन्टी करप्शन ब्युरोचे प्रमुख आहे. त्यांनी स्टेटमेंट दिले आहे की, होय, मुंबई महानगरपालिकेत भ्रष्टाचार आहे. आज सभागृहात कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. मुंबई महानगरपालिकेत भ्रष्टाचार आहे असे एसीपी यांचे स्टेटमेंट असेल तर शासन याबाबत सुमोटो कारवाई करुन एफआयआर का दाखल करीत नाही ? का तम्हाला लोकप्रतिनिधींची गरज आहे ? तुम्ही 33 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करुन सर्व गोष्टींपासून लोकांना वंचित ठेवत असाल तर तुम्ही ॲन्टी करप्शन ब्युरो मार्फत त्यांच्यावर कारवाई का करीत नाही ? शासनाने याबाबत सुमोटो कारवाई करावी, अशी मी मागणी करतो. प्रत्येक गोष्टीची मग रस्त्यासाठी असेल, नाले सफाई असेल. नाले सफाई हा विभाग असा आहे की, त्यावर बोलावे तेवढे कमी आहे. नाले सफाईच्या संदर्भात ज्या कॉन्ट्रॅक्टरांना काळ्या यादीत टाकलेले आहे त्यांना पुन्हा कामे दिलेली आहेत. रस्ते वाहतुकीसाठी 2309 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

मल:निस्सारण विभागासाठी 1106 कोटी रुपये, अग्निशमन दलासाठी 190 कोटी रुपये आहेत. यातील फक्त 28 कोटी रुपये वापरले गेले आहेत. काळबादेवी येथील दुर्घटनेत चार प्रमुख अधिकारी मारले गेले आहेत, नेसरीकर यांची पत्नी अशी म्हणाली होती की, पायातील बूट निकृष्ठ दर्जाचे असल्यामुळे बूटामधून त्यांचा पाय आतमध्ये जळाला होता. त्यांना दिलेला गणवेश व बूट अत्यंत निकृष्ठ दर्जाचे होते. ते शब्द आता वापरु नये म्हणून मेलेल्याच्या टाळूवरील लोणी खाण्याची तयारी आहे. अग्निशमन दलासाठी 190 कोटी रुपये वापरले असते तर अनुभवी ऑफिसर आपण गमविले नसते. ही जबाबदारी मंत्री महोदय आपलीच आहे.

सभापती महोदय, काल याकूब मेनन यांना फाशी दिल्यानंतर राज्यात अत्यंत धोकादायक वातावरण तयार झाले होते. मंत्री महोदय, श्री.दिवाकर रावते साहेब हे वातावरण धोकादायक दिसत होते.1993 मध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांबाबत सर्व लोक बोलले होते. शिवसेना भवन येथे बॉम्बस्फोट झाले तेव्हा मी स्वत: रस्त्यावर होतो. कै.दत्ताजी साळवी आणि मी कामगार सेनेच्या कार्यालयातून खाली उतरलो होतो, तेव्हा श्री.राकेश मारिया हे डीसीपी किंवा एसीपी असावेत. मुंबईत बॉम्बस्फोट झाले तेव्हा देखील आम्ही अशा गोष्टींचा बंदोबस्त कधी होणार याबाबत पोलिसांच्या नावाने छाती बडवित होतो. एके दिवशी टाडा न्यायालयाच्या न्यायाधीशांची मुलाखत ऐकली तेव्हा कळले की, मी यांना शिक्षा दिली असली तरी याचे खरे श्रेय मुंबई पोलिसांना जाते. मुंबई पोलिसांच्या टीमने श्री.राकेश मारिया यांच्याबरोबर काम करताना दोन वर्षात सुट्ट्या देखील घेतल्या नाहीत. त्यांनी सतत तपास केला, 1700 लोकांना समोर आणून त्यातील काही लोक सिलेक्ट केले, त्यांचा पाठपुरावा केला यासाठी पुरावे व साक्षीदार त्यांनी उभे केले, यामधून 170 लोकांना शिक्षा झाली. 170 लोकांपैकी 1993 च्या बॉम्बस्फोटामधील पहिली फाशीची शिक्षा याकूब मेनन यांना झाली. एखाद्या डॉक्टरने चांगले ऑपरेशन केल्यावर त्याचा रुग्ण चांगला होऊन रस्त्याने चालत जातो तेव्हा तो डॉक्टर समाधानी होतो, मी केलेले ऑपरेशन सक्सेस झाले असे त्याला वाटते. येथील पोलीस अधिकाऱ्यांना असे वाटत असेल की, आम्ही रात्रंदिवस तपास केला तेव्हा इतकी मोठी यंत्रणा नव्हती, तरी देखील तपास केला व आरोपी पकडले गेले व त्यांना शिक्षा झाली. कालचे वातावरण पाहिल्यानंतर मुंबई शहरात भितीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

वातावरण निर्माण झाले होते. याकून मेमन यांना टी.व्ही वर जास्त वेळ दाखविण्यात येत होते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा अत्यंविधी दाखविण्यासाठी चॅनेलकडून वेळ कमी दिला जात होता. म्हणजे समाज कोणत्या पध्दतीने चालला आहे, बॉम्बस्फोट झाले तेव्हा देखील आम्ही म्हणत होतो की, पोलीसवाले काय करीत आहेत, काल शिक्षा झाल्यावर देखील आपण तेच म्हणत आहोत. काल त्यांच्या अत्यंसंस्कारासाठी पोलीस पाठविण्यात आल्यानंतर इतका बंदोबस्त कशासाठी असे देखील आपण म्हणतो. याच्या मुळापर्यंत जाण्याची गरज आहे. येणारा काळ चांगला आला नाही तर पुढील पिढी आपणाला माफ करेल असे मला वाटत नाही. मी हिंदू व मुस्लिम असे काही बोलत नाही. खऱ्या अर्थाने याचा विचार करण्याची गरज आहे. ज्या अधिकाऱ्यांनी यासाठी चांगले काम केले, त्या अधिकाऱ्यांना शासनानाकडून वाहवा मिळेल असे मला वाटते होते. अत्यंसंस्कार झाल्यावर मुख्यमंत्री महोदयांनी निवेदन केले. 1993 पासून आजपर्यंत पोलीस तपास झाला त्या अधिकाऱ्यांची वाहवा होईल व त्यांची कोठे तरी शिफारस केली जाईल असे मला वाटले होते परंतु तसे झालेले नाही. तसे करण्याची गरज आहे, जर पोलीस चांगले काम करीत असतील तर चांगले म्हटले पाहिजे. वाईट करीत असतील तर वाईट म्हटले पाहिजे. ही बाब मी शासनाच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, दया नाईक हे अधिकारी आहेत, त्यांची बदली नागपूर येथे झाली, ते खंडणी पथकात असताना त्यांनी खूप एन्काऊंटर केले आहेत, त्यांच्या जिवीताला धोका आहे म्हणून ते नागपूरला गेले नाहीत. त्यांनी शासनाकडे बदली रद्द करण्यासाठी दिनांक 23/03/2015 रोजी अर्ज सादर केला आहे. सदरच्या निवेदनाच्या अनुषंगाने अप्पर सचिव गृह यांच्यासमोर दिनांक 30/05/2015 रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळी त्यांनी सादर केलेली कागदपत्रे कथन केलेली वस्तुस्थिती पाहता सदर बदली रद्द करण्यास महाराष्ट्र पोलीस सुधारणा अधिनियम 2015 मधील तरतुदीनुसार माननीय मुख्यमंत्री यांची मान्यता प्राप्त झाली आहे, मान्यता प्राप्त झाल्यावर त्यांची पोस्टिंग मुंबईला दाखविण्यात आली होती. पुन्हा आठ दिवसात त्यांना निलंबित केल्याची ऑर्डर डीजी यांनी काढली आहे. गृह सचिवांकडे सुनावणी होते, मुख्यमंत्री महोदय मान्यता देतात, त्यांच्या मान्यतेला डीजी ओव्हर रुल करु शकतात काय ? असे होत असेल तर मघापासून या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी जे विचार मांडले त्यामध्ये काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

चुकीचे आहे. यासंदर्भात काय कारवाई करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आदेश बरोबर नव्हते किंवा डीजी यांनी दिलेले आदेश बरोबर नाहीत. कोणाचे आदेश बरोबर आहेत व कोणाचे आदेश चुकीचे आहेत हे सभागृहासमोर येऊ द्यावे. सभापती महोदय, आपण मला वेळ कमीच दिला आहे, तरी देखील मी माझे भाषण संपवितो व आपले आभार व्यक्त करतो.

उप सभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा थांबविण्यात येत आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राजभाषा मराठी विधेयका संदर्भात

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाचा सदस्य या नात्याने मी आपणाला विनंती करीत आहे, आपणाला कल्पना आहे की, महाराष्ट्राची राजभाषा मराठी म्हणून आपण नेहमी चर्चा करतो, महाराष्ट्र राज्याची स्थापना 1960 मध्ये झाली. 1963 मध्ये महाराष्ट्राची भाषा मराठी असावी असा निर्णय घेण्यात आला. ती अंमलात येण्यासाठी त्या त्या वेळच्या संबंधित मुख्यमंत्री महोदयांनी पुढील वर्षी पुढील वर्षी असे करीत 1995 मध्ये शिवशाही सत्तेवर आली. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.मनोहर जोशी यांनी 15 ऑगस्ट 1995 रोजी या नस्तीला मान्यता दिली. या राज्याची राजभाषा मराठी व्हावी असा सरकारी निर्णय झाला, त्याचे कायद्यात रूपांतर झाले नव्हते. मला हे सांगतांना अभिमान वाटतो व सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, मराठी राजभाषेचा कायदा करण्याचे विधेयक आपल्या सभागृहात येणार आहे. राज्यभाषेचा कायदा करण्याचा सन्मान विधानसभेत व्हावयास पाहिजे होता. परंतु गोंधळात तो कायदा पारीत होऊ शकला नाही. महाराष्ट्राच्या राजभाषेचे विधेयक मंजूर होतांना महत्वपूर्ण सन्मान मिळाला पाहिजे, उच्च सभागृहाला तो मान मिळाला आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, राज्याची राजभाषा मराठी असल्याचा कायदा करण्याचे श्रेय आपल्या सदनाला मिळाले असताना कोणतीही चर्चा न करता आपण त्याचा सन्मान करु या व कुसुमाग्रज यांना आदरांजली देऊ या.

माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना मी विनंती करतो की, मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत, राजभाषेचे विधेयक त्यांनी सभागृहात मांडावे. राजभाषेचा सन्मान करण्याचा उच्च सभागृहाला सन्मान मिळाला तो सन्मान आपण घ्यावा अशी मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सदस्य या नात्याने नम्रपणे विनंती करतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या अस्मितेच्या दृष्टीने व महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा सन्मान करण्यासाठी आपल्या मराठी भाषेला कायदेशीर रूप देण्यासाठी हा प्रस्ताव विधेयकाच्या निमित्ताने आला आहे. त्याचे खरोखर मनापासून स्वागत करावे अशी ही ऐतिहासिक घटना या ठिकाणी होत आहे. आम्ही सर्व सन्माननीय सदस्य या विधेयकाला एकमुखाने पाठिंबा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

देऊ. महाराष्ट्राच्या मराठी भाषेचा सन्मान व त्या संदर्भातील विधेयक या सभागृहात मुख्यमंत्री महोदयांनी मांडले तर त्याचा अधिक गौरव होईल, ही भावना माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी व्यक्त केली त्या भावनेशी आम्ही सहमत आहोत, हे विधेयक आणल्याबद्दल या शासनाचे व संबंधित मंत्री महोदयांचे आणि आपणा सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

या नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ऐतिहासिक स्वरूपाचे विधेयक सभागृहापुढे येत आहे, त्याचे आम्ही स्वागत करीत आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांनी हे विधेयक मांडले तर या विधेयकाचा सन्मान वाढेल. परंतु या निमित्ताने एकच सांगतो की, कायदेशीर, कागदोपत्री मराठी राजभाषा जरूर होईल. परंतु आजही राज्याचा कारभार आणि आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महापालिकेचा कारभार इंग्रजी भाषेतून चालतो. जन्म दाखला व मृत्यू दाखला इंग्रजी भाषेतून दिला जातो. त्या कारभारात बदल घडणार की नाही याबाबत पक्के आश्वासन मिळाले पाहिजे. आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मराठी शाळा टिकविण्याच्या संदर्भात व मराठी भाषा जिवंत राहण्याच्या संदर्भात चर्चा झाली. मराठी भाषा तेव्हाच जिवंत राहील, जेव्हा राजकीय व्यवहारात, आर्थिक व्यवहारात, लोक व्यवहारात व बाजाराच्या व्यवहारात मराठी भाषेचा वापर होईल. या दृष्टीने या विधेयकात काय तरतूद केली जाणार आहे हे निश्चितपणे कळेल. परंतु लोक व्यवहारात आणि बाजाराच्या भाषेत मराठीचा वापर झाला नाही तर मराठी भाषेला सन्मान मिळणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या दृष्टीने आश्वासन दिले तर सगळयांना आनंद होईल.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राजभाषा (सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XL OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OFFICIAL LANGUAGES ACT, 1964.)

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 40 महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 40 महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मी या सभागृहाचे आभार मानतो. सभागृहातील सर्वच सदस्यांनी या विधेयकाचे स्वागत केले आहे. इतक्या वर्षानंतरही आपल्या राज्यामध्ये मराठी ही आपली राजभाषा आहे याला कायदेशीर स्वरूप नव्हते. मराठी भाषा विभागाचे माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांचे आपण मन:पूर्वक अभिनंदन करू. कायदा आणि प्रथा, परंपरा यात फरक आहे. वर्षानुवर्षे आम्ही सांगत आहोत की, मराठी ही आमची राजभाषा आहे. परंतु दुर्दैवाने कायद्यामध्ये तिचा अंतर्भाव नाही, ही बाब त्यांनी लक्षात घेतली आणि त्या निमित्ताने त्यांनी या ठिकाणी हे विधेयक आणले.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ही गोष्ट खरी आहे की, आपण कायदेशीर राजभाषेचा दर्जा देत असताना मराठी भाषेला लोकमान्यता आहेच, आज राजमान्यता जरी मिळाली तरी तिचा वापर वाढला पाहिजे, उपयोग वाढला पाहिजे, ती रुजली पाहिजे अशा प्रकारचे विचार या ठिकाणी मांडले ते योग्य आहेत. मराठी भाषा संचालनालयाच्या माध्यमातून अनेक योजना मागील काळात घोषीत झाल्या. पण त्या तितक्या वेगाने सुरु नव्हत्या. त्या सुरु करण्याचे काम मंत्र्यांनी आता हाती घेतले आहे. मागील काळात न्यायालयात देखील मराठी भाषेतून कामकाज सुरु करण्याचा निर्णय घेतला. परंतु आपल्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

न्यायालयात मराठी भाषा सुरु करीत असताना तेवढे टायपिस्ट व स्टेनो मिळू शकत नाही, ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. त्याचबरोबर मराठी ही संगणकाची युनिकोड भाषा कशाप्रकारे करता येईल याचे प्रयत्न सुरु केले. त्याचा वापर जवळजवळ सगळ्या ठिकाणी करणे सुरु केले आहे. त्यापेक्षा अधिक वापर करावा लागेल, ही भाषा रूजवावी लागेल. हे अतिशय महत्त्वाचे आहे. निश्चितपणे आपण भावना व्यक्त केल्या आहेत त्या दृष्टीने मराठी ही व्यापाराची भाषा, बाजाराची भाषा व्हावी, व्यवहाराची भाषा व्हावी, शिक्षणाची भाषा व्हावी आणि ज्ञानाचीही भाषा व्हावी यासाठी राज्य सरकार निश्चितपणे आपल्या सर्वांच्या मदतीने प्रयत्न करेल, हा विश्वास मी या ठिकाणी देतो आणि आपण सर्वांनी एकमताने हे विधेयक मंजूर करावे, अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-40 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-40 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXXI OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 31 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 31 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, एमआरटीपी कायद्याच्या कलम 124 एफ मध्ये डेव्हलपमेंट चार्जेस आकारण्याचा अधिकार आहे. त्यानुसार एक्झेम्पशनची सुध्दा तरतूद आहे. डेव्हलपमेंट टॅक्समध्ये पोट कलम (2) च्या तरतुदीनुसार शैक्षणिक, वैद्यकीय आणि धार्मिक संस्थांना विकास शुल्कामध्ये सवलत देण्याची तरतूद आहे. कमाल मर्यादेत 75 टक्क्यापर्यंत आपण ती सवलत देतो. Ease of Doing Business अंतर्गत वखारीला 90 टक्क्यापर्यंत सवलत देतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-31 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-31 संमत झाले आहे.

नंतर 3जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XXXII OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 32 - मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 32 - मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, 2010 च्या आधी महापालिका रेटेबेल व्हॅल्यूने टॅक्स गोळा करीत होती. 2010 नंतर आपण कॅपिटल व्हॅल्यूला शिफ्ट झालो त्यावेळी 40 टक्के वाढ झाली. यामध्ये 500 चौरस फुटापेक्षा कमी असणारे काही फ्लॅट बाधित होतील अशी शक्यता वर्तविण्यात आली होती.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 32 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 32 संमत झाले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कारखाने (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XXXVI OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE FACTORIES ACT, 1948, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

श्री.प्रकाश महेता (कामगार मंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीन सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 36 - कारखाने अधिनियम, 1947, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 36-कारखाने अधिनियम, 1947, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, कारखाने अधिनियम 1948 मध्ये 3-4 छोट्या सुधारणा आपण सुचविल्या आहेत. विद्युत वापराविना जेथे दहा कामगार काम करीत असतात त्याच्यावर कामगारांना काम करावयाचे असेल तर अनुमती घ्यावी लागत होती. आता आपण दहा ऐवजी वीस संख्या करीत आहोत. विजेचा वापर करून कारखाना सुरू असतात त्यांची अनुमती 20 पर्यंत होती ती आता 40 पर्यंत करण्यात आली आहे. अशाने 14300 कारखान्यांमध्ये कामगारांना रोजगार उपलब्ध होईल. 75 ऐवजी 115 तास ज्यांनी काम केले आहे त्यांना ओव्हर टाईम देण्याचा निर्णय या कामगार कायद्याच्या सुधारणेनुसार करीत आहोत. कामगारांनी 240 दिवस भरले तरच त्याला पगार मिळून रजा मिळत होती. आता 240 दिवसांची मर्यादा कमी करून 90 दिवसांवर आणून भर पगारी रजा मिळेल अशी तरतूद करण्यात आली आहे. महिलांना स्वेच्छेने रात्रपाळीत काम करावयाचे असेल तर सर्वोच्च न्यायालयाने महिलांच्या सुरक्षिततेच्या संबंधात ज्या अटी घालून दिल्या आहेत त्याची ज्यांनी पूर्तता केली आहे अशा युनिटमध्ये महिलांना रात्र पाळीत काम करण्याची सूट मिळावी अशा प्रकारचे हे विधेयक आहे

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित), अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 36 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 36 संमत झाले आहे.

.....

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XXXV OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.)

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, विधान सभेने समंत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 35 - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यारिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 35 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 35 संमत झाले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XLI OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 वि.स.वि.क्रमांक 41 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 41 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 41 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 41 संमत झाले आहे.

.....

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ विधेयक

मु. शी. :

L.A. BILL NO. XLVIII OF 2015

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF THE MIT ART, DESIGN AND TECHNOLOGY UNIVERSITY, PUNE FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-48, राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे स्थापन करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-48, राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे स्थापन करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय,या बिलाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. मागील वेळेस या बिलाबाबत मी दोनदा विचार मांडले होते त्यामुळे या बिलाविषयी आता मी जास्त काही बोलणार नाही. मागच्या वेळी माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते त्या आश्वासनाची मी या ठिकाणी आठवण करुन देतो. मंत्री महोदयांनी क्रॉस सबसिडीबद्दल असे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

सांगितले होते की, हे करणे शक्य असल्यामुळे पुढील वेळेस याचा आम्ही जरुर विचार करु. मी म्हणत नाही की, तेथी मागासवर्गीय व गरीब विद्यार्थ्यांनी पैसे उचलावेत. परंतु यासंदर्भातील जबाबदारी तेथील विद्यापीठावर टाकली पाहिजे की, जेणे करुन त्या विद्यापीठांमध्ये गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण सुध्दा सुकर होऊ शकेल. जसे आपण आरटीईमध्ये 25 टक्के केले त्यामुळे 25 टक्के अशा विद्यापीठांमध्ये या विद्यार्थ्यांसाठी जागा ठेवणे व क्रॉस सबसिडीची जबाबदारी त्याच विद्यापीठावर टाकणे असे किमान करणे अपेक्षित आहे. आपले राज्य कल्याणकारी असल्यामुळे आपल्याकडून अपेक्षा आहेत. परंतु माझा या बिलाला विरोध आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 50 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-48 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक- 48 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा परिषद व पंचायत समिती(सुधारणा)विधेयक

मु. शी. :

L.A. BILL NO. XLVII OF 2015

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF SANDIP UNIVERSITY, NASHIK FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-47, राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता संदीप विद्यापीठ, नाशिक याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-47, राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता संदीप विद्यापीठ, नाशिक याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 47. मधाशी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मुद्दा मांडला आहे. या बिलाच्या संदर्भात कॅबिनेटमध्ये चर्चा करताना यासंदर्भात समिती गठीत करण्यात आली असून या समितीने दोन गोष्टी करणे गरजेचे आहे. या समितीने महाराष्ट्राचा बृहत आराखडा बनवावा की, महाराष्ट्रासाठी अशी किती विद्यापीठे गरजेची असून त्यामध्ये कोणकोणते कोर्सेस सुरु करणे गरजेचे आहे. हे सर्व होत असताना प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण, प्रधान सचिव वित्त विभाग, अप्पर व मुख्य सचिव नियोजन विभाग,अप्पर सचिव महसूल विभाग, एक कुलगुरु, एक प्रशासकीय तज्ज्ञ अशी मंडळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

असून ते यासंदर्भात विचार करीत असतात. तरी सुध्दा महाराष्ट्रातील नॉन ग्रँटचे मेडीकल,इंजिनिअरींगचे जसे झाले तसे यामध्ये होता कामा नये त्यासाठी समितीने प्रथम बृहत आराखडा तयार करावा आणि त्याच बरोबर कायद्यातील काही गोष्टींमध्ये बदल करता येईल का यासाठी खरे म्हणजे आम्ही ही समिती गठीत केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात समितीच्या माध्यमातून निश्चितपणे विचार केला जाणार असून त्याची माहिती योग्य वेळी दिली जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 50 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-47 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि क्रमांक-47 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा परिद व पंचायम समिती (सुधारणा) विधेयक

मु. शी. :

L.C. BILL NO. XII OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-12, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उप सभापती : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा प्रस्ताव आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक-12 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक -12 संमत झाले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>वि.स.वि.क्रमांक 26 - महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयक 2015 संबंधी</u>

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा हक्क हे विधेयक खूप महत्वाचे आहे. तेव्हा आपण हे विधेयक मंजूर करावे. कारण हे विधेयक मंजूर झाल्यानंतर बरीच प्राधिकरणे तयार करावयाची आहेत. या विधेयकामध्ये काही कमतरता आहे असे सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिल्यानंतर त्या कमतरता दूर करण्यात येतील असे मी सभागृहाला आश्वासित करतो. तेव्हा माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक महत्वाचे असल्यामुळे आपण पुनर्विचार करावा आणि हे विधेयक मंजूर करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लोकसेवा हक्क विधेयक

L.A.BILL NO. XXVI OF 2015

(A BILL TO PROVIDE FOR DELIVERY OF TRANSPARENT, EFFICIENT AND TIMELY PUBLIC SERVICES TO THE ELIGIBLE PERSONS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)
AND MOTION FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE
AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री): सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी, आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 26-महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक,कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 26 -महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक,कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश गजभिये, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे यांनी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 26- महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक,कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे आणि माणिकराव ठाकरे यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 26- महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक,कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 30 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

सभापती : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न, विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव, या तिन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 26- महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयक 2015 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लोकसेवा हक्क विधेयकाच्या माध्यमातून पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा कालमर्यादेच्या आत प्राप्त करुन देण्याचा हक्क देण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, आम्हाला या विधेयकामध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या आहेत तेव्हा या विधेयकावर सखोल चर्चा होण्यासाठी हे विधेयक या सभागृहाच्या प्रवर समितीकडे पाठवावे अशी माझी विनंती आहे.

---------- ..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 26 - महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयक 2015 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मुख्यमंत्री पदाची जबाबदारी घेतल्यानंतर त्यांनी सुरुवातीच्या काळात ज्या काही घोषणा केल्या होत्या, त्यातील हा एक अत्यंत महत्वाचा विषय आहे, जिव्हाळ्याचा विषय आहे. मी त्यांच्या हेतूबद्दल अजिबात शंका घेत नाही. त्यांचा हेतू अतिशय चांगला आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर राज्यातील जनतेसाठी जे काही चांगले करता येईल ते तत्परतेने करावे हा त्यांचा हेतू चांगला आहे. आम्ही सर्वजण त्यांच्या हेतुशी सहमत आहोत. परंतु हे विधेयक ज्या पद्धतीने आणलेले आहे तो आपला हेतू कदाचित सफल होणार नाही, हे आपल्या निदर्शनास आणून देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वसामान्य जनतेला असे वाटते की, आमच्या करातून जे काही पैसे मिळतात त्यातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पगार होतात. तेव्हा सर्वसामान्यांना त्यांची सेवा मिळावी, हा त्यांचा हक्क आहे. आदरणीय श्री.अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध चळवळ उभी केली त्या चळवळीमधून लोकपालचे विधेयक ज्याची घटनेमध्ये तरतूद आहे, ती पुढे आली. त्यानंतर जनतेची सनद आली. त्याला अनुसरुन ही एकप्रकारे जनतेची सनद आहे असे आपण म्हणू.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरु देशाचे पहिले पंतप्रधान झाले. 1947 ते 1964 पर्यंत असे साधारणत: 17 वर्षे ते पंतप्रधान होते. त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटी त्यांना विचारण्यात आले की, यश आणि अपयश बद्दल आपले काय म्हणणे आहे ? त्यावर ते म्हणाले की, या देशात साधे टाचणीचे उत्पादन होत नव्हते त्या देशाने पोलाद कारखाना, मोठ धरणे उभारली, शेतीमध्ये प्रगती केली अशा अनेक गोष्टी केल्या. परंतु मला प्रशासकीय यंत्रणेमध्ये सुधारणा करता आली नाही याची खंत आहे. म्हणून हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आपण हा महत्वाचा विषय हातामध्ये घेतलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, सन 2010 मध्ये बिहारचे मुख्यमंत्री श्री.नितीश कुमार यांनी सुरुवातीला अशा प्रकारचे विधेयक आणले. त्यानंतर इतर राज्यांमध्ये विधेयक आणण्यात आले. आपण देखील त्याची सुरुवात अगोदर पासून केलेली आहे. फक्त त्याचे नाव वेगळे होते. तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.अे.आर.अंतुल साहेबांच्या काळात त्यांनी "जनता दरबार" सुरु केले होते. नंतर "जनता दरबार"चे रुपांतर "लोकशाही दिना"मध्ये झाले. तेव्हा महाराष्ट्राने सुरुवात केलेली आहे हे आपणास नाकारता येत नाही.

सभापती महोदय, कोणताही कायदा करताना तो कायदा असला पाहिजे, असा मुख्य मुद्दा आहे. आपल्याला प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण ठेवावयाचे असेल तर त्या संदर्भातील कायदा असेल तरच ते नियंत्रण ठेवता येते. कायद्यांतर्गत जे नियम होतात त्या नियमात प्रशासकीय मंडळाला सूट दिली तर त्या कायद्याचा बोजवारा उडतो असे अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. नेमकी तीच चूक या कायद्यामध्ये झालेली आहे, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या पृष्ठ 10 वर 28 क्रमांकाचा मुद्दा आहे की, "शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून, राजपत्राद्वारे नियम करता येतील" आपण हे नियम करण्याचे अधिकार, अधिकाऱ्यांना दिले तर प्रत्येक वेळेला वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारून नस्ती येईल आणि दुसऱ्या मंत्री महोदयांची परस्पर सही घेतली जाईल. त्यामुळे जो मूलभूत हेतू आहे तो साध्य होणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

माझे मत आहे की, या विधेयकातून सदरहू तरतूद वगळावयास पाहिजे. हे विधेयक आणण्यामागील सरकारची भावना आणि हेतू अतिशय चांगला आहे. आम्ही हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा आग्रह यासाठी धरत आहोत की, त्या समितीमध्ये या विधेयकावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर आवश्यक त्या सर्व गोष्टींचे कायद्यात रूपांतर होऊ शकेल.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये शास्तीची तरतूद नमूद केलेली आहे. या संदर्भातील उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात केला. या विधेयकातील खंड-3 हा "लोकसेवा पदनिर्देशित अधिकारी, अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे" या संदर्भातील आहे. या विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक-5 वरील खंड-10 मध्ये नमूद केले आहे की, "पाचशे रूपयांपेक्षा कमी नसेल परंतु पाच हजार रूपयांपर्यंत असू शकेल एवढी, किंवा राज्य शासन राजपत्रातातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी सुधारणा करील अशा रकमेएवढी, शास्ती लादील". असे नमूद केले आहे. यावरून असे दिसून येते की, शास्तीबाबत राज्य सरकारच्या हातात काहीच नाही. अधिकाऱ्यांच्या मनाला जे वाटेल ते त्या त्या वेळी अधिसूचनेद्वारे जाहीर करण्यात येईल किंवा राजपत्र अथवा नियमात जे जाहीर करण्यात येईल तेवढी रक्कम शास्तीची असेल. हे विधेयक आणण्यामागील सरकारचा हेतू अतिशय चांगला आहे. हा कायदा सरकारला लोकांसाठी करावयाचा आहे. त्यामुळे या सर्व बाबींचे रूपांतर कायद्यामध्ये करावे, अशी माझी विनंती आहे. अधिकारी आणि प्रशासकीय मंडळाला हे अधिकार देऊ नये असे मला वाटते.

सभापती महोदय, या राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.कन्नमवार साहेबांच्या बाबतीतील एक गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. मी लहानपणी यशवंतराव चव्हाण, पी.के.सावंत, नाईक साहेब यांच्या संपर्कात आल्यामुळे मला काही गोष्टी समजल्या. कन्नमवार साहेब मुख्यमंत्री असताना त्यांचे अधिकृत निवासस्थान सह्याद्री येथे होते. ते मंत्रालयामध्ये फार कमी येत होते. ते बहुतेक फाईलींचा निपटारा सह्याद्री या शासकीय निवासस्थानातून करायचे. मी त्यांना कधी बघितले नाही. परंतु मला त्यांच्या बाबत सांगितले गेले. ते अतिशय साधे गृहस्थ होते. ते सकाळी ज्या ठिकाणी बसायचे त्यासमोर एक टी-पॉय असायचा. त्या टी-पॉयवर वर्तमानपत्रे असायची. एखाद्या बाबतीत जर त्यांना काही करावयाचे असेल तर ते अधिकारी आणि सचिवांना सांगायचे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

मला अमुक गोष्टी करावयाच्या आहेत. ते ज्या ठिकाणी बसायचे त्यासमोर एक टी-पॉय असायचा. कन्नमवारांनी एखादी गोष्ट करण्याबाबत सांगितले तर अधिकारी प्रत्येक वेळी सांगायचे की, असे करण्याबाबत कायद्यात तरतूद नाही किंवा हे करणे नियमात बसत नाही. यावर कन्नमवार साहेब विचारायचे की, या बाबतीत आता काय करायचे ? त्यावर अधिकारी सांगायचे की, साहेब आम्हाला या बाबतीत तुमच्याकडून आदेश पाहिजेत. त्यानंतर कन्नमवार साहेब टी-पॉयवरील वर्तमानपत्रांच्या खाली ठेवलेली पांढरी स्ट्रीप फाडायचे आणि त्यावर आदेश लिहायचे. ती एक प्रकारे त्यांची ऑर्डर असायची. कारण ते मुख्यमंत्री होते. माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, ज्या वेळी आपण नियम आणि कायद्याच्या बाबतीत बोलतो त्यावेळी नियमाला किंवा अधिसूचनेला जास्त संधी देता कामा नये. माननीय मुख्यमंत्र्यांनी एकदा ऑर्डर दिल्यानंतर सचिवांना 'नाही' म्हणता येत नाही. कारण ती मुख्यमंत्र्यांची ऑर्डर असते. कागदाच्या साध्या तुकड्यावर जरी लिहिलेले असले तरी ते आदेश असायचे. त्यामुळे सचिवांना मुख्यमंत्र्यांचे आदेश फॉलो करावेच लागायचे. त्यामुळे अशी परिस्थिती या सरकारवर येता कामा नये. म्हणून आपल्याला जे काही म्हणायचे असेल ते कायद्यातच नमूद करावयास पाहिजे. या बाबत सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी सुधारणा दिलेली आहे. त्यांचे सुध्दा म्हणणे आहे की, सरकारला जे काही म्हणावयाचे असेल ते कायद्यातच अंतर्भूत करावे. मी पुन्हा एकदा मागणी करतो की, सरकारने किमान या कायद्याच्या बाबतीत नियम आणि अधिसूचना काढण्याचे अधिकार प्रशासकीय मंडळाला देऊ नयेत.

महोदय, दुसरी बाब अशी की, या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सुलभता असावयास पाहिजे. तसेच तिसरा मुद्दा असा की, या विधेयकात 'तांत्रिक' हा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. तांत्रिक अडचण आली तर संबंधित अधिकारी आपापल्या मतानुसार त्याचा अर्थ लावतील. त्यामुळे या विधेयकातून 'तांत्रिक' हा शब्द वगळावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये एका मुद्याचा समावेश झालेला नाही. सध्या काही कार्यालयांमध्ये सेवांचे आऊटसोर्सिंग करण्यात आलेले आहे. आमच्या भागात पुण्यामध्ये काही सेवा आऊटसोर्स केल्या आहेत. त्यामुळे ज्या कार्यालयांमध्ये सेवेचे आऊटसोर्सिंग करण्यात आलेले आहे त्यांना हा कायदा लागू राहील काय, या बाबतीत विधेयकामध्ये कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. आता नवीन तंत्रज्ञान, ई-तंत्रज्ञान आलेले आहे. त्यामुळे ज्या कार्यालयांमध्ये सेवेचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आऊटसोर्सिंग झालेले आहे त्या ठिकाणी हा कायदा लागू होईल काय, या बाबतचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा. तसेच हा कायदा लागू करण्यापूर्वी शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना ज्या गोष्टी किंवा मनुष्यबळाची आवश्यकता असेल ते सरकारने उपलब्ध करुन दिले पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 1 मे रोजी त्या त्या विभागातील ज्येष्ठ आमदारांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला. याबद्दल मी खरोखरच त्यांचे अभिनंदन करतो. मला पुण्याच्या तहसीलदारांनी तहसील कार्यालयात ध्वजारोहण करण्यासाठी बोलविले होते. त्या तहसील कार्यालयात किमान चार ते पाच तहसीलदार बसतात. मला कोणावर हेत्वारोप करायचा नाही किंवा कोणाबद्दल बोलायचे सुध्दा नाही. भाजपाच्या एका नेत्याने बीओटीवर त्या तहसील कार्यालयातील काही जागा घेतली आहे. असो. महोदय, ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाल्यानंतर मी तहसील कार्यालयात चहा-पाणी घेण्यासाठी गेलो. खुराड्यात जशा कोंबड्या राहतात तशा प्रकारे त्या कार्यालयात तहसीलदार छोटे छोटे स्टॉल लावल्यासारखे बसलेले होते. मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याला एका रिसेप्शनच्या कार्यक्रमात सेवा हमी कायद्याच्या स्वरुपाबाबत विचारणा केली होती. मी 1 मे रोजी तहसीलदारांना सुध्दा विचारले की, सेवा हमी कायद्याचे स्वरुप कसे असेल ? त्यांनी मला सांगितले की, साहेब, आम्हाला बसायलाच जागा नाही, शासनाची वेबसाईट बऱ्याच वेळा बंद असते, ई-तंत्रज्ञानाची पुरेशी कनेक्टिव्हीटी वाढलेली नाही. महोदय, अशा असंख्य तक्रारी आहेत. त्यामुळे त्या तक्रारींचा निपटारा झाला पाहिजे. माझे म्हणणे एवढेच आहे की, हा कायदा करण्यापूर्वी शासकीय कर्मचाऱ्यांना पुरेसे बळ दिले पाहिजे.

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्र.10 खंड-25 अंतर्गत "....कोणत्याही कृतीसाठी, कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा, खटला अथवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही". असे नमूद केले आहे. या अंतर्गत आपण अधिकार आणि आयुक्त निर्माण केले आहेत, यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी निर्माण केलेले आहेत. पण यामध्ये लोकप्रतिनिधींचा कोठेही समावेश नाही. या संदर्भातील खऱ्या अडचणी लोकप्रतिनिधींना येतात. दिवाणी न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद असल्यामुळे कोणी तेथे जाणार नाही. अधिकाऱ्यांच्या विरोधात कोणी बोलणार नाही. त्यामुळे या संदर्भातील आढावा घेण्यासाठी कमीत कमी प्रत्येक जिल्ह्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

लोकप्रतिनिधींची समिती असावयास पाहिजे. त्या समितीने या कायद्याची अंमलबजावणी करताना कोणत्या अडचणी आल्यात हे सरकारला सांगावे. जर न्यायालयाचे दरवाजे बंद होत असतील तर कमीत कमी लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे, अशी मी विनंती करतो.

मुख्यमंत्री महोदय, आपल्याला एक मोठा निर्णय घ्यावा लागेल. मला वाटतो तो निर्णय आपण घेऊ शकाल. माझी सर्वात महत्त्वाची मागणी अशी आहे की, मंत्रालय हे फक्त पॉलिसी मेकींग ऑफीस केले पाहिजे. आज अशी परिस्थिती आहे की, राज्याच्या स्थानिक पातळीवरील 90 ते 95 टक्के फाईल्स या मंत्रालयात येतात. माननीय मंत्र्यांना त्या फाईल्सचा निपटारा करावा लागाते. त्यामुळे मंत्रालयात मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. अशी परिस्थिती असेल तर सेवा हमी कायद्याचा उपयोग काय ? मंत्रालय स्तरावर केवळ धोरणात्मक निर्णय झाले पाहिजेत. त्या निर्णयांची अंमलबजावणी स्थानिक पातळीवरुन करुन घेतली पाहिजे. महोदय, मी कोणावर आक्षेप घेत नाही. या मंत्रिमंडळावर सुध्दा आक्षेप घेणार नाही. कारण या सरकारला सत्तेत येऊन केवळ 8-9 महिने झालेले आहेत. आपण मला आपल्या मंत्रिमंडळातील एक मंत्री असा दाखवा की, त्यांनी आपल्या विभागाची माहिती घेऊन राज्यातील संपूर्ण जिल्ह्यांचा दौरा केला आहे. मला वाटते कुठे ना कुठे तरी उणीव असेल. जर आपण दौराच केला नाही तर आपल्याला वस्तुस्थिती कशी समजणार ? त्यामुळे मंत्रालयाने केवळ पॉलिसी मेकींगवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. त्या पॉलिसीची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यास आपल्याला भरपूर वेळ मिळणार आहे. काल एका प्रस्तावावरील चर्चेच्या दरम्यान जे आरोप झाले त्या विषयात मी जात नाही. सरकारने मंत्रालय हे पॉलिसी मेकींग करुन, अधिकारांचे विभाजन केले पाहिजे. हे विभाजन विभागीय, जिल्हा आणि तालुका पातळीवर केले तर बरे होईल. अशा प्रकारे विभाजन केल्यास कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर असले तरी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होणार नाहीत. सभापती महोदय, राज्य सरकार भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करण्याचा कायदा आणत आहे. तो कायदा आणत असताना मंत्रालय हे केवळ पॉलीसी मेकींग हाऊस राहील अशा प्रकारचा कायदा सभागृहापुढे आणला पाहिजे. मंत्रालयात स्थानिक पातळीवरील फाईल्स पाठवून माननीय मंत्र्यांनी क्लार्कसारखे काम करावे, असे अपेक्षित नाही. त्यामुळे या दृष्टीने कार्यवाही करावयास पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, मी या निमित्ताने कै.शंकरराव चव्हाण यांचा आवर्जून उल्लेख करु इच्छितो. पूर्वी मंत्रालयात कामकाजाची एक विशिष्ट पध्दत होती. मी त्यावेळी आमदार होतो. त्यावेळी कोणतीही फाईल लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक, अधीक्षक, अवर सचिव, उप सचिव, सह सचिव, अतिरिक्त सचिव, सचिव आणि प्रधान सचिव या प्रोसेसने पुढे जात होती. या कार्यपध्दतीच्या बाबतीत शंकरराव चव्हाण यांनी सांगितले की, Nothing doing. त्यांनी सांगितले की, कक्ष अधिकारी ही एकच व्यक्ती फाईल हँडल करेल. ती फाईल कक्ष अधिकाऱ्याकडून थेट सचिवांकडे जाईल. जर सचिवांनी उप सचिव किंवा अतिरिक्त सचिवांना अधिकार दिले असतील तर, ती फाईल कक्ष अधिकाऱ्यांकडून थेट उप सचिव किंवा अतिरिक्त सचिवांकडे जाईल. त्यामुळे अशा पध्दतीच्या सुधारणा आपण कराव्यात, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या कायद्याचा फक्त मसुदा मंत्र्यापुढे आला असेल. उत्तम प्रशासनाच्या बाबतीत डॉ.माधव गोडबोले यांच्या एक सदस्यीय समितीने अहवाल तयार केला होता. त्यांनी तो अहवाल जुलै-2001 मध्ये शासनाकडे सादर केला आणि शासनाने तो मान्य केला.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

तो शासनाला जुलै, 2001 मध्ये दिला आणि शासनाने तो मान्य केला, त्याचा जो घोषवारा आहे तो उत्तम प्रशासन कसे असावे याचा उत्तम नमुना आहे. डॉ. माधव गोडबोले यांच्याबद्दल आपल्यापैकी कोणीही त्यांचे कौतुकच करेल, इतके उत्तम प्रशासन त्यांनी दिले. आपल्याकडे झिरो बेस बजेटची कल्पना आली. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, ही कल्पना सुध्दा या ना त्या प्रकारे आणावी. स्व. शंकरराव चव्हाण साहेबांनी त्यावेळी माझ्याकडे 7 विभाग दिले होते आमदारांच्या समित्या केल्या होत्या. मी चव्हाण साहेबांकडे गेलो अणि त्यांना म्हटले की, कसे काम करायचे ? ते म्हणाले की आपल्याला विकास निधी मिळाला पाहिजे. माझ्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग होता पाटबंधारे विभाग होता. ते मला म्हणाले की, रणपिसे काय हो, सार्वजनिक बांधकाम विभागाचे एक पोते जरी झटकले तरी लाखभर रूपये पडतील. महसूल गोळा करण्याचा विषय होता. त्यावेळी असे घडले. दूध योजना होती, दुधाच्या पिशव्यांची मायक्रॉन्समध्ये जाडी असते. आमच्यापुढे तो विषय आला. दुधाच्या पिशव्यांची जाडी जास्त होती. आम्ही दुधाच्या पिशव्या लॅबमध्ये पाठविल्या आणि दुधाच्या पिशव्यांची जाडी कमी केली आणि विभागाचे करोडो रूपये वाचविले. उत्तम प्रशासनामध्ये श्री. माधव गोडबोले यांचा हात कोणीही धरू शकणार नाही, त्यांनी ज्या सधारणा सुचविल्या होत्या, त्यांचा घोषवारा आहे. संपूर्ण पुस्तक वाचण्याची आवश्यकता नाही, त्यामध्ये त्यांनी सूचना दिल्या होत्या की, उत्तम प्रशासनासाठी त्रैमासिक बैठक आवश्यक आहे. कॉर्पोरेटमध्ये 3 महिन्यांनी आढावा घेण्याची पध्दत आहे. तालुका, जिल्हा, विभाग, मंत्रायल या पातळींवर आढावा बैठका झाल्या नाहीत तर या कायद्याचा काहीही उपयोग होणार नाही. गोडबोले समितीच्या घोषवाऱ्यातील सूचना आहेत, ती आपण स्वीकारावी. उत्तम प्रशासनासाठी स्थायी समिती स्थापन करणे या विषयाशी संबंधित एक स्थायी समिती नेमण्याची शिफारस करण्यात येत आहे. ही स्थायी समिती मंत्रालयीन क्षेत्रीय कार्यालये आणि समाजातील सर्व हितसंबंधीत व्यक्तींबरोबर सतत विचाविनिमय करून याबाबतीत यथोचित शिफारस करेल. स्थायी समिती असेल तर अनेक निर्णय घेण्याचे अधिक्कार त्यांना मिळतील. प्रत्येक वेळा माननीय मुख्यमंत्र्यांना फाईल्स दाखवा आणि निर्णय घ्या असे होणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना तेवढा वेळ नसतो म्हणून त्यांनी स्थायी समिती सूचविली होती. एक उत्तम प्रशासन केंद्रही असावे आणि उत्तम प्रशासनासाठी त्याचाही वारंवार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

आढावा घ्यावा आणि माननीय मुख्यमंत्र्यांना वाटले तर मंत्रिमंडळाची एखादी उप समिती सुध्दा असावी, अशा 4-5 सूचना त्यांच्या घोषवाऱ्यामध्ये होत्या. (अडथळा) सरकारकडे तो रिपोर्ट आहे. सरकारला तो रिपोर्ट सादर झाला आहे. माझे मत एवढेच आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची भावना चांगली आहे. आम्ही सहमत आहोत. ज्यांनी कायद्याचा मसुदा केला ते अधिकारी काय करतात ? ते अधिकारीच या कायद्याची विल्हेवाट लावतील हे लक्षात घ्यावे. तुमचा हेतू चांगला आहे. आम्ही तुमच्या हेतूशी सहमत आहोत. विधेयक प्रवर समितीकडे प्रलंबित ठेवावे म्हणून असे नाही. नियमात नको, अधिसूचनेत नको, जे काही आणायचे असेल ते कायद्यात आणावे. आपल्याला पाहिजे असेल तर आणावे. आम्ही काही प्रवर समितीसाठी हट्टाने बसलो आहोत, तुम्हाला काही विरोध करायचा आहे असे काही नाही. परंतु मेहेरबानी करून प्रशासकीय यंत्रणेच्या हाती या अधिसूचना आणि नियम यांचे अधिकार देऊ नका. ज्याला घोड्यावर बसायचे आहे, त्याची मांड पक्की पाहिजे. कायदा असला की, तो तुमच्या हातामध्ये राहील आणि तुम्ही चाबूक मारला की, तो प्रशासनाचा घोडा पळेल, एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या विधयेकाच्या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी काही सूचना मांडल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी 2-3 विषय मांडले आहेत. खरे म्हणजे हा कायदा अनेक राज्यांनी केला आहे. आपल्याही राज्याने सन 2005 मध्ये दफ्तर दिरंगाईचा कायदा केला होता. दुर्दैवाने जवळजवळ 7-8 वर्षे त्या कायद्याची अंमलबजावणी आपण करू शकलो नाही. आपण त्या कायद्यामध्ये एक सिटिझन्स चार्टर देखील ठेवला होता. कायद्याची अंमलबजावणी होत नव्हती, त्यावेळी आम्ही नागपूरमध्ये, आता आम्ही म्हणणे योग्य नाही, संबंधित लोकांनी एक पीआयएल दाखल केली आणि त्यानंतर काही गोष्टी अशा लक्षात आल्या की, सिटिझन्स चार्टर हा त्या कायद्याचा भाग जरी असला तरी देखील सिटिझन्स चार्टरला कायदेशीर अधिकार नाही. दफ्तर दिरंगाईच्या कायद्याची अंमलबजावणी झाली तरी मंत्रालयीन स्तरावरच्या ज्या फाईल्स आहेत, त्यांच्या संदर्भात त्यातून अधिक एफिशिएन्टली काम करता येईल. परंतु सेवा देण्याची वेगवेगळी कार्यालये आहेत, त्यामध्ये सिटिझन्स चार्टरला लिगल बॅकिंग नसल्यामुळे किंवा त्यातील तरतुदी या कायद्यात नसल्यामुळे त्या माध्यमातून जनतेला कुठलाही लिगल रिकोर्स राहत नाही. आपण उल्लेख केला. माननीय श्री. अण्णा हजारे साहेबांची ही सर्व मूव्हमेंट चालली होती त्यावेळी एक विरोधी पक्षाचा आमदार म्हणून मी स्वत: या सेवा हमी विधेयकाच्या संदर्भात देशातील जवळजवळ सर्व राज्यांचा अभ्यास केला. जगातील अनेक देशांनी हे स्वीकारले आहे. मी सर्वांच्या संदर्भातील अभ्यास करून एक मसुदा त्यावेळी तयार केला हाता आणि तो सभागृहात मांडला होता. सरकारतर्फे त्या संदर्भात असे सांगण्यात आले होते की, आम्ही हा मसुदा मांडू. परंतु दुर्दैवाने त्या काळात तो मांडण्यात आला नाही. आता हे सरकार आल्यानंतर हा मसुदा आपण येथे मांडला आहे. त्यामुळे हा मुसदा केवळ सरकारी स्तरावर झाला असे नाही तर मी स्वत: देखील जवळजवळ 15-20 देशांचा आणि आपल्या देशातील 78 राज्यांच्या या कायद्याच्या संदर्भातील अभ्यास केला आणि त्यातून हा मसुदा तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. सभागृहात 2-3 विषय मांडण्यात आले.

सभापती महोदय, नियम करण्याचा अधिकार हा प्रत्येक कायद्यात आपल्याला द्यावा लागतो आणि तो याकरिता द्यावा लागतो की, कायद्यामध्ये आपल्याला सर्व गोष्टींचा उल्लेख करता येत नाही. उदा. आपल्याला जर कायद्यामध्ये असे सांगायचे असेल की, रिपोर्ट सादर करा तर तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ....

कोणत्या प्रोफॉर्म्यात सादर झाला पाहिजे हा कायद्याचा भाग होत नाही, तो नियमांचा भाग होतो, म्हणून हे जे नियम करण्याचे अधिकार आहेत ते काही आपण कोणा अधिकाऱ्यांकडे दिलेले नाहीत, हे शासनालाच आहेत आणि शासनाने हे नियम तयार केल्यानंतर विधानमंडळाच्या आपल्या उप विधान समितीकडे येतील आणि उप विधान समिती त्याला मान्यता देईल. त्यामुळे विधानमंडळाचाच तो भाग असणार आहे. आपण त्याची काळजी व्यक्त केली, तसे निश्चितपणे होणार नाही. नियम देखील विधानमंडळच ठरवेल, कोणत्याही अधिकाऱ्यांना ते ठरविण्याचा अधिकार आपण देणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शास्तीच्या संदर्भात चिंता व्यक्त केली. मी त्याही संदर्भात सांगू इच्छितो की, आपण सुरूवातीला जास्त शास्ती ठेवण्याचा विचार केला होता. पण ज्यावेळी या संदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा झाली त्यावेळी सर्वांनी विनंती केली, विशेषतः अधिकारी, कर्मचारी महामसंघ भेटले, त्या सर्वांनी या कायद्याचे स्वागत करताना एक विषय असा मांडला की, नवीन कायदा येत आहे, आम्हाला या कायद्यामध्ये सर्व गोष्टी रूळायला थोडासा वेळ लागेल. सुरूवातीलाच जर एवढी शास्ती ठेवली तर ते योग्य होणार नाही म्हणून आपण ती शास्ती 500/- रूपये ते 5000/- रूपयांपर्यंत ठेवली. भविष्यात जर ती वाढवायची असेल तर त्या संदर्भात आपल्याला अशा प्रकारची अधिसूचना काढून ती वाढविता येईल एवढीच तरतूद यामध्ये आहे. त्यामुळे त्याचाही जो काही उपयोग आहे तो आपल्याला, शासनाला करायचा आहे. ती अधिसूचना काढल्यानंतर आपल्या निदर्शनास येणार आहे, ती अधिकारी स्वतःच्या भरवश्यावर वापरू शकतील असे त्यामध्ये नाही. जेथे सेवा आऊटसोर्स केल्या आहेत तेथेही हा लागू आहेच. कारण सेवा आऊटसोर्स जरी केल्या असल्या तरी आऊटसोर्सिंग एजन्सी ही त्या त्या शासनाचा किंवा लोकल बॉडीचा पार्ट आहे, त्याच्या सेवा देणारी ती एजन्सी आहे, त्यामुळे ते त्यांना लागू असेल. आऊटसोर्समध्ये सायनिंग ऑथारिटी असते, तो शासनाचा अधिकारी असतो.

(नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सायनिंग ॲथॉरिटी असलेला अधिकारी यासाठी जबाबदार असेल, आऊट सोर्सिंग एजन्सी जबाबदार ठरणार नाही. कारण, ऑऊट सोर्सिंग एजन्सी ही सायनिंग ॲथॉरिटीच्या अधिपत्याखाली काम करीत असते.

सभापती महोदय, दिवाणी न्यायालयाच्या संदर्भातही या ठिकाणी उल्लेख झाला आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, आपण माहितीच्या अधिकाराचा कायदा केला आहे. यामधील तरतुदी आणि सेवा हमी कायद्यातील तरतुदी बहुतांश सारख्या ठेवल्या आहेत. माहिती आयुक्तानी किंवा या कायद्यांतर्गत सेवा आयुक्तांनी दिलेले निर्णय दिवाणी न्यायालयात वरचेवर चॅलेंज होऊ लागले तर त्यामधून दिवाणी न्यायालयांचे काम मोठ्या प्रमाणावर वाढेल. माहिती आयुक्त किंवा सेवा आयुक्त यांचा दर्जा आपण त्यापेक्षा उच्च ठेवला आहे आणि त्यामुळे त्यांच्या निर्णयाविरुध्द अपिल करावयाचे असेल तर ते उच्च न्यायालयात करावे लागेल. त्यासाठी या कायद्यान्वये कोणताही अटकाव करण्यात आलेला नाही. अशीच तरतूद माहितीचा अधिकार कायद्यात आहे आणि तशीच ती आपण याही कायद्यात ठेवली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी लोकप्रतिनिधींची एक समिती गठीत करावी, अशी चांगली सूचना मांडली आहे व ती मी स्वीकारतो. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यानंतर मॉनिटरिंग किंवा अंमलबजावणी योग्य पध्दतीने होते किंवा नाही, हे पाहण्यासाठी जिल्हा स्तरावर आपण निश्चितपणे समित्या गठीत करू. त्या माध्यमातून आपल्याला चांगले काम करता येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आणखी एक चांगला विषय या ठिकाणी मांडला आहे. मंत्रालय हे पॉलिसी मेकिंगचे ठिकाण असले पाहिजे आणि तसेच अपेक्षित होते. परंतु, हळुहळु आपण अधिकार केंद्रित करु लागलो. आता हे सरकार आल्यानंतर आम्ही प्रयत्नपूर्वक हे अधिकार खाली देण्याची व्यवस्था सुरु केली आहे. बदल्यांच्या संदर्भातील अधिकार आपण खाली दिले आहेत, निर्णयांचे अधिकारही खाली दिले आहेत. आपल्याला हेही माहीत आहे की, नगर विकास विभागांतर्गत सेक्शन 37 व सेक्शन 20 चे मंत्रालयातील अधिकार आपण विभागीय आयुक्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

स्तरावर दिलेले आहेत. कारण, मी आपल्या या मताशी सहमत आहे की, जोपर्यंत आपण अधिकारांचे विकेंद्रीकरण करणार नाही तोपर्यंत पॉलिसी मेकिंगला मंत्रालय उचित वेळ देऊ शकणार नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.गिरीश महाजन असे म्हणत आहेत की, "आमचेही अधिकार देऊन टाकले आहेत." मी सांगू इच्छितो की, सर्वांचेच अधिकार खाली दिले आहेत, केवळ तुमचेच नाही. हे अधिकार खाली दिलेच गेले पाहिजेत आणि तोच आपला प्रयत्न आहे. फक्त अशा प्रकारे अधिकारांचे विकेंद्रीकरण करीत असताना चेक ॲण्ड बॅलन्स ठेवणेही आवश्यक आहे. अन्यथा, आपण हे अधिकार खाली देत गेलो आणि खालच्या स्तरावर काही गैरकारभार झाला तर आपला उद्देश सफल होणार नाही. त्यामुळे चेक ॲण्ड बॅलन्सही असला पाहिजे आणि तो मंत्रालयाच्या माध्यमातून झाला पाहिजे, एवढाच विषय आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना स्वागतार्ह असून संविधानाने मंत्री महोदयांना दिलेले अधिकार वगळून मंत्रालयातील सर्व बाबी, विशेषत: सेवेच्या संदर्भातील किंवा वैयक्तिक निर्णयांच्या संदर्भातील बाबी टप्प्याटप्प्याने खालच्या स्तरावरील प्रशासनाला कशा देता येतील, याचा आपण निश्चितपण प्रयत्न करू

सभापती महोदय, या कायद्याच्या माध्यमातून लोकांना आपण एक नवीन अधिकार देत आहोत. निश्चितच कायद्याची अंमलबजावणी करीत असतना काही अडचणी समोर येऊ शकतील. त्याही आपण भविष्यकाळात दूर करू

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना मी आपल्या माध्यमातून अशी विनंती करतो की, त्यांनी आपले अनुक्रमे विधेयक प्रवर समितीकडे आणि संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्याबाबतचे प्रस्ताव मागे घ्यावेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनीही अशाच स्वरूपाचा प्रस्ताव मांडला आहे, त्यांनाही मुख्यमंत्री महोदयांनी प्रस्ताव मागे घेण्याबाबतची विनंती करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद फडणवीस : सभापती महोदय, My dear friend, नागपूरचे माझे जवळचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनीही आपला प्रस्ताव मागे घ्यावा, अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, या विधेयकातील त्रुटी सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्यास आगामी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात त्या संदर्भात निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहूल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 च्या वि.स.वि.क्रमांक 26- महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयकावर बोलण्यासाठी मला आपण दोन मिनिटांचा कालावधी द्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या बिलाचा सर्व फोकस 'एलिजिबल पर्सन'वर आहे. म्हणजेच, डेसिग्नेटेड ॲथॉरिटीने असे ठरविले की, ही व्यक्ती एलिजिबल नाही तर त्याला अपिल करण्याचाही अधिकार या कायद्यान्वये मिळू शकणार नाही. कारण, या विधेयकातील सेक्शन 9 ची प्रोव्हिजन फर्स्ट अपिलासाठी आहे आणि त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Any eligible person whose application is rejected under sub section (2)". म्हणजे अपिल करण्याची फॅसिलिटी ही फक्त एलिजिबल पर्सनलाच आहे. ही तरतूद अशीच ठेवली तर हा कायदा कोणाच्याही उपयोगाचा ठरणार नाही. माझ्या मते आपण 'Eligible Person' ऐवजी 'Applicant' असे म्हणावयास हवे. कारण, ज्यावेळी ॲप्लिकंट ॲप्लिकेशन करतो तेव्हा त्याची एलिजिबिलिटी ठरविण्याचा अधिकार हा फायनल अपिलापर्यंत असावयास हवा. आपण जर हे अधिकार फर्स्ट ॲथॉरिटीला दिले आणि अपिल ॲथॉरिटीला फक्त एलिजिबल पर्सनचेच ॲप्लिकेशन्स स्वीकारण्याचे अधिकार ठेवले तर या कायद्याचा काहीही उपयोग होणार नाही. मुख्यमंत्री महोदयांनी यावर विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या व्यतिरिक्त तीन-चार मुद्दे आहेत, जे मी पटकन सांगू शकतो. या विधेयकात आपण डेसिग्नेटेड ऑफिसरची डेफिनेशन केली आहे आणि पुढे या डेसिग्नेटेड ऑफिसरला आपण रिस्पॉन्सिबल धरले आहे. जर त्यांनी विहित मुदतीत सर्व्हिस दिली नाही तर 'Designated officer will be responsible', असे आपण या विधेयकात म्हटले आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर आपल्याला Annexure-2 हवा असेल तर त्यासाठी आपण आपली फाईल संबंधित कार्यालयाकडे लॉग इन करतो. त्या कार्यालयात 3/4 सर्व्हेअर असतात. Annexure-2 चे कामकाज सर्व्हेअर यांनी करावयाचे असते. एका पेक्षा अधिक सर्व्हेअर असल्यामुळे त्या कामासाठी आपण नेमक्या कोणत्या सर्व्हेअरला जबाबदार धरणार आहोत ? म्हणून माझ्या मते डेसिग्नेटेड ऑफिसरच्या डेफिनेशनमध्ये आपण हेड ऑफ दि डिपार्टमेंट यांना सुध्दा इन्व्हॉल्व्ह केले पाहिजे. तसे केले तर कलेक्टिव्ह रिस्पॉन्सिबिलिटी होईल आणि अधिकारी स्वत:ची रिस्पॉन्सिबिलिटी दुसऱ्यावर ढकलू शकणार नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहूल नार्वेकर.....

सभापती महोदय, या विधेयकान्वये आपण 500 रुपयांची पिनल प्रोव्हिजनही केली आहे. परंतु, सिग्नल तोडला तर 500 रुपयांचा फाईन आहे. त्यामुळे सर्व्हिसेसच्या बाबतीत आपल्याला खरोखरच अधिकाऱ्यांना अकाऊंटेबल धरावयाचे असेल तर या रकमेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. यामधून एक डिटरंट फॅक्टर तयार होईल आणि हा फॅक्टर क्रिएट झाला तरच लोकांना योग्य प्रकारे सर्व्हिसेस प्राप्त होतील.

सभापती महोदय, या विधेयकान्वये आपण एक कमिशन तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे व त्यामध्ये मुख्यमंत्री महोदय, विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि कॅबिनेट मंत्री महोदय यांचा समावेश केलेला आहे. माझ्या मते विधानपरिषदेच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांना सुध्दा या समितीमध्ये स्थान असले पाहिजे. ज्यामुळे एक बॅलन्स क्रिएट होईल. शासनातर्फे मुख्यमंत्री महोदय व एक मंत्री महोदय आणि विधानसभा व विधान परिषदेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते यांचा समावेश असलेली ही समिती असावी, अशी तरतूद यामध्ये करावी, असे मला वाटते.

सभापती महोदय, या अमेंडमेंटस् आपण आणल्या तर हे विधेयक अधिक मजबूत होईल आणि ट्रान्स्फरन्सी, अकाऊंटेबिलिटी व रिस्पॉनसिव्हनेस, अशी जी बिलाची ऑब्जेक्टिव्हज आहेत, ती आपण अचिव्ह करु शकू. हे एक अतिशय चांगले बिल आहे. परंतु, या अमेंडमेंटस् केल्यानंतर या बिलाचा लोकांना चांगला फायदा होईल आणि या माध्यमातून आपण गुड गव्हर्नन्सचे एक चांगले एक्झाम्पल सर्वांसमोर ठेऊ शकू.

सभापती महोदय, या सर्व सूचनांचा शासनाने विचार करावा, अशी विनंती करतो, आपले आभार मानतो आणि थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 च्या वि.स.वि.क्रमांक 26- महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयकावर मी देखील फक्त दोन मिनिटेच बोलणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून घेतलेल्या धाडसी निर्णयाबद्दल मी मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानणार आहे आणि त्यांचे अभिनंदनही करणार आहे.

सभापती महोदय, नियत कालमर्यादेत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क आणि नियत कालावधीत लोकसेवा पुरविणे, अशी या विधेयकाची दोन उद्दिष्टे आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये.....

आपला जो हेतू आहे तो निश्चितच चांगला आहे. परंतु, कोणतेही विधेयक आल्यानंतर सर्व घटकांचा समावेश असावयास पाहिजे. यामध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी आरक्षण नाही. आपण जी समिती नियुक्त केली त्यामध्ये मुख्यमंत्री, विधानसभेतील विरोधी पक्षनेता आणि मुख्यमंत्र्यांनी एक कॅबिनेट मंत्री नामनिर्देशित करायाचा आहे. राज्यातील ज्या अधिकाऱ्यांची जिल्हानिहाय नियुक्ती करावयाची आहे, आपण कोणत्याही बॉडीचे सिलेक्शन करताना प्रोफेसर असो, असोसिएट प्रोफेसर असो किंवा इतर कोणीही असो, त्यामध्ये रिझर्वेशन हा क्लॉज आहे. त्या घटकाला वंचित ठेऊ नये, असे असते आणि आपण निश्चितपणे हे करावे. तसेच, मुख्य आयुक्तास किंवा मुख्य आयुक्तांना पदावरून दूर करणे यामध्ये शासनाचा काही अधिकार राहणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. हे अधिकार फक्त राज्यपाल महोदयांनाच आहेत. कलम 15 (1) नुसार हा अधिकार शासनाकडे असावयास पाहिजे. आपण मुख्य आयुक्तांची नेमणूक करणार आहात त्यांचे वय 65 वर्षापेक्षा जास्त असणार नाही, असे मला वाटते. एखादी व्यक्ती लोकसभेची सदस्य असो अगर नसो ती व्यक्ती राष्ट्रपती होऊ शकते. परंतु, आपल्याला कल्पना आहे की, लोकसभा किंवा विधानसभेत निष्णात लोक आहेत, कायद्याचे जाणकार आहे. असे नाही की, विधानपरिषदेत किंवा विधानसभेत कायद्याचे जाणकार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे, प्रा.जनार्दन चांदूरकर साहेबांसारखे सदस्य सभागृहात आहेत. निश्चितपणे त्या ठिकाणी सद्धा त्यांचे ग्रेडेशन कमी होऊ नये म्हणून ते त्यातून वगळण्यात यावे आणि त्यामध्ये योग्य व्यक्ती असेल त्या व्यक्तीला घेण्यात यावे, अशी माझी सूचना आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन-तीन मुद्दे मांडलेले आहेत. आपण इलिजिबल का नमूद केले, असा मुद्दा मांडलेला आहे. इलिजिबिलिटी याचा अर्थ येथे असा आहे की, आपण एखाद्या व्यक्तीला कायद्यानुसार अधिकार देत आहोत. उदाहरणार्थ अवैध ले-आऊटमधील एखाद्या व्यक्तीने महानगरपालिकेत जाऊन पाण्याच्या कनेक्शनची मागणी केली आणि त्याची मागणी फेटाळण्यात आली, कारण तो ले-आऊट अवैध आहे, जोपर्यंत तो वैध होत नाही तोपर्यंत आपल्याला पाण्याचे कनेक्शन देता येत नाही. तो पुन्हा अपिलमध्ये जाणार आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अपिलमध्ये फेटाळल्यानंतर तो पुन्हा, म्हणून इलिजिबल असे नमूद करण्याचे कारण एवढेच आहे आणि आपण जर त्याची संपूर्ण डेफिनेशन बघितली तर जो व्यक्ती कायदेशीर आहे तो प्रत्येक व्यक्ती यामध्ये इलिजिबलच आहे. त्यामुळे कोणतीही अडचण येणार नाही. आपण डेजिग्नेट ऑफिसर बाबत दुसरा विषय सांगितला. ज्या प्रमाणे माहितीच्या अधिकार कायद्यात अधिकारी डेजिग्नेट करावयाचा आहे, माहिती अधिकारी कोण, म्हणजे रिस्पॉन्सिबल कोण ? तसे यामध्ये सेवा अधिकारी कोण, हा प्रत्येक विभागाला डेजिग्नेट करावयाचा आहे आणि जो डेजिग्नेटेड ऑफिसर असेल त्याच्याच विरुद्ध या ठिकाणी कारवाई होईल. त्यामुळे यामध्ये कन्फ्युजन बिलकूल नाही. कोण कोण सेवा देणार आहे त्यालाच आपण डेजिग्नेट करणार आहोत. ते घोषित करणे, हेच कायद्याचे महत्व आहे आणि म्हणून डेजिग्नेटेड ऑफिसरचे कोणतेही कन्फ्युजन त्यातून तयार होणार नाही. तसेच, 500 ते 5000 रुपयांपर्यंत शास्तीची अट का नमूद केली ? मी मघाशी सांगितले की, हा कायदा नवीन आहे. सुरुवातीला चुका होऊ शकता. म्हणून थोडासा वेळ दिला पाहिजे. त्यामुळे सुरुवातीला शास्तीची रक्कम कमी ठेवण्यात आलेली आहे. हळूहळू सवय झाल्यानंतर शास्तीची रक्कम देखील वाढविण्यात येईल. तसेच, सिलेक्शनची जी प्रोसेस आहे त्या संदर्भात आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी सांगितले आहे. मुळात ही जी प्रोसेस आहे ती ज्या प्रमाणे माहितीच्या अधिकार कायद्यात आहे, ज्या प्रमाणे लोकायुक्त कायद्यात आहे, ज्या प्रमाणे केंद्रीय लोकायुक्त कायद्यात आहे, ज्या प्रमाणे सेन्ट्रल सिव्हीसीच्या कायद्यात आहे तीच तरतूद आपण जशीच्या तशी येथे केलेली आहे. यामध्ये कोणतीही वेगळी तरतूद करण्यात आलेली नाही. माझे परममित्र श्री.प्रकाश गजभिये यांनी सांगितले की, मुख्य आयुक्तास किंवा आयुक्तांना पदावरुन हटविण्याच्या संदर्भात आपण राज्यपाल महोदयांना अधिकार दिलेले आहेत. आपण अशा प्रकारचे सांविधानिक पद यासाठी तयार करतो की, शासनाचे त्यावर प्रेशर येऊ नये. शासनाने जर त्यांना पदावरुन हटविण्याचा अधिकार स्वत:कडे ठेवला तर उद्या त्यांना शासनाच्या प्रेशरखाली काम करावे लागेल. म्हणून आपण माहितीच्या अधिकारातही हीच तरतूद केलेली आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

की, एखाद्या व्यक्तीला पदावरून दूर करावयाचे असेल, उदाहरणार्थ मध्यंतरी आपल्याला माहिती आयुक्त, औरंगाबाद यांना काही कारणानिमित्त पदावरून दूर करावे लागले. त्यावेळी शासनाला त्यांना पदावरून दूर करता आले नाही. आपल्याला राज्यपाल महोदयांच्या माध्यमातूनच त्यांना पदावरून दूर करावे लागले. म्हणून आपण यामध्ये देखील तीच तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत जे प्रस्ताव मांडलेले आहेत ते त्यांनी मागे घ्यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी जिल्हा पातळीवर, विभागीय पातळीवर लोकप्रतिनिधींच्या समित्या स्थापन करण्याचे मान्य केले आहे. माझी अशी सूचना आहे की, हे अधिवेशन संपल्यानंतर एक अध्यादेश काढून तो याबरोबर जोडावा. (...अडथळा...) ठीक आहे, यामध्येच करावे.

सभापती महोदय, मी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत जो प्रस्ताव मांडलेला आहे तो मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे, सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी सुचविलेल्या सुधारणा मुख्यमंत्री महोदयांनी स्वीकारल्याबाबत मी त्यांना धन्यवाद देतो व मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत जो प्रस्ताव मांडलेला आहे तो मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टकातो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 30 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-26 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

सभापती : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-26 एकमताने संमत झाले आहे.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पीक विमा योजनेचे हप्ते भरण्याची मुदत वाढविण्याबाबत

मु.शी.: पीक विमा योजनेचे हप्ते भरण्याची मुदत वाढविण्याबाबत माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, मागील 3-4 दिवसापासून विधानसभा आणि विधानपरिषदेतील सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि सर्वच सन्माननीय सदस्यांनी पीक विमा योजनेच्या संदर्भातील मुदत आज संपत आहे, ती मुदत वाढवून देण्याबाबत वारंवार मागणी केलेली आहे.

यानंतर श्री.खर्चे वि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

केंद्र सरकारकडे दोन दिवसांपासून प्रधान सचिव कृषी व अन्य अधिकारी सातत्याने चर्चा करीत आहेत, मी स्वतः देखील माननीय केंद्रीय कृषी मंत्री यांच्याशी दोन तीन वेळा बोललो आहे, त्यासंदर्भात चर्चा झाली. परंतु विमा कंपन्या मुदत वाढ देण्यास तयार होत नव्हत्या. माननीय केंद्रीय वित्त मंत्री श्री. अरुण जेटली यांच्याशी मी चर्चा करुन विनंती केली की, राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता किमान 15 दिवस पीक विमा योजनेचे हप्ते भरण्यासाठी मुदत वाढवून देण्यात यावी. याबाबत केंद्र सरकारने मला आता नुकतेच कळविले आहे की, पीक विमा योजनेच्या संदर्भात हप्ते भरण्याबाबत आठ दिवसांची मुदत वाढवून देण्यात येत आहे.

सभापती : ठीक आहे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधानपरिषद विधेयक क्रमांक 13 बाबत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन 2015 चे.वि.प.वि.क्रमांक 13..

सभापती : माननीय राज्यमंत्री महोदय, हे विधेयक विधानपरिषदेत ओरिजनेट झाले आहे. हे विधेयक आता पास झाले तरी विधानसभा संस्थगित झाली आहे. त्यामुळे पुढील अधिवेशनात हे विधेयक मंजुरीसाठी मांडण्यात यावे.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील लीजवर देण्यात आलेल्या जमिनीबाबत धोरण ठरविणे

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबई शहरात क्रीडांगण आणि क्लबहाऊस याकरिता शासनातर्फे जमिनी व इतर सवलती काही अटी व शर्तीवर देण्यात येतात. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, या अटी व शर्तींचे पालन त्यांच्याकडून करण्यात येत नाही. उलट क्लबचे अधिकारी व पदाधिकारी अशा अविर्भावात वागतात की, शासनाचा या जमिनीशी काहीही संबंध नाही. सर्व सन्माननीय सदस्य माझ्या मताशी सहमत होतील. मी आपणाला विनंती करतो की, याबाबत सद्यस्थिती काय आहे, ज्या अटी व शर्ती आहेत त्यांचे पालन का होत नाही. यासाठी सर्व संबंधित लोकप्रतिनिधी यांची बैठक बोलवावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे, आपण म्हणता ती बाब मान्य करण्यात येत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मुंबई शहरातील शासकीय जमिनी लीजवर देऊन मोठ्या प्रमाणात क्लबहाऊस उभारण्यात आले आहेत. काही क्लबसाठी 99 वर्षाच्या लीजवर जमीन देण्यात आली आहे तर काही क्लबसाठी 39 वर्षाच्या लीजवर जमीन देण्यात आली आहे. काही क्लबहाऊस यांना ब्रिटीशांच्या कालखंडापासून किंवा त्या अगोदरपासून लीजवर जमिनी देण्यात आल्या आहेत. ज्या शर्ती व अटी नमूद करून या जमिनी क्लबसाठी देण्यात आल्या त्या अटी व शर्तींचे उल्लंघन अनेक वेळा झाल्याची उदाहरणे निदर्शनास आली आहेत. यासंदर्भात काही तक्रारी देखील आल्या आहेत. अशा तक्रारी क्लबकडे पाठविल्यावर त्या तक्रारीचे निवारण करण्यात येईल असे क्लबकडून सांगितले येते.

सभापती महोदय, हॉस्पिटल आणि क्लबसाठी मोठ्या प्रमाणात जमिनी दिल्या आहेत. या जमिनींचा वापर हॉस्पिटल ऐवजी अन्य कमर्शिअल कामासाठी करण्यात येत आहे. क्लबच्या मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणात लग्न व इतर कार्यक्रमासाठी मंडप उभारण्याची परवानगी देणे, अशा प्रकारे उल्लंघन झाले आहे. मंत्रालया शेजारी ओव्हल मैदान आहे, त्या शेजारी आणखी एक ग्राऊंड आहे, त्या ग्राऊंडची लीज आता संपलेली आहे, विल्सन कॉलेज ग्राऊंडची लीज संपत आली आहे, पोलीस ग्राऊंडची लीज संपत आली आहे. बोहरा कम्युनिटीचे ग्राऊंड आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

त्याचप्रमाणे पारशी जिमखाना या सर्वांसाठी शासनाने लीजवर जमिनी दिल्या आहेत. येथील प्रशासन अजिबात कोणाचे ऐकण्यास तयार नाहीत. पैसे भरुन देखील सभासद करण्यास ते तयार होत नाहीत. पुणे येथे ट्रम क्लब व आणखी बरीच ग्राऊंडस् आहेत, या सर्व जागांच्या लीज संदर्भात नव्याने विचार करुन त्या जागा ज्या प्रयोजनासाठी दिल्या आहेत, त्या त्याच प्रयोजनासाठी वापरल्या पाहिजेत यासाठी शासनाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. ज्या ठिकाणी अटी व शर्तींचे उल्लंघन होत असेल त्या जमिनी राज्य सरकारच्या ताब्यात घेण्याचा विचार शासनाकडून जरुर करण्यात येईल.

सभापती महोदय, यामध्ये ब्रीचकॅन्डी सारखी काही मोठी हॉस्पिटल्स् आहेत, या हॉस्पिटला सरकारने जमिनी दिल्या आहेत, सरकारने ठरवून दिलेल्या बीपीएल मधील 10 किंवा 20 टक्के रुग्णांवर मोफत किंवा कमी दराने उपचार करण्यास हॉस्पिटल प्रशासन तयार होत नाहीत. अशा हॉस्पिटलच्या लीजचे नुतनीकरण करावे किंवा नाही यासंदर्भातील निर्णय सरकारला घ्यावा लागणार आहे. कोट्यवधी रुपयांच्या जमिनी मोफत किंवा नाममात्र दराने दिलेल्या असताना गरीब वर्गाला देखील न्याय मिळत नसेल तर त्यांची ही भूमिका योग्य नाही. माननीय मुख्यमंत्री यांच्यासह आम्ही तीन-चार मंत्री एकत्र बसून याबाबत धोरण ठरविण्यात येईल. यामध्ये सन्माननीय सदस्यांकडून ज्या सूचना येतील त्यांचा जरुन विचार करण्यात येईल. मुंबई शहरापुरतेच नाही तर राज्यव्यापी धोरण ठरविण्यात येईल. यामध्ये शैक्षणिक संस्थांना देण्यात आलेल्या जमिनी व अशा प्रकारे अनेक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या जमिनीबाबत धोरण निश्चित केले जाईल. लोकप्रतिनिधींकडून ज्या सूचना येतील त्यांचा विचार धोरण ठरवितांना करण्यात येईल. लवकरात लवकर म्हणजे डिसेंबर किंवा मार्च महिन्यातील अधिवेशनात धोरण जाहीर करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना मान्य आहेत, मुख्यमंत्री व मंत्री महोदयांनी देखील याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. यासंदर्भातील धोरण जेव्हा ठरविण्यात येईल ते फायनल करण्याच्या अगोदर माझ्या दालनात सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांची एक बैठक घेण्यात घ्यावी. धोरणाचा मसूदा तयार केल्यानंतर लोकप्रतिनिधी सूचना देतील, ही कार्यवाही लवकरात लवकर व्हावी अशी माझी सूचना आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्व.आर.आर.पाटील यांचे मुंबईत स्मारक करण्याबाबत

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आम्ही नवीन सदस्य आहोत, महामहीम माननीय राज्यपाल यांचे अभिभाषण, दुसरे बजेटवर आणि तिसरे म्हणजे अंतिम आठवडा प्रस्तावावर आम्ही बोलत असतो. आज अंतिम आठवडा प्रस्ताव असल्यामुळे मी माननीय सभापती व मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानतो.

सभापती महोदय, फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्राला धर्मनिरपेक्ष आणि समतेच्या विचारावर गतीने नेणारे स्व.आर.आर.पाटील माननीय आबा हे सांगली जिल्ह्यातील तासगांव मतदारसंघातून सहा वेळा निवडून आले होते. राज्याचे उप मुख्यमंत्री, गृह मंत्री, ग्रामविकास मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून सक्षमरित्या त्यांनी काम केले. राज्यात डान्सबार बंदी, तंटामुक्ती गाव योजना, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व अशा अनेक लोकोपयोगी योजना राबवून देशात महाराष्ट्राची प्रतिष्ठा वाढविली आहे. तसेच गृहखात्याचा त्यांनी सन्मान वाढविला आहे. गोरगरीब शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. गडचिरोली जिल्ह्याचे ते स्वत:हून पालकमंत्री झाले आणि त्या ठिकाणी उल्लेखनीय कार्य केले. शासनाच्या अनेक योजनांमधून त्यांनी गडचिरोली येथे 350 इमारती बांधल्या आहेत, गृहमंत्री म्हणून नक्षलग्रस्त भागात अनेक नक्षलग्रस्तांना आत्मसमर्पण करण्यास त्यांनी भाग पाडले व त्यांना लोकशाही मार्गावर आणले. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेचे प्रभुत्व वाढावे याकरिता इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या. नक्षलवाद्यांची भीती त्यांच्या मनातून काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. असा मातब्बर नेता आज आपल्यात नाही, विधानसभा व विधानपरिषद हे दोन्ही सभागृह आबांना विसरु शकत नाही. आबा नेहमीसाठी सर्वांच्या ह्रदयात राहतील असे स्थान त्यांनी निर्माण केले आहे. त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचे स्मरण रहावे याकरिता मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, माननीय आबा आठवणीत रहावे म्हणून मुंबईत त्यांचे स्मारक उभारावे. मी मुख्यमंत्री व सभापती महोदयांना विनंती करतो की, मी मांडलेल्या सूचनेचा आपण सकारात्मक दृष्टीने विचार करावा, धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : उचित विचार करण्यात यावा.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य माझे मित्र आहेत. त्यांनी उपस्थित केलेल्या विषयाला मला उत्तर द्यावेच लागेल. सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगली सूचना मांडली आहे. दोन्ही सभागृहातील नेत्यांना विश्वासात घेऊन आबांच्या स्मृतीकरिता कशा प्रकारे आपणाला कार्य करता येईल याचा शासन निश्चित विचार करीन, माझी अशी विनंती आहे की, सभापती महोदयांनी याचे प्रमुख पद स्वीकारावे.

या नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी.: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, जयंत पाटील, हेमंत टकले, भाई जगताप, शरद रणपिसे, सय्यद मुझफ्फर हुसेन, सुभाष झांबड, प्रा.जनार्दन चांदूरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री अनंत गाडगीळ, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.समहरी रुपनवर, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य प्रा.जे.सी.चांदूरकर, माननीय सदस्य श्री जयंतराव जाधव, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय सदस्य सर्वश्री मुझफ्फर हुसेन, किरण पावसकर, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे सर यांनी आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, वेळेची मर्यादा लक्षात घेता त्यातील काही मुद्यांना मी या ठिकाणी उत्तर देणार आहे आणि उर्वरित मुद्यांबाबत लेखी उत्तर पाठविण्याचा प्रयत्न केला जाईल. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचे मी आभार मानतो, त्यांनी या ठिकाणी काल राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलिसांनी यश मिळविले त्याबद्दल पोलीस दलाचे अभिनंदन केले आहे आणि माझेही केले आहे. मला असे वाटते की, एका सुदृढ लोकशाहीमध्ये काही मुद्दे विशेषतः देश हिताचे असतात अशा मुद्यांवर आपण सगळे एकत्रितपणे काम करतो. म्हणून मी या निमित्ताने कालच्या संपूर्ण घटनेमध्ये संयम दाखविल्याबद्दल राज्यातील जनतेचे आणि यामध्ये सहकार्य दिल्याबद्दल विधिमंडळातील सर्व सदस्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात मोठया प्रमाणात चर्चा करण्यात आली आणि मागील आठ महिन्याच्या काळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली आहे अशा प्रकारचे चित्र निर्माण करण्यात आले. मी नेहमी असे म्हणतो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आकड्यांच्या आधारावर आपण फार गोष्टी मांडू नये. ज्यावेळी सातत्याने असा मारा होतो त्यावेळी अशा प्रकारची आकडेवारी द्यावीच लागते. केवळ आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो. जे

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3O.2

SGB/ 21:00

श्री.देवेंद्र फडणवीस.....

महत्वाचे गुन्हे आहेत त्या दृष्टीने जून, 2014 ते जून, 2015 या काळातील तुलना केली तर murder मध्ये minus 197 म्हणजे 197 गुन्हे कमी झाले आहेत आणि rate of detection हा 92.1 टक्के आहे जो आधीपेक्षा वाढला आहे. त्याच प्रमाणे attempt to murder यामध्ये minus 101 म्हणजे गुन्हे कमी झाले आणि rate of detection 97.68 टक्क्यापर्यंत पोहोचला आहे. Dacoity यामध्ये minus 113 आणि याचाही rate of detection 89.40 टक्क्यापर्यंत पोहोचला आहे. तसेच robbery मध्ये minus 312, घरफोडी मध्ये minus 365, riots मध्ये minus 227, hurts मध्ये minus 123, chain snatching मध्ये minus 228, अशा रितीने वेगवेगळया गुन्हयांबाबत हे स्पष्ट होते की, घट झालेली आहे. यातील काही चॅलेंजेस देखील राज्यासमोर निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, मालवणीसारख्या घटनेचा या ठिकाणी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी उल्लेख केला. ही घटना अतिशय गंभीर आहे. इतक्या मोठया प्रमाणात आपल्या राज्यात अशा प्रकारची दारु विकली जाते ती प्राशन करुन इतक्या मोठया संख्येने लोकांचा मृत्यू होतो, यामुळे शासनाने ही बाब गांभीर्यतेने घेतली आहे. याची आपण पाळेमुळे खोदून काढण्याचा प्रयत्न केला. गुजरात राज्यातून ही दारु मुंबईमध्ये येत होती. या ठिकाणी मला तुमच्यावर टाकायचे आणि आमच्यावर घ्यायचे असे नाही. अर्थात यातून आता हे लक्षात येते की, गेली सहा वर्षे या ठिकाणी सातत्याने अशा प्रकारची दारु येत होती. हे नेक्सस आपल्या हातामध्ये आले आहे. ही घटना घडण्याचे मुख्य कारण असे आहे की, मिथेनॉलचे डायल्यूशन करुन खोटी दारु विकली जायची. या केसमध्ये थेट मिथेनॉल देण्यात आले, त्यातून पॉयझनिंग होऊन मोठया प्रमाणात नागरिक मृत्युमुखी पडले. राज्य सरकारने या संदर्भात निर्णय घेतला आहे. या घटनेतील सर्व आरोपींविरुध्द 302 कलमाखालील गुन्हा दाखल केला आहे. ही संपूर्ण केस फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये चालविणार आहोत. थेट एवढ्या लोकांचा खून त्यांनी केला आहे अशा प्रकारचा त्यांच्यावर खटला भरत आहोत. त्यांनी फाशीची शिक्षाच झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी कोर्टापुढे करण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेतला आहे. या सोबत अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून भविष्यात कायद्यात काय सुधारणा करता येतील, आता आपण या केसमध्ये हे प्रूव्ह करु शकतो की, मिथेनॉल दिल्याचे त्यांना माहीत असताना त्यांनी ज्ञात असूनही पॉयझन दिले आहे. म्हणून सर्व आरोपींविरुध्द कलम 302

...3..

31-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3O.3

SGB/ 21:00

श्री.देवेंद्र फडणवीस.....

लावण्याचा निर्णय या केसमध्ये घेऊ शकतो. कदाचित सगळयाच केसेसमध्ये आपण हे कलम लावू शकणार नाही. म्हणून कायद्यात काय बदल करता येतील या संदर्भात गृह विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यावर चर्चा करुन योग्य तेही बदल करण्याची राज्य सरकारची मानसिकता निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, सातत्याने मी गृहमंत्री असल्यामुळे नागपूर शहर फार चर्चेत असते. तेथील गुन्हे वाढले आहेत अशी भूमिका लोक मांडत असतात. अर्थात चूक त्यांची नाही. नागपूरमध्ये काहीही घडले तरी टीव्ही चॅनेल्सना पूर्वी नागपूरमध्ये घटना घडायच्या पण त्या घटना त्यांना प्रमुख वाटायच्या नाहीत. आता नागपूर हे गृहमंत्र्यांचे गाव असल्यामुळे त्यांना नागपूरची बातमी प्रमुख वाटते. कोणतीही घटना घडली की, नागपूरमध्ये कायदा व सुव्यस्थेचा बोजवारा उडाला आहे अशा प्रकारची बातमी त्या ठिकाणी देण्यात येते. म्हणून नागपूरबाबत देखील पाहिले तर मागील जून, 2014 ते जून, 2015 या काळात मर्डरची संख्या 51 होती, आता 39 वर आली आहे, म्हणजे 12 ने घट झालेली आहे. Rate of detection 97.44 टक्के झालेला आहे. त्याप्रमाणे robbery मध्ये minus 103, H.B.T मध्ये minus 23, riots मध्ये minus 24 आहे. त्याचबरोबर chain snatching मध्ये minus 64, इतर offences मध्ये minus 109 आहे. महाराष्ट्र किंवा नागपूर किंवा संपूर्ण राज्यात मेजर वाढ महिलांवरील गुन्हयांमध्ये दिसून येते. 2013 पासून हे सातत्याने दिसते. याचे कारण असे की, 2013 सालापासून आपण या संदर्भात असा निर्णय घेतला की, "free registration of complaints". कम्प्लेंट आली की क्वेश्चन न करता रजिस्ट्रेशन करायचे.

सभापती महोदय, निर्भयाची घटना घडल्यानंतर आपण "रेप" चा स्कोप वाईडन केला. तो स्कोप वाईडन केल्यामुळे मोठया प्रमाणात, पूर्वीच्या डेफिनेशनमध्ये ज्या घटना रेप या संज्ञेमध्ये कदाचित बसल्या नसत्या, आता ही डेफिनेशन वाईडन केल्यामुळे त्या संज्ञेमध्ये त्या बसतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आताच ज्यांचा उल्लेख केला ते राज्याचे माजी गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील यांनी सांगितले होते की, ही डेफिनेशन वाईडन केल्यामुळे सातत्याने हे प्रकार वाढत आहेत. त्यांनी असे सांगितले होते की, समाजामध्ये रेप केसेस वाढणे हे भूषणावह नाही. पण त्याचे रजिस्ट्रेशन होणे अत्यंत महत्वाचे आहे. आपण रेपच्या संदर्भात पाहिले तर दुर्दैवाने 96 टक्के रेपच्या घटना ओळखीच्या व्यक्तीकडून झालेले आहेत. 4 टक्के घटना या अनोळखी व्यक्तीकडून झालेल्या आहेत. याचा

...4...

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अर्थ असा की, ओळखीच्या माणसांकडून रेप होतात आणि समाजाच्या भीतीपोटी, दबावापोटी त्याचे रजिस्ट्रेशन केले जात नाही. आता फ्री रजिस्ट्रेशन झाले, व्याख्या वाढली त्यामुळे जास्त रजिस्ट्रेशन वाढले आहे. जोपर्यंत अशाप्रकारे समाजात बुरख्याआड राहून अशा प्रकारची कृत्ये करणारे लोक एक्सपोज होणार नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर जरब देखील बसणार नाही. म्हणून आपल्या राज्यामध्ये नव्हे तर सर्वच राज्यांमध्ये नवीन डेफिनेशनमुळे रजिस्ट्रेशनमध्ये वाढ होत आहे. जे काही घडते ते समाधानकारक नसले, चुकीचे असले तरी देखील ही वाढ झाल्यामुळे आपण निश्चितपणे याच्या सोल्यूशनकडे जाऊ.

नंतर 3 पी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

आणि समजातील अशा प्रवृत्तींना कायद्याने जरब बसवू शकतो.

सभापती महोय,सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरचा एक विषय मांडला आहे. खरे म्हणजे त्यांनी पंढरपूरसंबधातील जी माहिती येथे दिली ती विसंगत आहे. पंढरपूरच्या पुजेच्या संदर्भात नियम असा आहे की, तेथे तीन पूजा होतात. पहिली पूजा खाजगी होती. मग नित्य पूजा होते. त्यानंतर पाच मिनिटांकरिता मंदिर बंद होते आणि पुन्हा उघडते. मग आषाढीची पूजा होते. ती पूजा मुख्यमंत्री करतात. नित्य पूजा त्या मंदिर समितीचा अध्यक्ष करतो. खासगी पूजेचे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये गेले होते. त्यासंबंधी उच्च न्यायालयाने निर्णय दिला नाही. त्यामुळे ही पूजा करायची किंवा कसे असा प्रश्न निर्माण झाला होता. शेवटी त्यात माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी मध्यस्थी केली आणि त्यांनी सांगितले की, 300 वर्षाची परंपरा आपण सुरू ठेवावी. तो निर्णय सर्वांनी मान्य केला. नित्य पूजा मंदिर समितीचा अध्यक्ष करतो. पण आता मंदिराची समिती नसल्यामुळे समितीचे हंगामी अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असल्यामुळे त्यांनी केली. त्यानंतर पाच मिनिटांकरिता मंदिर बंद म्हणजे गाभाऱ्यातील पडदा बंद करतात. त्यानंतर दीड तास आम्ही पूजा केली. त्या पूजेला आषाढीची मानाची पूजा असे म्हटले जाते. ही पूजा मानाच्या वारकऱ्यासोबत होते. या पुजेच्या वेळी सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर उपस्थित होते. त्याचे थेट प्रक्षेपण देखील झाले. आम्हाला बाहेरच थांबविले आणि कासवावर बसून पूजा करायला लागली असे येथे सांगितले गेले. मी आपणास सांगू इच्छितो की, कुठलीही पूजा करायच्या आधी एक संकल्प सोडावा लागतो. पद्धत अशी असते की, जेव्हा आपण गाभाऱ्यात जातो तेव्हा तेथील जे कासव असते त्याच्या जवळ बसून संकल्प सोडण्यात येतो आणि त्यानंतर मग आत जाऊन पूजा करावी लागते. अशा प्रकारे पूजा झालेली आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना बाहेर ताटकळत ठेवले आणि जिल्हाधिकाऱ्यांनी पूजा केली यात वास्तविकता नाही. एक गोष्ट खरी आहे की, पांडुरंगासमोर सगळेच सारखे आहेत. पांडुरंगाने मनात आणले आणि बाहेरच उभे रहावे असे म्हटले तर बाहेर उभे राहण्यास देखील हरकत नाही. कारण तेथे मानापमान नसतो. पण अशी काही घटना घडलेली नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, येथे शॉक व चेंगराचेंगरी संबंधीचा देखील मुद्दा मांडण्यात आलेला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, मोठी पताका असते. ती पूर्वी बांबूला असायची. मध्यंतरीच्या काळात बांबूची जागा लोखंडी रॉडने घेतली. खांद्यावर घेऊन जाणाऱ्याने ती पताका वर करताच ती वायरला टच झाली व त्यातून करंट लागला. त्यामुळे पताका सोडून ती व्यक्ती गर्दीत ओरडत ओरडत पळाली. त्यामुळे लोकांना वाटले की, काय झाले ? त्यामुळे लोक पळाले आणि चेंगराचेंगरी झाली. यात व्यवस्थेतील कमतरता होती असे काही नव्हते. त्याही संदर्भात माननीय मदत व पुनर्वसन मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी आज घोषणा देखील केली आहे. झालेली घटना दुर्दैवी आहे. त्याच्या पाठीमागचे कारण एवढेच होते.

येथे अनेक गोष्टी मांडलेल्या आहेत. आता क्राईमचा रेट कमी होत आहे. तसा राज्यातील रेट ऑफ कन्व्हीक्शन वाढत आहेत. त्यावर देखील माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी ऑब्जेक्शन घेतले आहे. त्यावर देखील मी बोलणार आहे. मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन 2008 साली 9.4, 2009 साली 9.6, 2010 साली 9, 2011 साली 8.2, 2012 साली 9.4, 2013 साली 13.3 2014 साली 15.2 रेट ऑफ कन्व्हीक्शन होते आणि आता रेट ऑफ कन्व्हीक्शन 32.6 झाला आहे. म्हणजे 8 टक्क्यावरून वाढत हे प्रमाण 32 टक्क्यांपर्यंत गेले. आपण रेट ऑफ कन्व्हीक्शनमध्ये JMFC च्या केसेसचाच दाखवितात असे सांगितले आहे. मुळामध्ये रेट ऑफ कन्व्हीक्शन कसा मोजायचा याची पद्धत एनसीआरबीने ठरविली आहे. ती सगळ्या राज्यात गेल्या दहा वर्षापासून सारखी आहे. त्यात कुठलाही बदल झालेला नाही. आपल्या राज्याच्या केसेसचे वर्गीकरण केले तर असे दिसून येईल की, 96 टक्के केसेस JMFC च्या असतात आणि 4 टक्के केसेस सेशन ट्रायलच्या असतात. त्यामुळे आपण कुठलाही रेट ऑफ कन्व्हीक्शन दाखविला तर तो JMFC चाच जास्त दिसेल. कारण 96 टक्के केसेस ह्या JMFC च्या असतात. त्यामुळे कुठलीही व्याख्या न बदलता जुन्या क्राईम रेकॉर्डप्रमाणेच ज्याप्रमाणे रेकॉर्ड द्यावा लागतो त्याप्रमाणेच आज रेट ऑफ कन्व्हीक्शन 32 टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. तो आपल्याला 50 टक्क्यांपर्यंत न्यायचा आहे. आम्ही सत्तेत आल्यानंतर या संदर्भात 17 जी.आर.काढले आहेत. जे साक्षीदार असतात त्यांच्या संदर्भात काय अडचणी येतात, केस प्रोसेस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

करताना काय अडचणी येतात, चार्जशिट पुट-अप करताना काय अडचणी येतात, फॉरेन्सिक एव्हीडन्स संदर्भात काय अडचणी येतात, अशा अडचणी आपण या 17 जी.आर.च्या माध्यमातून ॲड्रेस केल्या आहेत. त्या माध्यमातून आज सस्टीनेबल रेट ऑफ कन्व्हीक्शन वाढत आहे. तो 50 टक्क्यांपर्यंत जावा अशी आपली अपेक्षा आहे. आपला जो गुन्हा आहे त्याची शिक्षा आपल्याला होत आहे हे जेव्हा गुन्हेगाराच्या लक्षत येते तेव्हाच गुन्हगाराच्या मनामध्ये भय निर्माण होते.

सभापती महोदय, येथे आणखी काही मुद्दे मांडलेले आहेत. येथे कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या संबंधातील एक मुद्दा मांडला आहे. त्यासंबंधी एवढेच आपल्याला सांगतो की, आपण एडीजी,सीआयडीच्या अंतर्गत एक एसआयटी तयार केली आहे. अतिशय गतिमान प्रगती एडीजी,सीआयडी यांनी केलेली केलेली आहे. निश्चित दिशेने ते जात आहेत. जो कोणी यातील खुनी असेल त्याच्या पर्यंत लवकरच ही एसआयटी पोहचेल. मी आपल्याला आश्वस्त करतो की, तो कोणी असो, कुठल्या जातीचा असा, धर्माचा असो, पंथाचा असो, विचारांचा असो, राज्य सरकार आणि सीआयडी पोलीस निश्चितपणे पकडेल. त्या दिशेने वाटचाल सुरू झालेली आहे. काही लिडस मिळत आहेत. सगळ्या गोष्टीचा खुलासा येथे केला तर त्याचा तपासावर परिणाम होईल. काही लोक यासंबंधी वाच्यता देखील करीत आहेत. त्यांनाही माझा सल्ला असा आहे की, अशा प्रकारची वाच्यता केल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे कन्फ्युजन तयार होते आणि त्याचा फायदा हा गुन्हेगाराला मिळतो. यामध्ये राज्य सरकार निश्चितपणे उचित काम करेल हे मी या निमित्ताने सांगतो.

पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यासंदर्भात आपण नुकतीच एक बैठक घेतलली आहे. एका महिन्याच्या आत त्यांच्यासमोर मसुदा ठेवणार आहोत. पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यासंबंधी सदनातील सर्वच सन्माननीय सदस्य हे सेन्सेटीव्ह आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मला पत्र लिहून तशी मागणी देखील केली आहे. तेव्हा यासंदर्भातही आपण लवकर कारवाई करणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

एमएमआरडीएच्या लेखा परीक्षणासंबंधातील एक विषय मांडण्यात आला आहे. एमएमआरडीएचे लेखा परीक्षण हे दरवर्षी होतेच. महापालिकच्या संदर्भातही लेखा परीक्षण हे दरवर्षी करावेच लागते. लेखा परीक्षण हे होतेच. विशेष आढळले तर विशेष लेखा परीक्षण करू. अद्याप विशेष काही आढळलेले नाही. त्यामुळे श्री.तटकरे साहेब आपण काही विशेष आणले तर..... (अडथळा)..... आपण आमच्या दृष्टीने पहावे. विशेष काही आढळले तर त्याला विशेष लेखा परीक्षण करायला कोणाची ना असण्याचे कारण नाही. अद्याप फारसे समोर काही आलेले नाही.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. ते मांडत असताना त्यांनी माझी एक सोय केली आहे. त्यांनी शेवटी हे सांगितले की, माझ्या मुद्यांना लेखी उत्तर दिले तरी चालेल. त्यामुळे मी त्याच्या फार खोलात जात नाही.

सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर यांनी अनेक गोष्टी मांडल्या आहेत. त्यातील एकच विसंगती आपल्या लक्षात आणून देत आहे. आपण मला प्रश्न विचारला की, दाभोळकर यांच्या हत्येचे प्रकरण सीबीआयकडे सोपविले. म्हणजेच राज्याच्या पोलीस यंत्रणेमध्ये क्षमता नाही. हे प्रकरण सीबीआयकडे मी सोपविले नाही. ज्यावेळी आपले सरकार होते त्यावेळी हायकोर्टात मागणी झाल्यामुळे आपल्या सरकारच्या काळामध्ये हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्यात आलेले आहे. पोलिसांवर अविश्वास म्हणून त्यावेळच्या आपल्या सरकारने हे प्रकरण सीबीआयकडे सोपविले नाही, तर हाय कोर्टात त्यासंबंधी मागणी करण्यात आली. हाय कोर्टामध्ये राज्य सरकारने कमिटमेंट केले की, आम्ही हे प्रकरण सीबीआयकडे सोपवू. म्हणून ते प्रकरण सीबीआयकडे सोपविण्यात आलेले आहे. राज्याचे पोलीस देखील पूर्णपणे सक्षम आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वि.स.वि.क्रमांक 32

सभापती महोदय, 2010 याच्या आधी महापालिका रेटेबेल व्हॅल्यूने टॅक्स गोळा करीत होती . 2010 नंतर आपण कॅपिटल व्हॅल्यूला शिफ्ट झालो त्यावेळी 40 टक्के वाढ झाली. यामध्ये प्राधान्याने 500 चौरस फुटापेक्षा कमी असणारे काही फ्लॅट आहेत.

कारखाने विधेयक...

सभापती महोदय, कारखाने अधिनियम 1948 मध्ये 3-4 छोट्या सुधारणा आपण सुचविल्या आहेत. विद्युत वापराविना जेथे दहा कामगार काम करीत असतात त्याच्यावर कामगारांना काम करावयाचे असेल तर अनुमती घ्यावी लागत होती. आता आपण दहा ऐवजी 20 करीत आहोत. विजेचा वापर करून कारखाना सुरू असतात त्यांची अनुमती 20 पर्यंत होती ती आता 40 करण्यात आली आहे. अशाने 14300 कारखान्यांमध्ये कामगारांना रोजगार उपलब्ध होईल. 75 ऐवजी 115 तास ज्यांनी काम केले आहे त्यांना ओव्हर टाईम देण्याचा निर्णय या कामगार कायद्याच्या सुधारणेनुसार करीत आहोत. कामगारांनी 240 दिवस भरले तरच त्याला पगार मिळून त्याला रजा मिळत होती. 240 कमी करून 90 दिवसांवर आणून भर पगारी रजा मिळेल अशी तरतूद करण्यात आली आहे. महिलांना स्वेच्छेने रात्रपाळीत काम करावयाचे असेल तर सर्वोच्च न्यायालयाने महिलांच्या सुरक्षिततेच्या संबंधात ज्या अटी घालून दिल्या आहेत त्याची ज्यांनी पूर्तता केली आहे अशा युनिटमध्ये महिलांना रात्र पाळीत काम करण्याची सूट मिळावी अशा प्रकारचे हे विधेयक आहे. खंड 2 ते 9, व

वि.स.वि.क्र.35

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय,

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ....

म्हणून ते सोपवलेले आहे. राज्याचे पोलीस पूर्णपणे सक्षम आहेत. राज्य सरकारने नवीन रेट कॉन्ट्रॅक्ट का केले नाही ? असा मुद्दा आपण उपस्थित केला होता. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आम्हाला आता रेट कॉन्ट्रॅक्टचा बिझनेस हळू हळू समाप्त करावयाचा आहे. यासंदर्भात राज्य सरकारने 17 एप्रिलला निर्णय केला असून आज माननीय उद्योग मंत्र्यांनी त्यासंदर्भात निवेदन केले असून त्यासंदर्भात नवीन पर्चेस पॉलिसी तयार केली आहे. नवीन पर्चेस पॉलिसीमुळे चांगल्या प्रकारची खरेदी होऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यांची भरती एमपीएससी थ्रू का केली जात नाही ? असा मुद्दा उपस्थित केला असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यामध्ये कन्फ्यूजन असे झाले आहे की, आतापर्यंत कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती एमकेसीएलच्या माध्यमातून केली जात होती परंतु यावेळेस नगरविकास विभागाने एमकेसीएलच्या ऐवजी दुसऱ्या कंपनीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांची भरती केली व त्यामुळे कन्फ्यूजन असे झाले. यामुळे जणू काही एमपीएससीच्या जागी कंत्राटी नेमले गेले की, काय. अगोदर जशी रुटीन भरती होती तशीच भरती केली जात आहे. परंतु यामध्ये कन्फ्यूजन क्रिएट झाल्यामुळे मी सन्माननीय सचिवांना असे निर्देश दिले की, आपण यासंदर्भात सर्वांशी चर्चा करा व कोणाच्या मनात शंका असेल तर ती दूर करा व त्यानंतरच ही कारवाई करा.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी काही मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले असून मी सर्व मुद्यांच्या खोलात जाणार नाही. परंतु त्यांनी वाळू माफीयाच्या संदर्भात एक मुद्दा मांडला असून वाळू माफियाच्या संदर्भात अतिशय कडक कायदा सन्माननीय महसूल मंत्र्यांनी या ठिकाणी मांडला आहे. सन्माननीय सदस्यांनी एमपीआयडीच्या संदर्भात या ठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आता एमपीआयडीच्या अंतर्गत पहिल्यांदा एनएससीएल मध्ये जो मोठा घोटाळा झाला होता त्यामध्ये आपण 6 हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. आपण आता त्याच्या विक्री पर्यंत येऊन पोहचलो असून त्यातून आपण लोकांना पैसे परत करु शकू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी काही मुद्दे मांडले आहेत. त्यांनी मांडलेल्या मुद्यांची माहिती त्यांना लेखी स्वरुपात दिली जाईल तसेच त्यांच्या घरी गेल्यानंतर त्या मुद्यांच्या संदर्भातील माहिती त्यांना समजावूनही सांगेन तसेच त्यांनी मांडलेल्या मुद्यांचे नेमके उत्तर काय हे सुध्दा समजावून सांगेन. त्यामुळे सन्माननीय सदस्यां माझे म्हणणे मान्य करतील असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनीही काही मुद्दे मांडले असून त्यांनी फेसबूक व व्हॉटस ॲपच्या माध्यमातून चुकीच्या पध्दतीने माहिती पोस्ट केल्या जातात असा मुद्दा मांडला आहे. त्यांनी महत्वाचा मुद्दा मांडलेला असून त्यासंदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, त्यांनी मांडलेला मुद्दा बरोबर असून यासंदर्भातील सर्व्हर परदेशात असल्यामुळे त्यावर फार मोठी कारवाई आपल्याला करता येत नाही. परंतु नुकतीच राज्य सरकारने आपली सायबर कॅपिसिटी वाढवण्याचा प्रयत्न सुरु केला असून त्यामाध्यमातून आपण मोठया प्रमाणात 1000 लोकांची सायबर टिम तयार करीत आहोत व त्यामाध्यमातून आपला काम करण्याचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसेन यांनी अजामिनपात्र गुन्हयातील गुन्हेगार जामिनावर फिरत आहेत असा मुद्दा उपस्थित केला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, हा गंभीर मुद्दा आहे. शेवटी जामिन कोर्ट देत असते. अशा काही गोष्टी असतील तर या गोष्टी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास निश्चितपणे आणून देता येतील.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी महिलांवरील अत्याचाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचा उल्लेख केला आहे. परंतु गुन्हयांची वाढ का झालेली आहे याची माहिती मी यापूर्वीच दिलेली आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. हरिसिंग राठोड यांनी मालवणीचा मुद्दा मांडला असून या मुद्याचेही उत्तर मी अगोदरच दिले आहे. 288 आश्रमशाळांचा पगार झाला नाही असा विषय त्यांनी मांडला असून यासंदर्भात मी निश्चितपणे माहिती घेऊन त्यावर निर्णय करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर साहेबांनी ब्रिमस्टोवॅर्डच्या संदर्भात मुद्दा मांडलेला आहे. आपल्याला कल्पना आहे की, या प्रकल्पाच्या अंतर्गत वेगवेगळी कामे केली जात असून त्यामध्ये आपण पंपीग स्टेशन्स करीत आहोत, मल वाहिन्याही बदलवित आहोत. यातील चार स्टेशन्सचे काम आपण पूर्ण केले आहे. दोन स्टेशनचे काम 2016 पर्यंत पूर्ण होणार आहे. दोन स्टेशनच्या संदर्भातील जागा आता आपल्याला प्राप्त होत असल्यामुळे ती अधिग्रहण करावी लागणार आहे. ही जागा अद्याप हातामध्ये आलेली नाही. परंतु हे कामही वेगाने झाले पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आपण करीत आहोत. तसेच सन्माननीय सदस्यांनी कोस्टल रोडची रुपरेषा माहिती नाही असा मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात मी आयुक्तांना असे निदेश दिले आहेत की, आपण कोस्टल रोडचा जो आराखडा तयार केला आहे तो पब्लिक डोमेनमध्ये टाका व त्यावर जनतेला आपले म्हणणे मांडू द्या. त्याप्रमाणे कोस्टल रोडची रुपरेषा आता पब्लिक डोमेनमध्ये टाकण्यात आली असून सदर रुपरेषा आता जनतेसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यासंदर्भात जनेतेचे सजेशन्स,ऑब्जेक्शन्स आल्यानंतरच तो फायनल केला जाईल व त्यानंतर अंतिम आराखडा फायनल केला जाईल. आपण आरोग्य विभागाच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित केला आहे ती गोष्ट खरी आहे. मुंबईच्या सरकारी दवाखान्यावर मुंबईच्या व्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्राचा किंवा संपूर्ण देशाचा लोड येत असल्यामुळे सरकारी दवाखान्यांना अधिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. आरोग्य विभागाच्या संदर्भात आपण चांगली सूचना मांडलेली आहे.

सभापती महोदय, सभागृहाने या ठिकाणी जे मुद्दे मांडले त्यामुळे मी सभागृहाचे आभार मानतो. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चांगली राखण्याकरिता पोलीस प्रयत्न करीत आहेत, चांगल्या प्रकारे मेहनत करीत आहेत. त्यांच्या मेहनतीतून अनेक चांगल्या गोष्टी होत आहेत. या निमित्ताने मी सभागृहाच्या सर्व सदस्यांना विनंती करतो की, राज्याचे काम अधिक चांगले झाले पाहिजे अशी आपली जी भावना आहे त्या भावनेची आम्ही दखल घेतो आणि आपल्या सूचनांचा आदर करुन त्या अधिक चांगल्या करण्याचा आम्ही प्रयत्न करु एवढेच या ठिकाणी सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेवर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले असून त्यांनी महिलांवरील अत्याचाराच्या गुन्हयांची नोंद अधिक प्रमाणात होत असल्यामुळे महिलांवरील गुन्हे जास्त प्रमाणात दिसून येतात अशी माहिती या ठिकाणी दिलेली आहे. परंतु एक वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही की, गेल्या काही महिन्यात महिलांवरील गुन्हयांमध्ये खूप मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. मुख्यंत्र्यांनी गुन्हयांची आकडेवारी दिली, कन्व्हीक्शन रेट सांगितला, तीन वर्षापूर्वी, दोन वर्षापूर्वी, एक वर्षापूर्वी नेमके किती गंभीर गुन्हे घडत होते आता त्याचे प्रमाण घटल्याचीही त्यांनी माहिती दिली आहे परंतु या ठिकाणी मी आकडेवारीचा उल्लेख केला नसल्यामुळे मी त्याच्या खोलात जाणार नाही. परंतु एक बाब आपल्याला मान्य करावी लागेल की, अलीकडच्या काळात महिलांवरील व बालिकांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या घटनेमध्ये वाढ झाली आहे. या निमित्ताने माझी माननीय मुख्यमंत्र्यांना एवढीच विनंती आहे की, या गुन्हयांमध्ये कठोर कारवाई करण्याबाबत पोलीस दलाने एखादी गोष्ट मनामध्ये घेतली तर कारवाई निश्चितपणे होऊ शकते हे मी माझ्या भाषणात वारंवार सांगितले होते व पुन्हा एकदा सांगतो की, पोलिसांच्या मनात आत्मविश्वास, मनोबल असले आणि एखाद्या बाबतीत काम करण्याची इच्छाशक्ती असली तर गुन्हेगारांवर जरब बसविता येऊ शकते. आज समाजामध्ये अशा प्रकारची जरब निर्माण करण्याची आवश्यकता आहे असे आपण या ठिकाणी सांगितले आहे. परंतु याला कायद्याची सांगड घालण्याची आवश्यकता असून तशा प्रकारची सांगड घातली जावी अशी अपेक्षा आहे. आपण मघाशी सांगितले आहे की, आपण एखादी बाब आपल्या नजरेसमोर आणली नाही तर त्याबाबतीत आपल्याला काही बोलता येत नाही, आपले अवघड जागेच दुखणे असल्यामुळे निर्णय घेता येत नाही याबाबतीत मला निश्चितपणे जाणीव आहे. परंतु माझी आपल्याला विनंती आहे की, श्वेतपत्रिका प्रसिध्द करायला आपले काय जाते ? मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून घेतलेली कामे पुर्णत्वास जात असतांना त्यांच्या असलेल्या त्यावेळच्या किंमती, आज असलेल्या किंमती त्यांचा स्टेटस आपल्या नजरेसमोर येण्यामध्ये गैर काय आहे ? मी केवळ मुंबई महानगरपालिका म्हटले नाही तर एमएमआरडीएच्या बाबतीत सुध्दा उल्लेख केला आहे. एमएमआरडीए 15 वर्षे आमच्याच ताब्यात होती त्यामुळे एमएमआरडीएच्या संदर्भातील श्वेतपत्रिका काढण्यामध्ये काही गैर आहे असे वाटत नाही. परंतु एकदा यासंदर्भातील माहिती नजरेसमोर येण्याची आवश्यकता आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

एकंदरित पयाभूत सुविधा किती झाल्या, त्याचा फायदा नेमका किती झाला, फायदा होत असताना काही गोष्टीमध्ये गैरप्रकार झाले काय ही सर्व माहिती एकदा नजरेसमोर येण्याची आवश्यकता असून त्यासंदर्भातील चर्चा त्या माध्यमातून त्या वेळेला करता येईल. आपल्या मनात विशेष लेखा परीक्षण करावयाचे असेल.....आपण ते लावलेले आहे. मी एवढेच म्हटले आहे की, आपली राजकीय इच्छाशक्ती प्रबळ असेल तर आपण ते करु शकता. नसेल तर त्याला इलाज नाही. कारण काही वेळेला काही गोष्टी अडचणीच्या होतात, त्यामुळे आपल्याला सावरुन घ्यावे लागते. आणि ते सावरुन घेण्यामध्ये आपण खूप माहीर असल्यामुळे ....ठीक आहे. माहीर शब्द मागे घेतो. आपण सावरुन घेण्यामध्ये खूप तरबेज असल्यामुळे त्याही गोष्टी होत असतात. त्यामुळे एमएमआरडीए, महानगरपालिकाच्या संदर्भातील श्वेतपत्रिका प्रसिध्द करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री घोषणा करतील काय एवढीच माझी राईट ऑफ रिप्लायच्या माध्यमातून विनंती आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थाची स्वायत्तता असते. त्यांच्या स्वायत्ततेमध्ये राज्य सरकारने फार ढवळाढवळ करणे योग्य नाही. परंतु एक गोष्टी निश्चितपणे सांगू इच्छितो की, जे प्रमुख प्रकल्प आहेत त्यांच्या संदर्भात मग एमएमआरडीए असो किंवा महानगरपालिका असो त्यांच्या प्रकल्पाच्या मुळ किंमती काय आहेत, आताच्या किंमती काय आहेत, त्यामध्ये कितीने वाढ झाली आहे यासंदर्भात एमएमआरडीएची माहिती आपण अहवालामध्ये मांडतच असतो. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या संदर्भात सीएजीचा अहवाल आपल्याकडे येतो त्यामध्ये महानगरपालिकेच्या संदर्भातील माहिती मांडलेली असते. परंतु तरी सुध्दा आपण काही विशिष्ट प्रकल्पाच्या संदर्भात माहिती मागवली तर ती माहिती निश्चितपणे देण्यात येईल.

सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी राज्यातील विनाअनुदानित शाळांतील हजारो शिक्षक दहा-बारा वर्षे पगाराविना असणे यासंबंधी नियम 97 अन्वये उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चेसंबंधी

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये "राज्यातील विनाअनुदानित शाळांतील हजारो शिक्षक दहा-बारा वर्षे पगाराविना असणे यासंबंधी" उपस्थित केलेली चर्चा आजच घ्यावी असे सांगितले होते. या विषयावर सविस्तर चर्चा होण्यासाठी पुढील अधिवेशनात या चर्चेयसाठी वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेचे उत्तर मंत्री महोदयांनी लेखी स्वरूपात द्यावे आणि ही चर्चा पुढील अधिवेशनात घ्यावी.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेला मंत्री महोदयांनी लेखी उत्तर द्यावे व या विषयावरील तपशीलवार चर्चा नागपूर अधिवेशनात करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली होती. आपण त्यावर निवेदन करण्याचे निर्देश दिले होते त्यानुसार निवेदन करण्यात आलेले आहे. तेव्हा माझे तेच लेखी उत्तर समजावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांची अशी उत्तर देण्याची पद्धत योग्य नाही. नियम 97 खालील अल्पकालीन चर्चा वेगळी असते आणि नियम 93 अन्वये दिलेली सूचना वेगळी असते. मंत्री महोदयांची चर्चा करण्याची इच्छा असेल तर आपण या विषयावर चर्चा करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला सरंक्षण मिळाले पाहिजे. माझे एवढेच म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. तत्पूर्वी त्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्या संदर्भात लेखी निवेदन करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करताना काही म्हणणे मांडले तर त्याचे उत्तर मी देऊ शकतो. ते जर बोललेच नाही तर मी कोणते उत्तर देणार या अर्थाने मी वरीलप्रमाणे म्हटले आहे. नियम 93 अन्वये दिलेली सूचना आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या सूचनेतील विषय साधारणतः सारखाच आहे. परंतु भाषण करताना वेगळे मुद्दे उपस्थित होऊ शकतात, ज्या वेगळ्या मुद्यांचा आम्हाला उपयोग होऊ शकतो. त्याची उत्तरे मी देऊ शकतो असे मला म्हणावयाचे आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आज सभागृहाची बैठक सकाळी 9.30 वाजता सुरु झाली आणि आता रात्रीचे 9.30 वाजले आहेत. साधारणतः बारा तास सभागृहाची बैठक सुरु आहे म्हणून माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक चांगली सूचना केली. नियम 97 अन्वये चर्चा झाल्यास त्यावर मंत्री महोदय चांगले उत्तर देतील यामध्ये आमच्या मनात शंका नाही. मंत्री महोदयांच्या विद्वत्तेबद्दल व ज्ञानाबद्दल आमच्या मनात कोणतीही शंका नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेमध्ये जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्यास लेखी उत्तर मिळावे आणि नागपूरच्या अधिवेशनात त्या चर्चेसाठी वेळ द्यावा एवढीच आमची विनंती आहे.

सभापती : मी महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेच्या संदर्भात माझ्या कार्यालयात कोणतीही चर्चा झालेली नाही. परंतु माझ्या कार्यालयात जे काही घडते ते आपल्याला कसे कळते याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले तर मी आपला आभारी राहीन.

शिक्षण मंत्री महोदयांनी सांगितले की, नियम 93 च्या सूचनेवर जे निवेदन केलेले आहे तेच लेखी समजावे, त्यास पुन्हा उत्तर देऊ इच्छित नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेसंबंधी त्यांचे काही आक्षेप किंवा त्यांना जी काही चर्चा करावयाची आहे ती लेखी स्वरुपात मंत्री महोदयांकडे द्यावी. मंत्री महोदयांनी त्यांचे लेखी उत्तर सन्माननीय सदस्यांना द्यावे. सन्माननीय सदस्यांचे लेखी उत्तराने समाधान झाले नाही तर मी माझ्या अधिकारात नागपूरच्या अधिवेशनात सन्माननीय सदस्यांना स्पेशल जस्टीस देऊ शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या सूचनांची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दर्शविण्यात आलेली व प्रलंबित असलेली नियम 93 अन्वयेची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली निवेदने छापावीत)

.4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहापुढील उर्वरित कामकाजाबाबत</u>

सभापती : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आजच्या कामकाजपत्रिकेवरील उर्वरित कामकाज आता होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र विधानपरिषद द्वितीय (पावसाळी) अधिवेशन, 2015

दिनांक 13 जुलै, 205 ते 31 जुलै, 2015

या सत्रकाळातील कामकाजासंबंधीची सांख्यिकीय माहिती

पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या	-	14			
प्रत्यक्षात झालेले कामकाज	-	65	तास	01	मिनिटे
मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ	-	1	तास	00	मिनिटे
अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ	-	8	तास	28	मिनिटे
रोजचे सरासरी कामकाज	-	4	तास	39	मिनिटे

तारांकित प्रश्न

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 4323 स्वीकृत प्रश्न - 1307

सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न- 44 आहे. याचा सर्व सन्माननीय सदस्यंनी गांभीर्याने विचार करावा एवढेच मी नमूद करतो.

नियम 93 च्या सूचना

प्राप्त झालेल्या सूचना - 122 स्वीकृत सूचना - 54 निवेदन झालेल्या सूचनांची संख्या -27

औचित्याचे मुद्दे - 76 मांडण्यात आलेल्या सूचना - 33

लक्षवेधी सूचना

प्राप्त झालेल्या सूचना -1584 मान्य झालेल्या सूचना - 252 चर्चा झालेल्या सूचना -48

विशेष उल्लेख - प्राप्त झालेल्या सूचना -279, मांडण्यात आलेल्या सूचना -53

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा-

एकूण प्राप्त झालेल्या सूचना- 5, मान्य झालेल्या सूचना-4, चर्चा झालेल्या सूचना-1

नियम 46 अन्वये - 24 निवेदने करण्यात आली.

नियम 47 अन्वये - 1 निवेदन करण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

<u>शासकीय विधेयके</u> -

विधानपरिषद विधेयक - पुर:स्थापित करण्यात आलेली संख्या - 4

विधानपरिषद विधेयके - संमत केलेल्या विधेयकांची संख्या - 3

विधानसभा विधेयके - पारित केलेल्या विधेयकांची संख्या - 16

अशासकीय विधेयके- प्राप्त झालेल्या सूचना - 10

स्वीकृत सूचना - 3

विचारार्थ- 0

नियम 260 अन्वये - 2 प्रस्तावावर चर्चा झाली.

<u>अशासकीय ठराव</u> -

एकूण प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या - 182, स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - 171

चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - 0

शासकीय ठराव- सूचनांची संख्या- 0

<u>अर्धा तास चर्चा</u> - प्राप्त सूचनांची संख्या 140

मान्य झाल्या 84, चर्चा झाली 00

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

या सत्र कालावधीत सन्माननीय सदस्यांच्या सभागृहाशी संबंधित कामकाजासाठी विधिमंडळाच्या वतीने सभागृहामध्ये प्रथमच वाय-फाय ही अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे त्याचा लाभ सर्व सन्माननीय सदस्यांनी घेतला असेल, असा मला विश्वास वाटतो.

नागपूर अधिवेशनामध्ये या दोन्ही सदनाचे चॅनेल सुरु करीत आहोत, याची आपण नोंद घ्यावी. आपल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल, मंत्रिमंडळाच्या सहकार्याबद्दल मी आपला आभारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

सभापती : मी खालील घोषणा करतो :-

महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार दिनांक 07 डिसेंबर, 2015 रोजी विधानभवन नागपूर येथे घेण्यात येईल.

पृ.शी./मु.शी.: सत्र समाप्तीची घोषणा.

सभापती : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे, आता मी सत्र समाप्ती संबंधीचा राज्यपालांचा संदेश वाचून दाखवितो.

"मी.चे.विद्यासागर राव महाराष्ट्राचे राज्यपाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174 खंड (2) उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याद्वारे शुक्रवार दिनांक 31 जुलै, 2015 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबर महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

(रात्री 9 वाजून 38 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही